CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीभक्तिविजय कथासार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi.

डॉ.ज्ञानेश्वर तांदळे

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

९३

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

॥ ॐ श्री परमात्मने नमः ॥

श्रीभक्तिविजय कथासार

महिपती ताहराबादकर विरचित भक्तिविजय ग्रंथाचा संपूर्ण गद्य कथासार. प्रासादिक, सुबोध, रसाळ भावार्थ, आबालवृद्ध सर्वांना उपयोगी संग्राह्य ग्रंथ.

संकल्पक, संपादक व अनुवादक

(विद्यावाचस्पती) डॉ. ज्ञानेश्वर तांदळे

एम.ए., पीएच्. डी. (मराठी), पंडित (हिंदी), आचार्य (हिंदी)

मूल्य : ४० रुपये

अमोल प्रकाशन, पुणे ३०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीभक्तिविजय कथासार

• प्रकाशक •

संजय शिवाजीराव काकडे

अमोल प्रकाशन

श्री केशव अपार्टमेंट, ४९८ ब नारायण पेठ,

पत्र्यामारुतीसमोर, पुणे ४११ ०३०.

फोन - २४४३९९९१, २४४३३९९०

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ती : २००२

नवीन आवृत्ती : २००५

• मुखपृष्ठ •

रमेश भारताल

• रेखाचित्रे •

विनोद क्षीरसागर

• अक्षरजुळणी •

का. वि. शिगवण

'अक्षरवेल'

सी १८, प्लॉट नं. ५७२, दत्तवाडी, पुणे ३०.

• मुद्रक •

मुद्रारेखा

शिवाजीनगर, पुणे ५.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अनुक्रमणिका

अध्याय	विषय	पृष्ठ
	प्रस्तावना	५
१.	भक्तांचे अवतारकार्य....	९
२.	संत जयदेव....	१२
३.	संत तुलसीदास....	१५
४.	संत नामदेव	२२
५.	संत कबीर	२६
६.	संत कमाल	२९
७.	संत कबीर व गुरू रामानंद	३२
८.	विठ्ठलपंत व रामानंद स्वामी	३५
९.	संत ज्ञानेश्वर	३७
१०.	संत नामदेव व संत ज्ञानेश्वर तीर्थयात्रा	४२
११.	संत कबीरांची वाण्यावर कृपा	४६
१२.	संत नामदेवांच्या हातून घडलेले चमत्कार	५०
१३.	संत नामदेवांचे व्रतोद्यापन	५४
१४.	पांडुरंगाची प्रायश्चित्ताची कथा.	५७
१५.	पांडुरंगाचे चतुर्भुज दर्शन.	६०
१६.	भक्त कूर्मदास व संत सावता माळी.	६२
१७.	संत राका कुंभार व संत गोरा कुंभार	६६
१८.	संत नामदेव व परिसा भागवत	७४
१९.	भक्त नागनाथ	७९
२०.	भक्त जोगापरमानंद, संत नरहरी सोनार, संत नामदेव परीक्षा...	८२
२१.	संत जनाबाई	९१
२२.	संत ज्ञानेश्वर व योगी चांगदेव	९६
२३.	संत चोखामेळा, संत कबीर व जीवा तत्त्वा यांच्या कथा...	१०१
२४.	संत कबीर कथा	१०५
२५.	संत रोहिदास	१११
२६.	पिपाजी राजाची कथा.	११४
२७.	संत नरसी मेहता.	११७
२८.	संत नरसी मेहताच्या मुलाचे लग्न	१२०

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय	विषय	पृष्ठ
२९.	संत नरसी मेहतांची हुंडी	१२४
३०.	संत नरसी मेहतांची श्रीकृष्ण भक्ती	१२६
३१.	रामदासांची भक्ती व देवाचे आगमन	१३०
३२.	निराधारी ब्रह्मचारी	१३३
३३.	संत सूरदास	१३७
३४.	संत सेनामहाराज	१४२
३५.	सात्विक राजा व कर्माबाई यांच्या कथा	१४३
३६.	जन जसवंत, सूरदास मदनमोहनची कथा.	१४८
३७.	भक्त रसिकमुरार	१५३
३८.	संत मीराबाई	१५८
३९.	संत कान्होपात्रा	१६२
४०.	भक्त दामाजी	१६६
४१.	शांत ब्राह्मणी राजाची कथा	१६९
४२.	संत भानुदास	१७३
४३.	रामराजाची कथा	१७७
४४.	बहिरंभटाची कथा	१८२
४५.	संत एकनाथ	१८५
४६.	नाथांच्या घरी देव पाणी भरी	१९०
४७.	संत रामदास स्वामी	१९५
४८.	संत तुकाराम	२००
४९.	संत तुकारामांच्या पत्नीला रुक्मिणी मातेचे दर्शन.	२०५
५०.	पंगतीला बसून श्री गणेशाचे भोजन...	२०९
५१.	संत तुकाराम व विठ्ठलरुक्मिणी भेट.	२१४
५२.	संत तुकारामांचे अभंग पाण्यातून वर आले....	२२०
५३.	माणकोजी बोधला...	२२६
५४.	पांडुरंगाने केलेला चमत्कार...	२३४
५५.	गणेशनाथ, केशवस्वामी, गोमाई व लतिबशाह.....	२३८
५६.	संतोबा पवार, संत निळोबा व उद्धव	२४९
५७.	भक्त विसोबा सराफ	२५७
	समारोप....	२६१
	आरती भक्तीविजयाची.....	२६२
	नामस्मरण.....	२६४

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

।। ॐ श्री परमात्मने नम: ।।

प्रस्तावना

हे विश्व देवाने निर्माण केले आहे. त्याच्या सत्तेने साऱ्या विश्वाला चालना मिळते. त्याने मानव हा श्रेष्ठ प्राणी निर्माण केला. पृथ्वीवर राहून मानवाला आनंदाचा अनुभव घेता यावा, म्हणून त्याने मानवाची निर्मिती केली. ज्या ज्या वेळी धर्माला ग्लानी येते, त्या त्या वेळी तो अवतार घेऊन अधर्माचे निखंदन आणि धर्माचे उत्थान घडवित असतो, आपल्या भक्तांचा सांभाळ करीत असतो.

मानवी जीवन हे सात्विक, राजस, तामस या तीन गुणांच्या आधारे वाढत असते. समाजामध्ये तामस गुण वाढला की संघर्ष होऊ लागतो. सात्विक गुण वाढू लागले की पृथ्वीचे नंदनवन होते. सात्विक गुणांचे संरक्षण व संवर्धन व्हावे म्हणून ईश्वरच निरनिराळ्या ठिकाणी संतांची योजना करीत असतो व त्यांच्या आधारे मानवी जीवनाचे उन्नयन करत असतो.

जगात अनेक ठिकाणी संत होऊन गेले आहेत. आजही आहेत व उद्याही होणार आहेत. संत हेच मानवी जीवनाच्या दिशा आहेत. जगातील विविध भाषांतून संतांनी निरनिराळ्या प्रकारच्या साधना सांगितल्या आहेत; आणि तत्कालीन परिस्थिती पाहून आपल्या कोमल आणि विमल वाणीने मानवाच्या अंत:करणातील विवेकाचा दीप प्रज्वलित केला आहे. त्या दीपाच्या आधारे मानवाला जीवन आनंदाने जगणे सुलभ झाले आहे. जगातील सर्व संतांचे विचार महत्त्वाचे आहेत. समाजाने त्या विचारातील प्रधान समान सूत्रे एकत्र करून 'एकमेका सहाय्य करू। अवघे धरू सुपंथ' या पद्धतीने जीवनाची वाटचाल केली पाहिजे.

मानव हा फक्त अन्न, वस्त्र, निवारासाठी जीवन जगत असतो. त्यामुळे त्याच्यातील देवत्व त्याला प्रकट करता येत नाही. आपण कोणत्याही प्रकारे कितीही उत्तम पद्धतीने प्रपंच सुखी करण्याचा प्रयत्न केला तरी तो होऊ शकणार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाही. संपत्तीच्या आधारे आपण घरामध्ये विविध वस्तू आणू शकतो, घराला सजवू शकतो; परंतु शांती, समाधान, आनंद हे संपत्तीच्या आधारे बाहेरून विकत आणता येत नाही.

जीवनाचा खरा अर्थ समजावून घेण्यासाठी संतांच्या विचारांचे वाचन केले पाहिजे. तसेच त्या अनमोल विचारांचे मनन, चिंतन करणे आवश्यक आहे. संतांनी आपल्या आतमध्ये असणाऱ्या जीवाचे खरे स्वरूप समजावून सांगितले आहे. जीव हा परब्रह्माचा अंश आहे, तसेच आपल्या अवतीभोवती पसरलेले संपूर्ण विश्व हाही परब्रह्माचा आविष्कार आहे. आपल्या जीवाचे खरे स्वरूप आपण जाणले की अवतीभोवती असणाऱ्या साऱ्या विश्वाशी एकरूपता साधता येते. या विश्वाच्या पलीकडे संपूर्ण विश्वाला एका अंशाने धारण करणारा परमात्मा आहे. त्याचा अनुभव कसा घ्यावा ? हे संतांनी आपणाला शिकवले आहे. म्हणजे जीव, जगत्, जगतात्मा यांची पूर्ण ओळख जगातील संतांनी मानवाला करून दिली आहे.

समाजाला सन्मार्गाचा उपदेश करीत संतांनी भ्रमंती केली. चमत्कार करत राहणे हे संतांचे कार्य नव्हे. काही वेळेला देवानेच संतांच्या हातून चमत्कार घडवले; परंतु ते काही कारणाच्या निमित्ताने घडलेले चमत्कार होते. जगातील सर्व संतांनी आपल्यातील काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सराला हृदयातून घालवून टाका अशी शिकवण दिली आहे. जो मानव या सहा गोष्टी जिंकू शकेल त्याच्यातील देवत्व निश्चितपणे विकसित होऊ शकेल. हे सहा महाशत्रू कसे जिंकावेत ? हे संतांनी आपल्या ग्रंथांमध्ये कथित केले आहेत.

संतांनी जीवनामध्ये ज्या श्रद्धा जोपासल्या, त्याचा विचार आपणास कळणे आवश्यक आहे. यासाठी संतांच्या चरित्रांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. संतांनी जीवनामध्ये कशी वाटचाल केली याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. यासाठी महिपती ताहाराबादकर यांनी सत्तावन्न अध्यायाचा ९,९१६ ओव्यांचा 'भक्तिविजय' हा प्रासादिक, रसाळ ग्रंथ रचला. शके १६८४ वैशाख वद्य द्वादशीला हा ग्रंथ पूर्ण झाला. या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील संतांची चरित्रे व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

उपदेश प्रसिद्ध केला आहे. तसेच उत्तरेकडील संत जयदेव, तुलसीदास, कबीर, कमाल, मीराबाई, नरसी मेहता इ. संतांची चरित्रेही लिहिली आहेत.

महिपती बुवांचा जन्म नगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथे शके १६३७ मध्ये झाला. त्यांचे उपनाम कांबळे असे होते. ते वसिष्ठ गोत्रीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होते. त्यांच्या वडिलांचे नाव दादोपंत होते. ते कुलकर्णीपदाचे काम करीत होते. वडील पंढरपूरची वारी करत होते, त्याबरोबर हा छोटा मुलगाही पंढरपुरला जात होता. वाळवंटामध्ये देहभान विसरून भक्तीप्रेमात तल्लीन झालेले अनेक वारकरी छोट्या महिपतीने पाहिले होते. श्री विठ्ठलाच्या मंदिरात गरुडखांबाला प्रेमाने आलिंगन देणारे आणि पांडुरंगाला साष्टांग नमस्कार घालणारे, प्रेमभावाने पांडुरंगाच्या चरणकमलांवर मस्तक ठेवणारे अनेक भाविक पाहिले. त्यामुळे नकळत त्यांच्या कोमल हृदयावर सुसंस्कार घडले होते. वयाच्या १६ व्या वर्षी वडिलांचे छत्र संपले आणि महिपती कुलकर्णीपदाची कामे करू लागले.

महिपतींच्या अंतरंगात प्रेमभक्तीचा वेल हळूहळू वाढू लागला होता. ताहाराबादपासून ६ मैलांवर असणाऱ्या तांभेर या गावी मोरोबा तांबेकर या संतपुरुषाची त्यांच्यावर कृपा झाली. त्यामुळे त्यांचे भावनाशील हृदय भक्तीप्रेमाच्या सुगंधाने अधिकच भरून गेले. त्यांनी आपल्या कुलकर्णीपदाचे काम सोडून दिले. आणि संतलीलामृत, संतविजय, पांडुरंग माहात्म्य, तुलसी-माहात्म्य वगैरे ओवीबद्ध ग्रंथ लिहिले. कानामनाला अमृतात न्हाऊन सोडणारे त्यांचे शब्द काही केल्या विरत नाहीत. त्यांनी संतांची चरित्रे प्रसिद्ध करून समाजावर मोठे उपकार केले आहेत. शके १७१२ मध्ये श्रावण वद्य द्वादशीस त्यांनी देह ठेवला.

आज जगात सर्वत्र भौतिकतेची प्रचंड वाढ झाली आहे. तंत्रशास्त्र विकसित झाले आहे. संगणकामुळे अनेक क्षेत्रांत प्रगती करता येऊ लागली आहे. परंतु मानवी ज़ीवन अधिकच गुंतागुंतीचे व तणावयुक्त झाले आहे; तरी भौतिकतेची प्रगती करत संतविचाराने अंत:करणातील देवत्व प्रगट करण्याचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रयत्न सर्वांनी करणे आवश्यक आहे. मानवाची सद्‌बुद्धी विज्ञान वाढवू शकत नाही; पण संत आपल्या विचारांनी ही सद्‌बुद्धी वाढवू शकतात.

श्री महिपतींच्या ओवीबद्ध ग्रंथाचे हे कथासार आहे. संत विचारांवर माझा पूर्ण विश्वास आहे. त्यांनी सांगितलेल्या सन्मार्गावरून वाटचाल केल्यामुळे आता अंत:करणात असणाऱ्या जीवाची पूर्ण जाणीव होते. सारे विश्व आता सोयरे बनले आहे. बंधन आणि मोक्ष या दोन्ही संकल्पना संपून गेल्या आहेत. सगुण निर्गुणाच्या पलीकडे असणारे परब्रह्म मला प्रत्यक्षात अनुभवास आले. त्यांच्या दर्शनाने जो अपार आनंद झाला तो सर्वांना लाभावा, या उद्देशाने हा कथासार ग्रंथ सिद्ध केला आहे. ज्ञानोत्तर भक्ती हे यातील प्रमुख सूत्र आहे.

विश्वचैतन्याशी एकरूपता प्राप्त झाल्यावर माझ्या हृदयातून काही अभंग प्रगट झाले. त्यातील एक अभंग येथे देत आहे. अभंगाला 'ज्ञानेश' अशी नाममुद्रा मी घेतली आहे.

देवा तुझे रूप देवा तुझे नाम। हृदयी माझ्या राहो निरंतर ॥ १ ॥
किती जन्म गेले, किती जन्म आले। परि तव नामी मन माझे रंगले ॥ २ ॥
तुझे रूप सुंदर, तुझे नाम मंगल। तव प्रेमे जीवन विकसित झाले ॥ ३ ॥
ज्ञानेश म्हणे देवा, काय मागू आता। मागणे संपले उरे प्रेमानंद ॥ ४ ॥

अमोल पब्लिकेशनचे श्री. संजय काकडे यांनी हा ग्रंथ प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. सर्वांचे सहकार्य हा ग्रंथ सिद्ध होण्यासाठी लाभले त्याबद्दल अंत:करणापासून सर्वांचे आभार.

– ज्ञानेश्वर तांदळे
ज्ञानानंद भांडार,
२०५, नवी सदाशिव पेठ,
गांजवे चौक, पुणे ३०.
फोन - ४३३५१२०

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizaqtion by eGangotri



Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय १ ला

|| भक्तांचे अवतारकार्य ||

श्री गणेशाय नमः || श्री सरस्वत्यै नमः || श्री गुरूभ्यो नमः ||

श्री रुक्मिणी-पांडुरंग यांच्या चरणकमलांना मनोभावे वंदन. हे भक्तवत्सला, तू या विश्वात, प्रत्येक कणात सामावलेला आहेस. संपूर्ण विश्व तू एका अंशाने धारण केले आहेस. त्यामुळे तुझ्या गजानन व शारदारूपाला मी नमन करतो.

तुझ्या अमृतमय नामाने हा अथांग भवसागर तरून जाणाऱ्या संत तुकारामांना मी नमन करतो. रथी महारथी असे महाकवी व्यास, वाल्मिकी, शुक, नारद, शुक्र, जैमिनी यांना पण मी वंदन करतो व ज्या संतसज्जनांमुळे अनेक लोकांचा उद्धार झाला, त्या सर्व संतसमुदायास माझा नमस्कार असो. ज्याप्रमाणे एखाद्या गरीब ब्राह्मणाच्या घरी लग्न, मुंज, वास्तुशांती असली की सर्व धनिक लोक त्या दुबळ्या ब्राह्मणास मदत करतात, त्याप्रमाणे मी हा भक्तीविजय ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला आहे. तुमच्या शुभाशिर्वादाने माझा ग्रंथ पूर्ण व्हावा.

मी अज्ञानी आहे. मी कशाचाच अभ्यास केलेला नाही. देवदेवतांच्या संस्कृत भाषेच्या बाबतीत तर मी पूर्ण अज्ञानी आहे; पण भक्तांची चरित्रे वर्णन केली तर लक्ष्मीपती साक्षात् श्रीहरी आपल्यावर प्रसन्न होऊन दिव्यदर्शन देतो, असे मी एकेकाळी पुराणात ऐकले होते, म्हणून मी हा एवढा लेखनप्रपंच करीत आहे. भक्तांची चरित्रे वर्णन करताना विश्वपालनकर्ता श्रीहरी नक्कीच मला मदत करेल.

मला व्याकरण, शास्त्रे याबद्दल काहीही माहीत नाही.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्री एकनाथी भागवत लिहिणारे संत एकनाथमहाराज, जनी दासीचा उद्धार करणारे संत शिरोमणी नामदेवमहाराज, मुक्तेश्वर, वामनपंडित, दासबोधकार रामदास स्वामी, श्रीधर, बोधराज, कबीर या सर्वांच्या जिभेवर साक्षात् सरस्वती होती. त्यांच्या अमृतमय वाणीचे काय वर्णन करावे? साक्षात् रेड्याकडून वेदपठण करून घेणाऱ्या योगीराज ज्ञानेश्वर माऊलीस मी वंदन करतो व म्हणतो की, आपण निर्मळ गंगाजल आहात व मी छोटेसे ओहोळ आहे. मला आपल्यात सामील करून घ्या. भक्तांची चरित्रे सांगितली की श्रीहरी नक्कीच प्रसन्न होणार. आम्ही वसिष्ठांच्या कुलगोत्रातले. वसिष्ठ ऋषींना माझा नमस्कार. आमच्या माता-पित्याच्या दोन्ही कुळांचे एकच दैवत. ते म्हणजे रुक्मिणीपती पंढरपूरवासी श्रीविठ्ठल. त्याची उपासना केली की सर्व देवतांच्या उपासनेचे फळ मिळते. पृथ्वीप्रदक्षिणा केली की सर्व तीर्थाटणे साध्य होतात. समुद्राच्या पूजनाने सर्व नद्या संतुष्ट होतात. पंढरपूरनिवासी लाडक्या विठ्ठलाची उपासना प्रत्येकाने केली पाहिजे.

हा ग्रंथ मी स्वकल्पनेने लिहिलेला नसून मी त्याला आधार घेतलेला आहे. भारतातील उत्तर प्रदेशात एक थोर संत आहेत. त्यांच्या बुद्धिचातुर्याचे काय वर्णन करावे? त्यांनी ग्वाल्हेरी भाषेत अनेक संतांची रसाळ चरित्रे लिहिलेली आहेत. मान देशातसुद्धा उद्धवचिद्घनाने अनेक प्रिय भक्तांच्या चरित्रांची वर्णने केली आहेत. त्या दोन्हींचा आधार घेऊन मी ह्या ग्रंथलिखाणाच्या शुभकार्यास सुरुवात करतो. हे रुक्मिणीमाते व हे भक्तवत्सल पंढरीनाथ व श्रोतृसमुदाय आपण सर्वांनी माझी वचने ऐकावीत अशी विनंती आहे. कथाश्रवणास प्रारंभ करावा.

माखनचोर नटखट श्रीकृष्णाचा अवतार समाप्त झाला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कलियुगाने आपला खेळ दाखवण्यास प्रारंभ केला. लोकांनी सत्यधर्म सोडून दिला. धर्म भ्रष्ट झाला. सर्वत्र पापच वाढू लागले. कोणीही देवाची आराधना करत नव्हते. सर्व पुरुष व स्त्रिया काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर या शत्रूंच्या पापरूपी चिखलात रुतून बसले होते. धरतीमातेस हे सहन झाले नाही. वैकुंठात श्रीलक्ष्मीपती विष्णु भक्तांना सांगत होता, "कलियुगाच्या प्रभावामुळे पृथ्वी-लोकांत अमाप पाप वाढले आहे. मी पूर्वी अनेक अवतार धारण केले व पापीजनांचा संहार केला. पण मी बौद्ध अवतार घेतलेला असल्याने मी अहिंसेचा मार्ग अवलंबला आहे. मी आता हतबल आहे. आता माझ्या सर्व कल्पना तुम्हालाच पूर्ण करायच्या आहेत. माझा व श्रीलक्ष्मीमातेसह सर्व देवदेवतांचा शुभ आशीर्वाद तुमचे सदैव रक्षण करेल. तुम्ही सर्वजण आता भक्तांच्या रूपाने नामसंकीर्तने करून, प्रत्येकास नामस्मरण करायला लावून सर्व लोकांना सन्मार्गाला आणावे. कलियुगात प्रभूचे नामस्मरण व सत्संगती या दोनच गोष्टी लोकांना तारू शकतील. जा; लवकर कार्य आरंभ करा."

यानंतर सर्व देवदेवतांनी व भक्तांनी जगत्पालनकर्ता पीतांबरधारी श्रीविष्णूंचा त्रिवार जयजयकार केला. भक्त म्हणाले, "हे जिवलगा! तू जसे सांगशील तसे आम्ही सर्वजण करू."

सुदर्शनधारी श्रीविष्णू म्हणाले, "हे उद्धवा! तू शिंप्याच्या कुळात नामदेवाचा अवतार घे. पंढरपुरामधील राऊळात सदैव माझेच संकीर्तन कर. सत्संगती वाढव. माझ्या नानाविध चरित्रांची रसाळ वर्णने तू कीर्तनातून लोकांना सांग. शुक्राचार्य! तू कबीराचा अवतार घे व हिंदीतून निरनिराळे दोहे रचून लोकांना उपदेशाचे डोस पाज. वाल्मिकी, तू तुलसीदास हो व रामाची भक्ती सर्वत्र वाढव.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

रामायणाचे वर्णन कर. हे दारूका! तू ब्राह्मणाच्या कुळात जन्म घे व रामदास हो. हे त्रिनेत्रधारी कैलासपती शिवशंकर, तू जुनागढ येथे नरसी मेहताचा अवतार घे. तुम्ही पुढे व्हा. मी ज्ञानेश्वराचा अवतार धारण करून चांगदेवाचे गर्वहरण करणार आहे. माझ्या नाभी-कमलातून प्रकट झालेले ब्रह्मदेव सोपान होतील व आदिमाया आपल्या सर्वांची बहीण मुक्ताई म्हणून अवतार घेईल."

शंखचक्रगदाधारी श्रीविष्णूने हे सर्व सांगितल्यानंतर सर्वांनी विष्णूंना मनोभावे वंदन केले, व म्हणाले, "आता आम्हाला स्वर्ग नको व वैकुंठलोकपण नको. आम्हाला पृथ्वीच जास्त आवडेल; कारणं तेथे तुम्ही महाज्ञानी बनून ज्ञानेश्वरांचा अवतार घेणार. हरिकथा श्रवण, निरुपण सर्वत्र होणार." हे बोलल्यानंतर सर्व देव आपल्या लोकी गेले व भक्तजन योग्य वेळेची वाट पाहत होते.

व्यासांनी भविष्योत्तर पुराणात लिहिले की अत्यंत पापी कलियुगात भक्त अवतार घेऊन सर्वांचा उद्धार करतील.

आता पुढील अध्यायात आपण जयदेवाचे चरित्र पाहू या. त्याचे एकाग्रतेने श्रवण करावे.

अध्याय २ रा

।। संत जयदेव ।।

भगवान विष्णूंनी व्यासांना सांगितले, "तू अनेक पुराण-ग्रंथांची रचना केलीस. आता जयदेव नावाचा ब्राह्मण म्हणून तू जन्म घे." त्याप्रमाणे व्यासांनी जगन्नाथ क्षेत्राजवळ तंदुबिल्व नावाच्या गावी ब्राह्मणकुळात जन्म घेतला. त्याचे नाव जयदेव असे ठेवण्यात आले. तो लहानपणापासूनच अतिशय ज्ञानी होता. सर्व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शास्त्रांचा अभ्यास त्याने केला. त्याचा कीर्तीसुगंध सर्वत्र पसरला.

जयदेवाच्या हृदयामध्ये भक्तीप्रेमाचा नंदादीप प्रज्वलित झाला होता. त्याने पद्मपुराणातील राधामाधवविलासाचे वर्णन काव्यामध्ये केले. कलियुगातील भक्तांना भक्तीमार्गाची वाट गवसली. गीत-गोविंद हे त्यांचे काव्य प्रत्येक घरात जाऊन पोहचले. मोठ्या आवडीने त्या ग्रंथाचे पठण आणि गायन होऊ लागले.

जगन्नाथ क्षेत्रातील राजा याला मात्र त्या ग्रंथाचा मत्सर वाटला. त्याने एका काव्यग्रंथाची रचना केली. माझ्या ग्रंथाचे पठण करावे, अशी राजाने आज्ञा केली. पण लोकांनी ती आज्ञा मान्य केली नाही. लोक म्हणाले, "विद्या, हरिकीर्तन, गुरूमंत्र, मौल्यवान रत्ने ही कोणाला घ्या, म्हणून त्याच्या पाठीमागे लावू नये." राजाने जयदेवाच्या ग्रंथाला आव्हान दिले. दोन्ही ग्रंथ जगन्नाथाच्या मूर्ती समोर ठेवले. जो ग्रंथ बाहेर येईल तो देवाला अमान्य होईल असे समजावे. दुसऱ्या दिवशी राजाचा ग्रंथ बाहेर आलेला दिसला.

राजाने आपला पराजय मान्य केला. राजाने जगन्नाथाची प्रार्थना केली. जगन्नाथाने आशीर्वाद दिले आणि त्यातील चोवीस श्लोक काढून जयदेवाच्या ग्रंथात घालण्यात आले.

जगन्नाथ क्षेत्रात एका ब्राह्मणाला पद्मावती नावाची सुंदर कन्या होती. ब्राह्मणाच्या स्वप्नात येऊन जगन्नाथाने सांगितले की, तुझी कन्या जयदेव यांस द्यावी. त्याप्रमाणे त्या ब्राह्मणाने जयदेव व पद्मावतीचा विवाह संपन्न करून दिला.

जयदेव आता हरिकीर्तनात रंगून जात होते. एका भक्ताने जयदेवांना रत्ने, वस्त्रे, आभूषणे दिली. एका मनुष्याबरोबर रथात घालून ती पाठवली. त्याच्यामागे चोर लागले. चोरांनी जयदेवाला पकडले. त्यांनी जयदेवाचे हातपाय तोडले व रथ, मौल्यवान वस्तू

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0: In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घेऊन ते पळून गेले. अशा स्थितीतसुद्धा जयदेव परमपिता ईश्वराचे स्मरण करीत होते. तेथे एक राजा आला. राजाने जयदेवांना आपल्या राजवाड्यात आणले. त्यांची सेवा केली. राजा म्हणाला, "मला विश्वात्मक हरिप्राप्तीचे साधन सांगा." तेव्हा जयदेव म्हणाले, "हे राजन्! संतांची सेवा करावी. जे उभे गंध लावतात, बारा टिळे लावतात, तुळशीमाळा गळ्यांत घालतात आणि विष्णूच्या नावाचा सदैव उच्चार करतात अशा संतांच्या सान्निध्यात रहावे."

जयदेवांच्या आज्ञेप्रमाणे राजा संतांची सेवा करू लागला. त्यामुळे राजाकडे संतमेळा जमला. ज्या चोरांनी जयदेवांचे हातपाय तोडले होते, तेही संतांचे वेष परिधान करून आले. जयदेवाने त्या दोघांना ओळखले. त्याने राजास सांगितले, या दोन साधूंची विशेष सेवा करावी. पुढे ते दोन चोर तेथून निघून गेले. जाताना राजाने त्या दोघांना पुष्कळ द्रव्य दिले. त्यांचा सत्कार केला व सेवकांना सांगून त्यांना रथातून पाठविण्याची व्यवस्था केली. त्या वेळी त्या दोन चोरांनी अनेक खोट्या गोष्टी सांगितल्या, त्यामुळे पृथ्वी दुभंगून गेली व ते दोघेही आतमध्ये गडप झाले.

राजाचा सेवक राजवाड्यात परत आला आणि घडलेली घटना सांगितली. जयदेवने देवाचा धावा केला व त्या दोन चोरांचा सांभाळ करण्यास सांगितले, त्याप्रमाणे विष्णूने त्या दोघांच्यावर कृपा करून उद्धार केला.

एके दिवशी राजा अरण्यात गेला होता. त्यांच्याबरोबर जयदेवही होता. त्यावेळी प्रधानाने सर्वत्र खोट्या बातमीचा प्रसार केला, की वाघाने जयदेवाला खाऊन टाकले. ही बातमी ऐकून पद्मावतीने देहत्याग केला.

राजा जयदेवासह राज्यात परत आला. त्याला सर्व घोटाळा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समजला. पद्मावतीच्या मृत्यूस राणी कारणीभूत आहे हे कळताच त्याने राणीला मारावयाचे असे ठरवले. स्त्रीहत्या होईल म्हणून राजाने स्वत:च प्राणार्पण करावयाचे ठरविले. जयदेवांनी पद्मावतीजवळ जाऊन विष्णूची प्रार्थना केली. त्यांनी पद्मावतीस जिवंत केले. जो कोणी अष्टपदी गाईल, त्याच्याजवळ मी हात जोडून उभा राहीन, असा आशीर्वाद दिला.

आजपर्यंत अनेकांनी जयदेवाची चरित्रे गायली आणि त्यांना परमार्थाचे अनेक अनुभव प्राप्त झाले. संतांच्या चरित्राचे सदैव गायन करावे व त्यानी सांगितलेल्या मार्गावरून वाटचाल करावी.

अध्याय ३ रा

॥ संत तुलसीदास ॥

श्रीगणेशाय नम:। लक्ष्मीपती श्री विष्णूच्या आज्ञेवरून वाल्मिकीने तुलसीदास या नावाने अवतार धारण केला व एकवचनी, एकपत्नी रामचरित्राचे महान काव्य प्राकृत भाषेत लिहून रामभक्ती वाढवली. त्यांचे चरित्र आता आपण पाहू या.

हस्तिनापुरात एक ब्राह्मण दांपत्य रहात होते. हे दांपत्य धार्मिक कार्य करीत असे. या दांपत्याच्या पोटी महान रामभक्त तुलसीदास आले. त्यांच्या वडिलांचे नाव होते आत्माराम. ते अकबर राजाकडे कामाला होते. तुलसीदास तरुण झाल्यानंतर त्यांच्या आईवडिलांनी तुलसीदासांचा विवाह केला. त्यांच्या पत्नीचे नाव होते ममता. ममता दिसायला देखणी होती. नावाप्रमाणेच ती अत्यंत प्रेमळ होती. दोघांचेही एकमेकांवर जीवापाड प्रेम होते. तुलसीदासांना आपल्या पत्नीचा विरह एक क्षणभरसुद्धा सहन होत नसे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एके दिवशी ममताच्या मातापित्याने तिला माहेरी बोलावले. तुलसीदास दोन-तीन दिवस बाहेरच निवास करणार होते. तुलसीदास येईपर्यंत मी नक्की परत येईन, असे तिने आपल्या सासुसासऱ्यांस सांगितले.

त्याच दिवशी तुलसीदास आले. पत्नी माहेरी गेलेली समजताच त्यांना वाईट वाटले. मला आता तिला भेटलेच पाहिजे, असे आईवडिलांना सांगून ते घरातून बाहेर पडले. त्यांची सासुरवाडी पाच कोस अंतरावर होती. पावसाळ्याचे दिवस होते. मुसळधार पाऊस पडत होता. तुलसीदास ओलेचिंब झाले होते. मनात एकच ध्यास होता, पत्नीला भेटण्याचा. पत्नीचे माहेर आल्यानंतर घराची सर्व दारे बंद होती. फक्त वरच्या मजल्यावरील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एक खिडकी किंचित उघडी होती. तेथून एक काळा मोठा दोर लोंबत होता. ममतेने आपल्यासाठी ही योजना केली असावी, असे त्यांना वाटले. तुलसीदास त्या दोरावरून सपसप चढून वर गेले व आतमध्ये गेल्यानंतर प्रथम आपल्या पत्नीस मिठी मारली. त्यांनी आपल्या पत्नीस त्या दोराबद्दल सांगितले. ममता म्हणाली, "अहो धनी! मी तो दोर लावला नव्हता. कुठे आहे दाखवा पाहूया?'

तुलसीदासांनी तिला दोर दाखवण्यास नेले, तर तेथे काळा तांबडा साप होता. तुलसीदास बायकोवरील प्रेमापोटी त्या सापाच्या साहाय्याने वर चढून आले होते.

ममता म्हणाली, "अहो धनी! किती खुळे तुम्ही! या हाडामांसाने भरलेल्या शरीरावर एवढे प्रेम कशाला करताय? हे प्रेम क्षणभंगुर आहे. मी म्हातारी झाल्यानंतर तुम्हाला माझा काहीही उपयोग नाही. एक तर मनुष्यदेह दुर्लभ आहे व तुम्ही माझ्या मोहक शरीराच्या पाठीमागे लागून जन्म फुकट घालवणार. तुम्ही हेच प्रेम कौसल्यापुत्र, सीतापती, दशरथनंदन श्रीरामावर केले, तर नक्कीच तुमच्या आयुष्याचे कल्याण होईल."

ममतेचे हे कडक शब्द ऐकून तुलसीदासांचे डोळे खाड्कन् उघडले. त्यांनी पत्नीस कोटी कोटी धन्यवाद दिले. तेथून ताबडतोब निघून आनंदवन येथे जाऊन अनुष्ठानास प्रारंभ केला. त्यांनी एक तप अखंड 'श्रीराम, जय राम, जय जय राम' असा जप सुरू केला. त्यांना रामदर्शनाची आंतरिक ओढ लागली होती.

तुलसीदास रोज उठल्यानंतर पाण्याने मुखमार्जन करीत असत व ते पाणी एका वृक्षाच्या बुंध्यापाशी टाकत असत. त्या पाण्यामुळे एक भयानक पिशाच्च प्रगट झाले व तुलसीदासांना म्हणाले, "हे भक्ता! तुझी काही इच्छा असल्यास मला सांग. मी ती नक्कीच पूर्ण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

करेन.''

तुलसीदासांनी मला रामाचे दर्शन हवे, अशी मागणी केले. यावर पिशाच्च घाबरून म्हणाले की, ''रामाच्या नामस्मरणानेसुद्धा आमचा थरकाप उडतो; पण मी तुम्हाला अंजनीसुत महाबलशाली हनुमानजी कोठे भेटेल, हे सांगतो.''

पिशाच्च म्हणाले, ''तू पुराण श्रवण करायला जातोस त्या स्थळी एक वयस्कर ब्राह्मण सर्वांच्या आधी आगमन करतो व सर्व लोकांच्या शेवटी प्रस्थान करतो; तोच पवनपुत्र हनुमान आहे. त्याला तू प्रसन्न करून घे. तो जितेंद्रिय तुझी इच्छा नक्कीच पूर्ण करेल.'' असे बोलून पिशाच्च नाहीसे झाले.

दुसऱ्या दिवशी तुलसीदासाने ब्राह्मणाच्या वेशातील हनुमानाला प्रकट करून घेतले व आपली इच्छा त्याला सांगितली. हनुमानाने मी तुमची विनंती प्रभू रामचंद्रांना नक्कीच सांगेन, असे सांगितले व तो अंतर्धान पावला.

श्रीरामचंद्रांनी आपल्या भक्ताच्या इच्छेला मान देऊन तुलसीदास यांना दर्शन दिले. त्यांनी हे रूप पुढील प्रकारे घेतलेले होते. प्रभू रामचंद्र राजाच्या रूपात होते. त्यांचे नाव होते यवन व त्यांच्याबरोबर बरीच वानरसेना होती. पण तुलसीदासाने प्रभू रामचंद्रांना ओळखले नाही.

दुसऱ्या दिवशी वयस्कर ब्राह्मण वेषातील हनुमानाने प्रभू रामचंद्रांच्या भेटीविषयक तुलसीदासांना विचारले. तुलसीदासांनी नकारात्मक उत्तर देताच तो यवन राजा म्हणजेच प्रभू रामचंद्र व त्यांचे सैन्य म्हणजेच वानरसेना होती असे सांगितले. त्यावर तुलसीदास म्हणाले, '' पण रामाला माझा निरोप सांगा की धनुर्धारी श्रीराम व सीतामाई, लक्ष्मण असे प्रत्यक्ष दर्शन हवे आहे. दुसऱ्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

कोणत्याही रूपात मला दर्शन देऊ नका म्हणावे.''

आपल्या लाडक्या भक्ताच्या प्रेमाखातर प्रभू रामचंद्रांनी तुलसीदासांना हव्या त्या रूपात दर्शन दिले.

त्यानंतर तुलसीदासांनी मोठ्या प्रमाणावर लोकांमध्ये रामभक्तीची बीजे पेरली. लोकांनी श्रीरामचंद्राचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून जीवननौका कशी पुढे चालवावी हे सांगितले. हजारो लोक तुलसीदासांची रसाळ वाणी ऐकण्यासाठी लांबून येत असत. तुलसीदासांनी आश्रम बांधला व अन्नदान सुरू केले. त्यांच्या आश्रमात रोज हजारो लोक भोजनाचा स्वाद घेऊ लागले.

एके दिवशी दोन अट्टल चोर चोरी करण्याच्या उद्देशाने तुलसी-दासांच्या दिव्य आश्रमात आले. तुलसीदासांच्या आश्रमात अनेक प्रकारची अगणित संपत्ती होती. अनेक प्रकारची मौल्यवान रत्ने होती. त्यांपैकी काही रत्ने व सुवर्ण आपल्याबरोबर घेऊन सर्वत्र सामसूम झाल्यावर ते चोर गुपचूपपणे बाहेर पडण्यासाठी दाराकडे निघाले. पाहताच तर काय आश्चर्य? त्यांना तेथे दोन तेज:पुंज धनुर्धारी तरुण दिसले. ते चोर घाबरून दुसरीकडे पळाले. तेथेही पुन्हा त्यांना तेच तरुण दिसले. त्यांनी बाहेर जाण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना बाहेर पडता आले नाही. हताश झाल्याने ते रात्रभर तुलसीदासांच्या आश्रमातच बसून राहिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी तुलसीदास उठले व बाहेर निघाले. तेव्हा त्या चोरांनी तुलसीदासांना सारा प्रकार सांगून त्यांची क्षमा मागितली. तुलसीदासांनी तेथील सहकाऱ्यांना विचारले, " तुम्ही दारावर पहारा का ठेवला आहे? व कोणत्या माणसांचा ठेवला आहे?'' त्यावर ते सहकारी म्हणाले की पहारा आम्ही कोणीही ठेवला नव्हता. चोर म्हणाले, " तुलसीदासजी, त्यांच्या रूपाचे काय

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वर्णन करावे? दोघेही अत्यंत तेजःपुंज होते. त्यांच्या हाती धनुष्यबाण होता. मुकुट व कुंडले धारण केली होती.'' ते वर्णन ऐकताच तुलसीदासांनी ओळखले की हे दुसरे कोणी नसून साक्षात् रामलक्ष्मणच होते. ते चोरांना म्हणाले, '' तुम्हाला जे काही न्यायची इच्छा आहे ते तुम्ही घेऊन जाऊ शकता, घाबरू नका.'' पण त्या वेळी चोरांना वाईट वाटले. ते तुलसीदासांना म्हणाले, ''आम्हाला साक्षात् सीतापतीचे दर्शन झाल्यावर आम्हाला दुसरे काहीही नको. आमचे जीवन धन्य धन्य झाले.'' त्या दोघांनी पुढे आयुष्यभर रामाची व तुलसीदासांची सेवा केली.

काही वर्षांनंतर श्री तुलसीदासांनी असंख्य लोकांच्या साक्षीने नंदीला नैवेद्य दिला व त्याने तो खाऊनही टाकला. तसेच एका विप्राचा पण उद्धार केला. या दोन घटनांमुळे तुलसीदास फारच प्रसिद्ध झाले.

एके दिवशी त्यांच्या नगरातील एक श्रीमंत सावकार जैतपाळ परलोकी गेला. त्याची बायको त्याच्याबरोबर सती जाणार होती.

सती जाण्यापूर्वी तुलसीदासांना शेवटची भेटण्यास आली. तिने त्यांना नमस्कार केला. 'अष्टपुत्र सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद तुलसीदासांनी दिला. त्यावर सावकाराच्या बायकोने सर्व हकीकत सांगितली. तुलसीदास म्हणाले, ''माझ्या तोंडातून चुकून सौभाग्यवती असा शब्द गेला आहे. दशरथनंदनच हा शब्द खरा ठरवतील.'' त्या वेळी तुलसीदास सावकाराच्या प्रेताजवळ गेल्यावर ताबडतोब सावकार जिवंत झाला.

तुलसीदासांची कीर्ती सर्वत्र पसरली होती. अकबर बादशहाने तुलसीदासांना आपल्या दरबारात बोलवून घेतले व मला रामाचे दर्शन घडवा, असे त्यांना सांगितले. अकबर बादशहाने तुलसी-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दासांवर सक्ती केली. तेव्हा संकटमोचन हनुमानाचे तुलसीदासांनी स्मरण केले. हनुमानाने दहा हजार वानरसैन्य बोलवले व त्यांना संपूर्ण नगर उद्ध्वस्त करण्यास सांगितले. त्या दहा हजार वानरसैनिकांनी संपूर्ण नगरात उच्छाद मांडला. काही लोकांनी अकबराला तुलसीदासांना सोडून देण्याचा सल्ला दिला.

अकबर जातीने तुलसीदासांजवळ गेला व म्हणाला की, प्रभू रामचंद्रजी कोठे आहेत? त्यावर तुलसीदास म्हणाले की त्यांच्या थोड्याच सैन्याचे आगमन झाले आहे. अजून अठरा पद्म वानर येणार व मग साक्षात् रामचंद्र येणार आहेत. अकबर या दहा हजार वानरसेनेस घाबरला होता. अठरा पद्म वानर हा शब्द ऐकताच तो वेडाच झाला. त्याने तुलसीदासांना साष्टांग नमस्कार केला व त्यांची क्षमा मागितली. तुलसीदासांची मुक्तता झाल्यावर वानरसैन्य नाहीसे झाले.

अकबर बादशहाच्या विनंतीवरून एक वर्षभर तुलसीदास हस्तिनापुरास राहिले. तेथे भव्य प्रमाणात रामजन्मोत्सव वगैरे सुरू केला. त्यानंतर मथुरेस प्रस्थान केले. मथुरेमध्ये त्यांना प्रियादास नावाचा एक ब्राह्मण भेटला. त्याला अध्यात्माची फार आवड होती. प्रियादासाने कलियुगातील संत महात्म्यांची चरित्रे वर्णन करून ठेवली होती. ही चरित्रे ऐकण्याची इच्छा तुलसीदासांनी प्रियादासासमोर प्रगट केली. प्रियादासाने सर्वांची चरित्रे लिहिली होती. फक्त तुलसीदासांचेच नव्हते. श्रीरामचंद्राने एके दिवशी हळूच तुलसीदासांचे चरित्र लिहून ठेवले. प्रियादास जेव्हा ग्रंथ वाचू लागला, तेव्हा तुलसीदासांचे चरित्र त्याला स्वत:ला ऐकण्यास मिळाले. प्रभु रामचंद्रांचे ते मोत्यासारखे अक्षर पाहून तेथील जनसागराने रामाचा व तुलसीदासाचा जयजयकार केला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

हे तुलसीदासांचे चरित्र मी प्रियादासांच्या ग्रंथावरून नाभाजीने ग्वाल्हेरी भाषेत लिहिलेल्या सुंदर चरित्रावरून मराठीत रूपांतरित केले आहे.

अध्याय ४ था

।। संत नामदेव ।।

श्रोत्यांनो लक्षपूर्वक श्रवण करा. क्षीरसागरामध्ये लक्ष्मीपती नारायणाने शुक व उद्धव या दोघांना बोलावले व त्यांना म्हणाले की, "आता तुम्ही ताबडतोब पृथ्वीवर अवतार घ्या." यावर शुक व उद्धव म्हणाले, "हे श्रीहरी! आम्हाला गर्भवासाच्या यातना नको आहेत. त्या आम्हाला सहन होणार नाही. त्यामुळे तू आम्हाला अयोनिसंभव जन्म दे." नारायण म्हणाला, 'जशी तुमची इच्छा'. भगवंताने उद्धवास एका शिंपल्यामध्ये घालून भीमा नदीत सोडून दिले. तेच भक्त शिरोमणी नामदेव होय.

पंढरपुरात दामाशेठ नावाचा एक शिंपी रहात होता. तो विठ्ठलाचा परमभक्त होता. त्यांच्या पत्नीचे नाव होते गोणाई. देवाच्या कृपेमुळे सर्व काही उत्तम चालले होते; पण मूलबाळ नसल्याने ते दु:खी होते. गोणाई व दामाशेठनी भक्तकैवारी पांडुरंगाजवळ मुलासाठी प्रार्थना केली. तेव्हा विठ्ठल दामाशेठच्या स्वप्नात आला व म्हणाला, "हे वत्स! मी तुला काय सांगतो ते नीट ऐक. तू उद्या जेव्हा स्नानासाठी भीमानदीवर जाशील तेव्हा तेथे एक मोठा शिंपला दिसेल. त्यात तुला मूल मिळेल." त्यांनी हे सर्व काही आपल्या पत्नीस सांगितले.

दुसऱ्या दिवशी भीमा नदीवर दामाशेठजी स्नानाकरिता गेले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तेथे त्यांना मोठा शिंपला वाहत येताना दिसला. त्या शिंपल्यातून 'विठ्ठल विठ्ठल, जय हरी विठ्ठल' असा जयघोष ऐकू येऊ लागला. तो शिंपला दामाशेठने उघडून पाहिला, तर काय आश्चर्य? आतमध्ये एक गोंडस तान्हे मूल होते. त्यांनी मोठ्या प्रेमाने त्याला उचलले व गोणाईस आणून दिले. आपल्याला देवानेच हा प्रसाद दिलेला आहे असे गोणाईस वाटले. तिने बाळाचे प्रेमाने मुके घेतले. काही दिवसानंतर मोठ्या उत्साहात नामकरणविधी पार पडला. त्याचे नाव नामा असे ठेवण्यात आले.



दामाशेठजी रोज पंढरपूरच्या विठ्ठलास नैवेद्य दाखवत असत. एके दिवशी त्यांना बाजारातून येण्यास उशीर झाला. त्यामुळे गोणाईने नामदेवाला विठ्ठलास नैवेद्य दाखवून येण्यास सांगितले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामदेव लहान होते. त्यांनी विठ्ठलाच्या देवळात जाऊन प्रथम 'विठ्ठल विठ्ठल' असा जयघोष केला. त्यानंतर नैवेद्याचे ताट पुढे ठेवले व विठ्ठलाला नैवेद्य दाखवला. देव काही नैवेद्य भक्षण करेना. ते पाहून त्या लहानग्या नामदेवास वाईट वाटले. तो विठ्ठलास म्हणाला, "अरे विठ्ठला! रुक्मिणीकांता! आज माझे पिताश्री आले नाहीत म्हणून तू नैवेद्य खात नाहीस काय? मी जर हे असेच ताट घेऊन गेलो तर घरचे लोक मला बेदम बडवतील. त्यामुळे तू लवकर नैवेद्य खाऊन टाक." तरीही विठ्ठलाने नैवेद्याला हात लावला नाही, हे पाहून नामदेव विठ्ठलाच्या पायावर डोके बडवून घेऊ लागला. या चिमुकल्याची आर्त साद ऐकून विठ्ठलाने खरोखरच नैवेद्य खाऊन टाकला व नामदेवांना सांगितले की "हे बघ! मी नैवेद्य खाल्लेला कोणालाही सांगू नकोस."

रिकामे ताट घेऊन तो चिमुरडा नामदेव घरी परतला व आईला सांगू लागला, "आई! आज मोठी गंमतच झाली. मी बाप्पाला सांगितले की तू नैवेद्य खा व विठ्ठलबाप्पाने नैवेद्य खाल्लासुद्धा?" दामाशेठ घरी आले. गोणाईने आपल्या मुलाचा चमत्कार पतिराजास सांगितला. दामाशेठला वाटले की नाम्या नक्कीच खोटे बोलतो आहे . त्यांनी नामाला बोलवले व विचारले की, "खरे सांग, नैवेद्य तू खाल्ला की पांडुरंगाने खाल्ला?" नामदेवांनी खरे काय ते सांगितले तरी आपल्या मुलावर त्यांचा विश्वास बसेना. त्यांनी नामदेवाला उद्या पुन्हा हाच चमत्कार करण्यास सांगितले व म्हणाले, "मी माझ्या डोळ्याने उद्या पाहतो, विठ्ठल कसा नैवेद्य खातो ते?"

दुसऱ्या दिवशी वडिलांना घेऊन नामदेव राऊळात आला त्याने प्रथम विठ्ठलाचा जयघोष केला. विठ्ठलाच्या देवळात आल्यानंतर कालच्याप्रमाणे नैवेद्य खाण्याची प्रार्थना केली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विठ्ठलाने आजही नैवेद्य खाल्ला. दामाशेठच्या आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. पांडुरंगाचे पुन्हा दर्शन झाल्याने नामदेव आनंदात होते.

हा चमत्कार पाहिल्यामुळे दामाशेठ आनंदाने नाचू लागले. त्यांनी नामदेवास कडेवर घेऊन आनंदाने कुरवाळले. मोठ्या आनंदाने बापलेक घरी आले. घरी आल्यानंतर दामाशेठजींनी सर्व सत्यता पत्नीस सांगितली.

वय थोडे वाढल्यानंतर नामदेवांचे लग्न झाले. त्यांच्या पत्नीचे नाव होते राजाई. ती आपल्या जीवनसाथीच्या पावलावर पाऊल ठेवून संसार करणारी होती. त्यांना एक मुलगा झाला. त्याचे नाव 'नारायण' ठेवले. नामदेव संसारात गुरफटले नाहीत. त्यांचे सर्व लक्ष पांडुरंगाकडे होते.

एके दिवशी त्यांच्या या भक्तीमुळे घरातल्या कोणालाही खायला मिळाले नाही. नामदेव पैसेच मिळवत नव्हते. चोवीस तास भक्तीमध्ये गुरफटलेले असायचे. त्यामुळे त्यांची मातोश्री नामदेवांना ओरडली. आई बोलल्यामुळे नामदेव चिडले व पांडुरंगाकडे गेले व त्याला सर्व काही प्रकार सांगितला.

घरची गरिबी पाहून विठ्ठलाने वाण्याचे रूप घेतले व ते नामदेवांच्या गृही आले. त्यांनी नामदेवांच्या बायकोस बोलावले व विचारले की, "काय कुठेत नामदेवजी! दिसत नाहीत घरात? मी केशवशेठ. नामदेव माझा जिगरी दोस्त आहे. त्याला भेट म्हणून मी एवढी संपत्ती आणली आहे. ती त्याला द्या." राजाईने ते सर्व सामान घेतले व त्याचे मिष्टान्न तयार केले.

त्या वेळी नामदेवांची आई आपल्या लाडक्या मुलास समजवायला गेली होती. घरी राजाईने सर्व काही नवीन केले होते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

घराचे रूपच पालटून ठेवले होते. नामदेव व त्यांच्या आईला काही कळेना? नामदेवांनी आपल्या प्रिय राजाईस याबद्दल विचारले. ती काहीच बोलली नाही.

नामदेवांची जनी नावाची एक दासी होती. तिने सर्व काही याचा उलगडा करून सांगितला. आपण पांडुरंगाला उगीचच त्रास दिला असे नामदेवांना वाटले. त्यांना हे पटले नाही. त्यांनी गावातल्या हजारो ब्राह्मणांना बोलावून सर्व संपत्ती दान केली.

अध्याय ५ वा

।। संत कबीर ।।

उध्दवाप्रमाणेच श्रीहरीने शुक्राचार्यांना अयोनिसंभव जन्म दिला. त्यांना एका शिंपल्यात घालून पाठवले. तेच कबीर या नामरूपाने उदयास आले.

एके दिवशी एक मोमीन यवन सूत धुण्यासाठी भागीरथी नदीवर गेला होता. तेथे सूत धूत असताना त्याला एक मोठा शिंपला सापडला. तो मोमीन या यवनाने फोडला. त्याच्या आत एक तेजस्वी, गोंडस मूल दिसले. ते मूल घेऊन तो घरी आला. त्याने आपल्या बायकोस ते मूल दिले. हाच मुलगा पुढे भक्त कबीर झाला.

लहानपणापासून कबीर भक्तीमार्गात गुंग झाले होते. त्यांची बुद्धिमत्ता असामान्य होती. लहानपणी त्यांचे खेळण्याकडे लक्ष नव्हते. तारुण्यात आल्यावर कबीरांचे दोनाचे चार हात झाले. त्यांचे पैसे मिळवण्याकडे लक्ष नव्हते. ना काम, ना उद्योगधंदा. नुसते देवाचे चिंतन करण्यातच ते वेळ घालवत असत. त्यांच्या मातोश्रीने यावर उपाय म्हणून मागावर शेला विणण्याचा सल्ला दिला व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ताबडतोब अमलात आणण्यास सांगितले.

कबीरांचे शेला विणत असताना सारखे श्रीरामाचे नामस्मरण सुरू असे. या नामस्मरणामुळे मधेच त्यांचे काम बंद पडे. आई त्यांना पुन्हा सावध करत असे. एक शेला शिवायला ते कित्येक दिवस लावत असत. काही वेळेस सीतापती स्वत: शेला विणायला येत असत. शेला बनवून झाल्यानंतर तो विकण्याकरता कबीराला बाजारात पाठवले. तो शेला खुद्द रामाने बनवलेला असल्याने तो शेला फारच उंची झाला होता. असा शेला घेण्यास कोणीही गिऱ्हाईक तयार नव्हते. शेवटी संध्याकाळ झाली तरी काहीही विकले नाही. कबीर तसेच उठले व शेला विकला न गेल्याने आईच्या भीतीमुळे घरी न जाता ते तेथीलच शेजारच्या ओसाड

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घरात श्रीरामचंद्रजींच्या भजनात गुंग झाले.

आपल्या भक्ताची परीक्षा पाहण्यासाठी दशरथनंदन स्वत: वृद्ध ब्राह्मणाचे रूप घेऊन आले. त्यांनी कबीरांना विनंती केली, "हे मुला! मी गरीब ब्राह्मण आहे. मला अंगावर नेसायला काहीही नाही रे. तू मला एखादे वस्त्र दिल्यास या ब्राह्मणाचे आशीर्वाद तुला मिळतील." कबीरांना त्या दुबळ्या ब्राह्मणाची दया आली. त्यांनी तो न विकलेला शेला अर्धा फाडला व त्या ब्राह्मणाला दिला. थोड्या वेळाने कौसल्यापुत्र श्रीराम पुन्हा फकिराच्या वेषात आले. त्यांनी ते अर्धे वस्त्र मागितले. कबीरांनी ते देऊन टाकले.

रामचंद्र पुन्हा ब्राह्मणाचे रूप घेऊन कबीरांच्या घरी आले. त्यांनी कबीरांच्या मातेस सर्व काही सांगितले. दोघांना अर्धा-अर्धा शेला वाटून दिल्याचे कळताच आईचा राग अनावर झाला. तिने त्या ब्राह्मणास कबीर कोठे बसला आहे, ते दाखवायला सांगितले. तो ब्राह्मण त्या ओसाड घरी कबीरांच्या आईला घेऊन आला. आपला मुलगा धंदापाणी सोडून नुसतेच रामाचे भजन करीत बसला आहे हे तिला आवडले नाही. कबीरांची आई भजनातून उठवण्यासाठी त्यांना जाड काठीने बडवू लागली. तरीही त्यांच्यावर काही परिणाम झाला नाही. कबीर जसेच्या तसे शांत होते, भजनात तल्लीन झाले होते.

कबीरांची ही अनोखी भक्ती पाहून रामचंद्र म्हणाले, "हे माते! तू त्याला मारू नकोस. तू काठीने त्याला मारलेस; पण वळ माझ्या अंगावर उठले आहेत. हा माझा सर्वश्रेष्ठ भक्त आहे." श्रीरामाने आपले खरे स्वरूप प्रकट केले. रामाबरोबर सीतामाईपण होती. कबीरांनी डोळे उघडले. ते चैतन्यरूपी प्रभू रामचंद्राचे रूप पाहून त्या मायलेकांनी रामाच्या चरणांवर मस्तक ठेवले. रामाने कबीरांना

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

मिठी मारली.

शेवटी कबीरांची आई व कबीर श्रीरामचंद्र की जय असा जयजयकार करत घरी परतले.

अध्याय ६ वा

॥ संत कमाल ॥

प्रभू श्रीरामचंद्राचे दिव्यदर्शन झाल्यानंतर कबीरांची आई फारच आनंदित झाली होती. ती आता कबीरांना त्रास देत नसे. कबीरांची पत्नीसुद्धा आपल्या नवऱ्याप्रमाणेच पूर्णपणे रामनामात तल्लीन झाली होती. काही वर्षानंतर त्या दोघांना एक पुत्ररत्न झाले. त्यांनी त्याचे नाव 'कमाल' असे ठेवले. कमालला लहानपणापासूनच रामाच्या भक्तीची ओढ लागली होती.

वयाच्या सातव्या वर्षी आईवडिलांची आज्ञा घेऊन कमाल तीर्थाटनास निघाला. पहिल्यांदा तो द्वारकानगरीस गेला. त्याने गोमती सरितेवर स्नान करून कन्हैय्यालाल श्रीकृष्णाचे दर्शन घेतले. तेथेच चार महिने वास्तव्य केले. या चार महिन्यांत कमालने अनेकांना श्रीराम व श्रीकृष्ण या दोघांच्या भक्तीमार्गास लावले. त्यानंतर तो चित्रकोटनगर येथे गेला. तेथे एक मोठा सावकार होता. तोसुद्धा रामभक्तच होता. विष्णुदास असे त्याचे नाव होते. कमालला घेऊन सावकार घरी आला. तेथे त्याने पंचपक्वान्नाचे जेवण दिले व रात्री कीर्तनाचा कार्यक्रम ठेवला. कीर्तन उत्तम झाले. कमाल तेथून निघताना विष्णुदासने एक मौल्यवान हिरा भेट दिला. कमाल तो हिरा घेण्यास तयार नव्हता. कमाल म्हणाला, "हे मित्रा! मी वैष्णवभक्त. आमचे सारे कुळच वैष्णव आहे. आम्हाला याचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काहीही उपयोग नाही. उलट हिऱ्यामुळे माझ्या मनात मोहाचे जाळे निर्माण होईल. हिरा आणलेला पाहून माझे आईवडील मला रागावतील ." विष्णुदासाने अत्यंत आग्रह करून शेवटी कमालला हिरा दिलाच.

त्यानंतर कमालच्या आनंदवनास काही दिवस मुक्काम होता. आईवडिलांची विचारपूस करण्यासाठी तो पुन्हा आपल्या घरी आला. आईवडिलांचे आशीर्वाद घेऊन मित्राने दिलेला हिरा त्यांना दाखवला. तो हिरा पाहिल्यानंतर कबीर बेशुद्ध पडले. कबीरांची बायको घाबरून कबीरांजवळ गेली.

कबीर म्हणाले की आपल्या मुलाने रामाचे नाव विकून हा मौल्यवान हिरा आणला आहे. त्यामुळे त्याने आपला वंश बुडवला आहे याचे मला फार वाईट वाटते. आपल्या वडिलांच्या सांगण्यावरून कमालने तो हिरा विष्णुदासास परत केला. यामुळे कमालच्या आईवडिलांना आनंद झाला.

कबीरांची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती; तरी पण घरी आलेल्या अतिथींना ते जेवण बनवीत असत. एके दिवशी काही संतमंडळींचा समुदाय तीर्थाटन करीत रात्रीच्या वेळेस कबीरांकडे आला. कबीरांनी व कुटुंबियांनी त्यांचे उचित आदरातिथ्य केले. आत जाऊन बायकोस सांगितले की, "अतिथी आले आहेत. तू लवकर भोजन प्रबंध कर." यावर पत्नी म्हणाली की, "अहो धनी! घरात अन्नाचा एक दाणापण नाही. कोणीही आता आपल्याला उसने देणार नाही व विकत आणण्यासाठी दीडदमडीपण नाही. तुम्ही कुठूनतरी चोरून धान्य आणा. मग मी प्रबंध करते."

कबीरांनी आपल्या पत्नीच्या मतास संमती दाखवली. कबीर व त्यांचा मुलगा कमाल दोघेजण हत्यारे घेऊन बाजारात निघाले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तेथील एका वाण्याची मोठी भिंत फोडली व कमाल आत घुसला. कबीर बाहेर पहारा देत होते. कमालने त्या वाण्याचे सर्व जिन्नस पदार्थ कबीरांजवळ दिले. त्या भगदाडातून कोणीतरी दुसरा चोर येऊन चोरी करू नये म्हणून कमालने त्या मालकास उठवले व कमाल बाहेर येऊ लागला. वाण्याने शिताफीने कमालचे पाय धरले. त्यामुळे कमालचे संपूर्ण शीर बाहेर व पाय आत अशी विचित्र अवस्था झाली होती. चोरी कोणी केली हे कळू नये म्हणून पित्यास कमालने आपले शीर उडवण्याची विनंती केली. कबीरांनी आपल्या हाताने पोटच्या मुलाचा शिरच्छेद केला. ते शीर घरीसुद्धा नेले.

कबीरांकडे जेवणावर यथेच्छ ताव मारल्यानंतर ती संतमंडळी जाण्यासाठी निघाली. तेव्हा कबीर व त्याची बायको निरोप देण्यासाठी त्यांच्याबरोबर निघाले. त्याच वेळी चोरीच्या आरोपावरून त्या उरलेल्या धडास सुळावर नेण्याची राजाने आज्ञा दिली.

ती संतमंडळी सुळापाशी आली तेव्हा त्या धडाने संतमंडळींना प्रणाम केला. संतमंडळींना ते धड कोणाचे आहे काही कळाले नाही. त्यांनी कबीरांना विचारले तेव्हा कबीरांनी सर्व सत्यकथन केले. संतमंडळींना कमालची दया आली.

संतमंडळींनी कमालचे शिर मागवून घेतले व धडावर लावले. संतांच्या असीम कृपेमुळे कमाल पुन्हा जिवंत झाला. सर्वांना आनंद झाला. कबीरांना व कमालच्या मातोश्रींना आपले आनंदाश्रू लपवता आले नाहीत. या सर्वांपाठीमागे प्रभू रामचंद्राचाच आशीर्वाद आहे हे सर्वांनी जाणले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

अध्याय ७ वा

॥ संत कबीर व गुरू रामानंद ॥

ईश्वराविषयी कबीरांची भक्ती दिवसेंदिवस वाढतच होती. एके दिवशी कबीरजी बाजारात गेले होते. तेथे त्यांना एक वाणीस्त्री जात्यावर दळण दळत असताना दिसली. तिच्या त्या मोठ्या जात्याकडे पाहून कबीरांना रडू कोसळले. बाजारातील पुष्कळ लोकांनी त्यांना रडण्याचे कारण विचारले. पण कोणालाही कबीरांनी उत्तर दिले नाही. त्या बाजारात निपटनिरंजन नावाचे साधू आले होते. त्यांनी कबीरांना कारण विचारले, तेव्हा ते म्हणाले, "हे स्वामीजी! हे जाते फिरताना पाहून माझे मन चक्रावले आहे. त्या टाकलेल्या गव्हाच्या दाण्याचे जसे पीठ होत आहे तसेच या विचित्र भवसागरात अडकल्यामुळे आपले पीठ होणार हे नक्की." ते ऐकून साधुमहाराज म्हणाले, "हे वत्स! सगळ्याच दाण्यांचे पीठ होत नाही. खुंट्याच्या आधाराने जे दाणे राहिलेले असतात ते वाचतात. तसेच जे लोक प्रभूचे नामस्मरण करतात ते भवचक्रात सापडत नाहीत. त्यांना यमाचे भय मुळीच नसते. जे प्रभूचे नामस्मरण करीत नाहीत, त्यांना मारण्यासाठी यम टपलेलाच असतो." हा उपदेश ऐकून कबीरांनी त्या साधूंना धन्यवाद दिले. त्यानंतर ते दोघे घरी परतले.

गुरूशिवाय वाट कोण दाखवणार? सद्गुरूंचा शोध कबीरांनी सुरू केला. त्यावेळी रामानंदस्वामींचे नाव कबीरांनी ऐकले होते. रामानंदस्वामी अत्यंत विद्वान होते. तेच आता आपले सद्गुरू होय असे कबीरांनी मनोमन ठरविले.

कबीरांनी मोठ्या धाडसाने रामानंदस्वामींजवळ आपणास

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

शिष्य म्हणून स्वीकारण्याची विनंती केली. रामानंदस्वामींनी कानात बोटे घातली व म्हणाले, "तू कधीही माझा शिष्य होणार नाहीस." रामानंदस्वामी घरातून निघून गेले.

दुसऱ्या दिवशी रामानंदस्वामींच्या आश्रमात कबीरजी पुन्हा गेले. त्यांना पुन्हा विनंती केली, तेव्हा रामानंदस्वामी म्हणाले, "हे बघ! तू यवनाच्या वंशातला आहेस. त्यामुळे तुला उपदेश करण्यास मी पात्र नाही." कबीर म्हणाले, "तुम्ही काहीही म्हणा. मी तुम्हाला गुरू केल्याशिवाय राहणार नाही. माझा इरादा पक्का आहे."

रामानंदस्वामी गंगा नदीवर नियमित स्नानाला येत असत. स्वामींरामानंदांकडून गुरूमंत्र मिळावा व त्यांच्या पवित्र चरणकमलांचा स्पर्श आपल्यास व्हावा म्हणून ते गंगेच्या तीरावरील पायऱ्यांवर झोपले. एके दिवशी रामानंदस्वामी घाईने त्या पायऱ्यांवरून येत होते, तेव्हा त्यांचा स्पर्श झोपलेल्या कबीरांना झाला व मुखातून राम, राम असे शब्द प्रकटले. कबीर मोठ्या आनंदाने उठले व रामानंदस्वामींना साष्टांग नमन केले व म्हणाले की, "गुरूमहाराज! आजचा दिवस सोन्याचा दिवस आहे. आपल्यासारख्या गुरूंकडून मला गुरूमंत्र मिळाला. सद्‌गुरूंचे चरण लागल्यामुळे मी धन्य झालो."

एकदा रामानंदस्वामींना कबीर खुल्या बाजारात भजन करताना दिसले. त्यांच्या अवतीभोवती बरेच भक्तगण जमले होते. कबीरजींची सत्त्वपरीक्षा पाहण्यासाठी रामानंदस्वामी कबीरांजवळ आले. कबीर रामनामात तल्लीन होऊन गेले होते. भजन करतांना त्यांच्या मुखातून 'रामानंदऽग गुरू माझा' असा शब्द गेला. यामुळे रामानंदस्वामी चिडले व त्यांनी आपल्या पायातील खडावा कबीरजींच्या दिशेने भिरकावल्या व विचारले की रामानंदाने तुला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केव्हा दीक्षा दिली?

खडाव्या जोरात लागल्याने कबीरांच्या डोक्यातून रक्ताच्या धारा वाहत होत्या. तरीपण शांतपणाने कबीर म्हणाले, "हे पहा गुरूंचे माझ्यावर केवढे प्रेम? खुद्द आपल्या खडावा त्यांनी माझ्या मस्तकावर धारण करण्यास दिल्या आहेत. गुरूप्रेम फार महत्त्वाचे असते."

आपल्या शिष्यावर खुश होऊन रामानंदस्वामींनी कबीरांना 'असेच तू रामानंदाचे भजन करीत जा' असे सांगितले.

कबीरांची कीर्ती फुलाच्या सुगंधाप्रमाणे सर्वत्र दरवळत होती. काही लोकांना हे पाहवले नाही. त्यांनी कबीरांचा अपमान करण्याचे ठरवले. त्यांनी एक बेत आखला. वेगवेगळ्या तीर्थक्षेत्रांच्या पंडितांना पत्रे लिहून कबीरांच्या घरी बोलवून घेतले. हजारो साधू आले की कबीरांची त्रेधातिरपीट उडेल असे त्या लफंग्या लोकांना वाटले.

या उपद्व्यापामुळे हजारो संतमंडळी कबीरांकडे आली. त्या सर्वांची त्यांनी उत्तम तऱ्हेने उतरण्याची व्यवस्था केली; पण एवढ्या लोकांना अन्नदान कसे करायचे हा प्रश्न त्यांना पडला. कबीरांनी आपले इष्टदैवत श्रीरामाचा धावा केला. श्रीरामाने आपल्या लाडक्या भक्तासाठी कबीरांची हजारो रूपे घेतली व मायेने अन्नपदार्थ आणून सर्व संतमंडळींची क्षुधा शांत केली.

हा चमत्कार पाहून त्या दुष्ट लोकांना स्वत:च्या करणीबद्दल वाईट वाटले. त्यांनी कबीरांची क्षमा मागितली. कबीरांच्या रसाळ वाणीमुळे काशीमधील अनेक लोक त्यांचे शिष्य झाले. कबीरजी त्या सर्वांबरोबर श्रीरामाचे भजन करीत असत.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri

अध्याय ८ वा

॥ विठ्ठलपंत व रामानंद स्वामी ॥

(एके दिवशी त्रिनेत्रधारी, पार्वतीपती भोलेनाथ, विश्वनिर्माण-कर्ता ब्रह्मदेव हे दोघे लक्ष्मीपती, श्रीहरी विष्णूंना भेटायला गेले होते. तेव्हा श्रीहरी म्हणाले, की आपण त्रिदेव पृथ्वीवर अवतार घेऊन राहू. त्रिदेवांनी निवृत्तीनाथ, सोपानदेव व ज्ञानेश्वर असा अवतार घेतला. आदिमायेने मुक्ताईचा अवतार घेतला. ती या तीन भावडांची भगिनी झाली. तो कथाभाग पुढील अध्यायात आहे.)

अत्यंत पवित्र अशा गंगा नदीच्या तीरावर आपेगाव नावाचे एक क्षेत्र आहे. तेथे एक गोविंदपंत कुलकर्णी नावाचे ब्राह्मण गृहस्थ राहत असत. ते सर्व वेळ भगवंताची पूजाअर्चा करण्यात घालवत असत. त्यांना सुविद्य, सुशील पत्नी लाभली होती. त्यांना एक पुत्ररत्न झाले. गोविंदपंत व निराबाई या दांपत्याने त्या मुलाचे नाव विठोबा ठेवले. त्याला लहानपणापासूनच अध्यात्माची गोडी होती. आठ वर्षांचा झाल्यावर व्रतबंध संस्कार केला. तो गायत्रीदेवीची उपासना करू लागला. व्रतबंधानंतर चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणे यांचा त्याने खोलवर अभ्यास केला.

काही वर्षांनंतर विठोबाने आपल्या माताश्री व पिताश्रींकडे तीर्थाटनासाठी परवानगी मागितली. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या व शेवटी अलंकापुरीस म्हणजे आळंदीला आले.

आळंदीमधील पवित्र इंद्रायणीत स्नान करून विठोबा देवपूजा करीत बसले होते. सिद्धोपंत नामक एका ब्राह्मणाने विठोबाला पाहिले. सिद्धोपंतांनी विठोबाला सर्व काही विचारले. आपल्याच भक्तीमार्गातील आहे असे कळाल्यावर ते त्यांना भोजनासाठी घरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizaqtion by eGangotri

घेऊन गेले. तेथे त्यांचा व्यवस्थित आदरसत्कार केला.

पांडुरंगाने सिद्धोपंतांच्या स्वप्नात येऊन सांगितले की तुझी सुंदर कन्या विठोबास दे. तुला सुविद्य जावई लाभेल. सिद्धोपंतांनी याबद्दल विठोबास विचारले. विठोबा म्हणाले, "मी त्या पंढरपूर-वासी पांडुरंगाच्या आज्ञेशिवाय तुमच्या मुलीबरोबर लग्न करणार नाही."

पांडुरंगाने विठोबाच्या स्वप्नात येऊन सांगितले की, "हे वत्स! तू आता प्रपंचाला सुरुवात कर. सिद्धोपंताची कन्या तुला योग्य आहे." त्यानंतर त्या दोघांचा विवाह थाटामाटात पार पडला. विठोबाने आपल्या पत्नीस माहेरी पाठवले व पुढील तीर्थाटनासाठी प्रस्थान केले.

काही दिवसानंतर गोविंदपंत व निराबाई यांचे निधन झाले. त्यामुळे विठोबाने सासुरवाडीसच रहाण्याचे मान्य केले.

विठोबाचे संसारात मन रमत नव्हते. त्यांच्या मनात आले की आपण आता संन्यास घ्यावा. रामानंदस्वामींचा अनुग्रह घेऊन विठोबाजींनी संन्यास घेतला.

काही दिवसानंतर रामानंदस्वामी फिरत अलंकापुरीस आले. ते एके ठिकाणी बसले होते. विठोबाच्या पत्नीने त्यांना नमस्कार केला तेव्हा 'पुत्रवती भव' असा शुभाशीर्वाद दिला.

विठोबाची पत्नी म्हणाली, "स्वामीजी! माझे पतीपरमेश्वर संन्यास घेऊन तीर्थाटनासाठी गेले आहेत. पतीशिवाय पत्नीस मूल कसे होईल? ते काशी येथेच आहेत." रामानंदस्वामींनी रुक्मिणीस खोदून खोदून सर्व काही विचारले. त्यांनी मनोमन ओळखले की आपल्याकडून अनुग्रह घेतलेला विठोबाच हिचा जीवनसाथी आहे.

रामानंदस्वामी पुन्हा काशीस आले. त्यांनी विठोबास पुन्हा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा दिली. गुरूंची आज्ञा शिरसावंद्य मानून ते दांपत्य अलंकारपुरीस आले.

मधेच संन्यास सोडून पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारल्यामुळे आळंदीतले ज्ञानी लोक विठोबांना छळू लागले, निंदा करू लागले. लोकांच्या वागण्याला कंटाळून विठ्ठलपंत गावाच्या बाहेर झोपडी बांधून राहू लागले. गावातील लोकांनी त्याला ब्रहिष्कृत केले होते. अशी बारा वर्षे त्या झोपडीमध्ये काढली. काही वर्षांतच त्या दांपत्यास तीन पुत्ररत्न व एक कन्यारत्न यांची प्राप्ती झाली. हे सर्वजण ईश्वराचे अवतार होते.

पहिला पुत्र निवृत्तीनाथ हा हलाहल विष आपल्या कंठात धारण करणारे महादेव यांचा अवतार, ज्ञानेश्वर हा शंख, चंद्र, गदाधारी श्रीहरी विष्णूंचा अवतार तर सोपानदेव हा ब्रह्मदेवाचा अवतार होय. या तिघा भावंडाची भगिनी मुक्ताबाई साक्षात् आदिमायेचा अवतार होती.

अध्याय ९ वा

।। संत ज्ञानेश्वर ।।

(आपण यापूर्वीच्या आठव्या अध्यायात पाहिली ती ज्ञानेश्वरांचे पिताश्री विठ्ठलपंत कुलकर्णी यांची कथा. आता त्यांचा पुत्र ज्ञानेश्वर यांची कथा पाहू या.)

निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताबाई या चारही भावंडांच्या बाललीलांनी घर आनंदात बुडाले होते. ही चार भावंडे दिवसेंदिवस मोठी होऊ लागली. त्यामुळे आईवडिलास चिंता वाटू लागली. गावातील सर्व मुले त्यांना 'संन्याशाची वेडी पोरं' असे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

सारखे चिडवीत असत. आळंदी ग्रामस्थातील सर्वांनीच कुलकर्णी कुटुंबियास गावातून बहिष्कृत केले होते. मुले आठ वर्षांची झाल्यावर त्यांचा व्रतबंध संस्कार कसा करावयाचा हा यक्षप्रश्न कुलकर्णी दांपत्यास पडला.

एके दिवशी त्यांनी आळंदीतील सर्व प्रतिष्ठीत ब्राह्मणांना बोलावून घेतले व विनंती केली की, 'आपण सांगाल ते प्रायश्चित्त आम्ही घेऊ; पण आमच्या मुलांच्या मुंजीस परवानगी द्या.'

त्या ब्राह्मणसभेने सांगितले की 'प्रथम तुम्ही गृहस्थाश्रम स्वीकारला, मधेच अज्ञानपणामुळे संन्यास घेतला. तेथेही पुन्हा गोंधळ केला व पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारला. याला आमच्या शास्त्रात एकच प्रायश्चित्त आहे ते म्हणजे देहांत प्रायश्चित्त. तुम्ही देहांत प्रायश्चित्त घेतल्याशिवाय तुमच्या मुलांच्या मुंजी होणार नाहीत.'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

नाहीत.'

या निर्णयामुळे ज्ञानेश्वरांच्या वडिलांना फार वाईट वाटले. एके रात्री त्यांच्या आईवडिलांनी नदीत उड्या घेऊन देहांत प्रायश्चित्त घेतले. त्या ब्राह्मणसभेने त्या चार भावंडांस पैठणला जाऊन तेथून विद्वान ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र आणण्यास सांगितले. शुद्धिपत्र आणल्यास पुन्हा जातीत सामील करून घेता येईल असे सांगितले.

शुद्धिपत्रक मिळवण्यासाठी ही चार भावंडे पैठणला गेली. तेथील विद्वान ब्राह्मणांनी सर्व धर्मपुराणे चाळून पाहिली; पण कोठेही प्रायश्चित्त आढळले नाही. सभेमध्ये त्या विद्वान ब्राह्मणांनी सांगितले की 'देव हा सर्वत्र भरून राहिलेला आहे, तो जगातल्या प्रत्येक कणाकणात आहे, अशी भक्ती केल्यास तुम्ही दोषमुक्त व्हाल.' ही चौघे भावंडे पैठणलाच राहू लागली.

एके दिवशी काही टवाळखोर लोकांनी ज्ञानेश्वरांची कुचेष्टा केली. ते लोक म्हणाले, "नाव ज्ञानेश्वर. ज्ञानाचा ईश्वरच जणू आहे म्हणे. काही काडीचे ज्ञान तरी आहे का रे? नाव मोठे नि लक्षण खोटे असा हा प्रकार आहे. नुसते नाव ठेवून काही ज्ञान मिळत नाही." तिकडून एक माणूस काळाकुट्ट रेडा घेऊन चालला होता. ते लोक म्हणाले, "या रेड्याचे नावही ज्ञानेश्वर आहे; पण काही ज्ञान नाही."

ज्ञानेश्वरमहाराज शांत चित्ताने म्हणाले, "या रेड्यात आणि माझ्यात काहीही फरक नाही. ईश्वर ओतप्रोत सर्वत्र भरून राहिलेला आहे." या बोलण्यामुळे त्या लोकांना राग आला. त्याने त्या रेड्यास चाबकाने मारण्यास सुरुवात केली; पण वळ ज्ञानीयांचा राजा ज्ञानेश्वरांच्या पाठीवर उठले.

ते लोक म्हणाले, "तुमच्यात व या रेड्यात भेद नसेल तर या रेड्याच्या तोंडातून वेद बोलवून दाखवा पाहू बरे!"

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

ज्ञानेश्वरांनी मनोमन विठ्ठलाचे स्मरण केले. ते रेड्याजवळ आले. त्यांनी त्या रेड्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला व वेदातील दोन ऋचा म्हटल्या. काय आश्चर्य! रेड्याने ताबडतोब जशाच्या तशा त्या दोन ऋचा म्हणून दाखवल्या. या घटनेने उपस्थित असलेल्या लोकांचे धाबेच दणाणले. त्या सर्व लोकांनी ज्ञानेश्वरांची क्षमा मागितली व त्यांचा जयजयकार केला.

ज्ञानेश्वर आपल्या योगमायेने अनेक चमत्कार करीत होते. त्यांनी एका ब्राह्मणाच्या वडिलांच्या श्राद्धासाठी प्रत्यक्ष यमाकडून पितरांना बोलावून घेतले. त्या चार भावंडांनी पैठण सोडण्याचे ठरविले. जाण्यापूर्वी त्या चारही भावंडांचा ब्राह्मणसभेने शाल, श्रीफल देऊन सत्कार केला. त्या ज्ञानी रेड्याला घेऊन जावे अशी विनंती केली. ही चारही भावंडे म्हणजे देवाचा जणू अवतार आहेत. यांना प्रायश्चित्ताची आवश्यकताच नाही, अशा आशयाचे पत्रसुद्धा लिहून दिले.

ते पत्र घेऊन आनंदाने ती चारही भावंडे आळंदीस येण्यासाठी निघाली. काही दिवसानंतर ते महालय या तीर्थक्षेत्री आले. हे तीर्थक्षेत्र म्हणजे साक्षात् महालसा देवीचे जागृत स्थान होय. तेथे त्यांची गाठ मोहनीराज साधूशी झाली. त्यानंतर तेथेच काही दिवस राहून श्रीमद्भगवद्गीतेच्या आधारावर 'भावार्थ दीपिका' हा अनमोल ग्रंथ लिहिला. संत नामदेवांनी पुढे याचे नाव बदलून 'ज्ञानेश्वरी' असे ठेवले. या अमौलिक ग्रंथामुळे संस्कृत न समजणाऱ्या लोकांना गीतेचा भावार्थ कळला. तसेच आलेल्या दिव्य अनुभवांवर 'अमृतानुभव' हा दुसरा मौलिक ग्रंथ लिहिला. आळंदीच्या वनात आल्यानंतर तो ज्ञानी रेडा मृत्यु पावला. ज्ञानेश्वरांनी जातीने त्या रेड्याची समाधी बांधली व पूजा केली. त्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जागेला 'म्हसोबा' असे नाव दिले.

पैठणच्या अद्‌भुत चमत्कारांमुळे आळंदीतले काही ब्राह्मण-सुद्धा या चार भावंडांस मानू लागले. ही चारही भावंडे आपला नक्कीच उद्धार करतील अशी त्यांची मनोधारणा झाली.

आळंदीमध्ये विसोबा नामक एक दुष्ट मनुष्य होता. तो या चौघांना फार छळत असे. एकदा निवृत्तीनाथांना मांडे खाण्याची इच्छा झाली. त्यांनी मुक्ताईस मांडे कर म्हणून सांगितले. मांडे भाजण्याकरिता खापर आणण्यासाठी ती कुंभारदादाकडे गेली. रस्त्यात तिला लबाड विसोबा भेटला. त्याने मुक्ताईकडून सर्व काही जाणून घेतले व कुंभारदादाकडे तिच्याआधी पोहचूनं मुक्ताईस खापर देऊ नकोस असे सांगितले.

कुंभारदादाने मुक्ताईस खापर दिले नाही. आपल्या लाडक्या भावांना मांडे कसे द्यावे? असा प्रश्न तिला पडला. ती रडतच घरी आली. ज्ञानेश्वरांनी अंतर्मनाने सर्व काही जाणले. ते मुक्ताईस म्हणाले, "अग वेडी! खापर दिले नाही म्हणून का रडतेस? ये, माझ्या पाठीवर मांडे भाज. माझ्या पाठीचा खापर म्हणून उपयोग कर." ज्ञानेश्वरांनी आपल्या योगसामर्थ्याच्या मायेने पाठ तापवली. पाठ विस्तवासारखी लालबुंद झाली होती. मुक्ताईने पटापट मांडे भाजून घेतले. बाहेरून हे सर्व काही विसोबा पाहत होता.

विसोबाने ताबडतोब ज्ञानेश्वरांना साष्टांग लोटांगण घातले व क्षमा मागितली. ज्ञानेश्वरांनी एक मांडे त्यांना खाण्यासाठी दिले व म्हणाले, 'तू खेचर आहेस विसोबा!' तेव्हापासून विसोबा, विसोबा खेचर या नावाने ओळखले जाऊ लागले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय १० वा

॥ संत नामदेव व ज्ञानेश्वर तीर्थयात्रा ॥

ज्ञानेश्वरांच्या काळात संत शिरोमणी नामदेवरायांची पंढरपुरात मोठी कीर्ती होती. हा नामदेव कोण आहे? तो कोणत्या प्रकाराने देवाला आळवतो हे जाणून घेण्याकरिता ज्ञानेश्वर पंढरपुरास आले. नामदेवांनी ज्ञानेश्वरांना आलिंगन दिले. दोघांनी एकमेकांचे विचार समजावून घेतले.

ज्ञानेश्वरांनी नामदेवांजवळ तीर्थयात्रेला जाण्याची इच्छा प्रगट केली. "आळंदीहून मी याच कारणासाठी तुझ्या भेटीला आलो आहे. हे नामदेवा! हा माझ्या मनातील हेतू तू पूर्ण करशील का?"

नामदेव म्हणाले, " माझी येण्याची खूप इच्छा आहे; पण त्यापूर्वी मला विठ्ठलाची परवानगी घेतली पाहिजे." त्यानंतर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ज्ञानेश्वर व नामदेव विठ्ठलाच्या गाभाऱ्यात आले. नामदेव विठ्ठलाला म्हणाले, "हे पंढरीनाथा! माझा जिवलग सखा ज्ञानेश्वर याला मला बरोबर घेऊन तीर्थयात्रेला जावयाचे आहे. तुझी परवानगी मागण्यासाठी मी येथे आलो आहे."

विठ्ठल प्रसन्न झाला. त्याने ज्ञानेश्वरांस विचारले, "का रे? तुला तीर्थयात्रेची काय आवश्यकता आहे?"

तेव्हा ज्ञानेश्वर म्हणाले, "हे रुक्मिणीपती, जीवनात सत्संगती अत्यंत आवश्यक आहे. नामदेवासारख्या लोकांची मला संगत व्हावी म्हणून मी तीर्थयात्रा करण्याचे ठरवले आहे."

विठ्ठलाने नामदेवांना तीर्थयात्रेसाठी जाण्याची अनुमती दिली. व सांगितले की, "हे नामदेवा! तीर्थयात्रेस जेथे जाशील तेथे माझा विसर पडू देऊ नकोस. तीर्थाटनात सदैव माझे नामस्मरण सुरू ठेव. तुझी आता रोज भेट होणार नाही. त्यामुळे मला आता करमणार नाही. जा, लवकर जाऊन ये. मी तुझी वाट बघतो." विठ्ठलाने ज्ञानदेवांस सांगितले की, "हे ज्ञानदेवा! माझ्या लाडक्या नाम्याचा नीट सांभाळ कर. सदैव त्याच्या बरोबर रहा."

ज्ञानेश्वर व नामदेव गाभाऱ्यातून बाहेर पडताना साक्षात् विठ्ठलाचे डोळे पाणावले. त्यानंतर ते पवित्र अशा चंद्रभागेच्या तीरी आले. त्यानंतर तेथे स्नान करून त्यांनी तीर्थाटनास प्रस्थान केले.

पंढरपूर सोडून नामदेव गेल्यापासून रुक्मिणीपतीचे हृदय स्थिर नव्हते. पांडुरंगाला सारखी नामदेवांची आठवण येत होती. नामदेवांना पण तीर्थाटनात आपल्या प्रिय परममंगल पांडुरंगाची आठवण येत होती. ज्ञानेश्वरांनी नामदेवांच्या हृदयातील भाव अंतर्मनाने जाणला. तेव्हा ज्ञानेश्वर म्हणाले, "हे जिवलगा! तू आपल्या प्रेमरूपी दोरखंडाने विठ्ठलास बांधून ठेवले असताना एवढा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भावनावश का होतोस? तू तर तुझ्या लाडक्या विठ्ठलास हृदयरूपी बंदिखान्यात कोंडून ठेवले आहेस ना?"

यावर नामदेव म्हणाले, "हे ज्ञानदेवा! मी विठ्ठलाची सगुण उपासना करतो. त्यामुळे मला विठ्ठलाचे ते सावळे मनोहर मुखकमल पाहिल्याशिवाय चैन पडत नाही." तीर्थाटनात अनेक आध्यात्मिक विषयांवर या दोन ज्ञानी लोकांची चर्चा झाली.

तीर्थयात्रा करीत त्यांचे हस्तिनापुरात आगमन झाले. हस्तिनापुरातील लोकांना ज्ञानेश्वर व नामदेवांची विद्वता माहीत होती. त्यामुळे या दोन संतांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. प्रत्येकाने या दोन संतांना हारफुले अर्पण करण्यासाठी आणली होती. नामदेवांनी तेथील लोकांसाठी अनेक सुश्राव्य कीर्तने केली. ती सुश्राव्य कीर्तने ऐकताना लोक आनंदाने नाचत असत. विठ्ठलाच्या प्रेमरूपी वर्षावात नामदेवांनी सर्वांना न्हाऊन काढले होते. रोज हजारो लोक त्यांचे दर्शन घेण्यासाठी येत. त्यामुळे त्यांची कीर्ती दूरवर पसरली. जो तो त्यांना 'साधुमहाराज' म्हणू लागला.

त्या काळी दिल्लीमध्ये बादशाही अंमल होता. या साधुमहाराजांची चर्चा बादशहाच्या कानी गेली. या साधुमहाराजांचे एक तरी सुश्राव्य कीर्तन आपण ऐकले पाहिजे असे त्याला वाटले. त्याने नामदेवांच्या साधुत्वाची परीक्षा घेण्याचे ठरविले.

एके दिवशी नामदेव कीर्तन करीत होते. सर्व श्रोतृवृंद आनंदरसात डुंबला होता. तेवढ्यात तेथे बादशहा आला. त्याने आपल्या सेवकांना बोलावून तेथे गाय आणली व सर्व लोकांसमोर व नामदेवांसमोर त्या गायीची हत्या केली. त्या घटनेमुळे सर्वांना वाईट वाटले.

बादशहा नामदेवांना म्हणाला, "स्वामीजी! जर तुम्ही ही मृत्यु

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizaqtion by eGangotri

पावलेली गाय पुन्हा जिवंत कराल तरच तुम्ही खरेखुरे साधू. नाहीतर तुम्हालासुद्धा मी यमलोकी पाठवीन."

बादशहाने नामदेवांना विचारले की, किती दिवसांत ही गाय पुन्हा तू जिवंत करशील? यावर नामदेव शांतपणे उत्तरले "महाराज! या गायीला पुन्हा जिवंत करण्यासाठी चार दिवसांचा कालावधी मला पुरेसा आहे."

नामदेवांची द्विधा मन:स्थिती झाली होती. या संकटापासून आपला परमेश्वर श्रीविठ्ठलच सोडवेल असे त्यांना वाटले. त्यांनी अहोरात्र कीर्तन करून विठ्ठलाचा धावा करण्यास सुरुवात केली. सलग तीन दिवस नामदेव कीर्तनातून विठ्ठलास आळवित होते. चौथ्या दिवशी सावळा पांडुरंग नामदेवांवर प्रसन्न झाला. त्याने नामदेवांच्या अंत:करणात जाऊन गायीस पुन्हा जिवंत केले.

नामदेव या घटनेमुळे आनंदित झाले. ते विठ्ठलाला म्हणाले की, "हे विठूराया! चार दिवसांपर्यंत तू माझी सहनशक्ती का पाहिलीस?" यावर विठ्ठल म्हणाला की, "तू बादशाहाला सांगितले की चार दिवस थांब, मी गाय जिवंत करतो. म्हणून मी उशिरा आलो. तू ताबडतोब गाय जिवंत करतो असे म्हणाला असतास तर मी तुझ्या मदतीला लगेच आलो असतो. मी भक्तांनी हाक मारली की ताबडतोब येत असतो." असे बोलून पंढरीनाथ अंतर्धान पावले.

नामदेवांनी गाय जिवंत केली हे सर्वांनी पाहिले. सर्वांनी नामदेवांचा जयघोष केला. बादशहाला हे कळल्यानंतर तो धावत पळत आला व नामदेवांच्या चरणकमलांवर मस्तक ठेवून क्षमा मागितली. हे दृश्य पाहून सर्वांना नामदेवांच्या खऱ्या साधुत्वाची प्रचीती आली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय ११ वा

॥ संत कबीरांची वाण्यावर कृपा ॥

मागील अध्यायात आपण नामदेवांचा चमत्कार पाहिला. आता पुढील कथा शांत चित्ताने श्रवण करावी.

संत शिरोमणी नामदेव व ज्ञानेश्वर अनेक पवित्र तीर्थक्षेत्रे करत करत महादेवाचे अत्यंत पवित्र स्थान काशी येथे म्हणजेच आनंदवनात आले. आनंदवनात त्यांचा चार महिने मुक्काम होता. कबीर तेथेच रहायला होते. त्या कबीरांच्या घरी अनेक संत अतिथी म्हणून आले. कबीरांनी व त्यांच्या पत्नीने त्यांना वंदन केले. त्यांना बसायला गालिचा नव्हता. त्यामुळे कबीरांनी आपल्या उपाशी झोपलेल्या मुलांच्या अंगाखालची फाटलेली पोती त्या संतमंडळीस बसण्यास दिली. कबीरांनी या सर्व संतमंडळींसाठी भोजन प्रबंध करण्यास सांगितले. कबीरांची पत्नी स्वयंपाक घरात गेली तर घरात अन्नाचा एक कणसुद्धा नव्हता. आता या संतांना भोजनाशिवाय पाठवायचे कसे? म्हणून ती धान्य उसने आणण्यासाठी बाजारात गेली. अन्नधान्य विकत घ्यायलासुद्धा त्या गरीब कुटुंबाकडे पैसे नव्हते. पण अतिथींना भोजन देण्याचा मनोदय पक्का होता. कबीरांची पत्नी वाटेमध्ये अखंड श्रीरामाचे नामस्मरण करीत होती. रात्री उशीर झाल्यामुळे सर्व दुकाने बंद झाली होती. एका वाण्याचे दुकान सुरू होते. ती त्या वाण्याजवळ गेली व धान्य उधार देण्याची तिने विनंती केली.

वाणी म्हणाला, "अहो ताई! तुम्ही कोण बरे? मी तुम्हाला ओळखत नाही. मी ओळखीशिवाय कोणालाही धान्य उधार देत नाही."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

त्यांची पत्नी म्हणाली, "अहो शेठ! महात्मा कबीर माझे पतीपरमेश्वर आहेत. ते मोठे विष्णुभक्त आहेत. घरी संतांना भोजन द्यायचे आहे. तुम्ही लवकर धान्य द्या. संतमंडळी भुकेले असतील?"

तो वाणी म्हणाला, "हे प्रिये! मी तुझ्यावर आज खूश झालो आहे. तुझ्यासारखी देखणी स्त्री मी आजपर्यंत पाहिली नव्हती. तू जर माझी कामवासना पूर्ण केलीस तर मी धान्यच काय, तू मागशील ते देईन राणी; पण तू या गोष्टीस तयार नसशील तर जा घरी."

कबीरांच्या पत्नीला फार वाईट वाटले. ती या दुष्ट माणसावर मनातून संतापली. तिने विचार केला की या नराधमाला आपण जर नाही म्हटले तर आता धान्य दुसरीकडे कोठे मिळणार? धान्य न मिळाल्याने अतिथी उपाशी राहतील व आपले स्वत्व बुडेल. सीतापती नक्कीच यातून काहीतरी मार्ग काढतील.

कबीरांच्या पत्नीने शपथ घेऊन वाण्याला सांगितले की, "मला आता धान्य द्या. मी घरी जाऊन सर्व लोकांना भोजन देऊन येते." वाण्याने तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तिला धान्य दिले.

तिने धान्य घरी आणल्यानंतर ते शिजवण्यासाठी तयारी करू लागली. तेव्हा त्या संतमंडळींनी सांगितले की तुम्ही तसदी घेऊ नका. आम्ही आमच्या हाताने अन्न शिजवतो. त्यानंतर कबीरांची पत्नी कबीरांना म्हणाली, "हे स्वामी! आज मी एका वाण्याच्या दुकानातून धान्य आणले आहे. त्या वाण्याची वक्रदृष्टी माझ्यावर पडली. त्याने मला कामेच्छा पूर्ण करण्याच्या वचनावर धान्य उधार दिले आहे."

कबीर म्हणाले, "जा! तू दिलेले वचन पूर्ण कर. मनात काहीही संकोच बाळगू नकोस. दशरथनंदन यातून नक्कीच काहीतरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मार्ग काढेल. आज ज्या वाण्याच्या कृपेमुळे आपण संतांना भोजन दिले, त्या वाण्याची इच्छा तू नक्कीच पूर्ण कर."

ते पावसाळ्याचे दिवस होते. मुसळधार पाऊस पडत होता. कबीरांनी आपल्या पत्नीस खांद्यांवर घेतले व वाण्याच्या दुकानापर्यंत नेऊन पोहचवले. कबीर म्हणाले, 'तू पतिव्रता आहेस: तू मनात कोणताही संकोच न ठेवता त्या वाण्याची इच्छा पूर्ण कर. माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे.' असे म्हणून कबीर तेथून निघून गेले.

वाणी तिची वाट पाहत बसला होता. ती पावसात ओलीचिंब भिजली होती. पण तिच्या पायाला थोडासुद्धा चिखल लागला नव्हता. वाणी म्हणाला, "हे अप्सरे! बाहेर एवढा पावसामुळे चिखल झालेला असताना, तुझे पाय एवढे स्वच्छ कसे?"

कबीरांची पत्नी म्हणाली, "माझ्या पतीराजांनी मला स्वत: खांद्यावर बसवून तुमच्या दुकानापर्यंत आणले. मी सर्व सत्यकथा त्यांना सांगितली. मी पतिव्रता आहे. त्यांनीच मला तुमची कामेच्छा पूर्ण करण्यासाठी परवानगी दिली."

कबीरांच्या पत्नीचे हे कथन ऐकून वाणी मनातच ओशाळला. तो कबीरांच्या पत्नीला म्हणाला, "हे माते! मला क्षमा कर. मी निर्दयी, लज्जाहीन आहे म्हणून मी मागणी केली होती. मला कृपया क्षमा करा. मी आता प्रत्येक स्त्रीला मातेच्या रूपात पाहीन. माझ्या हातून भविष्यकाळात असे पाप पुन्हा कधीही होणार नाही. कबीरजी खरोखरच उदार आहेत. मला त्यांच्या चरणांजवळ माफी मागायची आहे. कृपया माझी व त्यांची भेट घडवून आणावी."

कबीरांची पत्नी म्हणाली, "शेठजी! तुम्हाला पश्चात्ताप झाला म्हणजेच तुमच्या पापाचे क्षालन झाले. चला मी तुम्हाला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पतीराजांकडे नेते.'' तो वाणी व कबीरांची पत्नी कबीरांकडे आले. वाण्याने धावतच कबीरांच्या चरणकमलांवर लोटांगण घातले व 'यां मूर्खाला क्षमा करा' असे म्हणाला.

त्याच्या मनातील भाव पाहून कबीरांनी त्याला हाताला धरून उठवले. रामाचे नामस्मरण करण्याचा साधा सोपा गुरूमंत्र त्याला दिला.

कबीरांची कीर्ती दूरवर पसरली होती. नामदेव व ज्ञानेश्वरांच्या कानी कबीरांची कीर्ती पोहचली. नामदेव व ज्ञानेश्वर कबीरांच्या भेटीस निघाले. कबीराने नामा व ज्ञानदेवांचे स्वागत केले. त्यांना आलिंगन दिले. ज्ञानेश्वर नामदेवांना म्हणाले, ''हे नामदेवा, तुला काही आठवतंय का ? तू उद्धव आहेस. तर शुकाने कबीराचा अवतार घेतला आहे. तुम्ही दोघांनी केशवाच्या सांगण्यावरून जन्म घेतलेला आहे.'' त्या दोघांना एकमेकांची ओळख पटली.

ज्ञानेश्वर म्हणाले, ''हे कबीर! तुला पंढरपूर माहीत असेलच. तेथे पुंडलिकाला भेटण्यासाठी आलेला केशव विठ्ठलाच्या रूपाने राहिलेला आहे. तू त्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपुरात अवश्य ये.''

''होय ज्ञानेश्वरा! मी कार्तिकी एकादशीला तेथे नक्की येईल.'' असे कबीर ज्ञानेश्वरांना म्हणाले.

त्यानंतर ज्ञानेश्वर व नामदेव कबीरांचा प्रेमळ निरोप घेऊन पुढील तीर्थयात्रेस निघाले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय १२ वा

।। संत नामदेवांच्या हातून घडलेले चमत्कार ।।

ज्ञानेश्वर व नामदेव यांनी वाराणसीहून प्रस्थान केले. ते गया, प्रयाग इ. तीर्थक्षेत्रे करून अत्यंत कडक उन्हाळ्यात मारवाड देशात आले. या प्रांतात अत्यंत कडक उन्हाळा होता. ऊन मी म्हणत होते. या प्रांतात अत्यंत बेताचा पाऊस पडत असल्याने उन्हाळ्यात पाण्यासाठी लोकांची त्रेधातिरपीट उडते.

भ्रमंती करता करता ज्ञानेश्वर व नामदेव या दोघांना खूप तहान लागली. त्यांना तेथे जवळच विहीर दिसली. विहिरीत अत्यंत खोलवर पाणी होते. पाणी काढण्यासाठी कळशी नसल्याने पाणी कसे काढायचे असा प्रश्न त्यांना पडला.

संत ज्ञानेश्वरांनी यावर एक उपाय योजला. त्यांनी आपल्या योगमायेच्या सामर्थ्याने सूक्ष्मरूप धारण केले व विहिरीतील पाणी पिऊन ते तृप्त झाले. त्यानंतर ज्ञानेश्वर पुन्हा मूळ रूपात आले व म्हणाले, "हे नामदेवा! तू एवढा चिंताक्रांत का झाला आहेस? थांब! मी पुन्हा तुझ्यासाठी पाणी आणतो. तू पाण्यासाठी उगीच चिंता करू नकोस."

यावर संत नामदेव म्हणाले, "हे मित्रा! रुक्मिणीपती पंढरपूरवासी विठ्ठल परमात्मा सर्वत्र भरून राहिलेला आहे. तो सर्वत्र आहे. प्रत्येक कणाकणात आहे. तो नक्कीच माझी चिंता दूर करील. आता बघ ज्ञानदेवा!" असे बोलून नामदेवांनी पांडुरंगाचा धावा सुरू केला, "हे सावळ्या पांडुरंगा! लवकर ये. माझा सांभाळ कर. मला फार तहान लागली आहे. तहानेमुळे माझा जीव चालला आहे."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

इकडे पंढरपुरास रुक्मिणीमातेने नामदेवांचा धावा ऐकला व लगेच आपल्या पतीस सांगितले की, "अहो तुमचा लाडका भक्त नामदेवास फार तहान लागली आहे. त्याचा तहानेमुळे जीव व्याकूळ झाला आहे."

पांडुरंगाने लगेच आपली कृपादृष्टी नामदेव व त्या विहिरीकडे फिरवली. लगेचच त्या विहिरीत तुडुंब पाणी भरले. ते निर्मळ जल पिऊन नामदेव तृप्त झाले.

यामुळे ज्ञानेश्वरांना आश्चर्य वाटले व नामदेवांना म्हणाले की, "नामा! तू खरोखरच विठ्ठलाला आपल्या प्रेमाने काबूत ठेवले आहेस. तुझी भक्ती धन्य आहे." असे बोलून ज्ञानदेवांनी नामदेवांचे चरणकमल धरले. ज्या मारवाड प्रांतात हा प्रसंग घडला ती विहीर आजसुद्धा विठ्ठलाच्या कृपेमुळे अखंड वाहत असते. मार्गशीर्ष महिन्यात तेथे मोठा उत्सव असतो. या प्रांताचा महिमा सर्वांना माहीत आहे.

त्यानंतर नामदेव व ज्ञानेश्वर अनेक तीर्थक्षेत्री जाऊन आले. तीर्थक्षेत्रे करीत करीत ते पुण्यक्षेत्र औंढ्या नागनाथास आले. ते ज्योतिर्लिंगाचे एक जागृत स्थान आहे. महाशिवरात्रीला म्हणजेच माघ वद्य चतुर्दशीस ते तेथेच होते. औंढ्या नागनाथ हे उमापतीचे जागृत देवस्थान आहे. हे पवित्र स्थान दोघांनाही आवडले.

स्नान केल्यानंतर कैलासपतीचे त्यांनी दर्शन घेतले. नंतर नामदेवांनी तेथे सुश्राव्य कीर्तन करण्यास सुरुवात केली. ते कीर्तन ऐकण्यासाठी खूप गर्दी झाली. मुंगीलाही आता शिरायला जागा नव्हती. कीर्तन अत्यंत रंगले होते. अचानक त्रिनेत्रधारी भोलेनाथांची पूजा करण्याकरिता काही ब्राह्मणांचा घोळका तेथे आला. ते महाद्वाराजवळ आले पण अफाट गर्दीमुळे त्यांना आत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

जाता येईना. तेव्हा ते श्रोत्यांना म्हणाले की, "शिव, शिव! बाजूला व्हा. आम्हाला शंभोची पूजा करायची आहे. तुमचा स्पर्श आम्हाला होता कामा नये. आम्ही सोवळे नेसून आलो आहोत. आम्ही मोठे पुजारी आहोत."

कीर्तनात सर्वजण तल्लीन झालेले असल्यामुळे त्या लोकांकडे कोणीही लक्ष देईना. शेवटी त्या अफाट गर्दीतून वाट काढत दोघे गृहस्थ नामदेवांजवळ गेले व त्यांना म्हणाले की, "हे साधूंनो! तुमचे कीर्तन तिकडे पंढरपुरात. आमच्या शंकराला कीर्तन वगैरे काही आवडत नाही. इथून जा आणि काय गोंधळ करायचा तो पंढरपुरात करा."

त्या दोघांचे भाषण ऐकून काही श्रोते त्यांना म्हणाले की, "अहो बुवा! विष्णु व शिवात भेद कसला? दोघेही परमात्म्याचे अंश आहेत व शंकरांना कीर्तन आवडत नाही असे कोणत्या ग्रंथात लिहिले आहे?"

यावर त्या सर्वांना राग आला. ते म्हणाले, "तुम्ही काही बोलू नका. आम्हाला वेद, शास्त्रे, पुराणे यांचे सर्व ज्ञान आहे. तुम्ही शांतता राखा. तुम्हाला यातले काही माहीत नाही. चला, येथून उठा; नाहीतर आम्ही एकेकाला बडवून काढू."

या बोलण्याचाही श्रोत्यांवर काहीही परिणाम होईना. शेवटी त्या दोघांनी नामदेवांनाच हुसकवून लावायचे ठरवले. ते दोघेजण कसलाही विचार न करता नामदेवांच्या अंगावर आले व म्हणाले, "बुवा, आम्ही पुजारी आहोत. आमची आज्ञा तुम्ही पाळली पाहिजे. येथे तुम्हाला कीर्तन करण्याची परवानगी नाही. देवळाच्या बाहेर कीर्तन करा. तुमच्यामुळे येथे आमचा खोळंबा झाला आहे."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

नामदेवांनी त्या सर्वांना नमन केले व ते म्हणाले, "हे पुजारीजी! जशी आपली आज्ञा." नामदेवांनी देवळाच्या पाठीमागच्या बाजूस कीर्तन करण्यास सुरुवात केली. नामदेवांना हा अपमान सहन झाला नाही. त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यांनी पांडुरंगाचा धावा सुरू केला. यामुळे शंकरांचे मंदिर जे पूर्वाभिमुख होते ते फिरून नामदेवांच्या समोर आले. या अद्भुत चमत्काराने सर्वजणांना आनंद झाला. सर्वांनी 'हरहर महादेव! जय जय शिवशंकर!' असा जयघोष केला.

तो दिवस पुण्यमय होता. कारण त्या दिवशी महाशिवरात्र होती. श्रोत्यांना महाशिवरात्र व नामदेवांचे सुश्राव्य कीर्तन असा दुग्धशर्करा योग लाभला.

ते सर्वजण शंकराची पूजा आटोपून बाहेर आले तेव्हा तेथील लोकांकडून मंदिर फिरल्याचे समजले. याचे त्यांना आश्चर्य वाटले. आपला अभिमान त्यागून ते कीर्तनश्रवणास बसले.

कीर्तन संपल्यानंतर सर्व श्रोत्यांदेखत त्या पाच-सहा लोकांनी संत नामदेवांचे चरणकमलांवर आपले मस्तक ठेवून क्षमा मागितली, आणि 'नामदेवमहाराज की जय!' असा जयघोष केला.

कीर्तनानंतर प्रथेप्रमाणे सर्वांना प्रसाद म्हणून बुंदीच्या कळ्या वाटण्यात आल्या. ते फिरलेले देऊळ अजूनही तसेच आहे.

धन्य ते संत नामदेवमहाराज! धन्य त्यांची विठ्ठलावरील भक्ती!!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय १३ वा

॥ संत नामदेवांचे व्रतोद्यापन ॥

या पूर्वीच्या अध्यायात औंढ्या नागनाथाचे देऊळ फिरले ही कथा श्रोतेजन हो, आपण ऐकलीत. आता पुढील कथा शांत चित्ताने श्रवण करा.

नामदेव व ज्ञानेश्वर तीर्थक्षेत्रे संपवून पुन्हा आपल्या गावी म्हणजे पंढरपूरला आले. नामदेवांनी आहे त्या कपड्यांवर पळत जाऊन चंद्रभागेत उडी घेतली व ओले कपडे घालूनच विठ्ठलाचे मुखकमल पाहण्यासाठी ते गेले. एखाद्या मातेस आपले हरवलेले मूल मिळाल्याने जसा आनंद होतो तसा आनंद नामदेवांना झाला. रुक्मिणीनाथही आपले आसन सोडून पुढे आले व त्यांनी नामदेवांना प्रेमाने मिठी मारली. नामदेवांच्या डोळ्यातून प्रेमाश्रू वाहू लागले.

विठ्ठलाच्या चरणकमलांवर मस्तक ठेवून नामदेवराय म्हणाले, "हे देवा! किती दिवसांनी आपली भेट होतीय रे? तुझे दर्शन न झाल्यामुळे पाण्याबाहेर पडलेल्या माशाप्रमाणे माझी अवस्था झाली होती. तुझे प्रेम मला असेच सदैव लाभू दे. पंढरपूर सोडून गेल्यापासून माझा जीवच नाहीसा झाला होता."

विठ्ठलही म्हणाला, "अरे नाम्या! माझी पण तुझ्यासारखीच अवस्था झाली होती. आम्ही सर्व देव भक्तांच्या प्रेमावरच राहत असतो. मी येथे आलेल्या प्रत्येक भक्ताला तुझी वार्ता विचारत होतो. तुला यात्रेत काही त्रास वगैरे झाला नाही ना?"

नामदेवांनी व पांडुरंगाने पुन्हा एकदा प्रेमाने मिठी मारली. पंढरीनाथाने आपल्या गळ्यातील तुळशीची माळ स्वत:

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामदेवांच्या गळ्यात घातली.

नंतर ज्ञानेश्वरांबरोबर अनेक संत विठ्ठलाच्या प्रेमळ भेटीसाठी आले. यामध्ये निवृत्तीनाथ, सोपानदेव, विसोबा खेचर, नरहरी सोनार इ.चा समावेश होता. या सर्वांनी नामदेवांची भेट घेतली. या वेळी स्वर्गातून देवदेवतांनी पुष्पवृष्टी केली. ऋषीमुनी, गण, अप्सरा, गंधर्व तो सोहळा पाहण्यास आले.

पांडुरंग नामदेवांना म्हणाला, "हे नाम्या! तू तीर्थयात्रा केलीस. तुला खूप पुण्य मिळाले. आता शास्त्रशुद्ध उद्यापन कर." नामदेवांनी आनंदाने यास अनुमती दर्शवली.

पांडुरंग रुक्मिणीस म्हणाला, "आपला लाडका भक्त नामदेव व्रताचे उद्यापन करून ब्राह्मणभोजन घालणार आहे." रुक्मिणी माता म्हणाली, "अहो! तुमच्या चरणकमलांकडे त्याचे सदैव लक्ष लागलेले असते. त्याचे हृदय मुळीच उद्यापनात नसणार. कारण ते हृदय त्यांनी तुमच्या चरणकमलांवर अर्पण केले आहे. त्यामुळे तुम्हाला व मलाच कंबर कसून सर्व कामे केली पाहिजेत. नामदेवांना बरोबर घेऊन सर्व ब्राह्मणांना भोजनासाठी आमंत्रणे देण्यास जा."

पांडुरंगाने गृहस्थाचे रूप घेतले व भक्तमंडळींबरोबर ब्राह्मणांना भोजनाचे निमंत्रण देण्यास तो गेला. या समुदायात निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, विसोबा, नरहरी सोनार, चोखोबासुद्धा होते. वाळवंटावर सर्व संतमंडळींचा समुदाय जमला होता. पांडुरंगाने गृहस्थाचे रूप धारण केले होते. त्यामुळे तो इतरांपेक्षा वेगळा दिसत होता. चेहरा अत्यंत तेजस्वी होता. ब्राह्मणांना निमंत्रण देण्यास गेल्यावर ब्राह्मणांनी त्याला ओळखले नाही. त्यांनी या विठ्ठलाची (गृहस्थाची) खोलवर चौकशी केली. तेव्हा हा विठ्ठल म्हणाला, "माझ्याबद्दल सर्व काही या संतमंडळींना माहीत आहेच.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांचा व माझा अत्यंत जुना संबंध आहे.

निमंत्रणे संपवून विठ्ठल परत आला. तो रुक्मिणीस म्हणाला, "प्रियंवदे! मी आज सर्व शास्त्रे, पुराणे यांचा अभ्यास केलेल्या विद्वान ब्राह्मणांना निमंत्रण देण्यास गेलो होतो. पण त्यांनी मला ओळखलेच नाही. मी कोण आहे हे त्यांना कळले नाही. असे कशामुळे झाले?"

रुक्मिणी म्हणाली, "स्वामी ! आपल्याला न ओळखण्यासाठी तुम्हीच काहीतरी युक्ती केलेली असणार. हे संपूर्ण विश्व तुम्हीच एका अंशाने धारण केले आहे. आता तुमच्या मनातील युक्ती मी कशी ओळखणार ? सर्व काही आपलीच माया आहे. जेव्हा तुम्ही माया निर्माण केली तेव्हा कलियुगात सर्व लोकांचे अकल्याण होणार हे मी ओळखले होते. कलिच्या सामर्थ्यामुळेच साक्षात् परमेश्वर समोर उभा राहूनसुद्धा त्यांना ओळखता आले नाही."

त्यानंतर विठ्ठलाच्या आज्ञेनुसार मिष्टान्नाचे भोजन व उद्यापन यांची सर्व उत्तम व्यवस्था अष्टसिद्धींनी येऊन केली. चंदनाचे सडे घातले, नक्षीदार रांगोळी काढली, फुलांच्या माळा ठिकठिकाणी लावल्या, पताका लावल्या, शोभेची दारू आणली. हजारो दीप प्रज्वलित करून व्रतोद्यापन विधीस सुरुवात केली. वेदातील सूक्ते म्हणण्यास सुरुवात केली. स्वत: सत्यभामा, राही व रुक्मिणीने नामदेवांना ओवाळले. देवाने आहेर म्हणून उंची वस्त्रे, आभूषणे नामदेवांना अर्पण केली.

महाद्वारी पांडुरंगाने स्वत: ब्राह्मणांचे पूजन केले. हे दृश्य पाहण्यासाठी देवदेवतांची आकाशात गर्दी जमली होती. या सर्व देवदेवतांना या अवर्णनीय सोहळ्यापासून वंचित रहावे लागल्याने फार वाईट वाटले. त्यांना वाटले की आपण येथे सदैव अमृत पित

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitized by eGangotri

असतो पण या प्रेमामृताची चव चाखण्यास मिळाली असती तर बरे झाले असते.

ब्राह्मणांना स्वत: पांडुरंग जातीने वाढत होता. तो त्यांना म्हणाला, "आज नामदेवांमुळे माझ्या हातून ब्रह्मसेवा होत आहे."

ब्राह्मण म्हणाले, "आम्ही तुमच्या आदरातिथ्याने थक्क झालो. भोजन पण उत्तम झाले आहे. आमचा आशीर्वाद सदैव नामदेवांच्या पाठीशी आहे."

पांडुरंग आता स्वत: भोजनास बसला. त्याने आपल्याबरोबर उद्धव, अक्रूर, नारद, तुंबर यासारख्या रथी-महारथी भक्तांनापण बोलवले होते. नामदेवांना सर्वांनी आग्रहाने बोलवले. नामदेवां-बरोबर स्वत: पांडुरंग, तसेच सर्व संतमंडळी भोजनासाठी होती.

नामदेवांची या अति आनंदामुळे शुद्धच हरपली. मग विठ्ठलाने त्याला सावध केले. इथपर्यंत सर्व ब्राह्मणांना आवडले. पण जेव्हा नामदेवांचे उष्टे अन्न विठ्ठल खाऊ लागला तेव्हा ब्राह्मणांना त्याची किळस वाटली व पांडुरंगाला याचे प्रायश्चित्त देण्याचे त्यांनी ठरवले.

अध्याय १४ वा

|| पांडुरंगाची प्रायश्चित्त कथा ||

रुक्मिणीपतीने नामदेवांचे उष्टे खाल्ले होते, हे तेथील जमलेल्या विद्वान ब्राह्मणांना आवडले नाही. त्यांना आश्चर्य वाटले. आपण इथे जेवल्यामुळे आपला धर्म बुडाला व या पापामुळे आपण प्रायश्चित्त घ्यावे असे त्यांना वाटले. त्यांनी पांडुरंगाला प्रायश्चित्त म्हणून वाळीत टाकून द्यावे असे ठरवले. ते मधूनच उठले व चालू

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लागले. पांडुरंगाने हे सर्व काही ओळखले. त्याने त्या ब्राह्मण समुदायास बोलवून घेतले व विचारले की, "हे ब्राह्मणांनो ! एवढ्या सुंदर समारंभातून मधूनच तुम्ही का उठला आहात ? आपल्या सेवेत काही कमी पडले का ?" पांडुरंगाने त्या ब्राह्मणांना माणिक, हिरे, रत्ने, सुवर्ण, तुलसीदल इ. दक्षिणा अर्पण केली. दक्षिणा मिळाल्यावर सर्व ब्राह्मण शांत झाले.

ब्राह्मण शांत झालेले पाहून विठ्ठलाने नामदेवांना ब्राह्मणवंदना करण्यास सांगितले. ब्राह्मणवंदना केल्यानंतर विठ्ठल त्या ब्राह्मणांना म्हणाला, "हे ब्राह्मणदेवतांनो ! माझ्या लाडक्या भक्तावर तुमचा शुभाशीर्वाद सदैव असू द्या."

विठ्ठलाने उठण्याचे कारण विचारले, तेव्हा ते ब्राह्मण म्हणाले, "नामदेव हा जातीने शिंपी आहे. तुम्ही त्याच्याबरोबर पंक्तीस कसे बसलात ? बसलात ते ठीक आहे पण त्याचे उष्टे अन्न तुम्ही खाल्लेत. असे उष्टे खाणे धर्मशास्त्रात बसत नाही. तुम्ही त्याचे उष्टे खाल्ले हा तुमच्या हातून अपराध झाला आहे."

यावर पंढरीनाथ म्हणाले, "हे ब्राह्मणदेवतांनो ! आपण असे करू नका. क्षुल्लक कारणासाठी भरल्या ताटावरून उठू नका. माझ्या हातून जे काही पाप झाले असेल ते सांगा. नामदेव माझा लाडका आहे. त्याने मला प्रेमाने घास भरवले म्हणून मी खाल्ले. रामावरातसुद्धा मी शबरीची उष्टी बोरे खाल्ली होती. मी भक्तांच्या हृदयातील प्रेमभाव पाहतो. मी सर्व लोकांवर प्रेमाचा वर्षाव करीत असतो. जे लोक देवाची भक्ति करतात त्यांच्या अनमोल मानवी नरदेहाचे सार्थक होते. मी अनेक भक्त पाहिले पण नामदेवांसारखा भक्त मला कोणीच आढळला नाही. मी नामदेवांचे उष्टे खाल्ले, ठीक आहे. आता तुम्हाला यावर कोणते प्रायश्चित्त द्यावेसे वाटते ते सांगा ? नामदेव हा तर तुमच्या जातीतल्या ज्ञानेश्वरांपेक्षा भक्तीत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

पुढे आहे.''

तेव्हा ते ब्राह्मण म्हणाले, ''आम्ही सांगतो तसे करा. प्रथम तुम्ही क्षेत्र प्रदक्षिणेला जाऊन या. त्यानंतर सर्व पापांचा भंग करणाऱ्या चंद्रभागा नदीवर शास्त्रोक्त स्नान करा. त्यानंतर आमच्यासारख्या पंढरपुरातील सर्व विद्वान ब्राह्मणांना सुवर्ण-दक्षिणा द्या. नंतर पुण्याहवाचन करा. त्यामुळे तुमचे पाप नष्ट होईल.''

याप्रमाणे विठ्ठलाने सर्व काही केले. प्रथम क्षेत्र प्रदक्षिणा केली. त्यानंतर चंद्रभागेवर शास्त्रोक्त स्नान केले. सर्व ब्राह्मणांना सुवर्णदक्षिणा दिली. शेवटी विठोबा त्या ब्राह्मणांना म्हणाला, ''तुमच्यामुळे मी आज पावन झालो. सर्व काही तुमच्या मनासारखे आता झाले ? आता मनात कोणताही विकल्प न ठेवता येथून जाऊन देवाची आराधना करा.''

हा सर्व त्रास विठ्ठलाने सहन केला होता. आपल्या पती-परमेश्वराला एवढा त्रास झाल्याबद्दल रुक्मिणी पांडुरंगास म्हणाली की, ''हे देवा! तुम्हाला कोणती गोष्ट सर्वांत आवडते? तुमचा निवास कोठे असतो? अष्टांगयोग करणाऱ्यांजवळ तुम्ही असत नाही. महान योगी जे सदैव डोळे मिटून समाधी लावून बसलेले असतात तिथेही तुम्ही असत नाही. वैकुंठ पण तुम्हाला खूपच जुने वाटते.'' यावर विठ्ठल म्हणाला, ''हे प्रियसखे! तुला मी सत्य सांगतो की जेथे माझे प्रेमळ भक्त माझे पूजन, कीर्तन, अर्चन करीत असतात तेच माझे ठिकाण होय. नामदेव हा माझा सर्व भक्तांमध्ये अत्यंत लाडका आहे. आता मला खूप कष्ट पडले तरी मला खरा आनंद त्यातच वाटतो.'' भक्तांचा असा अपूर्व महिमा ऐकल्यानंतर रुक्मिणीमातेस धन्य वाटले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय १५ वा

॥ पांडुरंगाचे चतुर्भुज दर्शन ॥

पांडुरंगाने प्रायश्चित्त घेतले. त्यानंतर पंढरपूरनिवासी सावळा पांडुरंग आपल्या प्रिय पत्नीस म्हणाला, "चंद्रभागेच्या पवित्र तीरावर ज्या ब्राह्मणांनी मला प्रायश्चित्त दिले, त्या सर्वांना मी पंचपक्वान्नाचे भोजन देणार आहे. माझ्याविषयी यांच्या मनात जे काही भाव असतील ते सर्व भाव मी नाहीसे करणार आहे. उगीचच माझ्याविषयी त्यांच्या मनात संशय नको. त्या सर्वांना मी दिव्य चतुर्भुज रूप दाखवणार आहे व त्यांच्या मनात माझ्याविषयी भक्ती उत्पन्न करणार आहे. यामुळे त्यांच्या मनात संतांच्या संगतीच्या वैभवाची जाणीव होईल व साऱ्या जगालाही समजेल." पांडुरंगाचे बोलणे ऐकून तिला फार आनंद झाला.

इकडे पांडुरंग आपल्या भक्त मंडळींसह विप्रांना जेवायचे आमंत्रण द्यायला निघाले. नामदेव, ज्ञानेश्वर अशी अनेक संतमंडळी विठ्ठलाबरोबर चालली होती. जेव्हा विठ्ठल ब्राह्मणांकडे आमंत्रणे देण्यास आले तेव्हा ते ब्राह्मण म्हणाले, "अहो विठुराया, तुमचे आमच्यावर एवढे प्रेम पाहून आम्हाला समाधान वाटले. तुमची कृपादृष्टी अशीच सदैव आमच्यावर राहू दे!" नंतर सर्वजण राऊळात भोजनासाठी आले. भोजन समारंभास पंचपक्वान्ने केली होती. विठ्ठल स्वत: जातीने सर्वांना आग्रह करून वाढत होता.

पांडुरंग शेवटच्या पंक्तीस भोजनास बसला. त्याने आपल्याबरोबर पंक्तीस संतमेळाच केला होता. यामध्ये ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधू निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सुदामा, चोखामेळा, सावतामाळी, बंका, गोरा कुंभार इ.चा समावेश होता. हे सर्व पाहून स्वर्गातून देवेंद्राने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

सर्वांवर पुष्पवृष्टी केली.

पांडुरंगाने साध्या गृहस्थाचे रूप धारण केले होते. ते रूप पाहून एक व्यक्ति म्हणाली की, "हा पांडुरंग साक्षात् परमेश्वरच. याला आपण काय प्रायश्चित्त देणार? याला जर आपण अनन्यभावाने शरण गेलो तर नक्कीच आपला जन्ममरणाचा फेरा चुकेल."

अशा प्रकारचे भाषण ऐकून विठ्ठलाला हसू फुटले. त्याने गृहस्थाचा घेतलेला वेष सोडून दिला व सर्वांसमोर दिव्य चतुर्भुज रूप धारण केले. या चतुर्भुजाचे वर्णन काय करावे? शंख, चक्र, गदा तीन हातात होती व एका हाताने सर्वांना मंगल आशीर्वाद देण्यात येत होते. ते दिव्य रूप जन्मोजन्मी आपल्या हृदयात साठवून ठेवावे असे होते. या चतुर्भुजरूपधारीच्या मस्तकावर रत्नजडित किरीट होता. कपाळाच्या मध्यभागी कस्तुरीचा टिळा लावला होता. कानात कुंडले होती. हे विशाल, मनोहर चतुर्भुज रूप पाहून सर्व लोकांचा अभिमान मीठ पाण्यात जसे विरघळते तसा क्षणार्धात नाहिसा झाला. सर्वजण पांडुरंगास शरण आले.

विठोबाने लोकांना सांगण्यास सुरुवात केली, "कृपया सर्वजण लक्ष देऊन ऐका. मी भक्तांचा कैवारी आहे. भक्तांनी मला त्यांच्या हृदयरूपी बंदिखान्यात कोंडून ठेवलेले असते. जसा ज्याचा भाव तसा मी त्याला पावत असतो. मी भक्तांचा दास असतो. पुढे मागे उभा राहून भक्तांचा मी सांभाळ करीत असतो. भक्ताने काहीही अर्पण केलेले मला अत्यंत प्रिय असते. भक्तांच्या प्रेमावरच मी जगत असतो."

हे ऐकल्यानंतर सर्व लोकांनी पांडुरंगाची करुणा भाकली व ते त्याला शरण गेले.

लोकांचा हा भाव पाहून पांडुरंगास परमसंतोष झाला. त्याने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

ज्ञानेश्वर सांगतील तसे वागा अशी आज्ञा केली. ज्ञानेश्वर म्हणाले, "हे विठुमाऊली! या सर्व मंडळींना तू अक्षय वर दे."

पांडुरंग व नामदेव यांच्यात किती दृढ प्रेम होते हे पंढरपुरातील सर्व नागरिकांना माहीत होते. नामदेवांचे चरित्र म्हणजे भक्तीरसाचा सागरच होय. त्या सागराला किनारा नाहीच. परमेश्वर भक्तीद्वारे कसा वश होतो याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे नामदेव होय. आपले कल्याण करण्यासाठी सदैव अशा कथा वाचाव्यात.

अध्याय १६ वा

।। भक्त कूर्मदास व संत सावता माळी ।।

प्रेमस्वरूप भगवंताला अनेक भक्त लाभले. या भक्तांनी आपल्या भक्तीद्वारे भगवंतास वश करून घेतले. या अनेक भक्तांमध्ये एक भक्त होता. त्याचे नाव कूर्मदास. त्याची कथा मी आता तुम्हाला सांगत आहे. ती कथा शांत चित्ताने श्रवण करा.

कूर्मदास हा पैठणचा निवासी होता. तो ब्राह्मणकुळातला होता. त्याच्या दुर्भाग्याने त्याला जन्मापासूनच हातपाय नव्हते. हा कूर्मदास म्हणजे सूर्याचा सारथी अरुणाचाच अवतार होय. थोडा मोठा झाल्यावर त्याला हरिकीर्तनाची आवड वाटू लागली. आपण पण हरिकीर्तन करून आपल्याला मिळालेल्या मनुष्यजन्माचे सार्थक करावे असे त्याला वाटत असे. पैठण येथील मंदिरात दर वर्षी मोठ्या प्रमाणात हरिनामोत्सव चालत असे. या हरिनामोत्सवात अनेकांची व्याख्याने, प्रवचने व कीर्तने होत असत. कूर्मदास श्रवणभक्ती व्हावी म्हणून जीवाचा आटापिटा करून घसरत घसरत जात असे. तो कीर्तनात तल्लीन होऊन भगवंताच्या नामाचा जयघोष करत असे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

एके दिवशी कीर्तनात बुवांकडून त्याने पंढरपुरचे व विठ्ठलाचे माहात्म्य ऐकले. कूर्मदासालाही आपण पंढरपुरात जाऊन वात्सल्यमूर्ती विठ्ठलाचे दर्शन घ्यावे असे वाटले. त्याने आपला मनोदय पैठणवासीयांना सांगितला. तेव्हा लोक म्हणाले, "अरे वेड्या! तुला हातपाय नाहीत. तू कसा पंढरपुरात जाणार? तू आता इथूनच मानसपूजा करून विठ्ठलाचे गुणगान गा!"



कूर्मदास त्या लोकांना म्हणाला, "अरे! हातपाय नसले म्हणून काय झाले? पंढरपूरला गेलो नाही तर माझा जन्ममरणाचा फेरा कसा चुकेल? मला या मिळालेल्या मनुष्यजन्मातच सार्थक करून घेतले पाहिजे."

त्याचा निश्चय दृढ होता. तो घसरत घसरत पैठणच्या बाहेर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

गेला. तेथून कोसभर अंतरावर पवनपुत्र श्रीरामभक्त हनुमानाचे देऊळ होते. तेथे तो विश्रांतीसाठी थांबला. दुसरा मुक्काम त्याने दुसऱ्या गावात केला. त्याला तेथे फार तहान व भूक लागली. त्याने पांडुरंगाचा धावा सुरू केला. आपल्या भक्ताच्या हाकेला ओ देऊन ताबडतोब विठ्ठल ख्रिस्ताच्या रूपाने धावत आला. त्याने कूर्मदासाची चौकशी केली. कूर्मदासाने त्याला पंढरीला जाण्याचा मनोदय सांगितला. तेव्हा तो पांडुरंगरूपी ख्रिस्ती म्हणाला, "मला तुमची सोबत मिळाल्यामुळे बरे झाले. आपण दोघेही आता पंढरपुरास जाऊ."

कूर्मदास म्हणाला, "मला जन्मत:च हात-पाय नाहीत. माझा तुम्हाला त्रासच होईल. मला सर्वत्र घसरत घसरत जावे लागते." कूर्मदासाने त्या ख्रिस्तीस नाव, गाव इ. विचारले. तेव्हा तो कूर्मदासाला म्हणाला, "मला विठोबा ख्रिस्ती या नावाने सर्वजण ओळखतात. माझे पंढरपुरात मोठे दुकान आहे. त्यामुळे आम्हाला वरचेवर ये-जा करावी लागते."

पांडुरंगाने त्या रात्री पुन्हा कूर्मदासाला खाण्यापिण्यास दिले. दुसऱ्या दिवशी पंढरपुराचा पुढील रस्ता कूर्मदासाला दाखवून व्यापाराची सबब सांगून विठ्ठलाने तेथून प्रयाण केले. कूर्मदास घसरत घसरत दुसऱ्या गावी आले. तेथे कूर्मदासांची विठ्ठलाने विचारपूस केली. याप्रमाणे मजल दरमजल करीत कूर्मदास कार्तिक मासात लहुळ गावी आले.

यात्रा पंढरपुरास जाण्यासाठी निघाली. तेथून सात कोसाच्या अंतरावर पंढरपूर होते. त्यांच्या मनात आले की, एकादशी उद्यावर आलीय. आता अंतरसुद्धा खूप आहे. आपल्याला एवढे कष्ट सहन होणार नाही. त्यामुळे त्याने भक्तांबरोबर निरोप सांगितला की,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

"विठुरायास सांगा की मला तुझ्या भेटीची खूप इच्छा होती. पण अपंगत्वामुळे मला येता येत नाही. त्यामुळे माझा नमस्कार विठोबास सांगा. विठोबाला म्हणावे येथेच येऊन माझा उद्धार करा."

इकडे पंढरपुरातील महाद्वारामध्ये संत शिरोमणी नामदेवांचे कीर्तन सुरू होते. सर्व श्रोते कीर्तनात तल्लीन होऊन गेले होते. विठ्ठलाने नामदेवांना जवळ घेतले व सांगितले की, "तुझ्यासारख्या अनेक भक्तांना मी पाहिले पण तुझी भक्ती ही काही वेगळीच आहे." तेवढ्यात तेथे अनेक वारकऱ्यांचा समूह आला. त्यातील एकाने विठ्ठलास कूर्मदासाचा निरोप सांगितला.

कूर्मदासाचा निरोप ऐकून कूर्मदासास आपण केव्हा एकदा भेटतोय असे विठ्ठलास झाले. नामदेव व ज्ञानेश्वर या दोघांनाही बरोबर घेऊन विठ्ठल लहुळ गावाकडे निघाला. जाताना नामदेव व ज्ञानेश्वर यांची भेट सावतामाळींबरोबर करून द्यावी असे विठ्ठलास वाटले.

नामदेव व ज्ञानेश्वरांना बाहेर ठेवून विठ्ठल सावतामाळींना भेटण्यास गेले. तेथे सावतामाळी विठ्ठलाच्या भजनात गुंग झाला होता. सावतामाळी देहभान विसरून भजनात गुंग झाले होते. विठ्ठलाने सावतामाळींना उठवले व त्यांना प्रेमाने मिठी मारली.

सावतामाळी विठ्ठलास म्हणाले, "हे कृपासागरा! खूप दिवसांनी तू आलास. आता मी तुझी पूजा केल्याशिवाय सोडणार नाही."

विठ्ठल यावर म्हणाला, "बाहेर दोन मोठे चोर आहेत. मला त्यांच्यापासून खूप भीती वाटते. त्यामुळे तू मला कुठेतरी लपव. मला लपण्यासाठी जागा दे." सावता माळीने आपले पोट चिरून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

विठ्ठलाला त्यात लपायला सांगितले.

इकडे विठ्ठलास उशीर झाल्यामुळे ते सावत्याच्या घरात गेले. तेथे सावतामाळी पुन्हा भजनात तल्लीन होऊन गेले. त्यांना विठ्ठल कोठेही दिसेना. शेवटी सावतामाळींना सावध करून सर्व काही विचारले. सावतामाळींनी आपले पोट चिरून विठ्ठलाचे दर्शन घडवले. नामदेवांनी सावतामाळींची अनन्य भक्ती पाहून त्यांना साष्टांग नमन केले.

सावता, नामा, ज्ञानेश्वर व विठ्ठल असे चौघेही लहुळ गावी आले. विठ्ठलाला पाहिल्यावर कूर्मदासाने साष्टांग नमन केले. विठ्ठलाने चतुर्भुज रूपात दर्शन दिले. कूर्मदासाला हवा तो वर मागण्यास सांगितले तेव्हा, तुमचे सदैव वास्तव्य इथेच असू दे, असे तो म्हणाला. विठ्ठलाने तेथे कायमचे वास्तव्य केले. पंढरपुराप्रमाणेच लहुळ गावाचा महिमा आहे. तेथे आजही यात्रा भरते.

अध्याय १७ वा

॥ संत राका कुंभार व संत गोरा कुंभार ॥

पंढरपुरामध्ये एक कुंभार रहात होता. त्याचे नाव होते राका. राका कुंभार हा भगवंताच्या भक्तीमध्ये तल्लीन होऊन गेला. त्याचे सर्व कुटुंबच भगवंताच्या भक्तीरसात डुंबले होते. प्रपंच व परमार्थ यांची सुरेख सांगड राकाने घातली होती. त्याला एक सात्त्विक पत्नी लाभली होती. तिचे नाव बांका. आपल्या पतीपरमेश्वराबरोबर ती प्रपंच व परमार्थ करत असे. त्यांना एक कन्यारत्न होते. तिचे नाव बंका होते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पंढरपूरवासी रुक्मिणीपती पांडुरंगावर या तिघांचे अपार प्रेम होते. 'हाती काम व मुखी भगवंताचे नाम,' अशी त्यांची अवस्था होती. मडकी वगैरे तयार करून, विकून राका आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करीत असे.

एके दिवशी एक घटना घडली. भाजण्यासाठी तयार केलेली कच्ची मडकी राकाने एका कोपऱ्यात लावून ठेवली होती. त्यातील एका मडक्यात मांजरीने आपल्या पिलांना नेऊन ठेवले होते. ही पिल्ले नुकतीच जन्माला आली होती.

खूप दिवसानंतर मडकी तयार झाल्यानंतर राकांनी सर्व मडकी व्यवस्थित रचून भाजण्यासाठी आवा लावला. मांजरीचे मडके घाईघाईने त्यामध्ये गेले होते, हे अग्नी लावल्यावर राकाच्या लक्षात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आले.

नंतर काही तासांनी त्या पिलांची आई आली व आपल्या पिलांचा शोध घेऊ लागली. हे दृश्य राकांना पाहवले नाही. राकांना त्या मांजराची दया आली. आपल्या हातून फार मोठा अपराध झाला आहे अशी जाणीव त्यांना झाली. आपण सर्व मडकी तपासूनच आव्यामध्ये ठेवावयास हवी होती, असे त्यांना वाटले.

त्यांनी बांकाला ताबडतोब बोलवले व म्हणाले, "अग! आज माझ्या हातून महापाप झाले. त्या डेऱ्यातील मांजरीच्या पिलांसकट मी तो डेरा आव्यामध्ये भाजण्यासाठी ठेवला. आता आव्याने पेट घेतल्यानंतर मांजरीची पिले नक्कीच होरपळून गतप्राण होतील." हे पतीराजाचे बोलणे ऐकून बांकाची शुद्धच हरपली. काही वेळाने शुद्धीवर आल्यानंतर ती आपल्या नवऱ्याला म्हणाली की, "या संकटातून आपला पंढरीनाथच आपल्याला सोडवू शकेल. त्याला आपल्या भक्तीबद्दल पूर्ण कल्पना आहेच. तुम्ही त्याला काहीतरी नवस करा म्हणजे तो नक्कीच पावेल."

राकांनी विठोबारायास नवस केला की, "हे दीनानाथा! भक्तकैवारी! सावळ्या विठ्ठला! जर तू या पिलांचे अग्नीपासून संरक्षण केलेस तर मी या संसारामधून मुक्त होईल. यापुढे मी प्रपंचात अडकणार नाही."

हा नवस केल्यानंतर ते दोघे पांडुरंगाचा अहोरात्र धावा करत होते. त्यांनी तीन दिवस अन्नपाणीसुद्धा घेतले नाही.

तिसऱ्या दिवशी आवा भाजून कच्ची मडकी पक्की होऊन आली. राकाने ताबडतोब ते मांजरीचे पिल्लांचे मडके शोधले. विठ्ठलाच्या कृपेमुळे आतली पिल्ले बागडत होती. त्यांना थोडीही इजा झाली नव्हती. त्यांना खूप आनंद झाला. राका व बांकाने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विठ्ठलास कोटी कोटी धन्यवाद दिले.

दुसऱ्या मिनिटाला त्याने आपल्या पत्नीस सांगितले की, मी आजपासून संसार करणार नाही. तसा मी पांडुरंगाला नवस केला होता. त्या नवसाचे मला पालन केले पाहिजे. बांकाही त्यांच्या बोलण्याशी सहमत झाली. त्या दोघांनी गावातील गोरगरिबांना बोलवून होते नव्हते ते सर्व काही देऊन टाकले. तिघेही संसारातून मुक्त झाले. राका, बांका व बंका यांनी फक्त आपल्या अंगावर एक वस्त्र ठेवले होते. बाकी सर्व काही लोकांना दिले होते.

राका व त्याचे कुटुंबीय आपल्या उदरनिर्वाहासाठी रानातील काटक्यांची मोळी विकत असत. एवढ्या हलाखीच्या परिस्थितीत पण ते अतिथींना भोजन घालत असत.

एके दिवशी राकांची कन्या बंका व नामदेवांची कन्या यांची नदीच्या तीरावर भेट झाली. त्या दोघींमध्ये भांडणे झाली. त्यानंतर त्या दोघी आपआपल्या घरी परतल्या.

नामदेवांच्या कन्येने नामदेवांना बंकाबरोबर झालेले भांडण सांगितले. तेव्हा नामदेव विठोबाच्या देवळात गेले व म्हणाले, "हे विठ्ठला! राका कुंभाराबद्दल मी प्रथमच ऐकले आहे. तो सकाम भक्तांमध्ये मोडतो का निष्काम भक्तांमध्ये मोडतो हे मला प्रथम सांग."

यावर विठ्ठल म्हणाला, "हे नामदेवा! त्याच्यासारखा वैराग्यशील भक्त या पृथ्वीवर अजूनपर्यंत नाही. त्याने सर्व गोष्टींचा त्याग केला आहे."

नामदेव म्हणाले, "मला त्याचा वैराग्यभाव पाहायचा आहे. त्यामुळे तू त्याची परीक्षा घे."

विठ्ठलाने नामदेवांना संमती दर्शवली. भर दुपारी राका, त्यांची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पत्नी बांका व मुलगी बंका 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' असा जयघोष करीत होते. ते फक्त वाळलेली लाकडेच गोळा करीत होते. विठ्ठलाने रुक्मिणीस एक रत्नजडित कंकण एका काटकाखाली ठेवण्यास सांगितले. बंकेची नजर त्या रत्नजडित कंकणावर गेली.

त्यांच्या पत्नीने ते कंकण पाहिले तेव्हा ती म्हणाली, "आज आपल्या भजनात कोणीतरी मुद्दाम दु:ख आणले आहे. आपण सर्वसंगपरित्याग केला आहे. आज आपली कोणीतरी परीक्षा पाहत आहे. त्यामुळे त्या रत्नजडित कंकणावरची काटकीसुद्धा आपण घेणे बरोबर नाही."

आपल्यापेक्षा राका कुंभार हजारपटीने विरक्त आहे, असे नामदेवांना खात्रीनिशी पटले. विठ्ठलाने त्या तिघांनाही दर्शन दिले. तिघेही एकत्र रुक्मिणीपतीच्या पाया पडले.

तिघांच्या मनात 'आज सोनियाचा दिवस' आहे असे वाटले. विठ्ठलाच्या दर्शनाने त्यांना परमानंद झाला.

गोरा कुंभार

आता आपण दुसऱ्या कुंभाराची कथा पाहू. ती तुम्ही नीट श्रवण करा.

या कुंभाराचे नाव होते गोरा कुंभार. यांचे वास्तव्य तेरढोकी गावात होते. आपण बरे, आपले काम बरे व आपला देव बरा असा त्यांचा स्वभाव होता. सदैव विठ्ठलाचे नामस्मरण त्यांच्या जिभेवर असे.

एके दिवशी त्यांची पत्नी पाणी भरण्यासाठी त्यांच्या लहान मुलाला तेथेच ठेवून गेली. गोरा कुंभारांना त्या मुलावर लक्ष

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitized by eGangotri

ठेवण्यास सांगितले. विठ्ठलाच्या भजनात ते पूर्णपणे गुंग झाले होते.

गोरा कुंभार मडकी तयार करण्यास लागणारी माती पायाने तुडवीत होते. त्याच्या नकळत ते मूल त्या चिखलात आले व त्यांच्या वडिलांच्या पायानेच *(गोरा कुंभाराच्या पायदळीच)* ते तुडवले गेले.

पाणी आणल्यानंतर माता आपल्या लाडक्या मुलास शोधू लागली. तेवढ्यात तिची नजर चिखलाकडे गेली. तो चिखल संपूर्ण लालेलाल झाला होता. मातेस शोक आवरेना. ती मोठ्याने रडू लागली. ती आपल्या नवऱ्यास मोठमोठ्याने बोलू लागली.

भजनात विघ्न आल्यामुळे गोरा कुंभारांची तळपायाची आग मस्तकात गेली. ते आपल्या पत्नीस मारण्यास धावले. ती शिताफीने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

निसटली व नवऱ्यास म्हणाली की, "जर तुम्ही मला मारले तर पांडुरंगाची शपथ आहे." हे ऐकून गोरा कुंभार मागे आले व पुन्हा भजन करू लागले.

काही दिवसांनी बायकोचा राग कमी झाला. 'विठ्ठलाची शपथ मला स्पर्श करू नका, मला मारू नका,' असे बोलल्याबद्दल तिने प्रथम क्षमा मागितली. ती आपल्या पतीची चरणसेवा करण्यासाठी गेली. तेव्हा गोरा कुंभार म्हणाले, "तू मला विठोबाची शपथ घातली आहेस. त्यामुळे तू मला स्पर्शदेखील करू नको. जा ताबडतोब इथून. आपल्या आईवडिलांकडे जाऊन रहा. मला तुझे तोंडदेखील पाहावयाचे नाही."

नवऱ्याच्या आज्ञेप्रमाणे ती आपल्या माहेरी गेली. तिने आईबापास सर्व हकीकत सांगितली. ती म्हणाली, "हे मला आता स्वीकारणार नाही. माझ्या धाकट्या बहिणीचे लग्न त्यांच्याबरोबर लावून द्या म्हणजे वंशवेलाचा विस्तार तरी होईल."

गोरोबांच्या सासुसासऱ्याने धाकटी मुलगी गोरोबांकडे दिली व तिचा पत्नी म्हणून स्वीकार करा असे सांगितले. "तुम्हाला पांडुरंगाची शपथ आहे. तुम्ही दोघींना सारखेच वागवा," असे सांगितले.

एके दिवशी गोरोबांची पहिली पत्नी गोरोबांना म्हणाली की, "अहो धनी! माझा अंगिकार तुम्ही करत नाहीत हे ठीक आहे. पण धाकट्या बहिणीबरोबर तरी नीट संसार करा. माझ्या बहिणीत काय कमी आहे? तिचे तारुण्य मुसमुसलेले आहे. दिसायला पण देखणी आहे. तुमच्यापासून तिला मूल व्हायलाच हवे, म्हणजे वंशविस्तार तरी होईल."

यावर गोरोबा म्हणाले, "तुझ्या आईवडिलांनी विठोबाची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शपथ घालून दोन्ही मुलींना सारखेच वागवा असे सांगितले. त्यामुळे तुझ्याप्रमाणे मला तिचाही त्याग केला पाहिजे.''

मग दोघी बहिणींनी यावर एक रामबाण उपाय शोधून काढला. गोरा कुंभार रात्री एकटेच झोपले होते. त्या दोन बहिणी आल्या व गोरोबांच्या डाव्या व उजव्या हाताला झोपल्या व गोरोबांचे दोन्ही हात आपल्या छातीवर ठेवले.

सकाळी गोरोबा उठले. रात्रभर आपल्या हातून घोर पाप घडले हे त्यांच्या लक्षात आले. विठोबाची शपथ आपल्या करकमलाने मोडली म्हणून त्यांनी आपली दोन्ही करकमले छाटून टाकली.

त्यांच्या दोन्ही पत्नींना फार वाईट वाटले. त्या गोरोबांना म्हणाल्या की, विठुराया यावर नक्कीच काय तरी उपाय शोधेल. तुम्ही त्याचे अखंड नामस्मरण करा म्हणजे सर्व काही साध्य होईल.

काही दिवसानंतर अत्यंत पवित्र आषाढी एकादशी आली. गोरोबांच्या आज्ञेनुसार दोन्ही पत्नी गोरोबांना घेऊन पंढरपुरास आल्या. त्या तिघांनी भक्त पुंडलिकाचे दर्शन घेतले. पवित्र चंद्रभागेचे स्नान केले.

गरुडपारावर नामदेवांचे कीर्तन सुरू होते. सर्व भक्तमंडळी कीर्तनात रंगली होती. ज्ञानेश्वर जातीने तेथे हजर होते. गोरोबा आपल्या दोघी पत्नींसह तेथे बसले. नामदेवांनी विठ्ठलाचा जयघोष सुरू केला. सर्वजण हात वर करून विठ्ठलाचा जयघोष करत होते. आपल्याला हात नाहीत व हात वर करून आपल्याला भगवंताचे गुणगान करता येत नाही म्हणून गोरोबांना अश्रू आवरता आले नाहीत.

सर्व लोक गोरोबांकडे पाहत होते. गोरोबांनी विठ्ठलाचा धावा सुरू केला व हात देण्याची विनंती केली. विठ्ठलास गोरोबांची दया

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आली. विठ्ठलाच्या कृपेमुळे गोरोबांना हात फुटले. सर्व लोकांनी विठ्ठलाचा जयजयकार केला.

गोरोबांच्या पहिल्या पत्नीने, माझ्यावरही कृपा कर, अशी विनवणी केली. विठ्ठलाने तिच्या मनातील भाव ओळखला. तिचे मेलेले मूल पुन्हा तिला जिवंत करून दिले. मूल मिळालेले पाहून गोरोबांनाही आनंद झाला.

रुक्मिणीमातेने गोरोबांना सांगितले की, ' हे बघ, आजपासून तू दोन्ही पत्नींचा स्वीकार कर. तू आज विठ्ठलाच्या शपथेपासून मुक्त झालास.'

सर्वांनी पुन्हा एकदा विठोबा व रुक्मिणीचा गजर केला. गोरोबा आपल्या दोन पत्नींना व मुलाला घेऊन आपल्या गावी आले व पुन्हा सुखाने संसार करू लागले.

अध्याय १८ वा

।। संत नामदेव व परिसा भागवत ।।

आपल्या घराला सर्व भक्तांचे पाय लागावेत, आशीर्वाद लाभावेत म्हणून सर्व भक्तजनांना आग्रहाची विनवणी करून गोरोबांनी आपल्या गावी बोलावले. गोरोबांच्या विनंतीला मान देऊन सर्व भक्तांचा मेळा गोरोबांच्या घरी आला. गोरोबांनी सर्वांना भोजन देऊन तृप्त केले. गोरोबांच्या कुटुंबियांनी संतांचे आशीर्वाद घेतले.

भोजनावर यथेच्छ ताव मारून झाल्यानंतर सर्व भक्त मंडळी गप्पाष्टकांसाठी एकत्र बसली. यामध्ये ज्ञानेश्वर व त्यांचे बंधू, भगिनी, सावतामाळी, नामदेव इ. चा समावेश होता.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

ज्ञानेश्वर म्हणाले, "गोरोबाकाका, तुमच्याकडे पक्की मडकी व कच्ची मडकी असतात. ती तुम्ही कशी ओळखता? त्याचे प्रात्यक्षिक जरा दाखवा पाहू!"

ज्ञानेश्वरांच्या या बोलण्याचा मतितार्थ गोरोबांना कळला. गोरोबांनी हातात थापटी घेतली व सर्वांच्या मस्तकावर मारून हे मडके पक्के आहे असे म्हणू लागले. असे करत करत ते नामदेवां-जवळ आले व त्यांच्या मस्तकावर थापटी मारली तेव्हा गोरोबा म्हणाले, "अरे देवा! हे मडके अजून कच्चे आहे."

यावर मुक्ताई म्हणाली की, "काका! तुम्हाला यातले सर्व काही कळते म्हणून नामदेवांचे मडके अजून कच्चे आहे असे तुम्ही सांगितले."

या बोलण्याने सर्वजण नामदेवांना हसू लागले. नामदेव मनातून खजिल झाले.

नामदेव मनातून चिडले होते. सर्व भक्तांच्या मेळ्यात एवढा मोठा अपमान त्यांना सहन झाला नाही. पंढरपुरात आल्यानंतर ते ताबडतोब विठ्ठलाकडे गेले व विठ्ठलास गोरोबांकडे माझा अपमान झाला असे सांगितले.

यावर विठ्ठल म्हणाला, "अरे नाम्या! तू एवढे का चिडतोस? गोरोबांनी सांगितलेले शंभर टक्के खरे आहे. तू अजून कच्चाच आहेस. या अध्यात्मामध्ये नुसती भगवद्भक्ती करून चालत नाही. तर त्यासाठी सद्‌गुरूंची नितांत आवश्यकता आहे. गुरूशिवाय कोण वाट दाखवणार? सद्‌गुरू, सत्संगती व नाम:स्मरण ह्या तीन गोष्टी अध्यात्मात अत्यावश्यक आहेत."

नामदेव म्हणाले, "मी तुझ्या चरणांजवळ आलो आहे. तुला मी पूर्णपणे शरण आलो आहे. असे असताना सद्‌गुरूंची कशासाठी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आवश्यकता हवी? तूच माझे सर्व काही आहेस."

विठोबा म्हणाला, "सद्गुरू प्रत्येकाला हवाच. मीसुद्धा कृष्णावतार व रामावतारमध्ये अनुक्रमे सांदिपनी व वसिष्ठ ऋषी यांना गुरू केले होते. त्यामुळेच मला आत्मज्ञानाची प्राप्ती झाली. त्यामुळे तू माझे ऐकलेस तर तुझी कीर्ती सर्व जगात पोहचेल."

नामदेव विठ्ठलास शरण गेले व म्हणाले, "हे प्राणनाथा! आता तूच मला सांग मी कोणास सद्गुरू करू? तुला सर्व प्रकारची कल्पना आहेच." विठोबाने नामदेवांना विसोबा खेचरांचे नाव सुचवले. नामदेवांना मल्लिकार्जुनाच्या देवळात जाण्यास सांगितले.

विठ्ठलाच्या आज्ञेनुसार नामदेव मल्लिकार्जुनाच्या देवळात आले. तेथे विसोबा खेचर पादत्राणांसह भोलेनाथाच्या पिंडीवर पाय ठेवून झोपले होते. हे दृश्य पाहताच नामदेवांना राग आला. ते त्यांना म्हणाले, "अरे आंधळ्या प्राण्या! तुला काही कळत नाही. साक्षात् गणेशपित्याच्या पिंडीवर तू पाय ठेवून झोपला आहेस."

हे बोलणे ऐकून विसोबा खेचर नामदेवांना म्हणाले, "अरे वत्सा! माझ्या हातून मोठी चूक झाली, मान्य आहे. पण वयोमानामुळे माझ्या अंगात शक्ती नाही. त्यामुळे तूच माझे पाय दुसरीकडे ठेव."

नामदेवांनी विसोबा खेचरांचे दोन्ही पाय उचलले व दुसरीकडे ठेवले. तेथेही उमापतीची पिंड निर्माण झाली. अशा प्रकारे त्यांनी पाच-सहा वेळा दिशा बदलली पण जातील तेथे शंकराची पिंड येतच होती.

शेवटी नामदेव दमले व विसोबा खेचरांना साष्टांग नमस्कार केला. नामदेवांना सर्वत्र शंकरच दिसू लागले. त्यामुळे नामदेवांचा अभिमान नाहिसा झाला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

विसोबा खेचरांनी नामदेवांना आपल्या हृदयाशी धरले व आपला वरदहस्त नामदेवांच्या मस्तकावर ठेवून त्यांना आशीर्वाद दिला. विसोबा खेचरांनी पुढे नामदेवांना अलौकिक ज्ञान दिले.

एके दिवशी देवळात आल्यानंतर विठ्ठल गमतीने नामदेवांना म्हणाला, "विसोबा खेचरांना गुरू केल्यापासून तुझे माझ्यावरचे प्रेम, भक्ती कमी झाले आहे." नामदेव म्हणाले, "तसे काही नाही. आता माझा द्वैतभाव नाहीसा झाला आहे. तुझ्या व विसोबा खेचरांच्या स्वरूपात मुळीच भेद आढळत नाही."

यावर खूष होऊन विठ्ठलाने सर्व संतांना सांगितले की, "आता नामदेवाचे मडके कच्चे नाही. आता ते पक्के मडके आहे. नामदेवाचे सर्व आचार, विचार, उच्चार पक्के झाले आहेत."

परिसा भागवत

आता आपण पंढरपूरमधील एका भक्ताची कथा पाहू. या भक्ताचे नाव होते परिसा भागवत. यांनी मोठे अनुष्ठान करून देवीस प्रसन्न केले होते. देवी प्रसन्न झाल्यावर परिसाने वर मागितला की, "माझे हृदय सदैव तुझ्या भजनामध्ये स्थिर राहू दे, माझी जिव्हा सदैव तुझे नामस्मरण करू दे व मला पोटाची काळजी कधीही न पडो."

रुक्मिणीने परिसा भागवतास एक परीस दिला व सांगितले की, "याचे तू नीट रक्षण कर. हा कोणालाही देऊ नकोस व दाखवूसुद्धा नकोस." रुक्मिणीमातेस नमस्कार करून परिसा आपल्या घरी आला व आपल्या प्रिय पत्नीस म्हणाला, "अग कमलजा! मला रुक्मिणीमातेने हा परिस दिला आहे. तो नीट जपून ठेव व याबद्दल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

कोणाला सांगू नकोस.''

एके दिवशी परिसा भागवताची पत्नी चंद्रभागेचे पाणी घेऊन घरी येत होती. तिला वाटेत नामदेवांची पत्नी राजाई भेटली. बोलता बोलता कमलजाने राजाईस परिसाबद्दल सांगितले. तो आम्हाला रुक्मिणीमातेने बहाल केला आहे हेसुद्धा सांगितले. राजाईने एक प्रहर तो परीस मिळावा यासाठी कमलजाजवळ विनंती केली.

काही दिवसानंतर कमलजाने आपल्या नवऱ्याच्या न कळत राजाईस तो दिव्य परीस आणून दिला. तिने एका प्रहरात बऱ्याच गोष्टींना त्या परीसाचा स्पर्श करवून त्यांचे सोने केले. ते सोने तिने बाजारात विकून मुबलक पैसा मिळवला. आपल्या कुटुंबासाठी राजाईने खूप सामानसुमान आणले, मिठाई आणली. नामदेव महाराज काही वेळाने पुन्हा आपल्या घरी आले. त्यांना याबद्दल प्रथम काही कळलेच नाही. त्यांनी आपल्या पत्नीस याचा जाब विचारला. राजाईने सर्व काही सांगितले. नामदेवांनी ताबडतोब तो परीस बायकोकडे मागितला व चंद्रभागेत फेकून दिला.

परिसा भागवत आपल्या बायकोकडे परिस मागू लागले. त्यांच्या बायकोने तो राजाईस दिला असल्याचे सांगितले. परीसा भागवत व नामदेव यांची भेट झाली. नामदेवांनी त्याला मी परीस चंद्रभागेच्या पाण्यात फेकून दिला आहे असे सांगितले. आपला प्राणप्रिय परीस गेला म्हणून परिसा भागवत मोठ्याने रडू लागला. तो नामदेवांना अपशब्द बोलला. सर्व गावकऱ्यांना बोलवून, माझा परीस नामदेवाने चोरून पाण्यात फेकून दिला, असा खोटा आरोप नामदेवांवर ठेवला.

नामदेवांनी आपली सत्य बाजू सिद्ध करण्यासाठी ताबडतोब चंद्रभागेत उडी मारली. चंद्रभागेतून ओंजळभर खडे काढले व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परीसा भागवतास, 'यापैकी तुमचा कोणता परीस आहे?' असे विचारले. परिसाने सर्व खडे घेतले व लोखंडास लावले तर सर्व काही सुवर्णमय झाले.

हा सर्व प्रकार पाहून लोक नामदेवांवर खूष झाले व परिसा भागवतास नामदेवांची जाहीर माफी मागण्यास सांगितले. परिसा भागवताने जमलेल्या जनसमुदायासमोर नामदेवांचे चरणकमल धरले.

नामदेवांनी परिसा भागवतास उठवले व आपला वरदहस्त परिसाच्या मस्तकावर ठेवून त्याला दिव्य ज्ञान प्रदान केले. यामुळे परिसा सर्व माया-मोहापासून मुक्त झाला व नामदेवांचा पट्टशिष्य झाला.

अध्याय १९ वा

॥ भक्त नागनाथ ॥

श्रोत्यांनो! आता पुढील कथा तुम्ही शांत चित्ताने श्रवण करा.

परळीवैजनाथ या गावात नागनाथ नावाचा एक भक्त राहत असे. गावात 'ॐ भवति भिक्षां देहि', असे म्हणत म्हणत तो आपला उदरनिर्वाह करत असे. नागनाथ सुश्राव्य असे कीर्तन करत असत. ते कीर्तन ऐकण्यासाठी प्रत्येकजण आपल्या जीवाचा आटापिटा करत असे. त्यांना गावामध्ये मोठा मान होता. पण काही दुष्ट, लबाड लोक त्यांची टिंगलटवाळी करत असत. नागनाथ अशा दळभद्री लोकांकडे मुळीच लक्ष देत नसत.

एके दिवशी नागनाथ रात्री झोपले होते. काही गुंड लोकांनी रात्रीच त्यांच्या घराला आग लावून दिली. लोक आग-आग करीत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मोठ्याने ओरडू लागले. लोकांच्या ओरडण्यामुळे नागनाथ जागे झाले. पाहतात तर काय ? सर्व घरच ज्वालांनी वेढलेले आहे. त्यांची पत्नी व मुलेबाळे आतील खोलीत झोपलेली होती. आपल्यावरील संकटाचे निवारण करण्याकरिता तो पांडुरंगाची करुणा भाकू लागला. आपल्या प्रेमळ भक्ताची हाक ऐकून विठ्ठलाने नागनाथाचे संरक्षण केले. त्यांच्या कुटुंबियांनीसुद्धा या विठ्ठलाचे आभार मानले.

नागनाथाच्या झोपडीस आग लागल्याचे कळताच गावातील सर्व लोक चौकशीसाठी आले. घरातील कोणालाही इजा झाली नाही, याबद्दल त्यांना आश्चर्य वाटले. लोक नागनाथाच्या भक्तीवर समाधानी होते. सर्व लोकांनी नागनाथांचा जयजयकार केला व आपली भक्ती खरोखरच थोर आहे असे सांगितले.

पुढे त्यांच्या गावातील लोकांनी त्यांना एक जमीन देण्याचा बेत आखला. नागनाथांची संमती घेण्यासाठी गावातील काही लोक नागनाथांकडे आले व त्यांना सविस्तर सांगितले.

नागनाथ म्हणाले, "मला जमिनीची काहीही आवश्यकता नाही. मी विरक्त मनुष्य. लोकांकडून भिक्षा घेऊन त्यावरच माझा व कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू आहे."

या भाषणामुळे लोक त्यांना म्हणाले, "नागनाथबुवा ! जमीन तर आम्हाला तुमच्या नावेच करायची आहे. त्या जमिनीवरचे उत्पन्न कोणासही मिळाले तरी चालेल." गावचे असंख्य शेतकरी त्या जमिनीवर धान्यरूपी सोने पिकवीत व त्याचा धर्मादायासाठी उपयोग करीत. अशा प्रकारे ही पद्धत वर्षानुवर्षे सुरू होती; पण मध्येच एक मोठी अडचण निर्माण झाली.

एका नवीन हवालदाराची बदली त्या गावात झाली. त्याने खोटेच कारण सांगून ती जमीन बळकावयाची ठरवले. "तुम्ही त्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नागनाथांच्या मध्ये येऊ नका. ते फार मोठे संत आहेत," असे खूप जणांनी त्या हवालदारास सांगितले पण पालथ्या घड्यावर पाणी!

एके दिवशी भल्या पहाटे तो हवालदार नागनाथांच्या घरी गेला व त्यांना म्हणाला की, "आमच्या घरी लग्न आहे. आमच्या परंपरेनुसार लग्नासाठी देवाची प्रतिष्ठापना करताना वाघाचे दैवत लागते. त्यामुळे तू जर आज सायंकाळपर्यंत जिवंत ढाण्या वाघ आणून दिला नाहीस तर तुझी जमीन माझ्या नावाने करेन."

नागनाथ चिंतातुर झाले. आता जिवंत ढाण्या वाघ कसा आणायचा हा यक्ष प्रश्न त्यांना पडला. ते ताबडतोब अरण्यात गेले व लक्ष्मीपती श्रीहरीचा धावा करू लागले. त्यांनी श्रीहरीस प्रार्थना केली की, 'हे जगदीश्वरा! तुला प्रथम कोटी कोटी प्रणाम. मी त्या हवालदारास जिवंत ढाण्या वाघ आणून देतो असे वचन दिले आहे. त्यामुळे आता तूच यातून काहीतरी मार्ग शोधून काढ.

श्रीहरीने स्वत:च ढाण्या वाघाचे रूप घेतले व नागनाथां-बरोबर चालू लागले.

नागनाथ अक्राळ-विक्राळ वाघास घेऊन येत असल्याची वार्ता गुराख्यांनी गावात सांगितली. हे ऐकून सर्वजण आपला जीव कसा वाचेल, ते पाहू लागले. लोक जागा मिळेल तिथे दाटीवाटीने लपून बसले. काही हुशार लोकांनी वाघ आतमध्ये येऊ नये म्हणून वेशीचे दार बंद केले.

वाघ वेशीपर्यंत आला. त्याच्या डरकाळीने बंद झालेले दार खाडकन् उघडले. वाघ आत आल्याचे बघताच सर्वजण वाट मिळेल तिथे पळू लागले. काही लोकांची तर बोबडीच वळाली, काहींची तर भीतीने दातखिळी बसली. नागनाथांनी सर्व लोकांना अभय दिले व सांगितले की, "तुम्ही श्रीहरीचे भजन सुरू ठेवा.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुमच्या जीवाला थोडासुद्धा धोका नाही.''

त्यानंतर नागनाथ वाघास घेऊन त्या हवालदाराकडे आले. हवालदार भीतीने घरात लपला होता. त्या वाघाने दोन-तीन डरकाळ्या फोडल्यानंतर भीतीने त्याचे धोतरच ओले झाले. तो काही झाले तरी बाहेर येण्यास तयार होईना.

बायकोने बाहेर हुसकावल्यानंतर तो बाहेर आला. त्याने नागनाथांना साष्टांग नमस्कार केला व झालेल्या अपराधाबद्दल क्षमा मागितली.

नागनाथ श्रीहरीरूपी वाघास घेऊन पुन्हा अरण्यात गेले. तेथे वाघाचे रूप टाकून श्रीहरीने मनोहरी चतुर्भुज रूप धारण केले. श्रीहरीने नागनाथांस आपल्या हृदयाशी घेतले व त्यांना दिव्य आशीर्वाद दिले.

अध्याय २० वा

॥ भक्त जोगा परमानंद, संत नरहरी सोनार, संत नामदेवांची परीक्षा ॥

श्रोत्यांनो! आता मी तुम्हाला तीन भक्तांच्या कथा सांगणार आहे. तीन भक्तांची नावे अनुक्रमे जोगा परमानंद, नरहरी सोनार व नामदेव अशी आहेत. या तीनही कथा एकाग्रतेने श्रवण करा.

जोगा परमानंद नावाचे एक भक्त होते. त्यांचे बार्शी गावात वास्तव्य होते. त्यांना काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर यांपैकी काहीही नव्हते. अत्यंत विरक्तपणे जीवन जगण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्याचे चित्त अखंड हरिभजनात गुंतलेले असे. ते न चुकता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घरापासून देवळापर्यंत साष्टांग नमस्कार घालत असत. गावातील लोकांच्या भिक्षेवर त्यांचे पोट भागत असे. सदैव आनंदी चेहरा, जिभेवर नामस्मरण सुरू असे. जोगा परमानंद म्हणजे जणू काही सळसळत्या उत्साहाचे मूर्तीमंत प्रतीकच होते.



एके दिवशी काही श्रीमंत व्यापारी महाद्वारी आले. त्या दिवशी तुफान पाऊस पडला होता. सर्वत्र चिखल साचला होता. त्या चिखलातून नित्यनेमाप्रमाणे जोगा परमानंद साष्टांग नमस्कार घालत आहे हे पाहून त्या व्यापाऱ्यांना आश्चर्य वाटले. त्यांना जोगा परमानंदांबद्दल सहानुभूती वाटली. त्यांनी एका दुकानातून पीतांबर विकत घेतले व नको नको म्हणत असतानाही ते पीतांबर त्यांना दिले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जोगा ते पीतांबर नेसले. त्यानंतर ओचे खोचून नमस्कार घालण्यास सुरुवात केली. त्या नवीन वस्त्राच्या मोहात पडून पूर्वीपेक्षा देवावरील निष्ठा कमी झाली. त्यामुळे त्या दिवशी रात्र झाली तरी नमस्कार घालून झाले नाहीत. त्यामुळे जोगा परमानंदाला खूप वाईट वाटले. स्वत:बद्दल खूप लाज वाटली. पीतांबरामुळे हे संकट आपल्यावर ओढवले याची त्यांना जाणीव झाली.

त्यांनी याबद्दल देहाला दंड घेण्याचे ठरवले. तिकडून एक शेतकरी दोन मस्त बैल घेऊन चालला होता. त्याने पीतांबराच्या मोबदल्यात ते दोन बैल विकत घेतले. नंतर बैलांच्या पायांना दोऱ्या बांधून त्या आपल्या दोन्ही हातास बांधल्या व नंतर बैलांना हुसकावून लावले. बैल खूप दूरवर पळत होते. जमिनीवरून सरपटत गेल्यामुळे जोगा परमानंदांचे सारे शरीरच रक्तबंबाळ झाले होते. हे सर्व दु:ख बाजूला करून ते भगवंताच्या नामस्मरणात तल्लीन झाले होते. या सर्व अपघातामुळे त्यांची प्राण जाण्याची वेळ आली. प्राण कंठाशी आला तरी ते भजन करण्याचे थांबले नव्हते. त्यांच्या शरीराची सगळी कातडीच सोलून निघाली होती, तरीही त्यांची तिकडे लक्ष नव्हते.

पांडुरंगाला आपल्या भक्ताची दया आली. त्याने ताबडतोब तेथे धाव घेतली. स्वत:च्या हाताने जोगा परमानंदांना पाणी दिले. नंतर त्यांच्या संपूर्ण शरीरावरून हात फिरवला. त्यामुळे त्यांची कांती पूर्ववत झाली. ते पूर्वीप्रमाणे सुंदर दिसू लागले. विठ्ठलाने त्यांना आपले अद्‌भुत दर्शन दिले.

पुढे एके दिवशी भक्तमेळा जमलेला असताना रुक्मिणीपतीने जोगा परमानंदांची तोंडभरून स्तुती केली. तेव्हा ज्ञानेश्वर माऊली

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

म्हणाले, "हे देवा! तुझे स्वरूप खरोखरच उत्तम आहे. तूच सर्व काही करत असतोस. तुझ्याच कृपेमुळे एकापेक्षा एक वरचढ भक्त उदयास येतात. त्यांच्या भक्तीचा पाझर फक्त तुलाच कळतो. तू खरोखरच धन्य आहेत."

नरहरी सोनार

श्रोत्यांनो! पंढरपूर म्हणजे भक्तांचे आगरच होय. या पंढरपुरात अनेक श्रेष्ठ भक्त होऊन गेले. त्यापैकी आज आपण नरहरी सोनार या भक्ताची कथा पाहू.

नरहरी सोनार या नावाचा एक भक्त पंढरपुरात राहत होता. पंढरपुरात राहूनसुद्धा तो विठ्ठलास मानीत नसे. त्याची सर्व भक्ती उमापतींवर होती. भोलेनाथांशिवाय तो दुसऱ्या देवाचे दर्शनही घेत नसे.

नरहरी सोनार नेमाने शंकरांच्या मंदिरात जात असत. वाटेमध्ये विठ्ठलाचे देऊळ लागत असे. त्या देवळाकडे ते ढुंकूनसुद्धा पाहत नसत.

एक श्रीमंत सावकार होता. त्याला सर्व मुलीच होत्या. त्याला वंशविस्तार होण्यासाठी मुलगा हवा होता. म्हणून त्याने पंढरपुरातील पांडुरंगास नवस केला होता की, 'हे विठ्ठला! मायबापा! जर मला पुत्ररत्न झाले तर मी सुवर्णजडित कडदोरा तुला अर्पण करीन.'

देवाने सावकाराची प्रार्थना ऐकली. त्या सावकारास मुलगा झाला. त्याने पंढरपुरात चौकशी केली की, या गावात उत्तम सोनार कोण आहे? सर्वांनी नरहरी सोनारांचेच नाव सांगितले. नरहरी सोनारांकडे गेल्यानंतर बायकांना कोणते दागिने घेऊ, किती घेऊ,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अशी अवस्था होत असे. नरहरी अत्यंत नाजूक कलाकुसर करत असत.



तो सावकार पत्ता शोधत नरहरी सोनारांकडे आला. नरहरी सोनारांना त्या सावकाराने सर्व काही सांगितले व पैसे दिले. तेव्हा नरहरी सोनार म्हणाले, "तुम्ही सुवर्णरत्नजडित कडदोऱ्याबद्दल मुळीच चिंता करू नका. मी अत्यंत आकर्षक असा तो कडदोरा बनवतो. फक्त तुम्ही स्वत: त्या विठ्ठलाच्या कमरेचे माप घेऊन या म्हणजे झाले."

नरहरी सोनारांच्या आज्ञेनुसार त्या सावकाराने विठ्ठलाच्या कमरेचे माप आणून दिले.

काही दिवसातच कडदोरा तयार झाला. प्रेमात पडावे अशी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुंदर कलाकुसर नरहरी सोनारांनी केली होती. सावकार तो सुवर्णरत्नजडित कडदोरा घेऊन विठ्ठलाच्या देवळात गेला.

प्रथम त्या सावकाराने विठ्ठलाची पाद्यपूजा केली व नंतर तो कडदोरा विठ्ठलाच्या कमरेला बांधण्यास गेला पण खूप प्रयत्न करूनसुद्धा तो कडदोरा अपुरा पडू लागला. त्या सावकाराने नरहरींकडे जाऊन थोडा वाढवून आणला तर पुन्हा तो फारच सैल झाला. असे पाच-सहा वेळा झाले. तो कडदोरा काही केल्या विठ्ठलाच्या कमरेस व्यवस्थित बसेना.

सारखे हेलपाटे मारावे लागत असल्यामुळे तो सावकार वैतागला व नरहरी सोनारांना म्हणाला की, "तुम्ही पंढरपुरातले मोठे सोनार आहात. तुमच्या हातून अशी चूक होईल याची अपेक्षा नव्हती. स्वत: विठ्ठलाच्या देवळात येऊन कमरेचे माप घ्या म्हणजे सर्व काही ठीक होईल.

नरहरी सोनार म्हणाले, "अहो सावकारबुवा, मी शैव आहे. मी शंभू महादेवाचेच दर्शन घेतो. महादेवाशिवाय मला सर्व देवांचे दर्शन वर्ज्य आहे. असे असताना मी विठ्ठलाच्या कमरेचे माप घेण्यास कसे काय येऊ? मी येणार नाही."

सावकाराने त्यांना खूप मिनत्या केल्या तेव्हा नरहरी सोनार डोळ्यांवर पट्टी बांधून विठ्ठलाच्या कमरेचे माप घेण्यास निघाले. नरहरी सोनारांना या अवस्थेत पाहून रस्त्यावरील लोक त्यांना हसू लागले.

त्या सावकाराने नरहरी सोनारांचा हात विठ्ठलाच्या कमरेवर ठेवला. नरहरी कमरेचे माप घेऊ लागले. तेव्हा आपण भोलेनाथाच्या पिंडीस स्पर्श करत आहोत असे त्यांना वाटले. त्यांनी आपल्या डोळ्यावरची पट्टी काढली. पाहिले तर पुन्हा विठ्ठलाची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मूर्तीच होती. पुन्हा पट्टी बांधली तर पुन्हा शंकरांची पिंड भासली. असे त्यांनी पाच-सहा वेळा केले पण त्यांना थोडाही फरक जाणवला नाही.

नरहरी सोनारांनी विठ्ठलाच्या चरणकमलांवर साष्टांग नमस्कार घालून विठ्ठलाची क्षमा मागितली व म्हणाले की, "आजपर्यंत मी दोन देवांमध्ये मतभेद करीत होतो. हे माझ्या हातून अघोर पाप झाले. शिव काय व पांडुरंग काय? दोघेही एकाच परमात्म्याचे अंश आहेत. आता आजपासून मी सर्व देवदेवतांना मानून त्यांचे मंगल आशीर्वाद घेणार."

विठ्ठल म्हणाला, "तुला हे कळावे म्हणून मीच हे सर्व काही केले. आजपासून तू आता आत्मज्ञान शिकण्यास सुरुवात कर."

नरहरीच्या समाधानासाठी विठ्ठलाने शंभू महादेवाची पिंडी मस्तकी धारण केली. ही पिंडी सर्वजण विठ्ठलाचा मुकुट म्हणून ओळखतात.

भक्तांचा कैवारी पांडुरंग आपल्या भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण करत असतो.

संत नामदेव

राजस सुकुमार मदनाचा पुतळा असलेल्या

श्री विठ्ठलाने आपला लाडका भक्त नामदेवास विचारले की, "सर्वत्र मी ओतप्रोत भरून राहिलेलो आहे याची तुला सदैव जाणीव असते का?"

नामदेव म्हणाले, "हे विठ्ठला! मी संपूर्ण प्राणीमात्रांवर समदृष्टी ठेवतो. माणसांएवढेच मी प्राण्यांनाही महत्त्व देतो."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

नामदेवांचे हे भाषण लक्षात ठेवून विठ्ठलाने त्याची प्रचीती घेण्याचे ठरवले.

एके दिवशी श्रीविठ्ठलाने कुत्र्याचे रूप धारण केले. तो कुत्रा संपूर्ण गावभर हिंडला. जिथे लोक जेवायला बसलेले असत, तिथे हा कुत्रा जाई व अन्न मिळवण्याचा प्रयत्न करीत असे. सर्वजण त्या कुत्र्यास हाकलत असत. तो कुत्रा सोवळ्या ब्राह्मणांच्या ताटात तोंड घालू लागला पण त्यांनी त्याला हाकलून दिले. नामदेव जेवायला बसले होते. भाकरीचे चार तुकडे ताटात होते. त्यापैकी पटकन दोन तुकडे त्या कुत्र्याने पळवले व धूम ठोकली.

नामदेव त्या कुत्र्याच्या पाठीमागे तुपाची वाटी घेऊन पळू लागले. ते कुत्र्याला म्हणत होते, "अरे राजा! नुसती कोरडी भाकरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizaqtion by eGangotri

खाऊ नकोस! तुला घास लागेल. मी तूप आणले आहे. तुपात भाकरी भिजवून शांतपणे खा."

मोठ्या शिताफीने नामदेवांनी त्या कुत्र्यास पकडले व भाकरी-तूप स्वत:च्या हाताने त्या कुत्र्यास भरवले. नामदेवांची ही वृत्ती पाहून श्रीविठ्ठलाने आपले खरे रूप प्रकट केले व नामदेवांना मंगल आशीर्वाद दिले.

एकदा विठ्ठल नामदेवांना म्हणाला की, चल नामदेवा! आज आपण मस्तपैकी पंचपक्वान्नाचे भोजन करू.

नामदेव म्हणाले, "अरे विठ्ठला! आज पुण्यमयी एकादशी आहे. एकादशीस दोन्ही वेळेस अन्न ग्रहण करायचे नसते. आज संपूर्ण उपवास करून हरीभजन करायचे असते. एकादशीस अन्न-ग्रहण करणारा नरकात खितपत पडतो."

विठ्ठल म्हणाला, "एकादशीस उपवास करतात हे ठीक आहे. पण सर्वजण उपवास करण्याचे ढोंग करतात. लोक उपवास करतात पण त्यांच्या उपवासात श्रद्धा व भाव नसतो. अंबरीष ऋषी व रुक्मांगदाने ज्या निष्ठेने व्रत केले त्या निष्ठेने कोणीच व्रतवैकल्ये करत नाहीत. आजच्या युगात सर्वचजण ढोंगी झाले आहेत."

नामदेव म्हणाले, "तू पाठीशी असल्यामुळे माझ्या हातून सर्व व्रतवैकल्ये व्यवस्थित होतील. तुझ्या असीम कृपेमुळे माझ्या हातून कधीही व्रतभंग होणार नाही."

या भाषणामुळे पांडुरंगाने नामदेवांची परीक्षा घेण्याचे ठरवले. एका एकादशी व्रताच्या दिवशी श्री विठ्ठलाने वृद्ध उपाशी ब्राह्मणाचे रूप घेतले.

तो वृद्ध उपाशी ब्राह्मण नामदेवांच्या घरी आला व त्यांना म्हणाला की, "हे नामदेवा! गेले ८-१० दिवस मी उपाशी आहे. मी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भुकेने व्याकूळ झालो आहे. तू मला अन्नदान कर. त्यामुळे तुझे पुण्य वाढेल व माझी भूकही शमेल."

नामदेव म्हणाले, "अहो आजोबा! आज एकादशी आहे. एकादशीस अन्न जसे खाऊ नये तसेच अन्नदानही करू नये. तुम्हाला मी शाबुदाणा वडे व दही खाण्यास देतो. त्याचे तुम्ही भक्षण करा."

यावर तो ब्राह्मण म्हणाला, "मला एकादशी वगैरे काही माहीत नाही. मला अन्नच हवे आहे. जर तू अन्नदान केले नाहीस तर माझा आत्मा अतृप्त राहून माझा मृत्यु होईल व त्यामुळे तुला ब्रह्महत्येचे पाप लागेल."

नामदेव म्हणाले, "मला पापपुण्य शिवत पण नाही. मी पापपुण्यविरहीत आहे. मला अन्नदान करता येत नाही कारण त्यामुळे मलासुद्धा पाप लागेल. मी सर्व व्रतवैकल्ये नेमाने करतो."

नामदेवांचे हे बोलणे ऐकून त्या ब्राह्मणाने प्राणत्याग केला. नामदेवांच्या घरासमोर त्या ब्राह्मणाचे प्रेत पाहण्यासाठी गर्दी जमली. नामदेवांनी त्या ब्राह्मणाचे प्रेत भीमातीरी नेले व ते प्रेत जाळू लागले. त्यात नामदेवांनी व त्यांच्या पत्नीनेही उडी मारली.

विठ्ठल प्रकट झाला. त्याने आपले चतुर्भुज रूप धारण केले. नामदेवास म्हणाले, "तू खरोखरच अंबरीष ऋषी व रुक्मांगदापेक्षा श्रेष्ठ आहेस. तुझी भक्ती खरोखरच धन्य आहे."

अध्याय २१ वा

॥ संत जनाबाई ॥

एकदा कार्तिकी एकादशीस पंढरपूरला यात्रा भरली होती. लहान-थोर सर्व मंडळी श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी आली होती.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तेथे सात वर्षांची खेडवळ कपडं घातलेली एक मुलगी तेथे आली. ती आपल्या आईवडिलांसमवेत तेथं आली होती. ती आईवडिलांस म्हणाली, "आई-बाबा, आता मी सर्व आयुष्य पंढरपुरातच घालवणार. मी आता पुन्हा घरी येणार नाही."



तिला सोडून आईवडील घरी परतले. ती महाद्वारात एकटीच बसली होती. तिच्याकडे नामदेवांचे लक्ष गेले. नामदेवांनी तिला मोठ्या प्रेमाने जवळ घेतले व नाव-गाव विचारले. तेव्हा ती म्हणाली, "माझे नाव जनी आहे. लक्ष्मीपती श्रीहरीच माझे आईवडील आहेत. मी त्यांच्याच चरणी माझे आयुष्य समर्पित करणार आहे." नामदेवांनी तिला उचलले व आपल्या घरी आणले. नामदेवांनी आपल्या बायकोस तिचा सांभाळ करण्यास सांगितले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

कृष्णावतारात जीं कुब्जा दासी होती तीच जनाबाई या नामरूपाने पुढे उदयास आली.

लोक तिला तू कोण असे विचारत. तेव्हा ती सांगे की, "मी नामयाची दासी जनी आहे." तिच्या जिभेवर विठ्ठलाचे नामस्मरण सुरू असे. हाती काम व मुखी नाम असा तिचा ताळमेळ असे. एकदा काय झाले? पावसाचा जोर होता. नामदेव व त्यांचे सर्व कुटुंबीय रात्री आपल्या घरात झोपले होते. तेव्हा लक्ष्मीपती श्रीहरीने आपल्या सुदर्शन चक्राने नामदेवांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे पाऊस-पाण्यापासून संरक्षण केले.

नामदेवांना आपल्यामुळे देवास त्रास पडल्याचे कळले तेव्हा ते चिडले. तेव्हा विठ्ठल म्हणाला, "अरे! काल पावसात तुझी मुले ओलीचिंब झाली असती तर गोणाईने मलाच नावे ठेवली असती." देव असे बोलतोय पाहिल्यावर गोणाईने विठ्ठलाचे चरणकमल धरले.

जनी तेवढ्यात तिथे आली. तिने देवाच्या पाठीचे मालिश केले. त्यामुळे देवास बरे वाटले.

त्यानंतर विठ्ठल म्हणाला, "नामदेवा! तुला आता भूक लागली असेल. चल, आपण सर्वजण मिळून भोजन करू या." पांडुरंगाने आपल्या मायेने सुमधुर अन्न निर्माण केले. विठ्ठल जेवायला बसला. विठ्ठलाबरोबर स्वत: नामदेव, पत्नी राजाई, मातोश्री गोणाई, त्यांची चार मुले गोविंद, विठ्ठल, नारायण, महादेव.

जनाबाईला या पंक्तीस बोलावले नाही. जनाबाईंना याचे फार दु:ख वाटले. नामदेवांना "आज काही अन्न गोड लागत नाही," असे सांगून विठ्ठल ताटावरून उठला. ते विठ्ठलाचे उष्टे अन्न गोणाईने जनाबाईंना दिले. तिने ते तसेच ठेवले व विठ्ठलाचे गुणगान गाऊ लागली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्या रात्री नामदेव व विठ्ठल एकाच गादीवर झोपले होते. विठ्ठल मध्यरात्री उठला व जनीच्या खोलीत जाऊन तिच्या हातून स्वत:चेच उष्टे अन्न पुन्हा खाल्ले. गोणाईने नामदेवास हे सांगितले तेव्हा नामदेव म्हणाला, "तो भक्तांचा भावाचा भुकेला आहे. भाव शुद्ध असला की तो कुळ, जात, स्त्री, पुरुष असे काही पाहत नाही. रामावतारात शबरीची उष्टी बोरे त्यानेच खाल्ली होती. जनीच्या हातून तो स्वत:चे उष्टे स्वत:च खात आहे."

दुसऱ्या दिवशी जनाबाई दळण दळत होती. तेव्हा विठ्ठलाने तिला येऊन मदत केली. विठ्ठल व जनाबाई दळण दळत असताना गोणाईस जनाबाईंच्या ओव्यांचा आवाज आला. तिला विठ्ठलाच्या ठिकाणी एक मोलकरीण दिसू लागली.

गोणाईने जनीस मोलकरणीबद्दल विचारले तेव्हा जनाई काहीच बोलली नाही. त्या मोलकरणीस विचारले तेव्हा ती मोलकरीण म्हणाली की, "मी विठाई मोलकरीण हाय. मला सर्वजण ओळखतात." गोणाईस खूप क्रोध आला होता. त्या क्रोधामध्येच त्या गोणाईने विठाई मोलकरणीस काठी मारली. तेवढ्यात तेथे नामदेव आले. त्यांनी विठ्ठलाला तेथे पाहिले. त्यांनी गोणाईस सांगितले की ही विठाई मोलकरीण म्हणजे साक्षात् परब्रह्म श्रीविठ्ठल आहे. गोणाईस आपण विठ्ठलाला काठी मारल्याचे फार वाईट वाटले. तिने विठ्ठलाची क्षमा मागितली.

दळण संपल्यानंतर विठ्ठल पुन्हा झोपला. सूर्योदयास थोडा अवधी असताना जनी उठली व विठ्ठलास म्हणाली की, "प्रभु! तुम्ही लवकरात लवकर देवळात जा. लोक काकड आरतीला जमा झाले असतील. तुम्ही तेथे नसल्यास सर्व लोकांचा गोंधळ होईल."

देवाने एक नाटक करायचे ठरवले. आपला शेला व गळ्यातील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitization by eGangotri

एकावेळी मुद्दामहून विसरला. काकड आरती करताना भक्तांच्या लक्षात आले की विठ्ठलाचा शेला व रत्नहार दिसत नाही. त्यांना विठ्ठलाच्या अंगावर जनीची वाकळ दिसली. त्यावरून त्यांनी ओळखले की हा हार नक्कीच जनीने चोरलेला असेल.

जनीवर सर्वांनी चोरीचा आरोप ठेवला. सर्वांनी तिला विठ्ठलासमोर नेले व सुळी देण्याचे ठरवले. जनीने पांडुरंगाचा धावा सुरू केला. त्यामुळे उभे केलेल्या सुळाचे तुकडे तुकडे होऊन पाणी झाले. सर्वजण डोळे फाडून पाहू लागले. सर्वांनी जनीच्या नावाचा जयजयकार केला.

एकदा मंदिरात बसून जनाबाई अभंग करत होती. जनीचे अभंग विठ्ठलास खूपच आवडले. त्याने शाई व लेखणी घेऊन ते सर्व अभंग कागदावर उतरवले. तेवढ्यात तेथे ज्ञानियांची माऊली ज्ञानेश्वर आले. ते येताच विठ्ठलाने सर्व लेखनसाहित्य लपवून ठेवले. ज्ञानेश्वरांनी हे सर्व अंतर्ज्ञानाने ओळखले. "हे विठ्ठला! तुमचे केलेले गुणवर्णन स्वत:च लपवून ठेवणे तुम्हाला शोभत नाही. श्रुती, पुराणे सर्वजण तुमचे वर्णन करताना दमतात, तर तिथे जनीची काय कथा? तुम्ही अभंग लिहून घेता हे कसेतरी वाटते."

यावर विठ्ठल म्हणाला, "अरे ज्ञानदेवा! मला जनीचे सर्व अभंग अमृतासमान वाटतात. पण तू कसे ओळखले मी जनाबाईचे अभंग लिहितो."

ज्ञानेश्वर म्हणाले, "तू जसे आमचे हृदय जाणतोस तसेच आम्ही सर्व भक्तजन तुझे हृदय जाणतो. जसे पत्नीचे हृदय पतीलाच कळणार; चंद्राच्या कला चकोरालाच माहीत असणार."

ज्ञानेश्वर नामदेवांना म्हणाले की, "आज मी साक्षात् विठ्ठलास जनीचे अभंग लिहिताना पाहिले."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पांडुरंग आपल्या भक्तांना म्हणाला की, "आता सर्व संतांनी ठरवून टाका की जे भक्त कवित्व करतील त्यांचे लेखक कोणकोण असतील ? ज्ञानेश्वरांचे अभंग सच्चिदानंद बाबा लिहीतील. मुक्ताईचे अभंग ज्ञानेश्वर तर जोगा परमानंदाचे अभंग विसोबा खेचर लिहीतील. जनाबाईचे मी स्वत: लिहीन. सावता माळींचे अभंग काशिबा गुरव लिहीतील. कूर्मदासाच्या अभंगाचे लिखाण सुदेव करतील. चोखामेळ्याचे अभंग अनंतभट्ट लिहीतील."

सर्व भक्तमंडळी म्हणाली की जनी खरोखरच धन्य आहे. साक्षात् भगवंतच तिचे अभंग लिहून काढणार आहे. आजपासून जनी दासी नाही तर ती संत जनाबाई आहे.

नंतर सर्व भक्तांनी मिळून पंढरीनाथाची पूजा केली व जयघोष केला. त्यानंतर विठ्ठल आपल्या स्वस्थानी आला व त्याने आपल्या पत्नीस सर्व वृत्तांत सांगितला.

अध्याय २२ वा

।। संत ज्ञानेश्वर व योगी चांगदेव ।।

जनाबाईंनी देवाची एवढी भक्ती केली हे आपण सर्व श्रोत्यांनी ऐकले. एवढ्या थोर भक्तीचा संप्रदाय कोणता ? असा प्रश्न तुम्हीच मला केला होता. त्याचे कथानक मी तुम्हाला सांगणार आहे. कृपया ते नीट लक्ष देऊन ऐका, ही नम्र प्रार्थना.

चरित्रलेखक कवी म्हणाला की, हा संप्रदाय फार प्राचीन आहे. उमापती शंभू महादेवापासून याचा आरंभ होतो. एकदा गणेशपिता शिवशंकर नदीतीरी आपल्या अर्धांगिनीस ब्रह्मस्वरूप रामाचे रहस्य समजावून सांगत होते. तेव्हा त्या नदीच्या पाण्यातील माशाच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitized by eGangotri

पोटी असलेल्या बालकाने हा उपदेश ऐकला. हा कवी नारायणाचा अवतार होता. हाच पुढे मच्छिंद्रनाथ या नामरूपाने प्रसिद्ध झाला. त्यांचाच शिष्य म्हणजे गोरक्षनाथ होय. त्याची कडक परीक्षा घेऊनच त्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला व सर्व सिद्धी बहाल केल्या.

गोरक्षनाथांचा शिष्य अद्वयानंद, त्यांचा शिष्य प्रभवानंद, प्रभवानंदांचा शिष्य गहिनीनाथ, त्यांचा शिष्य निवृत्तीनाथ, निवृत्तीनाथांचा शिष्य त्यांचेच छोटे बंधू ज्ञानेश्वर होय. ज्ञानेश्वरांचा शिष्य म्हणजे विसोबा खेचर, विसोबा खेचरांचा शिष्य म्हणजे नामदेवमहाराज. या नामदेवांचा शिष्य म्हणजे जनी अशी दिव्य गुरूपरंपरा आहे.

तुम्हाला माहीतच असेल की संत ज्ञानेश्वरांच्या काळात एक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दीर्घायुषी योगी होते. त्यांचे नाव चांगदेव होते. त्यांना योग-सामर्थ्यामुळे १४०० वर्षांचे महान दीर्घायुष्य लाभले होते. हे चांगदेव पूर्वजन्मी इंद्र होते. या इंद्राचे नाव होते पुरंदर. याच्याबरोबर अजून तेरा इंद्र होते. असे चौदा इंद्र बंदिवासातच पडले होते.

नारदमुनी तेथे योगायोगाने आले होते. त्या नारदमुनींना त्यांनी आमची बंदीवासातून सुटका कशी होईल? असा प्रश्न विचारला. आम्हाला मोक्ष कसा मिळेल? असा दुसरा प्रश्न त्यांनी केला.

नारदमुनी म्हणाले, "अरे वत्स! मोक्ष मिळतो तो पृथ्वी-लोकातच. त्यात मनुष्य जन्मामध्येच मोक्ष मिळतो. त्यासाठी सद्‌गुरू, सत्संगती व प्रभूचे नामस्मरण या तीन गोष्टींची नितांत आवश्यकता असते. पृथ्वीवर सुप्रसिद्ध असे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. पंढरपुरातील विठ्ठल दयाळू आहे. तो भक्तांवर दयेचा वर्षाव करत असतो. पृथ्वीवर तू मनुष्याचा जन्म घे व तेथेच तू साधना कर."

इंद्र म्हणाला, "ते ठीक आहे, पण या लोकांमधून माझी सुटका कशी होईल?"

भक्तश्रेष्ठ नारदमुनी म्हणाले की, "लक्ष्मीपती श्रीहरी विष्णूंचा 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा तू अखंड जप कर." नारदमुनींनी सांगितल्याप्रमाणे त्याने साधना सुरू केली व लवकरच त्याने एका ब्राह्मण दांपत्याच्या पोटी जन्म घेतला. त्याचे माता-पित्याने 'चांगदेव' असे नाव ठेवले. मोठ्या प्रमाणात नामकरण-विधी साजरा झाला.

या चांगदेवांनी बालपणापासूनच योगसाधना करण्यास सुरुवात केली. त्याला जन्मत:च अनेक सिद्धी लाभल्या होत्या.

वयाच्या आठव्या वर्षी आईवडिलांनी चांगदेवांची मुंज केली. मुंज केल्यामुळे त्यांची ज्ञाननाडी सुरू झाली. तारुण्यात पदार्पण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केल्यानंतर त्यांचा विवाह झाला. त्यांना सुलक्षणी, सुविद्य पत्नी लाभली. त्यांना चौदा विद्यांचे ज्ञान प्राप्त झाले होते. त्याने यमाची शेंडीच आपल्या हाती धरून ठेवली होती. त्यांना मृत्यूचे मुळीच भय नव्हते. त्यांना या योगसामर्थ्यामुळे १४०० वर्षांचे महान दीर्घायुष्य लाभले होते. त्यांनी तापी नदीच्या काठी आश्रम बांधला होता. आपल्या अनेक शिष्यांसह ते तेथे निवास करत असत. महान योगीराज अशी त्यांची सर्वत्र कीर्ती होती. चांगदेव नित्यनेमाने पंढरपूरला जात असत. विठ्ठलाच्या चरणांवरच त्यांनी आपले आयुष्य समर्पण केले होते. एवढे असूनसुद्धा त्यांनी सद्‌गुरू केला नव्हता. अध्यात्मामध्ये सद्‌गुरूंना फारच महत्त्व असते. कारण तेच पुढील दिशा शिष्याला दाखवत असतात.

चांगदेवांना अनेक शिष्यमंडळी होती. त्यांनी अनेकांना शिष्य केले; पण स्वत: मात्र कोणाचेही शिष्य झाले नाहीत. या चांगदेवांना आपल्या योगसामर्थ्याचा खूप गर्व होता.

त्यांनी एके दिवशी काही लोकांच्या तोंडी ज्ञानेश्वरांबद्दल ऐकले. आळंदी येथे ज्ञानीराज ज्ञानेश्वर राहतात. त्यांनी सामान्य लोकांसाठी भगवद्‌गीतेचे मराठीत निरुपण केले आहे. भावार्थ-दीपिका असे त्या ग्रंथाचे नाव आहे. हे ज्ञानेश्वर म्हणजे जणू काही ज्ञानाचा अपार सागरच आहे. साक्षात् विष्णूंनी लोकोद्धारासाठी ज्ञानेश्वरांच्या रूपात अवतार घेतला आहे.

या ज्ञानेश्वरांना भेटण्याची चांगदेवांची खूप दिवसापासून इच्छा होती. त्या भेटीपूर्वी चांगदेवांनी ज्ञानेश्वरांना पत्र लिहिण्यास घेतले. त्यांना पत्राची सुरुवात कशी करावी हे काही समजेना. तीर्थरूप ज्ञानेश्वर असे म्हणावे की चिरंजीव ज्ञानेश्वर असे म्हणावे. अशा द्विधा मन:स्थितीत ते अडकले. त्यांनी आपल्या शिष्यास

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कोरेच पत्र घेऊन ज्ञानेश्वरांकडे जाण्याची आज्ञा दिली. आकाश-मार्गाने त्यांच्या शिष्याने आळंदीस प्रयाण केले.

आळंदीमध्ये ज्ञानेश्वर व त्यांची तीन भावंडे सिद्धेश्वर मंदिराजवळ बसलेली होती. चारही भावंडे हरिचिंतनात मग्न होती. आकाशमार्गाहून आलेल्या त्या शिष्याने कोरे पत्र ज्ञानेश्वरांना दिले. ज्ञानेश्वरांनी ते पत्र पाहिले. त्यांनी ते कोरे पत्र आपल्या भावंडांना दाखवले. त्यावर मुक्ताबाई म्हणाली की, "१४०० वर्षे तपश्चर्या करूनसुद्धा चांगदेव कोराच राहिला आहे. याला आत्मज्ञानाची प्राप्ती करून देणे आवश्यक आहे."

ज्ञानेश्वरांनी त्या कोऱ्या पत्रास उत्तर दिले आणि तेच पुढे 'चांगदेव पासष्टी' या नामरूपाने पुढे आले.

चांगदेव ज्ञानेश्वरांच्या भेटीसाठी वाघावर आरूढ होऊन निघाले. त्यांच्या पाठोपाठ चौदाशे शिष्य होते. ज्ञानेश्वरांनी आपल्या तिघा भावंडांना घेऊन भिंत चालवली व ती आकाशात नेली. ज्ञानेश्वर भिंत आकाशात चालवत आहेत, हे पाहून चांगदेवांचा सगळा अभिमान गळून पडला. ते मनात म्हणाले की, "आपली सजीव प्राण्यांवर सत्ता आहे; पण निर्जीव वस्तूंवर ज्ञानेश्वरांची सत्ता आहे."

त्या चारी भावंडांनी चांगदेवांना ज्ञानोपदेश केला. ज्ञानेश्वरांनी चांगदेवांना आपल्याकडे काही दिवस ठेवून घेतले होते. ज्ञानेश्वर व चांगदेवांची दिव्य भेट ज्या वटवृक्षाखाली झाली त्याला विश्रांतीवट असे संबोधतात.

एके दिवशी मुक्ताबाई स्नान करीत होत्या. चांगदेवांनी तिच्याकडे पाहून दुसरीकडे तोंड फिरवले. मुक्ताबाई चांगदेवांना हसली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुक्ताई म्हणाली, "अरे, तुला अजून ज्ञानाची प्राप्ती झालीच नाही वाटतं. तुला कोणी गुरू दिसत नाही वाटतं."

यावर चांगदेव म्हणाले की, "माते, या गोष्टीचे ज्ञान तुला कसे काय झाले?" तेव्हा मुक्ताई म्हणाली, "जर तुला गुरू असता तर गुरूंच्या कृपेमुळे तू स्त्री, पुरुष असा भेद केला नसताच."

चांगदेवांना आपली घोडचूक कळून आली. त्यांनी ताबडतोब ज्ञानेश्वरांना गुरू केले. ज्ञानेश्वरांनी आपला वरदहस्त त्यांच्या मस्तकावर ठेवून पूर्णपणे विरक्त केले.

अध्याय २३ वा

|| संत चोखामेळा, संत कबीर व जीवा तत्त्वा यांच्या कथा ||

श्रोत्यांनो! आता मी तुम्हाला दुसऱ्या भक्ताची कथा सांगणार आहे. या भक्ताचे नाव होते चोखामेळा. चोखामेळा जातीने महार होते. त्यांचे वास्तव्य पंढरपुरास होते. विठ्ठलाचे सदैव नामस्मरण करीत आपला प्रपंच चालवावा, असा त्यांचा मनोदय होता.

पंढरपुरातील मंदिरात प्रदक्षिणा घालून ते महाद्वारात विठ्ठल विठ्ठल असा जयघोष करीत असत. चोखामेळांना मंदिरात जाण्याची परवानगी नसे. काही लोक चोखामेळांना मुद्दाम चिडवत व म्हणत की, "जर विठ्ठलाचे तुझ्यावर प्रेम असते तर तुझी व त्याची भेट नक्कीच झाली असती. तो आतमध्ये कटेवरी हात ठेवून उभा व तू बाहेर उभा, यामुळे तुमच्या दोघांची भेट होणे शक्य नाही."

तो त्या लोकांना म्हणत असे की, "देव थोडा उशिरा का होईना, भक्तांवर नक्कीच कृपेचा वर्षाव करतो. एक दिवस तो माझ्यावर नक्कीच कृपा करेल."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एक दिवस श्रीविठ्ठल स्वत: त्याच्या घरी आला. त्याने चोखामेळ्यास उठवले व मंदिराच्या गाभाऱ्यात नेले. तेथे त्याला साक्षात् पांडुरंगाबरोबर बोलत असताना पुजाऱ्याने व इतर लोकांनी पाहिले. तेव्हा लोक म्हणाले की दाराला कुलूप असतानासुद्धा तू आत कसा काय आलास? तुझ्या स्पर्शामुळे विठ्ठल बाटला.

चोखामेळा म्हणाले, "विठ्ठलाने मला स्वत: हाताने धरून येथे आणले आहे. विठ्ठल माझ्या जीवाचे जीवन आहे. विठ्ठल हा भक्तीभावाचा भुकेला आहे. तो स्त्रीपुरुष, उच्चनीच, जातीभेद वगैरे काही पाहत बसत नाही. असे असताना तुम्ही विठोबा बाटला असे कसे बरे म्हणता?"

पुजारी चोखामेळांवर चिडले व म्हणाले, "आम्ही ब्राह्मण उच्च कुळातले. तू हलक्या जातीतला. स्वत:ला काही ज्ञान नसताना आम्हाला काही शिकवू नकोस. तू आता येथे राहू नकोस. तू आता चंद्रभागेच्या पलीकडेच जा. इकडे राहिलास की आमच्या सर्वांच्या डोक्याला त्रास होईल."

चोखामेळांनी, 'मला येथे राहू द्या,' म्हणून खूप विनंती केली पण त्याचे लोकांनी ऐकले नाही. त्यांना चंद्रभागेच्या पलीकडे हद्दपार केले. चोखामेळा विठ्ठलाचे दर्शन होत नाही म्हणून खूप उदास होत असे. दीपमाळ बांधून चोखामेळाने विठ्ठलाचे नामस्मरण सुरूच ठेवले.

एके दिवशी दही सांडल्यामुळे श्रीविठ्ठलाच्या पुजाऱ्याने चोखोबांच्या श्रीमुखात लावली. त्यामुळे चोखोबांचे गाल सुजले होते. विठ्ठलाची पूजा करण्यासाठी जेव्हा पुजारी आला तेव्हा त्याला विठ्ठलाचे गालसुद्धा सफरचंदासारखे लालबुंद झाले होते, सुजले होते, असे दिसले. चोखोबांना थोबाडीत मारली व सूज विठ्ठलाला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आली.

हा सर्व प्रताप पाहून पुजारी ओशाळला. त्याने ताबडतोब जाऊन चोखामेळांची क्षमा मागितली व मोठ्या सन्मानाने त्यांना विठ्ठलाच्या देवळात आणले. विठ्ठलाला पाहून चोखामेळांनी त्या विठ्ठलास आलिंगन दिले. चोखोबांनी विठ्ठलाच्या गालावरून हात फिरवला. त्यानंतर मूर्ती पुन्हा पूर्ववत दिसू लागली.

त्या दिवसापासून चोखोबांना विठ्ठलाच्या देवळात जाण्या-पासून अडवण्यासाठी कोणाचेही धाडस होईना.

एके दिवशी विठ्ठल खूपच दमला होता. तो आपल्या पत्नीस म्हणाला की, "हे रुक्मिणी ! माझे अंग जरा रगडून दे. मला आज खूप कष्ट पडले आहेत."

रुक्मिणीने विचारले की, "आज कोणत्या भक्ताच्या घरी एवढी मोठमोठी कामे करण्यास गेला होता ? कोणत्या भक्तांवर आज स्वारी खूष झाली होती ?"

तेव्हा रुक्मिणीस विठ्ठल म्हणाला की, "अग ! आज माझ्या लाडक्या भक्ताकडे म्हणजे नामदेवांकडे अचानक खूप अतिथी आले होते. नामदेवांनी त्या सर्व अतिथींसाठी भोजन बनवण्यास सांगितले. भोजन बनवण्याची संपूर्ण जबाबदारी जनाईवर लादण्यात आली होती. हे सर्व काम करताना तिच्या नाकी नऊ आले म्हणून मी तिला मदत करण्यासाठी गेलो होतो."

एकदा नामदेव कीर्तन करीत होते. त्या वेळी पाठीमागे टाळकरी कोणीच नव्हते. त्यामुळे साक्षात् विठोबा हातात टाळ घेऊन कीर्तनात नाचू डोलू लागला. नाचता नाचता विठ्ठल इतका बेभान झाला की त्या विठ्ठलाचे वस्त्र सुटले तरीही विठ्ठलास त्याचे भान राहिले नाही. तेव्हा तेथे ज्ञानेश्वर होते. ते विठ्ठलास म्हणाले की,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

"अरे विठ्ठला! कीर्तनात एवढे बेभान होऊ नकोस. प्रथम आधी स्वत:चे वस्त्र सांभाळ, मग हवा तेवढा नाच."

यावर विठ्ठल म्हणाला, "मला मान-अपमान याचे काहीही वाटत नाही. मला लाजलज्जा काही नाही. मला देहाचे भान पण नाही. भक्तांच्या प्रेमामुळे मी न्हाऊन निघालो."

असे विठ्ठल बोलल्यानंतर कबीरांचे तेथे आगमन झाले. सर्व संतांची विठ्ठलाने कबीरांशी ओळख करून दिली. रुक्मिणीमातेने आपल्या सर्व भक्तगणांना ओवाळले.

पंढरपूराहून प्रस्थान करून कबीर दक्षिणेकडची अनेक तीर्थक्षेत्रे पाहण्यासाठी निघाले. शंभोनाथाचे अत्यंत पवित्र स्थान रामेश्वर येथे त्यांना जायचे होते. वाटेत एका नगरात मुक्काम करून त्यांनी तेथे सुश्राव्य कीर्तन केले. त्या कीर्तनास अफाट गर्दी झाली होती. त्या कीर्तनास जीवा व तत्वा या नावाचे दोन ब्राह्मण आले होते. त्यांनी कबीरांकडून ज्ञानोपदेश घेतला.

या दोन ब्राह्मणांनी यवनी गुरुंकडून अनुग्रह घेतला म्हणून इतर ब्राह्मणांनी त्यांना ब्राह्मण जातीतून हाकलून दिले. त्यामधील एकाचा पुत्र व दुसऱ्याची कन्या लग्नाला आली होती. जातीतून हाकलून दिल्यामुळे कोणीही त्यांच्याशी सोयरीक करण्यास तयार होईना! त्यांना खूप त्रास सहन करावा लागला. त्यामुळे ते पुन्हा आपल्या कबीर गुरूंकडे गेले.

त्यांनी सर्व कल्पना कबीरांना दिली. कबीर म्हणाले की, "आम्ही या दोघांचे एकमेकांमध्ये लग्न लावत आहोत असे जाहीर करा, म्हणजे सर्व काही व्यवस्थित होईल."

त्या दोघांनी आपल्या गावात येऊन जाहीर निवेदन केले. त्या दोघांपासून नवीन जात निर्माण होईल म्हणून त्यांच्याशी सोयरीक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करण्यास लोक तयार झाले. मुलाचे लग्न उत्तम रीतीने पार पडले. मुलीलाही चांगल्या कुळाचे सासर मिळाले.

जीवा व तत्वांनी हा सर्व वृत्तांत आपल्या गुरूंना जाऊन सांगितला.

अध्याय २४ वा

॥ संत कबीर कथा ॥

श्रोत्यांनो ! आपण मागील अध्यायामध्ये जीवा व तत्वा यांची कथा पाहिली. आता मी तुम्हास सावकाराची कथा सांगतो, ती श्रवण करा.

एक श्रीमंत सावकार होता. घरी कशाचीही कमतरता नव्हती. त्या सावकारास यश, लक्ष्मी, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य सर्व काही प्राप्त झाले होते. त्याची पत्नी सुलक्षणी होती. देवाच्या कृपेमुळे त्याची पाच मुलेही सुसंस्कारी होती. सावकार दानशूर होता. त्याच्या मागील जन्माच्या पापामुळे त्याला पंडुरोग झाला. तो अत्यंत अशक्त व निस्तेज झाला होता. काही दिवसांनी त्याच्या अंगाला मोठमोठ्या जखमा झाल्या व त्यातून दुर्गंधी येऊ लागली.

त्याच्या मुलांनी अनेक वैद्यांना बोलावले पण कोणाच्याही औषधाचा सावकारावर परिणाम झाला नाही. या दुर्धर रोगाला सावकार कंटाळला व आपल्या सर्व मुलांना बोलावून त्यांना सांगितले, "मुलांनो ! तुम्ही सर्व उपाय केलेत पण त्यांचा काहीही फायदा झाला नाही. त्यामुळे तुम्ही माझे शरीर भागीरथी नदीमध्ये नेऊन समर्पण करा."

सर्व लोक गंगेच्या तीरी आले. दानशूर व प्रेमळ स्वभावामुळे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सावकारास अंतिम निरोप देण्यासाठी अफाट जनसमुदाय लोटला होता.

त्या वेळी तेथे कबीरांचे शिष्य पद्मनाभ स्नानासाठी आले होते. मुखामध्ये सदैव प्रभूचे नामस्मरण सुरू होते. लोकांची अफाट गर्दी त्यांनी पाहिली. त्यामुळे त्यांनी तेथील लोकांना याबद्दल विचारले, तेव्हा लोकांनी सावकार जीव देतोय असे सांगितले. त्यामुळे त्यांना फार वाईट वाटले. पद्मनाभांनी त्या अफाट जनसमुदायातून वाट काढली व ते सावकाराजवळ गेले. पद्मनाभ सावकाराला म्हणाले, "शेठजी! तुम्ही आत्महत्या का करत आहात? आत्महत्या करणे हे महापाप आहे. ८४ लक्ष योनी पार केल्यानंतर मनुष्याचा जन्म मिळतो. त्यामधून तुम्ही अशी आत्महत्या केलीत तर जन्ममरणाचे चक्र सुरूच राहील. मनुष्य-जन्मात तुम्ही प्रभूला शरण जा व जन्माचे सार्थक करा."

सावकार म्हणाला, "तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. मला पंडुरोग झाला आहे. सर्व उपाय केले तरी या दुर्धर रोगापासून माझी सुटका झाली नाही. त्यामुळे शेवटचा उपाय म्हणून मी आत्महत्येचा विचार केला."

पद्मनाभ म्हणाले, "तुम्ही म्हणता सर्व उपाय संपले. पण एक रामबाण उपाय माझ्याकडे आहे. तुम्ही फक्त तीनवेळा राम, राम, राम असे म्हणा. तुम्ही ताबडतोब व्याधीमुक्त व्हाल. रामाचे त्रिवार नामस्मरण केल्यामुळे सर्व व्याधीतून, पापातून मुक्तता होते. इतर अनेक उपासना केल्या, उपास-तापास केले, तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या, ज्ञानदान, अन्नदान केले तरी रामाचे नामस्मरण नाही केले तर सर्व काही व्यर्थ आहे. त्यामुळे तुम्ही अंत:करणापासून रामाचे त्रिवार नामस्मरण करा."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

या पद्मनाभाचा सुंदर उपदेश सर्वांनी ऐकला. त्यामुळे तिथे उपस्थित असलेल्या जनसमुदायाने रामाचा त्रिवार उच्चार केला. सावकाराने राम, राम, राम असे तीन वेळा म्हटल्यानंतर त्याचे ते कुरूप शरीर पुन्हा तेजोमय दिसू लागले. आपले शरीर पुन्हा पूर्ववत झाल्यामुळे सावकारास खूप आनंद झाला. तिथल्या उपस्थित असलेल्या सर्वांना रामाचे नामस्मरण केल्यामुळे उत्तम आरोग्यसंपदा लाभली. खूप लोकांना लहान-मोठे आजार होते. ते ताबडतोब नाहीसे झाले. सर्वांनी पद्मनाभांचा जयजयकार केला.

पद्मनाभांची कीर्ती काशीमध्ये पसरली. सर्वजण पद्मनाभांचा उपदेश घेऊ लागले. कबीर तेथेच होते. त्यांना ही बातमी कळली. ते पद्मनाभांना भेटायला गेले तेव्हा पद्मनाभाने त्यांना चरणवंदना केली व म्हणाले, "हे गुरूदेव! तुम्ही मला ओळखले असेलच. मी आपल्याच संप्रदायातला आहे. लोकांना हरीनामाचे महत्त्व समजावून सांगणे हेच माझ्या जीवनाचे मुख्य ध्येय आहे."

कबीर पद्मनाभास म्हणाले, "तू लोकांना तीन वेळा रामनामाचा उच्चार करा असे म्हणतोस. पण त्रिवार रामनामाची मुळीच आवश्यकता नाही. शुद्ध अंत:करणाने एक वेळ जरी 'राम' ही पवित्र देवाची दोन अक्षरे जिव्हेने उच्चारली तरी पुरेसे आहे. पुराणातल्या अजामेळ या ब्राह्मणाने फक्त एकदाच देवाचे नाव घेऊन मोक्ष मिळवला होता. एकदा रामनाम घेतले तरी सर्व पापांच्या राशी भस्मसात होतात. वाल्मिकी ऋषींनी महान काव्य 'रामायण' लिहिले. महादेवाने ९९, ९९, ९९, ९९९ एवढ्या श्लोकांचे स्वर्ग, मृत्यु व पाताळ या लोकांमध्ये समान वाटप केले. यामुळे प्रत्येक लोकी ३३, ३३, ३३, ३३३ एवढे श्लोक आले. त्यानंतर एक श्लोक शिल्लक राहिला. अनुष्टुप वृत्तांत ३२ अक्षरे असतात. १० अक्षरे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पुन्हा तीन लोकांत वाटून दिली (प्रत्येकी १० × ३ लोक = ३० अक्षरे). शेवटी बत्तीस अक्षरांमधील दोनच अक्षरे शिल्लक राहिली ती दोन अक्षरे म्हणजेच 'राम' ही होय. ही दोन अक्षरे कैलासपती शिवाने स्वत: धारण केली. पुढे देव व दानव यांच्यात समुद्रमंथन झाले. त्यामुळे हलाहल नावाचे विष बाहेर आले. संपूर्ण विश्वात हे विष सांडू नये म्हणून उमापतीने ते प्राशन केले, तेव्हापासून त्यांना 'नीलकंठ' असे नाव पडले. विष-प्राशनामुळे गळ्याचा खूप दाह होऊ लागला; पण राम असे एकदाच शंकराने म्हणताच तो दाह शांत झाला. तू त्या सर्वांना तीन-तीन वेळा कशाला देवाचे नाव घेण्यास सांगितले. एकदा नामस्मरण केले तरी खूप झाले. मनुष्याने जीवनात एक वेळ तरी देवाचे नाव घ्यावे."

हा सर्व उपदेश ऐकून पद्मनाभ आश्चर्यचकित झाले. ते कबीरांच्या पाया पडले व लोकांना चुकीचा उपदेश केला म्हणून क्षमा मागू लागले.

कबीरांनी आपल्या भक्तीने देवाला आपलेसे केले होते. कबीरांची 'दानशूर' अशी ख्याती दूरवर पसरलेली होती.

एके दिवशी वाराणसी येथे एकाच वेळी १०,००० वैष्णव आले. त्यांनी लोकांना विचारले की "या वाराणसीत असा कोण वैष्णव आहे की जो आम्हाला शिधा देऊन तृप्त करील? अशा दानशूर व्यक्तीचे नाव आपण सांगू शकाल काय?"

त्या लोकांनी मुद्दामच कबीरांचे नाव सांगितले व म्हणाले की, "तुम्ही कबीराकडे जा. तुम्हाला वाटेल तेवढा शिधा मिळेल. त्या कबीराकडे खूप संपत्ती आहे."

ते १०,००० वैष्णव कबीरांकडे आले. कबीरांनी सर्वांचे स्वागत केले. त्या सर्वांसाठी जलप्राशनाची व्यवस्था केली. जल-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्राशनानंतर त्यातील एकाने १०,००० लोकांसाठी शिधा मागितला. कबीरांनी या मागणीस संमती दर्शविली.

कबीर आपल्या पत्नीस निरोप सांगून बाजारात गेले. ते अनेक वाण्यांकडे गेले; पण १०,००० लोकांसाठी शिध्याचा साठा कोणाचाच दुकानात नव्हता. शेवटचा उपाय म्हणून ते तुळशीदास वाण्याकडे आले. कबीर म्हणाले, "शेठजी! आज आमच्याकडे १०,००० अतिथी आले आहेत. त्यांना शिधा हवा आहे. त्यामुळे तुम्ही एवढ्या लोकांसाठी शिधा पाठवण्याची व्यवस्था कराल का?"

तुळसीदास वाणी म्हणाला, "मी शिधा पाठवतो पण एका अटीवर."

कबीर म्हणाले, "कोणती अट? अतिथींच्या सेवेसाठी मी कोणतीही अट मान्य करण्यास तयार आहे."

तुळसीदास वाणी म्हणाला, "कबीरा! तुझी बायको दिसायला रूपवान आहे. तिच्यासारखी सुंदर स्त्री वाराणसीत नाही. तिच्याकडे पाहून माझा काम उफाळून येतो. तू जर तिला एका रात्रीसाठी माझी कामेच्छा पूर्ण करण्यासाठी पाठवलेस तर मी धान्य पाठवेन."

त्या वाण्याची विचित्र मागणी ऐकून कबीरांना वाईट वाटले. तरीही राम यातून काहीतरी मार्ग काढेल या आशेने त्यांनी ती मनोकामना मान्य केली.

कबीरांनी व त्यांच्या पत्नीने त्या १०,००० वैष्णवांना शिधा-वाटप केले. सर्वांनी त्या दोघांना मंगलमय आशीर्वाद दिले व पुढील तीर्थयात्रेसाठी प्रयाण केले.

सूर्य मावळला. रात्र झाली. कबीरांनी आपल्या बायकोस तुळशीदास वाण्याकडे जाऊन त्याची कामेच्छा पूर्ण कर, अशी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आज्ञा दिली. त्याच्यामुळेच आज एवढ्या वैष्णवांना शिधावाटप करण्याचा योग आला. त्यांच्या पत्नी थोड्यासुद्धा घाबरल्या नाहीत. पतीपरमेश्वराची आज्ञा शिरोधार्य मानून त्या पतीबरोबरच त्या वाण्याकडे गेल्या. पत्नीस सोडून कबीर घरी आले व रामनामात गुंग झाले.

तुळसीदास वाणी कामेच्छा पूर्ण करण्यासाठी माशाप्रमाणे तडफ़डत होता. कबीरांच्या पत्नीस पाहताच तो तिला जाऊन भेटला. कबीरांच्या बायकोने त्या वाण्यास ढकलून दिले व सांगितले की मी प्रथम थोडा वेळ कौसल्यासुत श्रीरामचंद्राचे नाम:स्मरण करणार आहे. त्यानंतर तू कामेच्छा पूर्ण कर.

त्यांची पत्नी रामाचा जप करू लागली. त्या वेळी दशरथनंदन श्रीराम कोतवालाच्या रूपात प्रकट झाले. त्यांनी तुळशीदास वाण्यावर धनुष्यबाण धरला व रागाने म्हणाले, "अरे! दुष्ट माणसा, काही लाजलज्जा तुला आहे का नाही? परस्त्रीवर कशाला नजर ठेवतोस? परस्त्री ही नेहमी मातेसमान मानावी. स्त्रीलंपटा ! हेच का संस्कार दिलेत तुझ्या आईबापाने? संतांच्या पत्नीवर कशाला वाईट नजर ठेवतोस? कामावर विजय मिळवता येत नसेल तर जा बाजारू स्त्रियांच्यात, तेथील वेश्यांमध्येच घुटमळत बस."

श्रीरामाचे ते दिव्य रूप पाहून तो वाणी घाबरला. त्याची दातखिळीच बसली. त्याने कबीरांच्या पत्नीला नारळ देऊन क्षमा मागितली. प्रभू रामचंद्र त्यांच्या पत्नीस घरी सोडवण्यास आले. त्यानंतर ते अदृश्य झाले.

कबीरांना आपली पत्नी ताबडतोब आल्याने आश्चर्य वाटले. कबीरांनी आपल्या अर्धांगिनीस सर्व काही विचारले. त्यांच्या पत्नीने सर्व काही सविस्तर सांगितले. त्यांनी प्रभू रामचंद्राचे मनोमन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आभार मानले.

कबीरांना हे सर्व अद्‌भुतच वाटले. ते ताबडतोब त्या वाण्याकडे गेले. तेथे सर्व चौकशी करून ते कोतवालाकडे गेले. कबीरांनी कोतवालाची खरडपट्टी काढली. कोतवाल म्हणाला की मी इथेच झोपलो होतो, मी त्या वाण्याकडे कशाला जाऊ?

या सर्व गोष्टीचा छडा लावण्यासाठी कोतवालाला घेऊन कबीर वाण्याकडे आले व वाण्याला म्हणाले की, "हा कोतवाल धनुष्यबाण घेऊन तुझ्यावर धनुष्यबाण रोखून आला होता का?"

त्यावर वाणी म्हणाला, " माझ्याकडे आलेला कोतवाल हा नव्हता! कुणीतरी वेगळाच होता." ते ऐकून कबीरांनी बरोबर आलेल्या कोतवालास घरी पाठवले.

नंतर कबीर त्या वाण्यास म्हणाले, "अरे स्त्रीलंपटा! तो कोतवाल नव्हता, तर साक्षात् प्रभू रामचंद्रच होते. कामात पूर्ण बुडल्यामुळे सीतापती समोर असूनसुद्धा तू त्यांना नमन केले नाहीस. किती मूर्ख आहेस रे तू? प्रभू रामाच्या कृपेमुळेच तू महापापापासून वाचलास, नाहीतर नरकात खितपत पडला असतास."

या गोष्टी कळल्यानंतर त्या वाण्यास खूप पश्चात्ताप झाला. त्याने कबीरांची व श्रीरामाची माफी मागितली.

अध्याय २५ वा

॥ संत रोहिदास ॥

श्रोत्यांनो! आता मी तुम्हाला भक्त रोहिदास याची कथा सांगणार आहे. आपण ती एकाग्रतेने श्रवण करा.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रोहिदास हे चांभार जातीतील होते. ते लोकांची चरणसेवा करीत होते. मुखामध्ये सदैव लक्ष्मीपतीचे नामस्मरण सुरू असे. जेवढे गिऱ्हाईक येईल तेवढ्यावरच ते समाधानी असत. त्यांना जास्त पैशाची अपेक्षा नसे. कोणी साधुसंत त्यांच्याकडे गेले की त्यांना ते जोडे बनवून देत असत. प्रेमळ स्वभावामुळे ते सर्वांमध्ये प्रिय होते.

रोहिदासांनी मनोमन जाणले होते की हा सर्व संसार क्षणभंगुर आहे. त्यात मानवी देह नाशवंत आहे. पुन:पुन्हा मानवी देह मिळत नाही. त्यामुळे सदैव देवाचे प्रेम मिळवून जीवनाचे सार्थक करून घ्यावे. रोहिदास विष्णुभक्त होते.

एके दिवशी रोहिदास देवपूजेसाठी बसले होते. तेव्हा तेथे पंचांग सांगण्यासाठी एक ब्राह्मण मुनी आले. त्या वेळी देवाच्या पूजेसाठी चामड्याच्या बुधल्यात पाणी घेतले होते. देवाचे आसन वगैरे पूजेचे सर्व साहित्य चामड्याचेच होते.

रोहिदासांनी त्या ब्राह्मण मुनीस नमस्कार केला व बाहेर तुळशी वृंदाजवळ बसवले. त्या वेळी ते मुनी म्हणाले की, "तू देवाच्या पूजेचे पाणी चामड्याच्या बुधल्यात का घेतोस? चामडे हे पूजेमध्ये वर्ज्य आहे. देवाच्या पूजेसाठी तू सर्व चामड्याची उपकरणे वापरतोस. शिव! शिव! हे काही बरोबर नाही. आम्ही ब्राह्मण देवाची सोवळ्याने पूजा करतो. देवाच्या पूजेसाठी आम्ही ताम्हन, घंटा इ. साहित्य वापरतो. चामड्याच्या भांड्यात पाणी घेतल्याने देवांचा अपमान होतो."

रोहिदासांनी हे सर्व काही शांतपणे ऐकून घेतले आणि ते म्हणाले, देवांना मान-अपमान असत नाही. देव प्रेमाचा भुकेला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असतो. मानवाचे शरीर हे चामड्याचेच असते. मानवाच्या आत अनेक हाडे असतात ती हाडे दिसू नयेत म्हणून चामड्याने माणसाचे शरीर शिवून टाकलेले असते. ज्या हातांनी तुम्ही सोवळे नेसून देवाची पूजा करता तो हात चामड्याचाच असतो ना! तुम्ही चामड्याच्या हातानेच अन्नभक्षण करता. तुम्ही भजन करताना मृदुंग वाजवता, तो चामड्याचाच असतो. चामड्याचीच गाय असते. तिने दिलेले दूध तुम्ही पवित्र मानता व त्याच दुधाने तुम्ही देवाला अभिषेक करता. तुम्ही सर्व निसर्गसौंदर्य ज्या डोळ्यांनी पाहता ते डोळेसुद्धा चामड्याचेच असतात. मनुष्य हा नखशिखांत चामड्यानेच बांधलेला असतो. असे असताना चामड्याच्या बुधल्यात देवाच्या पूजेसाठी पाणी घेतले तर त्यात काय वावगे आहे? देव काही कशात पाणी घेतले आहे हे पाहत नाही तर तो पूजा करणाऱ्याच्या अंत:करणातील भाव पाहत असतो."

हा उपदेश ऐकून त्या मनुष्यास सर्व काही कळाले.

तो मनुष्य रोहिदासास म्हणाला, "खरोखरच तू आमच्यापेक्षा ज्ञानी आहेस. तुझ्या ज्ञानासमोर आमचे ज्ञान फिके आहेत. हे सर्व ठीक आहे पण जोपर्यंत जीवाचे स्वरूप शरीरात आहे, तोपर्यंत शरीरास विटाळ असतोच ना?"

रोहिदास म्हणाले, "अहो, विटाळ वगैरे सर्व काही मानलेल्या गोष्टी आहेत. मानवाचे शरीर हेच तर मातेच्या विटाळापासून बनलेले असते. पित्याचे वीर्य व मातेचा विटाळ बनून मानवाची शरीरसंपदा तयार होते. हे सर्व अमंगल असून तुम्ही जन्ममरणाच्या वेळी विटाळ मानत बसता. इतर वेळेस काय! हे सर्व शुद्ध नसतेच. या मानवी शरीरात सर्वांत शुद्ध व पवित्र कोण असेल तर तो म्हणजे आतील परमात्माच होय."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

यावर ब्राह्मण पुन्हा म्हणाला, "शाळिग्राम हा चांभारांनी पूजला तर त्यास महापाप लागते. चार वर्णांमध्ये सर्वांत श्रेष्ठ आम्हीच आहोत. आमच्यासारखे श्रेष्ठ या पृथ्वीवर कोणीच नाही. आम्ही श्रेष्ठ असल्यामुळे आम्हीच विष्णूची पूजा करण्यास पात्र आहोत. वर्णांमध्ये सर्वश्रेष्ठ तो ब्राह्मण होय. देवांमध्ये श्रेष्ठतम तो म्हणजे श्रीहरी विष्णू होय. या विष्णूची पूजा करण्याचा अधिकार फक्त जानवे घालणाऱ्यांनाच म्हणजे फक्त आम्हालाच असतो."

रोहिदास म्हणाला, "तुम्ही जानवे घालता ते आम्हाला माहीत आहे. जानवे घातल्याने दुष्ट शक्तींपासून संरक्षण होते. जानवे धारण करणाऱ्यास यम वंदन करतो. जानवे घातल्याने यश, लक्ष्मी, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य इ. षड्गुणांचे संवर्धन होते. जानवे घातल्याने भरपूर दीर्घायुष्य लाभते. तुमचे जानवे फक्त शरीरावर असते पण मी जानवे घातलेले आहे ते शरीरावर नाही तर हृदयामध्ये घातलेले आहे." असे म्हणून रोहिदासांनी रापी हातात घेतली व आपले पोट फाडून त्यातील जानवे त्या ब्राह्मणास दाखवले व विचारले की, "आता आहे का मला विष्णूची पूजा करण्याचा अधिकार?"

हा सर्व प्रकार पाहून त्या व्यक्तिने रोहिदासांना सविनय नमस्कार केला. त्यांची क्षमा मागितली. त्यानंतर ते गृहस्थ नियमितपणे ज्ञानामृत घेण्यासाठी रोहिदासांकडे येऊ लागले.

अध्याय २६ वा

॥ पिपाजी राजाची कथा ॥

पिपाजी नावाचा एक राजा होता. तो एका नगरात राज्य करीत असे. त्या नगराचे नाव होते गडेमंडळ. स्वभावाने तो अत्यंत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सात्त्विक होता. कोणीही याचक त्याच्याकडे काही मागायला आल्यास तो त्यांना परत पाठवत नसे. या राजाची देवीवर फार श्रद्धा होती. तो नियमितपणे दुपारी भोजनापूर्वी देवीच्या देवळात जात असे व त्यानंतर तेथे नैवेद्य समर्पण करत असे. त्याचा अंत:करणातील अष्टसात्त्विक भाव पाहून देवी नैवेद्य खात असे.

एके दिवशी त्या नगरात संतमेळा आला. यामध्ये अनेक संत, भक्त, वैष्णव होते. प्रत्येकाचा यथोचित सत्कार करून शिधा वाटप केले. त्यानंतर व्रताप्रमाणे तो राजा देवीस नैवेद्य समर्पण करण्यास गेला. देवी तो नैवेद्य रोजच्याप्रमाणे खाण्यास तयार होईना. देवी म्हणाली, "देवाचे भूषण असलेले संतसज्जन तुझ्या नगरात आलेले आहेत. त्यांनी अन्न भक्षण केल्याशिवाय मला भोजन करता येणार नाही. तू घरी जा, मी नंतर जेवते. तुझे भाग्य थोर, त्यामुळे तुला संतचरणांचे दर्शन लाभले. आज तुझ्या आयुष्यातील सोन्याचा दिवस आहे."

देवीचे हे भाषण ऐकून त्या राजाने विचारले की, "हे माते! तुझ्याहून श्रेष्ठतम असे दुसरे दैवत कोणते आहे?" यावर देवी म्हणाली, "हे वत्स! विश्वनिर्माणकर्ता ब्रह्मदेव, देवांचा राजा इंद्र, उमापती महादेव यांनासुद्धा ज्याच्या गुणांचा अंत लागत नाही असा लक्ष्मीपती श्रीहरी विष्णू तो माझ्यापेक्षा श्रेष्ठ होय. त्याचे वास्तव्य क्षीरसागराच्या ठिकाणी असते. शंख, चक्र, गदाधारी श्रीविष्णूंचे रूप पाहताना डोळे दिपून जातात."

त्या विष्णूंना भेटण्याची इच्छा राजाने प्रगट केली. देवीने ते आपल्या हातात नसल्याचे सांगितले. ती म्हणाली, "तू आलेल्या साधुसंतांची सेवा मनोभावे कर. ते तुला दशरथनंदन श्रीरामाचे दर्शन घडवतील. श्रीराम हासुद्धा श्रीहरी विष्णूंचाच अवतार आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यामुळे तुला आपोआपच विष्णूंचे दर्शनसुद्धा होईल.'' राजाने त्या संतांना तशी विनंती केली. संतांनी सांगितले, ''तुला सद्गुरूंची आवश्यकता आहे, त्यामुळे तू वाराणसी येथे जाऊन रामानंद स्वामींची दीक्षा घे. तेच तुला आत्मज्ञानाचा उपदेश करतील.''

आपल्या पतीपरमेश्वराबरोबर त्याची राणीही त्याच्याबरोबर गेली. त्या राजाला कळाले होते की, हे राज्य, वैभव, नोकर, चाकर, संपत्ती हे सर्व क्षणभंगुर आहे. सत्य आहे ते एक म्हणजे परमात्मा होय.

काशी (वाराणसी) येथे आल्यानंतर ते दोघे राजा-राणी रामानंदस्वामींना शरण गेले. रामानंद स्वामींनी मंत्राची दीक्षा दिली, 'रामकृष्णनारायण' या मंत्राचा अखंडपणे जप करण्यास सांगितले. या नामाचा अखंड जप करण्यासाठी ते पती-पत्नी काही दिवस तेथेच राहिले.

काही दिवसांनी त्या उभयतांना वाटले की आपण आता सर्व तीर्थयात्रा करून यावे. तीर्थयात्रा केल्याने नक्कीच अपार पुण्याची प्राप्ती होते. त्यांनी आपला मनोदय रामानंद स्वामींना सांगितला. रामानंद स्वामींनी तीर्थाटनाची परवानगी दिली.

त्यानंतर सर्वप्रथम ते वसुदेव-देवकी पुत्र श्रीकृष्णाचे अत्यंत पवित्र स्थान, चार धामांपैकी एक धाम जे द्वारका तेथे ते गेले. त्यांनी डोळे भरून द्वारकाधीशाचे दर्शन घेतले. आणि प्रेमळ अंत:करणाने कन्हैय्यालालजवळ प्रार्थना केली. त्यामुळे श्रीकृष्णाने त्या दोघांना आपले दिव्य दर्शन दाखवले.

पिपाजी राजाचे द्वारकेस चार महिने वास्तव्य होते. तेथे नियमितपणे राजा हरीकीर्तन करीत असे. हरीकीर्तनातून तो लोकांना अध्यात्माचा उपदेश करीत असे. पिपाजीने द्वारकेहून आपल्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अर्धांगिनीसह पुढील तीर्थयात्रेसाठी प्रयाण केले.

एका अरण्यातून त्यांचा प्रवास सुरू होता. अरण्यात असताना एक मोठा वाघ अचानक त्यांच्या समोर आला व मोठ्याने डरकाळी फोडू लागला. या वाघास पाहून राणीची भीतीने गाळण उडाली. तिला भीतीमुळे घाम फुटला. तेव्हा पिपाजी राजानेच तिला धीर दिला व सांगितले की, "अग! मी आहे ना इथे! तू मुळीच भिऊ नकोस."

राणीस पिपाजी म्हणाला की, या सर्व विश्वात श्रीराम ओतप्रोत भरून राहिला आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वत्र श्रीरामच आहे. एवढेच काय या वाघातसुद्धा श्रीरामच आहे.

असे म्हणत असताना तो वाघ त्यांच्याजवळ येऊन थांबला. राजाने त्या वाघास रामाचे भजन करण्यास सांगितले. वाघाने ताबडतोब आपले गुरगुरणे थांबवले व वृत्ती शांत ठेवली. राजास त्या वाघाने दंडवत घातला.

पिपाजी राजामुळे त्या वाघास दिव्य ज्ञान झाले. रामाचे गुणगान, भजन करीत असताना काळाने वाघावर झडप घातली.

या वाघास पुढचा जन्म मनुष्याचा मिळाला. पुढे नरसी मेहता नावाचे जे साधू झाले ते याच वाघाचे रूप होय. ती कथा आपण पुढे पाहूया.

अध्याय २७ वा

॥ संत नरसी मेहता ॥

आपण मागील अध्यायात पाहिले की रामाचे नामस्मरण करताना वाघाचा अंत झाला होता. त्याच वाघाला पुढे मनुष्ययोनीत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जन्म मिळाला. त्याने एका ब्राह्मणाच्या कुळी जन्म घेतला. तेच पुढे नरसी मेहता झाले.

नरसी मेहतांचा जन्म जुनागड येथे झाला. त्यांचा व्रतबंध-संस्कार झाल्यानंतर आईवडील परलोकी गेले. त्यांच्या चुलत बंधूंनी त्यांचा सांभाळ केला. नरसींना लहान मुलांप्रमाणेच खेळण्याचे भयंकर वेड होते.

एकदा त्यांची वहिनी त्यांना रागावली. वहिनी म्हणाली, की नरसी, तू फक्त खेळाकडे लक्ष देतोस. आता अभ्यासाकडे थोडे लक्ष दे. या बोलण्यामुळे नरसी रागावले व अरण्यात गेले. तेथेच एका शिवलिंगावर झोपले. तेथे त्यांनी खूप दिवस अन्नपाणी घेतल्याशिवाय काढले. शंकरांना वाटले की आपले दिव्य दर्शन हवे असेल म्हणून शिवलिंगाला इतके दिवस धरून बसला आहे. महादेवाने नरसीस दिव्य दर्शन दिले व वर मागण्यास सांगितले.

नरसी मेहता म्हणाले की, "हे त्रिनेत्रधारी शिवशंभो! मी अजून बाल्यावस्थेत आहे. मला कोणता वर मागावा हे काही कळत नाही. त्यामुळे तुम्हाला जी वस्तू विशेष प्रिय असेल ती मला तुमच्यातर्फे द्या." शंकर म्हणाले, "चल माझ्याबरोबर, मला श्रीकृष्णाच्या त्या अद्भुत लीला फार प्रिय आहेत." शंकरांनी नरसीस गोपीचा वेष प्रदान केला.

गोपीरूपी नरसी मेहतांना घेऊन भोलेनाथ रासमंडळात आले. त्या दोघांनी श्रीकृष्णास नमन केले.

उपवनामध्ये भगवान श्रीकृष्ण आपल्या गोपींबरोबर खेळत होता. शंकरांनी त्या नरसी मेहतास गोपींमध्ये हळूच जाऊन उभा राहण्याची आज्ञा दिली. महादेवाची आज्ञा शिरसावंद्य मानून गोपीरूपी नरसी मेहता गोपींमध्ये गेले. श्रीकृष्णाची रासलीला रंगात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आली होती. तेवढ्यात श्रीकृष्णाची नजर नवीन गोपीवर गेली. द्वारकाधीशाने पार्वतीपतीस या नवीन गोपीबद्दल विचारले.

भोलेनाथांनी आपल्या नेत्रकटाक्षांनी त्या गोपीरूपी नरसी मेहतास श्रीकृष्णाचे चरणकमल पकडण्यास सांगितले. नरसी मेहतांनी श्रीकृष्णास नमन केले. तेव्हा नीलकंठाने देवकीपुत्रास सर्व काही नरसी मेहतांबद्दल सांगितले.

द्वारकाधीशाने नरसी मेहतास सांगितले की, "तू खरोखर धन्य आहेस. तू प्रत्यक्ष डोळ्यांनी माझ्या रासलीला पाहिल्यास. आता तू पाहिलेले सर्व ग्रंथरूपाने लिहून ठेव. माझ्या रासलीला, ग्रंथरूपात लिहून ठेवल्यामुळे भविष्यकाळात सर्व लोकांना त्याचे श्रवण, वाचन करता येईल."

श्रीकृष्णाच्या आज्ञेनुसार नरसी मेहतांनी गुजराथी भाषेत 'रासमंडळ' हा अलौकिक ग्रंथ लिहिला. त्यात श्रीकृष्णाच्या नानाविध लीलांचे वर्णन आहे. तो ग्रंथ सर्व भारत देशात लोकप्रिय आहे.

नरसी मेहता शिवालयातच बसून कृष्णलीला गात असत. त्यांच्या मोठ्या भावाला नरसी मेहतांबद्दल समजल्यानंतर त्यांनी नरसी मेहतास पुन्हा घरी आणले. त्यांचे लग्न लावून दिले. त्यांना एक कन्यारत्न व पुत्ररत्न प्राप्त झाले. नरसी मेहतांनी आपला प्रपंचाचा सर्व भार श्रीकृष्णावर टाकला.

नरसी मेहतांच्या दिव्य प्रेमामुळे श्रीकृष्णानेच मोठेपणी नरसी मेहताच्या मुलाचे लग्न लावून दिले. ती कथा आपण पुढील अध्यायात पाहू या.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय २८ वा

॥ संत नरसी मेहता-मुलाचे लग्न ॥

नरसी मेहतांनी प्रपंचाचा सर्व भार श्रीकृष्णावरच टाकला होता. नरसी मेहता शांत ठिकाण पाहून श्रीकृष्णाचे भजन म्हणत असत. कोणी काही दानधर्म केल्यासच नरसी मेहतांच्या कुटुंबाचे पोट भरत असे.

जुनागडजवळ एक गाव होते. त्या गावाचे नाव होते शामपूर. तेथे एक धनाढ्य सावकार होता. त्या सावकाराचे नाव होते त्रिपुरांतक. त्याला सुंदर कन्या होती. सोळा हजारांत देखणी असे तिचे लावण्य होते. ती वयात आल्यानंतर सावकाराने वरसंशोधन करण्यास सुरुवात केली. त्यांनी अनेक गावांमध्ये अनेक पुरोहितांना पाठवले. कृष्णभट्ट नावाच्या एका पुरोहिताने त्या मुलीची जन्मपत्रिका नरसी मेहतांच्या मुलासाठी दिली. पत्रिकेचे गुण जमले. पुरोहिताने दोन्ही बाजूच्या लोकांना बोलावले व साखरपुडा संपन्न झाला.

त्यानंतर सावकाराच्या लक्षात आले की, नरसी मेहता आपल्यापेक्षा हजार पटीने निर्धन आहे. मी एवढा धनाढ्य मनुष्य आणि माझी मुलगी त्या निर्धनाच्या घरात सून म्हणून जाणार? छे!छे!! सावकार व पुरोहित यांच्यात वाद झाला. पुरोहिताने सावकारास सांगितले की, आता साखरपुडा झाला आहे. सोयरिक झाली आहे. आता संबंध तुम्हीच तोडले तर तुम्हालाच गावातील लोक नावे ठेवतील. नरसी मेहताचे कुटुंब संस्कारक्षम आहे.

सावकाराने त्या पुरोहितास अट घातली व म्हणाला, "नरसी मेहतांस सांगा की लग्नाचे वऱ्हाड घेऊन येताना ५०० हत्ती, पाचशे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घोडे, फुलांनी सजवलेले पाचशे सुंदर रथ, पाचशे पालख्या आणाव्यात. जुनागडहून शामपूरला येताना अनेक वाद्ये वाजवित यावे. वधूसाठी भरपूर सोने आणावे. आभूषणे व वस्त्रेसुद्धा भव्य प्रमाणात आणावीत. आमच्या गावातील सर्वच लोकांना जेवण दिले पाहिजे. अशा पद्धतीने काही झाले नाही तर लग्न मोडेल.''

कृष्णभट्टाने सर्व निरोप नरसी मेहतांना सांगितला.

नरसी मेहतांच्या मनात आले, ''हा सावकार एवढा धनिक असूनसुद्धा मला कमी लेखण्यासाठी मुद्दाम एवढा लवाजमा मागितला असेल. असू दे. मला काहीही चिंता नाही. तो मुरलीधर सर्व काही चोख व्यवस्था ठेवेल व माझ्या मुलाचे लग्न सुखरूप पार पडेल.''

नरसी मेहतांची प्रार्थना मुरलीधर श्रीकृष्णाने ऐकली. श्रीकृष्ण आपल्या प्रिय रुक्मिणीस म्हणाला की, ''माझा लाडका भक्त मला शरण आला आहे. आज त्याच्या मुलाचे लग्न आहे. तरीसुद्धा लग्नाची सर्व कामे बाजूला सारून तो माझे भजन करीत बसला आहे. आता त्या सावकाराच्या म्हणण्याप्रमाणे आपल्याच सर्व काही करावयास पाहिजे. तू पण माझ्याबरोबर सहकार्याला चल.''

रुक्मिणी आनंदाने मदतीस तयार झाली. त्या श्रीकृष्णाने आपल्या सर्व भक्तांची, अष्टनायकांची, गोपांची मंडळी गोळा केली. त्यांना निरनिराळी मानवी रूपे देऊन नरसी मेहतांच्या वऱ्हाडात सामील होण्याची आज्ञा दिली.

असंख्य मंडळी वऱ्हाडात सामील झाली व ते शामपूरच्या दिशेने वाटचाल करू लागले. अनेक स्त्रिया नटूनथटून चालल्या होत्या. लहान मुले-मुली व पुरुषमंडळी किती होती याची गणनाच नव्हती. गोवर्धनधारी श्रीकृष्णाने स्वत: मुनीमजीचे रूप धारण केले

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होते व घोड्यावर स्वारी बसली होती.

शामपूर जवळ आल्यानंतर श्रीकृष्णाने एकाला पुढे पाठवून त्रिपुरांतकाला वऱ्हाड आले आहे असे सांगण्यास सांगितले.

त्रिपुरांतक वऱ्हाडी मंडळींचे स्वागत करण्यासाठी गेला. एवढ्या मोठ्या प्रमाणात वऱ्हाड पाहून यांची बडदास्त कशी ठेवायची असा यक्षप्रश्न त्या सावकारास पडला. नरसी मेहतांचा एवढा लवाजमा पाहून सावकारास आपले वैभव त्या मानाने खूपच छोटे आहे असे वाटले.

त्रिपुरांतक घाईगडबडीने स्वागत करण्यासाठी वाजंत्रीसह निघाला. पण नरसी मेहतांच्या वऱ्हाडात एवढी वाजंत्री होती की त्रिपुरांतकाची वाजंत्री त्यापुढे ऐकूच येईना. कृष्णभट्ट पुरोहिताने मनोमन ओळखले की हे सर्व त्या जगदीश्वर श्रीकृष्ण भगवानाचेच काम आहे.

विश्वकर्मा स्वत: जातीने वऱ्हाडाचे वैभव वाढवत होता. शामपूर गावात जनसमुदायच भरला. विश्वकर्माने गावातील मोकळ्या मैदानात मोठमोठे मांडव घातले. फुलांच्या माळा बांधून सुशोभिकरण केले. अनेक अप्सरा आपले नृत्यप्रदर्शन करीत होत्या. स्वर्गातून सर्व सोहळा पाहण्यासाठी यक्ष, गंधर्व, देवदेवतांची गर्दी जमली. श्रीकृष्ण स्वत: नरसी मेहतांच्या मुलाबरोबर मंडपात येऊन बसला. त्या श्रीकृष्णाचे नयनरम्य रूप पाहून तेथील सर्व लोकांना धन्य वाटले. रुक्मिणी नवरदेवाच्या मातेसह बसली होती.

आलेल्या प्रत्येक वऱ्हाडी मंडळींबरोबर त्रिपुरांतक ओळख करून घेऊ लागला. तो श्रीकृष्णाकडे आला. तेव्हा श्रीकृष्ण म्हणाला, "शेठजी! तुम्हाला नरसी मेहतांचे स्थळ लाभले. तुम्ही भाग्यवान आहात. तुमची मुलगी नक्कीच चांगल्या कुळात गेली

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आहे. नरसी मेहतांचे संपूर्ण कुटुंबच संस्कारक्षम आहे. त्याच्या-सारखी सोयरीक मिळण्यास भाग्याची जोड लागते."

त्रिपुरांतक म्हणाला, "तुम्हाला नरसी मेहताची सर्व माहिती कशी काय आहे? तुम्ही कोण? कोठून आलात? परिचय करून दिल्यास बरे होईल."

यावर श्रीकृष्ण हसून म्हणाला की, "मी नरसी मेहतांचा मुनीमजी आहे. त्यांचे सर्व व्यवहार मीच बघतो. त्यांच्या सर्व कुटुंबाचा हिशेब मीच ठेवत असतो. माझे नाव सांवळसा आहे. आम्ही द्वारकेमध्ये राहतो. नरसी मेहतांचे माझ्यावर खूप प्रेम आहे. सदैव माझी ते आठवण काढीत असतात."

श्रीकृष्णाने एवढे स्वत:बद्दल वर्णन करूनसुद्धा त्या सावकारास हा मुनीमजी म्हणजे साक्षात् श्रीकृष्ण देव आहे हे कळले नाही.

सावकाराकडून नवरदेवास आहेर सुरू झाला. सावकारांची वस्त्रे श्रीकृष्णाच्या आहेरासमोर कमी दिसू लागली. त्यामुळे सावकाराकडील पाहुणे नवरदेवास वस्त्रे देण्यास संकोच करू लागली.

यावर श्रीकृष्ण त्या सावकारास म्हणाला की, "शेठजी! स्वयंपाक व्यवस्थित केला तरी त्यात चवीपुरतेच मीठ असावे तसेच आपल्याबरोबरीच्या पाहुण्यांबरोबर सोयरिक करावी. नरसी मेहता किती श्रीमंत आहेत ते तुम्ही आता पाहिलेच आहे. नरसी मेहताच्या अफाट धनसंपत्तीसमोर तुमचे धनवैभव म्हणजे हत्तीसमोर मुंगीसमान आहे." यामुळे सावकारास वाईट वाटले.

श्रीकृष्णाच्या मंगल आशीर्वादामुळे व सहकार्यामुळे विवाह समारंभ उत्तम रीतीने पार पडला. सावकारावर पण श्रीकृष्णाने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपली कृपादृष्टी ठेवली त्यामुळे ब्राह्मणांना दक्षिणा देताना सावकारास मुबलक धन उपलब्ध झाले. सावकारास या चमत्काराबद्दल काहीही कळेना.

गावातील सर्व लोकांना व वऱ्हाडी मंडळींना मिष्टान्नाचे भोजन देण्यात आले. सर्व लोकांनी नवदांपत्यास शुभाशीर्वाद दिले.

श्रीकृष्णाच्या पाया पडून नवदांपत्याने अलौकिक आशीर्वाद घेतले. हा लग्नाचा सोहळा पाच दिवस अखंडपणे सुरू होता.

लग्नानंतर सर्व वऱ्हाडी मंडळी आपआपल्या गावी गेली. जुनागडमधील सर्व माणसे घरी परतली. श्रीकृष्ण निरोप घेताना नरसी मेहतांना एकांतात म्हणाला की, "हे वत्स! तू संकटात मला जेव्हा बोलावशील तेव्हा मी तत्पर उपस्थित राहीन."

श्रीकृष्ण अंतर्धान पावला. त्याने आणलेली सर्व मंडळीपण अदृश्य झाली.

अध्याय २९ वा

॥ संत नरसी मेहतांची हुंडी ॥

नरसी मेहता निरंतर भगवान श्रीकृष्णाचे नामस्मरण करीत होते. त्यांना कशाचीही चिंता नव्हती. सर्व काही देव करेल, मी त्याची फक्त भक्तीच करीन, अशी त्यांची वृत्ती होती. गावातील सर्व लोक नरसी मेहतांना संतच समजत होते व त्यांच्याकडून ज्ञानामृत प्राशन करीत होते.

एके दिवशी काही लोक द्वारकेला जाण्यापूर्वी जुनागड येथे मुक्कामासाठी राहिले. केशवभट नावाचा एक ब्राह्मण होता. त्याला हुंडी हवी होती. लोकांकडून त्याने हुंडीसाठी नरसी मेहतांचा पत्ता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मिळवला. नरसी मेहतांच्या घरी केशवभट्ट गेला. त्याने सातशे रुपये देऊन द्वारकेची हुंडी नरसींकडून मागितली. 'सावळा सावता' या मुनीमजीच्या नावाने ती हुंडी नरसी मेहताने लिहून दिली. केशवभट्टाने दिलेले सातशे रुपये नरसी मेहतांनी धर्म-कार्यासाठी वापरले.

केशवभट्टास थोडा संशय आला. तेव्हा त्याने नरसी मेहतास सर्व काही सविस्तर विचारले. तेव्हा नरसी मेहता म्हणाला की, "आमची मुख्य पेढी क्षीरसागरी आहे. ही झाली आमची मुख्य पेढी. तसेच मथुरा, गोकुळ, वृंदावन येथेही आमच्या मोठमोठ्या पेढ्या आहेत. पंढरपुरात आमचे फार मोठे दुकान आहे. या दुकानाचा चालक द्वारकेस असतो. या दुकानाचे गिऱ्हाईक म्हणजे वाल्मिकी, व्यास, कबीर, नामदेव, ज्ञानेश्वर होत."

त्या हुंडीमध्ये नरसी मेहताने असे लिहिले होते की, "हे जीवीच्या जीवना, भक्तवत्सला, तुझ्यावर पूर्ण विश्वास ठेवून मी हुंडी याला लिहून दिली आहे. तेव्हा तू त्याला सातशे रुपये दे. आता तूच माझे संरक्षण कर. माझी लाज तुझ्याच हातात आहे."

केशवभट्टाचे द्वारकेस आगमन झाले. त्याने द्वारकाधीशाचे दर्शन घेतले व पुजाऱ्यास विचारले की सावळा सावताचे घर कोठे आहे? त्या पुजाऱ्याने सांगितले की असा कोणताही सावकार या द्वारकेमध्ये नाही.

केशवभट्टाला याबद्दल खूप वाईट वाटले. केशवभट्ट तेथेच स्वस्थ बसून राहिला.

इकडे श्रीकृष्णाने सावकाराचे रूप घेतले व त्या केशवभट्टाच्या चिंताक्रांतीचे कारण विचारले. केशवभटाने सर्व काही सांगितले. तेव्हा तो सावकार म्हणाला की, "नरसी मेहताने ज्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सावळा सावताबद्दल सांगितले तो मीच. नरसी मेहताने मला कोणते काम सांगितले आहे ते सांगा.'' केशवभट्टाने नरसी मेहतांचे पत्र त्यांना दाखवले.

ते पत्र श्रीकृष्णाने वाचले व ताबडतोब स्वत: जवळील सातशे रुपये केशवभटास दिले. नरसी मेहताबद्दल श्रीकृष्णाने केशवभटास खूप काही सांगितले.

ब्राह्मण ते रुपये मोजू लागला. तेव्हा तो पैसे मोजताना दमला. त्याचे हात दुखू लागले. तेव्हा त्याने ओळखले की तो सावकार म्हणजे साक्षात् श्रीकृष्णच होता. त्या ब्राह्मणाने आवश्यक तेवढेच द्रव्य जवळ ठेवले व उरलेल्या सर्व द्रव्याचे गावातील लोकांना अन्नदान केले.

त्यानंतर केशवभट जुनागडास आला. नरसी मेहतांना त्याने सावळा सावता सावकाराबद्दल सर्व काही सांगितले.

श्रीकृष्णाबद्दल सर्व वृत्तांत ऐकून नरसी मेहतांना बरे वाटले. त्यांनी श्रीकृष्णाचे मनोमन आभार मानले.

अध्याय ३० वा

॥ संत नरसी मेहतांची श्रीकृष्णभक्ती ॥

नरसी मेहतांच्या मुलाचे लग्न थाटामाटात पार पडले होते. त्यानंतर नरसी मेहतांच्या कन्येचे पण लग्न झाले. तिला चांगले सासर मिळाले होते. काही महिन्यांनंतर तिला डोहाळे लागले. सासरच्या लोकांनी डोहाळेजेवणाचा कार्यक्रम करण्याचे ठरवले. त्यासाठी सर्वांना आमंत्रणे देण्यात आली. नरसी मेहतांना व त्यांच्या कुटुंबातील सर्वांना आमंत्रण दिले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुलीच्या सासरकडील लोकांनी नरसी मेहतांना निरोप पाठवला की, "तुम्ही कन्येसाठी काहीतरी आहेर आणा. नुसते रिकाम्या हाती येऊ नका." सासरकडील हा निरोप आल्यानंतर नरसी मेहतांच्या पत्नीस आहेर काय द्यावा, असा प्रश्न पडला. तिने आपल्या पतिपरमेश्वरास याबद्दल विचारले. तेव्हा नरसी मेहता म्हणाले, "अग! आपण गरीब माणसं. आपल्याकडे काही सोने, नाणे, वस्त्रे, आभूषणे देण्यासाठी नाहीत. पण श्रीकृष्णाचे हरिनाम आहेर म्हणून देता येईल. श्रीकृष्णाचे नाम त्यांना आहेर म्हणून स्वीकारण्यास नक्कीच आवडेल."

ठरलेल्या शुभमुहूर्तावर नरसी मेहता व कुटुंबीय मुलीच्या सासरी गेले. त्या सासरच्या लोकांचा नरसी मेहतांनी काय आणले आहे, यावरच डोळा होता. त्यांनी पाहिले की नरसी मेहता रिकाम्या हातानेच आलेले आहेत. तेव्हा सर्व पाहुणेमंडळींच्यादेखत त्यांचा जावई, व्याही त्यांना हसू लागली. त्यांना रागाने वाट्टेल ते बोलून त्यांचा अपमान केला. त्यांची ते चेष्टा करू लागले. नरसी मेहतांना याबद्दल थोडे वाईट वाटले. त्यांच्या कन्येने नरसींना एका बाजूस नेले व ती म्हणाली की, "बाबा! तुम्ही रिकाम्या हाताने का आलात? रिकाम्या हाताने यायचे होते तर आधीच त्यांना कल्पना द्यायची होती. तुमचा अपमान तर होतोच, शिवाय मलाही सर्वजण नावे ठेवतात."

नरसी मेहतांच्या डोळ्यात अश्रू आले. ते तिला म्हणाले, "तू मुळीच काळजी करू नकोस. द्वारकाधीश श्रीकृष्ण सर्व काही व्यवस्थित करेल. मी प्रपंचाचा सर्व भार त्याच्यावरच टाकला आहे." त्यानंतर नरसी मेहता सासरच्या लोकांना म्हणाले की, "मी फक्त मुलीलाच आहेर देणार नाही, तर तुम्हालासुद्धा आहेर देणार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

आहे. त्यामुळे प्रत्येकाने मला एका कागदावर लिहून द्या की कोणाला काय काय हवे आहे?"

नरसी मेहतांच्या म्हणण्यानुसार सासरच्या एका माणसाने यादी तयार केली व नरसी मेहतांना दिली व तो त्यांना उपहासाने म्हणाला की, "नरसीजी! आम्हाला काय हवे होते ते आम्ही लिहिले आहे. तुम्हाला पण काही हवे असल्यास त्या यादीत लिहा." त्या माणसास वाटले की हा गरीब नरसी मेहता काय देणार? म्हणून त्याने आपल्या नावापुढे दगड हवा असे लिहिले व पाषाण हवा असे पण लिहिले.

नरसी मेहता आपली मागणी मान्य करतील यावर कोणाचाही विश्वास नव्हता. नरसी मेहतांनी ती लांबलचक यादी घेऊन श्रीकृष्णाचे भजन सुरू केले. त्या नरसींची तीव्र हाक ऐकून श्रीकृष्णाने एका ब्राह्मणाचे रूप घेतले. त्याच्याबरोबर अनेक वस्तू होत्या. त्याच्याबरोबर असलेल्या तीन-चार गाठोड्यांमध्ये यादीप्रमाणे सर्व वस्तू होत्या.

तो ब्राह्मण म्हणाला की, "राम राम मंडळी, सर्व काही ठीक आहे ना! मला नरसी मेहतांनी आहेर घेऊन येण्यास सांगितले. मी द्वारकेस असतो."

असे सर्व वर्णन करूनसुद्धा कोणालाही कळले नाही की हा ब्राह्मण म्हणजे साक्षात् श्रीकृष्णच आहे. श्रीकृष्णरूपी त्या ब्राह्मणाने सर्वांना यादीप्रमाणे वस्तू देण्यास सुरुवात केली. सर्वजण आहेर मिळाला म्हणून आनंदात होते. ज्या माणसाने दगड मागितला होता, त्या माणसाच्या डोक्यावर श्रीकृष्णांनी दगड ठेवला व म्हणाले की, "ए दगड्या! तुला दगड हवा होता ना? घे."

नरसी मेहतांच्या कन्येने अलंकाराची मागणी केली होती.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तिला पण अलंकार देऊन टाकले. तिला ते सुंदर अलंकार पाहून खूप आनंद झाला.

सर्वांना सर्व काही देऊन झाल्यानंतर श्रीकृष्ण नरसी मेहतांबरोबर जुनागडला पुन्हा आला. आपण सर्वांना आहेर दिले पण बिचाऱ्या नरसीला काहीही दिले नाही म्हणून श्रीकृष्णास वाईट वाटले. श्रीकृष्णाने ताबडतोब एक माळ नरसींच्या गळ्यात स्वत:च्या करकमलाने घातली व तो अंतर्धान पावला. ती माळ दिव्य होती. त्या दिव्य माळेकडे पाहून लोकांनाही आपल्याकडे अशी एक माळ असती तर बरे झाले असते असे वाटत होते.

नरसी मेहता कीर्तन करायला लागले की श्रीहरीच्या मूर्तीवरचा हार निघून नरसींच्या गळ्यात येत असे. लोकांना नरसी मेहतांच्या भक्तीबद्दल धन्य वाटत असे.

तेथे एक मंडूक राजा राज्य करीत होता. त्याला हार येऊन गळ्यात पडतो ही बातमी कळाली. त्याने मुद्दाम श्रीहरीच्या गळ्यातील हार सेवकांकडून सुईदोऱ्याने घट्ट बांधून ठेवला व नरसी मेहतांना म्हणाला की, "स्वामीजी! तुम्ही लोकांना अद्‌भुत चमत्कार दाखवून लोकांना फसवत आहात. हार गळ्यात कसा येतो बरे? यामागे तुझाच काहीतरी हात आहे. आता हार तुझ्या गळ्यात येऊन पडला तर ठीक, नाहीतर तुला कठोर शासन करण्यात येईल."

मंडूक राजाचे हे बोलणे ऐकून नरसी मेहतांनी श्रीकृष्णास, माझी लाज तूच राखणार आहेस, असे सांगितले व भजन करण्यास सुरुवात केली. कित्येक तास झाले तरी तो हार नरसी मेहतांच्या गळ्यात येईना.

नरसी मेहतांना क्रोध आला व ते देवावर चिडले. आपला लाडका भक्त चिडल्यामुळे देवाने ताबडतोब आपल्या गळ्यातील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हार नरसी मेहतांच्या गळ्यात टाकला. राजाला आश्चर्य वाटले. त्याने पाहिले तर सुईदोऱ्याची बंधने जशीच्या तशी होती. तेव्हा त्या मंडूक राजाने नरसी मेहतांना साष्टांग नमस्कार घातला व म्हणाला, "साधुमहाराज! मला क्षमा करा. मी चुकलो. तुमची भक्ती खरोखरच धन्य आहे."

अध्याय ३१ वा

।। रामदासाची भक्ती व देवाचे आगमन ।।

श्रोत्यांनो! आतापर्यंत आपण अनेक भक्तांच्या कथा ऐकल्या. आता आपण भक्त रामदासाची कथा पाहू या. आपण ती शांत चित्ताने श्रवण करावी. *(रामदास स्वामींची कथा सत्तेचाळिसाव्या अध्यायात आहे.)*

भक्त रामदास यांचे वास्तव्य डाकुर या गावी होते. भक्त रामदास अत्यंत भाविक व ज्ञानी होते. लोकांकडून भिक्षा मागून ते उदरनिर्वाह करीत असत. त्यांच्या मुखामध्ये सदैव देवाचे नामस्मरण सुरू असे. ते दर एकादशीस द्वारकेला जायचे. प्रत्येक एकादशीच्या वेळी सागवानी लाकडात छेद करून त्यात तुळशीच्या मंजिऱ्या रोवून ते लाकूड हातावर ठेवून द्वारकेपर्यंत प्रवास करीत असत. द्वारका पाहिल्यानंतर त्यांचा आनंद गगनात मावत नसे. कधी एकदा परमेश्वरास आलिंगन देईन असे त्यांना वाटत असे. देवास भेटल्यानंतर तुळशीची मंजिरी मोठ्या प्रेमाने देवास अर्पण करीत असत.

अशा पद्धतीने त्या भक्त रामदासांनी वारीचा रौप्यमहोत्सव केला. त्यानंतर भक्त रामदासांचे शरीर थकले. त्यांना एवढ्या लांबून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येता येईना. एकदा एकादशीस रामदास देवाला म्हणाले, "हे देवा! गेली २५ वर्षे मी अखंडपणे तुझी वारी करत आहे. आता माझे शरीर वयोमानाप्रमाणे थकले आहे. त्यामुळे मला पुन्हा काही येथे येता येणार नाही. मी येथे नाही आलो तरी माझे तुझ्यावरचे प्रेम काही कमी होणार नाही. तू सदैव माझ्या मागेपुढे उभा राहून माझे संरक्षण कर. तुला कोटी प्रणाम करतो श्रीकृष्णा!"

रामदासांचे हे बोलणे ऐकून द्वारकाधीश भक्तवत्सल श्रीकृष्ण प्रकट झाले. त्यांनी भक्त रामदासांना आपल्या छातीशी धरले व म्हणाले की, "हे रामदासा! तू माझी प्रेमाने २५ वर्षे सेवा केली आहेस. त्यामुळे तू माझा लाडका भक्त झाला आहेस. तू २५ वर्षे खूप कष्ट घेतलेस. आता मीच तुझ्याबरोबर डाकोरला येतो. माझा रथ घे. त्या रथात बसून मी डाकोरला तुझ्याबरोबर येतो. आपण आजच रात्री इथून प्रयाण करू."

बेत आखल्याप्रमाणे द्वारकाधीश व रामदास रात्रीतून डाकोरला आले. रामदास देवाला म्हणाले, "हे जगदीश्वरा! मी तुला कोठे लपवू. तुझी मूर्ती तेथे न दिसल्याने नक्कीच ते माझ्याकडे येतील व मला शिक्षा करतील." देवाच्या सांगण्यानुसार रामदासाने ती मूर्ती तळ्यात टाकून दिली.

द्वारकेला सर्व पुजारी लोक मूर्ती दिसेना म्हणून आश्चर्य करू लागले. कोणीतरी मूर्ती नक्कीच चोरलेली आहे असे त्यांना वाटले. काही पुजाऱ्यांना रामदासांबद्दल संशय आला. ते डाकोरला आले. त्यांनी रामदासांना याचा जाब विचारला. रामदास म्हणाले की, "अहो! मूर्ती चोरीला गेली यात माझा काय दोष? मी मूर्ती काही चोरून वगैरे आणली नाही. वाटलं तर माझ्या घराची तुम्ही झडती घ्या."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सर्व पुजाऱ्यांनी रामदासांच्या घराची झडती घेतली; पण कोठेच मूर्तीचा पत्ता लागला नाही. सर्व गावभर, हौद इ. ठिकाणी मूर्ती पाहिल्या पण सर्व श्रम व्यर्थ गेले. शेवटी ज्या तळ्यात मूर्ती लपवली होती तेथे ते पुजारी आले. त्यांनी तळ्यात उडी मारून शोध घेतला. तेव्हा त्यांना द्वारकाधीशाची मूर्ती सापडली.

त्या सर्व पुजाऱ्यांनी मूर्ती घेतली. रथामध्ये व्यवस्थित ठेवून द्वारकेकडे प्रयाण करू लागले. रामदासांना हे सर्व पाहून रडू आले. त्यांना देवाने दृष्टांत दिला की, "तू त्या पुजाऱ्यांना सांग की मी मूर्तीची सुवर्णतुला करतो व त्या मूर्तीच्या वजनाएवढे सोने तुम्हाला देतो. यामुळे त्यांना द्रव्यलोभ सुटेल. तू तुझ्या बायकोची सोन्याच्या वाल असलेली नथ एका पारड्यात टाक. पारडे बरोबर समांतर होईल. जा लवकर, वेळ नको घालवू."

त्या रामदासांनी पुजाऱ्यांना वरीलप्रमाणे सांगितले. मूर्तीच्या वजनाएवढे आपल्याला सोने मिळणार म्हणून ते आनंदाने रामदासांना मूर्ती देण्यास तयार झाले.

रामदासांनी या सुवर्णतुलेसाठी सर्व ग्रामस्थांना साक्षीदार म्हणून बोलावले. ग्रामस्थांनी रामदासांना वेड्यात काढले. रामदासांनी तिकडे लक्ष दिले नाही. रामदासांनी एक मोठा तराजू आणला. एका पारड्यात श्रीकृष्णजीची मूर्ती ठेवली. रामदास घरी गेले व आपल्या प्रिय पत्नीस सर्व काही सांगून तिची नथ मुठीमध्ये घेऊन आले. त्यांनी ती सोन्याची नथ दुसऱ्या पारड्यात टाकले. काय आश्चर्य? ताबडतोब दोन्ही पारडी समांतर झाली. सर्व लोकांना आश्चर्य वाटले की एवढ्या नथीमुळे दोन्ही पारडी समांतर कशी झाली? मूर्तीचे वजन फारच जास्त होते.

देवसुद्धा हा सर्व सोहळा स्वर्गातून पाहत होते. त्या सर्व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देवदेवतांनी रामदासस्वामींवर पुष्पवृष्टी केली.

द्वारकेचे सर्व पुजारी ती नथ घेऊन द्वारकेस आले. श्रीकृष्णाची मूर्ती रामदासांना देऊन टाकली. द्वारकेस पुन्हा दुसऱ्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाली.

रामदासांच्या थोर भक्तीच्या प्रेमात पडून श्रीकृष्णाने डाकोरलाच वास्तव्य केले. आजसुद्धा हजारो भाविक द्वारकाधीशाचे दर्शन घेण्यापूर्वी डाकोरनाथाचे दर्शन घेतात.

अध्याय ३२ वा

॥ निराधारी ब्रह्मचारी ॥

श्रोत्यांनो! सर्वप्रथम तुम्हाला मनोभावे वंदन. श्रोतेजनहो! मथुरेची पुरातन मूर्ती हरिद्वारास कशी गेली याची रसाळ कथा आता मी तुम्हाला सांगणार आहे. ती तुम्ही एकाग्रतेने श्रवण करा.

महाशिवरात्रीचा दिवस होता. महादेवाचे अत्यंत पवित्र स्थान रामेश्वर येथे मोठी यात्रा भरली होती. उत्तर भारतातून दोन विद्वान ब्राह्मणांचे रामेश्वरास आगमन झाले. दोघेही परमेश्वराचे भक्त होते. त्या दोघांची ओळख रामेश्वरला झाली. त्यातला एक ब्राह्मण म्हणाला, "मी हरिद्वारला असतो. माझे कुटुंब हरिद्वारमध्येच असते." दुसरा ब्राह्मण म्हणाला की, "मी मूळचा गौड देशातला. मी ब्रह्मचारी आहे. परमेश्वरच माझे आईवडील आहेत. माझे नाव निराधार ब्रह्मचारी आहे." पहिल्या ब्राह्मणाने आपले नाव कल्याण आहे असे सांगितले.

निराधार ब्रह्मचारी व कल्याण यांची चांगलीच मैत्री जमली. वेद, उपनिषदे, पुराणे यांवर ते तासन् तास चर्चा करीत असत.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रामेश्वराची यात्रा व्यवस्थितपणे पार पडल्यानंतर ते उत्तरेस ज्या ठिकाणी भगवान श्रीकृष्ण जन्मास आले, त्या मथुरेस ते दोघेही आले. तेथे पण त्यांनी एकमेकांच्या संगतीत खूप दिवस घालवले.

मथुरेस वास्तव्य असताना अचानक कल्याणला हिवताप आला. हिवतापामुळे कल्याणचे संपूर्ण शरीर कृश झाले होते. निराधार ब्रह्मचाऱ्यांनी त्या कल्याणाची अहोरात्र सेवा-शुश्रूषा केली. सहा महिने निराधार ब्रह्मचारी कल्याणाची शुश्रूषा करीत होते.

सहा महिन्यानंतर कल्याण ठणठणीत झाला. तेव्हा कल्याण निराधार ब्रह्मचारींना म्हणाले , "तुझे उपकार मी कसे फेडू? सहा महिने तू माझी अखंड शुश्रूषा केलीस हे मी कधीही विसरणार नाही. तुझे नाव निराधार ब्रह्मचारी असले तरी तू दुसऱ्यांना सदैव आधार देणारा आहेस. माझ्या आजारपणात तूच उपयोगी पडलास. त्यामुळे माझी सुंदर कन्या तुला पत्नीच्या रूपात स्वीकारावी लागेल."

यावर निराधार ब्रह्मचारी म्हणाला की, "हे कल्याणा! उगीच मला संसाराच्या खोल दरीमध्ये ढकलून देऊ नकोस. संसार हा काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर या सहा शत्रूंनी वेढलेला असतो. मला अखंड ब्रह्मचर्याचे पालन करून भगवंताची प्राप्ती करून घ्यायची आहे. मला संसाररूपी खोल दरीत मुळीच पडावयाचे नाही."

कल्याणाने ब्रह्मचाऱ्यास समजावले. कल्याण म्हणाले की, "संसार हा मुळातच नासका असतो पण तो विवेकाने केला की सर्व काही व्यवस्थित होते. तू संसाराचा सर्व भार देवावर टाकून दे. तो तुझा संसार पेलण्यास सर्वसमर्थ आहे. त्याने एका अंशाने सारे विश्व धारण केले आहे. तुझा संसार त्यापुढे एकदम छोटा आहे. मी मथुरा या पुण्यक्षेत्री कन्यादानाचा संकल्प करतो. तू माझी कन्या पत्नी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणून स्वीकारशील असे वचन तू मला दे.''

निराधार ब्रह्मचारी कल्याणजींना म्हणाला की, ''तुम्ही म्हणता म्हणून मी तयार झालो पण तुमच्या कन्येस व घरातील सर्वांना हे मान्य होईल का?''

कल्याण म्हणाले, ''तू माझा जिवलग मित्र आहेस. घरात मीच कर्तापुरुष आहे. तरीसुद्धा तुझा विश्वास नसेल तर आज श्रीकृष्णाच्या साक्षीने तुला माझी कन्या देण्याचे वचन देतो.''

एका शुभमुहूर्तावर ते दोघेही श्रीकृष्णाच्या मंदिरात गेले. कल्याणाने निराधार ब्रह्मचाऱ्यास तेथे बसवले व स्वत:च्या हातात उदक घेऊन म्हटले की, ''मी तुला कन्या देईन याला साक्ष श्रीकृष्ण आहे.''

कल्याण आजारातून उठले होते. त्यामुळे ते खूप थकले होते. त्यांचे वय पण वाढले होते.

मथुरा सोडून ते हरिद्वारकडे गेले. कल्याण स्वत:च्या घरी गेले तेव्हा कोणीही त्यांचे स्वागत केले नाही. बरोबर कोणाला आणले आहे याचा उलगडा त्यांना काही होईना.

कल्याणाने निराधार ब्रह्मचाऱ्याला दिलेले वचन पत्नीस सांगितले. पत्नीला हे मुळीच आवडले नाही. ती म्हणाली, ''हरिभक्ताला आपली कन्या मुळीच द्यायची नाही. त्या ब्रह्मचाऱ्याचे तुमच्यावर कितीही उपकार झाले तरी त्या उपकाराच्या परतफेडीसाठी दुसरा उपाय शोधा.''

कल्याणाने कुटुंबातील अनेकांना याबद्दल विचारले पण प्रत्येकाने यास ठाम विरोध दर्शविला.

कल्याण व ब्रह्मचारी दोघेजण राजाकडे गेले व सर्व काही सांगितले. कल्याण राजास म्हणाले, ''तुम्ही काहीही करून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कन्यादान करण्यास माझ्या कुटुंबीयास भाग पाडा. तुमच्या आज्ञेचे ते उल्लंघन करणार नाहीत.''

राजा म्हणाला, ''हे सर्व ठीक आहे. तू जेव्हा वचन दिलेस तेव्हा साक्षीदार म्हणून कोण होते का? साक्षीदाराचीच यात खूप मदत होईल असे मला वाटते.''

कल्याणाने सांगितले की, ''मी माधवालाच साक्षी मानून निराधार ब्रह्मचाऱ्यास वचन दिले आहे.''

''तू मथुरेहून त्याला इकडे बोलावून घे असे राजाने कल्याणास सांगितले.

ब्रह्मचारी म्हणाले, ''हे राजन्! मी आता ताबडतोब मथुरेस जातो व श्रीकृष्णास येथे घेऊनच येतो.'' ब्रह्मचारी मथुरेस आले. ते श्रीकृष्णाची विनवणी करू लागले. श्रीकृष्ण प्रसन्न झाला. त्या ब्रह्मचाऱ्यांनी हरिद्वारास राजाकडे साक्ष द्यायला या, म्हणून प्रार्थना केली. तेव्हा श्रीकृष्ण म्हणाला की ''अरे मी तर पाषाणमूर्तीच्या स्वरूपात आहे. एवढ्या लांब मी कसा चालत येणार ?''

ब्रह्मचारी म्हणाले, ''तू जसे बोलतोस. तसेच तुला चालावेही लागेल. तुला हरिद्वारास कोणत्याही परिस्थितीत आलेच पाहिजे. चल लवकर, आपल्याकडे वेळ कमी आहे.''

श्रीकृष्ण निराधार ब्रह्मचाऱ्याची कळकळीची विनवणी ऐकून हरिद्वारला येण्यास तयार झाला. त्यापूर्वी त्याने ब्रह्मचाऱ्यास एक अट घातली. श्रीकृष्ण म्हणाला, ''तू प्रवासात पुढे व्हायचे. मी तुझ्या पाठोपाठ येतच आहे. तू अजिबात मागे वळून पाहायचे नाही. तू जर मागे वळून पाहिलेस तर तेथेच मी थांबेन. तिथून पुढे मी काही येणार नाही.''

दोघांचा प्रवास व्यवस्थित सुरू झाला. हरिद्वार अर्ध्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कोसावर आले असताना अचानक ब्रह्मचाऱ्याने मागे वळून पाहिले. त्यामुळे श्रीकृष्ण तेथेच थांबला.

ब्रह्मचारी राजाकडे पळत पळत आला व म्हणाला, "राजन्! लवकर चला. येथून अर्ध्या कोसावर देवकीनंदन श्रीकृष्ण साक्ष देण्यासाठी मथुरेहून आले आहेत." राजाला खूप आनंद झाला. साऱ्या नगरात ही वार्ता पसरली. प्रत्येक जण श्रीकृष्णाचे मनोहर रूप पाहण्यासाठी धडपडू लागला.

श्रीकृष्णाने राजाला व कल्याणाच्या कुटुंबीयास निराधार ब्रह्मचाऱ्याचे लग्न कल्याणाच्या कन्येबरोबर लावण्याची आज्ञा केली. साक्षात् श्रीकृष्णाने लग्नाची सर्व तयारी पूर्ण केली. कल्याणाच्या कुटुंबियांचा विरोध मावळला होता.

श्रीकृष्णाच्या साक्षीने निराधार ब्रह्मचाऱ्याचा विवाह थाटामाटात पार पडला. हा लग्नसोहळा चार दिवस सुरू होता.

मथुरेहून आलेला श्रीकृष्ण हरिद्वारलाच कायमस्वरुपी राहिला. सर्वजण हरिद्वारास श्रीकृष्णाचे दर्शन घेण्यास येऊ लागले.

या सर्व गोष्टींमुळे श्रीकृष्णाची दुसरी सुंदर मूर्ती मथुरेस बसवली.

अध्याय ३३ वा

॥ संत सूरदास ॥

एकदा श्रीकृष्णाचा अत्यंत लाडका भक्त अक्रूर अचानकपणे सत्यभामेच्या घरी आला. सत्यभामेने त्याचे यथोचित स्वागत केले. त्याला फलाहार दिला. नंतर दोघे गप्पा मारत बसले. सत्यभामा अक्रूराला म्हणाली, "अक्रूरा! पहिल्याप्रमाणे आता श्रीकृष्णाचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

माझ्यावर लक्ष नाही. तो खूप दिवसांत इकडे फिरकलाच नाही. मी त्याची चातक पक्ष्याप्रमाणे वाट पाहत बसले आहे. श्रीकृष्णाचे माझ्यापेक्षा रुक्मिणीवर फार प्रेम आहे. श्रीकृष्ण जर मला भेटण्यास आला नाही तर माझ्या जीवाचे काही खरे नाही. प्रिय श्रीकृष्णाच्या विरहात माझा मृत्यु होईल असे मला वाटते."

अक्रूराने सत्यभामेचे समाधान होण्यासाठी स्वत: श्रीकृष्णाचे रूप घेतले. तो सत्यभामेकडे आला व म्हणाला की, "हे बघ! मी आलो!" तेवढ्यात देवकीपुत्र श्रीकृष्णाचे तेथे आगमन झाले. अक्रूर आपले रूप घेऊन सत्यभामाशी बोलत बसला आहे, हे पाहून श्रीकृष्णास भयंकर क्रोध आला. त्याने दोघांना शाप दिला. अक्रूरास श्रीकृष्ण म्हणाला की, "तू स्त्रीलंपट आहेस, लबाड आहेस यामुळे तू कलियुगात मनुष्य जन्मात अवतार घेशील; पण त्या वेळी तू आंधळा म्हणून जन्मास येशील. सत्यभामे, तू कलियुगात दासी होशील."

अक्रूर श्रीकृष्णाच्या पाया पडला व म्हणाला, "हे देवा! काय केलेस तू, सत्यभामेस तुझा विरह सहन होत नव्हता म्हणून मी फक्त तुझे रूप घेतले. आणि तू मला शाप देतोस ? मी जर तुझे रूप घेतले नसते तर सत्यभामेने प्राणत्याग केला असता.'क'

द्वारकाधीश म्हणाले, "अरे! मी दिलेला शाप वरदान ठरणार आहे. कलियुगात तुला लोकांना ज्ञानामृत पाजायचे आहे. त्यामुळे तुला अवतार घ्यायचा आहे. मांझे तुझ्यावर अखंड प्रेम आहे हे लक्षात ठेव. मी तुला त्या अवतारात दर्शनसुद्धा देणार आहे. सत्यभामा दासीची व तुझी भेट झाली की मी तेथे प्रकट होईन."

हाच अक्रूर पुढे काही वर्षांनंतर मथुरेजवळ जन्मास आला. त्याच्या आईवडिलांनी त्याचे नाव 'सूरदास' असे ठेवले. ते

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जन्मापासून नेत्रहीन होते. नेत्रहीन असल्यामुळे त्यांचे मन कधीही वाईट गोष्टी पाहाव्यात असे करत नसे. त्यांचे संपूर्ण लक्ष परमेश्वराच्या चरणाशी होते. सदैव श्रीकृष्णाचे नामस्मरण व श्रीकृष्णाचे भजन यात ते आपला दिवस घालवत असत.

एके दिवशी सूरदास मथुरेला गेले. तेथे ते श्रीकृष्णाच्या मंदिरात गेले व श्रीकृष्णास म्हणाले की, "हे प्रिय परमेश्वरा! गोवर्धनधारी श्रीकृष्ण, तुला मी गोकुळातून मथुरेत कंसाकडे आणले. हे काम अत्यंत अवघड होते. तरी तुझ्या प्रेमापोटी मी सर्व काही केले. येताना गोपी अक्षरश: रडत होत्या तरी त्यांना बाजूला सारून मी तुला व बलरामास मथुरेस आणले. त्या गोपींचा शाप मला नक्कीच मिळालेला असणार. माझा खरा अपराध गोकुळातच झाला आहे. तू दिलेला शाप हा निमित्तमात्र होता. मला क्षमा कर भगवंता! मला तुझे दर्शन करायचे आहे. त्यामुळे मला दृष्टी दे. तुझे ते मनोहर, दिव्य रूप माझ्या डोळ्यात साठवून ठेवायचे आहे."

सूरदासांची ही करूण प्रार्थना ऐकून श्रीकृष्णाने त्याला दृष्टी दिली. सूरदासांनी श्रीकृष्णास मिठी मारली व डोळे भरभरून दर्शन घेतले व पुन्हा श्रीकृष्णास म्हणाले, "तुझे रूप सदैव माझ्या हृदयात राहू दे. आता मला पहिल्यासारखे पुन्हा आंधळे कर. या जगातल्या वाईट गोष्टींचे माझ्या डोळ्यांना दर्शन व्हायला नको. वाईट गोष्टींचे दर्शन झाले की मनात काम, क्रोध, लोभ, मोह आदींची उत्पत्ती होते. त्यापेक्षा अंध असलेले केव्हाही बरे!"

श्रीकृष्णाने सूरदासांच्या विनंतीनुसार त्यांना पुन्हा अंध केले.

एके दिवशी राजाच्या दरबारी तानसेनाची मैफल रंगली होती. तानसेन फार मोठा गायक होता. त्याच्या गाण्यामुळे पाऊस पडत असे, समया पेटत असत. नवरत्नांपैकी एक रत्न म्हणून तानसेनाचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

उल्लेख केला जाई. आलापी, ताना घेताना सर्व श्रोते मान डोलवत असत. त्याची मैफल संपल्यानंतर राजा तानसेनास म्हणाला, "उत्तम! अतिउत्तम! आजचा पूरिया धनाश्री राग खूपच चांगला गायला. तानसेन! तू खरोखरच उत्तम गायक आहेस. तुझ्याशी तुलना करण्यासारखा दुसरा कोणी गायक नाहीच."

तानसेन म्हणाला, "हे अन्नदाता! जगात एकापेक्षा एक हुशार लोक असतात."

राजा म्हणाला, "तुझ्यापेक्षा वरचढ दुसरा गायक कोण आहे? त्याला किती राग येतात व कोणकोणते राग येतात?"

तानसेन म्हणाला, "त्या गायकाचे नाव आहे सूरदास. जन्मापासून आंधळा असूनही त्यांनी गाण्यावर प्रभुत्व मिळवले आहे. त्यांना अनेक राग येतात. उदाहरणार्थ मालकंस, धानी, पिलू, बागेश्री इ."

राजाने सूरदासांना राजदरबारात गाण्यासाठी सन्मानाने घेऊन येण्याची आज्ञा सेवकांना दिली. सूरदास आले तेव्हा तानसेनाने त्यांना प्रथम नमस्कार केला व म्हणाले की, "आमच्या राजेसाहेबांना आपले गाणे ऐकण्याची तीव्र इच्छा आहे. तुम्ही कोणतातरी राग त्यांना सादर करून दाखवा. एका ओंजळीच्या वाळूत जेवढे कण असतात तेवढे राग तुम्हाला येतात याची मला कल्पना आहे. आपल्यास जो आवडेल तो राग सादर करा."

सूरदास म्हणाले की, "हे राजन! मला आता शास्त्रीय गाणे म्हणण्याची इच्छा नाही. मी आपणास श्रीकृष्णाचे एक सुंदर भजन ऐकवतो. आपली परवानगी असल्यास मी सुरुवात करतो."

राजाने परवानगी दिली. सूरदासाने भजनाची सुरुवात प्रथम आलापी घेऊन केली. त्यानंतर भजनाच्या ओळी म्हणू लागले. काय

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आश्चर्य? शिवपार्वती पुत्र एकदंत श्रीगणेश सूरदासांना टाळाची साथ करू लागला. विद्यादेवी शारदा वीणा वाजवू लागली. रंभा, मेनका, उर्वशी इ. स्वर्गातल्या अप्सरा तेथे श्रीकृष्णाबरोबर नाचू लागल्या. श्रीकृष्ण साक्षात् नाचत आहे हे पाहिल्यावर सर्वांचे डोळे दिपले. राजाने सूरदासांना एक हजार सुवर्णमुद्रा बक्षीस म्हणून दिल्या.

त्या नगरात सूरदास एक महिना होते. त्यांनी अनेकांना भक्तीमार्गाकडे ओढून घेतले.

सूरदासांची कीर्ती राणीपर्यंत पोहोचली. राणीला वाटले की आपणसुद्धा श्रीकृष्णाचे भजन सूरदासांकडून ऐकावे. त्यामुळे आपल्याला श्रीकृष्णाचे फुकट दर्शन होईल.

राणी त्या काळी पडदा पाळीत असत. परपुरुषासमोर त्या पडद्याशिवाय बसत नसत. सूरदास आंधळा असल्यामुळे त्यांनी पडद्यात बसायचे नाही असे ठरवले.

सूरदास भजन म्हणू लागले. सर्व राण्या भजन ऐकण्यात तल्लीन झाल्या होत्या. सत्यभामारूपी दासी उठली व आनंदाने बेहोष होऊन नाचू लागली. सत्यभामारूपी दासी नाचू लागल्यानंतर सूरदासांना श्रीकृष्णाच्या म्हणण्यानुसार डोळे आले. त्यांनी तिला हौदात पडण्यापासून वाचवले.

सूरदासांना पुन्हा दृष्टी आल्याचे पाहून सर्व राण्या लज्जित झाल्या व पुन्हा पडद्याआड बसल्या. त्यांना सूरदासांचे आश्चर्य वाटले.

तेथे श्रीकृष्ण प्रकट झाला आणि सूरदास व सत्यभामेस आपल्यामध्ये विलीन करून घेतले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय ३४ वा

॥ संत सेनामहाराज ॥

श्रोत्यांनो! आता मी तुम्हाला भक्त सेना यांची कथा सांगणार आहे. ती तुम्ही शांत चित्ताने श्रवण करा, ही नम्र विनंती.

सेनामहाराज हे बादशहाकडे नोकरीस होते. ते रात्रंदिवस हरीचे चिंतन करीत असत. मुखामध्ये सदैव नामस्मरण सुरू असे. एके दिवशी ते देवाची पूजा करीत होते तेव्हा राजाचे सेवक आले. त्यांनी त्यांच्या बायकोस सांगितले की, "सेनामहाराजांना बोलावले आहे." यावर बायको म्हणाली की, "ते घरी नाहीत. बाहेर गेलेत. त्यांना यायला थोडा उशीर होईल." असे सात-आठ वेळा झाले. त्यांना शेजारच्या माणसाने सांगितले की त्या सेनामहाराजांची बायको खोटं बोलते. नवऱ्याच्या ध्यानात विघ्न येऊ नये म्हणून ती तुमच्या सेवकांना, 'पतिपरमेश्वर घरी नाहीत' असे सांगते. या भाषणामुळे बादशहा चिडला. त्याने सेनामहाराजांना कठोर शासन करण्याची आज्ञा दिली.

आपल्या प्रिय भक्तावर आलेले संकट भगवंताने सोडवले. भगवंत सेनामहाराजांचे रूप घेऊन बादशहाकडे आला. सेनामहाराज आले म्हणून बादशहास खूप आनंद झाला. बादशहा लगेच चंपी मालिश करायला बसला. बादशहाने तेलाच्या वाटीत मान डोकावली की त्याला चतुर्भुज श्रीनारायणाचे रूप दिसत असे, वर पाहिले की सेनामहाराज दिसत असत. बादशहा चतुर्भुज नारायणाच्या दर्शनाने मोहित झाला. त्याला ते रूप सारखे पाहावेसे वाटत असे.

चंपी मालिश संपल्यानंतर देव अंतर्धान पावले. बादशहाने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देवाला ओंजळभर होन दिले. ते त्याने धोकटीमध्ये ठेवले.

बादशहाने पुन्हा एकदा सेनामहाराजांना बोलावून घेतले. हे सेनामहाराज होते. सकाळप्रमाणे भगवंत सेनामहाराजांच्या रूपात नव्हते. बादशहाने चंपी मालिशची वाटी आणली व सेनामहाराजांना म्हणाला, "सेनाजी! आपंण स्वत: जसे चतुर्भुज नारायणाचे रूप वाटीत दाखवले तसे दाखवा." बादशहाची आज्ञा मानून सेनामहाराजांनी बादशहाचे चंपी मालिश सुरू केले. खूप वेळ झाला तरी वाटीत चतुर्भुज नारायणाचे रूप दिसेना. बादशहाला राग आला. तेव्हा सेनामहाराजांनी मनोमन ओळखले की, सकाळी माझे संरक्षण करण्यासाठी विष्णूच स्वत: माझे रूप घेऊन आले होते. भक्तांवर काहीही संकट आले की देव त्वरीत उडी घेत असतो. सेनामहाराजांनी लक्ष्मीपती नारायणाचा धावा सुरू केला. काही क्षणातच बादशहाला नारायणाचे चतुर्भुज रूप पुन्हा एकदा वाटीत दिसले. बादशहा खुष झाला.

देवाने सेनामहाराजांच्या घरी होन ठेवले होते. ते होन ब्राह्मणांमध्ये देऊन टाकले. ह्या चमत्कारामुळे बादशहाची देवावर भक्ती जडली. तो सकाळ-संध्याकाळ नारायणाचे भजन करू लागला.

यामुळे संतश्रेष्ठ सेनामहाराजांना खूप आनंद झाला. संत सेनामहाराजांनी पुढे अनेक वर्षे लोकांना अध्यात्माचे ज्ञानामृत दिले.

अध्याय ३५ वा

॥ सात्विक राजा व कर्माबाई यांच्या कथा ॥

श्रोत्यांनो! जगन्नाथपुरी हे ठिकाण तुम्हाला माहीत असेलच.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जगन्नाथपुरी हे चार धामांपैकी एक पवित्र धाम आहे.

फार वर्षांपूर्वी जगन्नाथपुरीस एक राजा होता. त्या राजाचे नाव होते सात्विक. नावाप्रमाणे सात्विक राजा सात्विक होता. तो अनेकांना अन्नदान करत असे. त्याची देवावर अत्यंत दृढ श्रद्धा होती. देवाची पूजा केल्याशिवाय तो मुखात पाण्याचा थेंबही घेत नसे. जगन्नाथपुरीतील जगन्नाथ मंदिरात तिन्ही वेळेस सात्विक राजा पूजेसाठी जाऊन बसत असे. लोकांचेसुद्धा राजावर खूप प्रेम होते. सात्विक राजा प्रजेची सर्व प्रकारे काळजी घेत होता.

एके दिवशी राजा नेमाप्रमाणे देवळात बसला होता. त्या दिवशी तो जरा लवकरच देवळात आला होता. त्याच्याबरोबर त्याचे पाच-सहा मित्रसुद्धा होते. वेळ घालवण्यासाठी राजा व त्याचे मित्र द्यूत खेळण्यासाठी बसले. ते खेळात इतके गुंग झाले की त्यांना पूजेचेही भान राहिले नाही. पूजा झाल्यानंतर पुजारी सर्वांना गोड प्रसाद देण्यासाठी आला. सर्वांनी उजव्या हातावर प्रसाद घेतला. राजाचे चित्त विचलित झाल्यामुळे सात्विकने डावा हात प्रसाद घेण्यासाठी पुढे केला. पुजाऱ्यास हे अशुभ वाटले. त्यामुळे सात्विक राजाला प्रसाद न देता पुजारी पुढे गेला.

खेळ संपल्यानंतर राजाने आपल्याला प्रसाद का मिळाला नाही, म्हणून मित्रांना विचारले. त्या वेळी मित्र म्हणाले की, "अरे! तू प्रसादासाठी डावा हात पुढे केलास. तुझ्यावर मायेचा प्रभाव पडला होता. प्रसादासाठी नेहमी उजवा हात पुढे करायचा असतो."

राजाला त्या गोष्टीमुळे फार पश्चात्ताप झाला. आपल्या हातून फार मोठा अपराध घडला आहे असे त्याला वाटले. त्याने ठरवले की डाव्या हाताने फार मोठा अपराध केला आहे तेव्हा त्या डाव्या हातास आपणच शिक्षा द्यावी. सात्विक राजा आपल्या प्रधानास

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणाला, ''प्रधानजी! मी रात्री झोपतो तेव्हा एक पिशाच्च येते व वेड्यासारखे माझ्यासमोर नाचते. त्याचे ते विचित्र हावभाव पाहून मला खूप भीती वाटते. तो आजसुद्धा खिडकीतून हात घालेल तेव्हा तुम्ही सावध राहा व त्याने हात घातला रे घातला की तो तोडून टाका.'' प्रधान या कामास तयार झाला.

रात्र झाल्यानंतर प्रधानाला खिडकीत हात दिसला. प्रधानजीला हात दिसल्यावर त्याला वाटले की अन्नदात्याने सांगितल्याप्रमाणे हा पिशाच्चाचा हात असेल म्हणून प्रधानाने समशेरीने हात तोडला. हात तोडल्यानंतर प्रधानास ताबडतोब कळाले की हा राजेसाहेबांचा डावा हात आहे. त्याला खूप वाईट वाटले. तो राजाची क्षमा मागू लागला.

राजा प्रधानास म्हणाला, ''अरे! तू फक्त हात तोडण्यास निमित्तमात्र ठरला आहेस. त्या डाव्या हाताने घोर अपराध केला होता म्हणून मी तो हात तुझ्याकडून युक्तीने तोडवून घेतला. अपराधी हातास शिक्षा हवीच होती.''

त्यानंतर राजाने तोडलेला डावा हात पालखीत घालून देवाच्या महाद्वारी पाठवला. त्याने सेवकांना आज्ञा केली, 'माझा निरोप देवाला सांगा की, तुमचा शुद्ध प्रसाद घेण्यासाठी राजाने डावा हात पुढे केला. डावा हात प्रसादासाठी पुढे करणे हा फार मोठा गुन्हा आहे. त्यामुळे राजास योग्य ती शिक्षा द्या म्हणावे.

सेवकांनी तुटलेल्या हाताची पालखी देवाच्या महाद्वारी नेली; व जगत्पिता देवाला राजाची प्रार्थना सांगितली. त्या तुटलेल्या हातावर सेवकांनी हार व बुक्का वाहिला व राजाचा जयघोष केला. लोकांना राजाच्या या निर्णयाबद्दल आश्चर्य वाटले. आपला अन्नदाता खरोखरच न्यायप्रिय आहे याची लोकांना खात्री झाली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यानंतर राजाचा डावा हात पालखीतून नाहीसा झाला. पालखीत दवणा उत्पन्न झाला. तो दवणा पुजाऱ्याने बागेत लावला.

पुजारी नेमाप्रमाणे प्रसाद वाटप करीत होते. तेथे राजासुद्धा आला होता. राजाने नकळत तुटलेल्या हाताचा भाग पुढे केला. त्याला ताबडतोब हात फुटले. सर्वांना आनंद झाला. राजाने आनंदाने प्रसाद खाल्ला.

सर्वांनी जगदीश्वराचा जयघोष केला.

कर्माबाई

श्रोत्यांनो! आता तुम्ही दुसरी कथा श्रवण करा. ही कथा जगन्नाथपुरीतील एका स्त्रीभक्ताची आहे.

जगन्नाथपुरीत एक स्त्रीभक्त राहत होत्या. त्यांचे नाव होते कर्माबाई. देवावर तिचे फार प्रेम होते; पण प्रपंचावर देवापेक्षा जास्त प्रेम होते. तिच्या पोटात मूल असताना तिचे पती यमलोकी गेले. त्यामुळे कर्माबाईंना खूप दु:ख झाले. नऊ महिने झाल्यानंतर कर्माबाईंनी एका गोंडस मुलास जन्म दिला. त्यामुळे त्यांचे दु:ख थोडे कमी झाले. त्यांचा या मुलावर खूप जीव होता. आपल्या जीवाच्या पलीकडे त्या लाडक्या लेकाचा सांभाळ करीत होत्या.

काही वर्षानंतर मुलगा मोठा झाला. कर्माबाईंनी आपल्या लेकाचां गुणवान, सुशील कन्येबरोबर विवाह केला. कर्माबाईंना नातू झाला. नातू झाल्यानंतर काही दिवसातच त्यांचा मुलगा परलोकी गेला. आपला लाडका पुत्र परलोकी गेल्याने त्यांना दु:ख झाले. त्या देवाला म्हणाल्या, "माझ्या हातून काय पाप झाले म्हणून तू मला शिक्षा देतोस? मला प्रथम पतीचे दु:ख सहन करावे लागले आणि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आता पुत्राचे दु:ख सहन करावे लागत आहे. मला आता या दु:खी संसारसागरात राहण्याची मुळीच इच्छा नाही.''

काही दिवसांनी दहा-बारा वैष्णव जगन्नाथाचे दर्शन घेण्यासाठी जगन्नाथपुरीस आले होते. ते वैष्णव मुक्कामासाठी कर्माबाईंच्या घरी राहिले. त्यांना चिंतातुर पाहून त्या वैष्णवांनी चिंतेचे कारण विचारले; तेव्हा कर्माबाईंनी आपला पती व मुलगा गेल्याने फार दु:ख व चिंता वाटते असे सांगितले.

ते वैष्णव म्हणाले, ''माते! जन्मलेला प्रत्येक मनुष्य कोणत्यातरी दिवशी मृत्युमुखी पडणारच. या पृथ्वीवर जन्म घेतलेला कोणताही मनुष्य अमर नाही. तुम्ही या दोघांच्या मोहात पडू नका. तुमचे त्या दोघांवर जेवढे प्रेम होते त्यापेक्षा अनंत पटीने तुम्ही देवावर प्रेम केले तर तुमच्या नरजन्माचे सार्थक होईल.'' त्यांनी श्रीकृष्णाची एक सुंदर मूर्ती कर्माबाईंना दिली.

वैष्णवांनी सांगितल्याप्रमाणे कर्माबाई श्रीकृष्णावर अपार भक्ती करू लागल्या. तहान-भूक विसरून त्या सदैव श्रीकृष्णाच्या मूर्तीसमोर बसत असत. ''श्रीकृष्ण, गोविंद, हरे मुरारी, हे नाथ! नारायण वासुदेव!'' असे त्या सदैव नामस्मरण करीत असत. कर्माबाईंच्या हातची खिचडी श्रीकृष्णास खूप आवडत असे.

एके दिवशी काही कर्मठ ब्राह्मण त्यांच्या घरी उतरले. ते सोवळे-ओवळे पाळत असत. कर्माबाई सोवळे-ओवळे पाळीत नसत. हे त्या ब्राह्मणांना आवडले नाही. ते कर्माबाईंना म्हणाले, ''उद्यापासून आम्हाला देवास नैवेद्य दाखवायचा आहे. त्यामुळे तुम्ही सोवळ्याने स्वयंपाक करा.''

दुसऱ्या दिवशी सोवळ्याने स्वयंपाक करण्यास कर्माबाईंनी सुरुवात केली. यामुळे नैवेद्यास थोडा उशीर झाला. देवाला फार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizaqtion by eGangotri

भूक लागली होती. त्याने पुजाऱ्याबरोबर कर्माबाईंना निरोप पाठवला की, "देव हा भावाचा भुकेला आहे. ज्यांच्या मनात शुद्ध भाव असतो त्यांनी प्रेमभावनेने केलेला स्वयंपाक मला आवडतो. देवाला कर्माचे कोणतेही बंधन नसते. देव जात-पात, स्त्री-पुरूष काही पाहत नाही. पटकन नैवेद्य आण म्हणावे."

पुजाऱ्याचा निरोप आल्यानंतर कर्माबाईंनी लगेच नैवेद्य पाठविला व देवाने ताबडतोब नैवेद्य खाल्ला. पुजारी या गोष्टीमुळे मनातून चक्रावले. त्यांना कर्माबाईंच्या भक्तीचे नवल वाटले. देवळातील सर्व लोकांनी कर्माबाईंचा जयजयकार केला.

आजही जगन्नाथास प्रथम कर्माबाईंच्या खिचडीचा नैवेद्य दाखवतात. त्यानंतर सर्व नैवेद्य दाखवतात.

अध्याय ३६ वा

॥ जन जसवंत, सूरदास मदनमोहनची कथा ॥

श्रोत्यांनो! आता तुम्ही जन-जसवंत या भक्ताची कथा श्रवण करा.

जन-जसवंत अतिशय श्रीमंत होते. त्यांच्या घरी नोकर-चाकर सर्व काही होते. एवढे असूनसुद्धा त्यांना आपल्या श्रीमंतीबद्दल मुळीच गर्व नव्हता. त्यांचे सदैव हरिकीर्तन सुरू असे. ते दारात आलेल्या याचकास काहीतरी दिल्याशिवाय पाठवत नसत. वर्षातून एकदा ते गावातल्या सर्व लोकांना अन्नदान करीत असत. यात्रेत आलेल्या सर्व साधुसंतांना ते नवीन वस्त्रे प्रदान करीत असत. त्यांची सर्व संपत्ती सत्कारणी लागत होती.

त्यांना पाच मुलगे होते. काही दिवसांनंतर ते मोठे झाले. काही कामधंदा न करता बापाच्या पैशावर चैन करत जीवन जगावे असा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांचा मनोदय होता. त्या पाचही जणांना दुष्ट मित्रांची संगत लागली. दुष्ट मित्रांच्या संगतीमुळे ते पाचही जण बाईबाटलीत रमू लागले. ते बाईबाटलीसाठी वडिलांकडे पैसे मागत; पण वडील त्यांना मुळीच पैसे देत नसत. त्यामुळे त्या पाचही जणांना वडिलांचा खूप राग येई. ते आपली व्यसने पूर्ण करण्यासाठी वाईट मार्गाने पैसे मिळवू लागले.

वडील सदैव हरिभक्तीत रंगलेले असत. ते भरपूर दानधर्म करीत असत, हे त्या मुलांना आवडत नसे. त्यांना वाटे की आपला बाप असाच दानधर्म करून आपल्याला भिकेला लावेल. त्यामुळे त्यांनी वडिलांनाच मारायचे ठरवले.

ते पाचही जण राजाकडे गेले व म्हणाले, "हे राजन्! आमच्या पिताश्रींना वेड लागले आहे. आम्ही सावकार; आमच्या घरी खूप संपत्ती आहे. पण आमचे वडील दारात आलेल्या प्रत्येकाला मोठ्या प्रमाणात दानधर्म करतात. आम्हाला सर्वांसाठी साधा एक रुपयासुद्धा ते देत नाहीत. यामुळे आम्हाला संपत्ती संपेल की काय अशी भीती वाटू लागली आहे. त्यामुळे तुम्हीच आमच्या पिताश्रींना देहदंडाची शिक्षा द्या."

तो राजासुद्धा मूर्ख होता. त्याने त्या पाच मुलांवर विश्वास ठेवला व सेवकांना आज्ञा दिली की, "ताबडतोब जा आणि जन-जसवंत सावकारास पकडून आणा. त्याची मोट बांधून मी पाण्यात फेकून देणार आहे."

राजाच्या या निर्णयामुळे त्या मुलांना खूप आनंद झाला. बापाचा मृत्यु झाल्यानंतर संपत्ती कशी उडवायची, याचा बेत ते ठरवू लागले.

राजाची आज्ञा मानून सेवकांनी जन-जसवंत सावकाराला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पकडून राजाकडे आणले. त्या सावकारास पाण्यात फेकून देण्यापूर्वी सावकार राजास म्हणाला, "अरे गाढवा! तुला काहीही कळत नाही. या वेड्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मला तू देहदंड देत आहेस. पण मला खात्री आहे की देव माझे संरक्षण करेल. या विश्वात तो सर्वत्र भरून राहिला आहे. मी देवाचा परमभक्त आहे. भक्तावर आलेले संकट देव सहजपणे दूर करतो."

राजाच्या सेवकांनी त्याला हौदात ढकलून दिले. देवाने हौदामध्ये ताबडतोब मोठ्या कासवाचे रूप घेतले व जन-जसवंतास अधांतरी तरंगवले. हे पाहून राजा शरमिंदा झाला. त्याने ताबडतोब स्वत: हौदात उडी मारली व जन-जसवंतास वर काढले. राजाने जन-जसवंताची क्षमा मागितली.

वडिलांवर भलता आरोप ठेवल्यामुळे राजाने त्या पाचही मुलांना कडक शिक्षा केली.

भक्त सूरदास मदनमोहन हे अकबर बादशहाकडे नोकरीस होते. बादशहाचा अत्यंत विश्वासू माणूस म्हणून त्यांची ख्याती होती. बादशहाने त्यांना मथुरेस अधिकारी बनवून पाठवले. भक्त सूरदास हे दानशूर होते. प्रत्येक याचकाला ते भरपूर धन, धान्य, नवीन कपडे दान देत असत. संतांना खाण्यासाठी माव्याची बर्फी, पाकातले गुलाबजाम, बेसनाचे लाडू, साजूक तुपातली जिलेबी इ. अनेक पदार्थ पाठवीत असत. संतांची, साधूंची सेवा करण्यासाठी त्यांनी आपली पै नि पै खर्च केला. एक रुपयासुद्धा स्वत:साठी शिल्लक ठेवला नाही.

पैसे संपले म्हणून त्यांच्या सेवेत खंड पडला. त्यांनी मनोमन ठरवले की, आपणास बादशहाने पूर्ण अधिकार दिले आहेत. तेव्हा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याच्याच पैशाने आपण साधुसंतांची सेवा करू. त्याचे पैसे आपण चांगल्याच कारणासाठी खर्च करणार आहोत. सूरदास मनमोहन यांनी हळूहळू बादशहाची संपत्ती घेण्यास सुरुवात केली. बादशहाच्या त्यांनी ८० लक्ष १० हजार मुद्रा साधुसंतांच्या सेवेसाठी वापरल्या. सूरदास मदनमोहन यांच्याकडे एक दिवाण कामासाठी होता. भक्त सूरदासांची चहाडी त्या दिवाणाने बादशहाकडे केली.

बादशहाला राग आला. त्याने आपल्या सेवकांना मथुरेत धाडले व त्यांच्याकरवी मदनमोहन यांना निरोप सांगितला की, "तुम्ही येथे स्वत: येऊन ८० लक्ष १० हजार मुद्रा परत केल्या पाहिजेत."

बादशहाचे सेवक सूरदासांच्या वाड्यात अचानक आले. त्यांनी सूरदासांना राजाचा निरोप सांगितला, "तू जेवढे द्रव्य खर्च केलेस तेवढे परत कर, नाहीतर तुला मृत्यूदंड देण्यात येईल."

सूरदासांना एक युक्ती सुचली. ते त्या सेवकांना म्हणाले, "अहो, मी बादशहाचे सर्व द्रव्य खर्च केले नाही. त्या पैशाने मी अमूल्य जवाहिर विकत घेतलेय. ते जवाहिर बघताच बादशहास खूप आनंद होईल. जवाहिर दुप्पट किंमतीचे आहेत. राजासाठी मी अमूल्य संपत्ती जतन करून ठेवली आहे." त्यांनी घरात जाऊन दोन पेट्यांमध्ये गारगोट्या भरल्या व बादशहास पत्र लिहिले की, "हे राजन्! तुमच्या सूरदासाने सर्व द्रव्य खर्च केले यात काहीही शंका नाही. जीवाची भीती वाटून मी पळून जात आहे." सेवकांना त्या दोन पेट्या व पत्र सुपूर्त केले. त्या दिवशी आलेल्या सर्व सेवकांना श्रीखंड-पुरीचे जेवण दिले. सेवकांनी यथेच्छ भोजन केले. त्यानंतर सर्वांना वस्त्रदान केले. समाधानाने सर्वजण झोपले. रात्रीतून सूरदास पळून गेले व अरण्यात हरिभजन करू लागले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

इकडे सकाळी त्या सेवकांनी दोन पेट्या उचलल्या व बादशहाकडे नेल्या. त्यांना सूरदास सापडले नाहीत. त्यांनी त्या पेट्या राजदरबारात आणल्या. बादशहाने पेटारे उघडायला सांगितले. नुसत्या गारगोट्या पाहून राजा संतापला. सेवकांनी राजास पत्र दाखवले. हे पत्र सूरदासाने नक्कीच स्वत: लिहिलेले आहे, याची त्याला खात्री पटली.

राजा म्हणाला, "खरोखरच सूरदास धन्य आहे. त्याच्या-सारखा नेक इन्सान मी कुठे पाहिला नाही. त्याने माझी सर्व संपत्ती सत्पात्री दान केली. मला संपत्तीचा फार गर्व होता. सूरदासाने माझ्या संपत्तीचा चांगला उपयोग करून माझे गर्वहरण केले आहे. जा! सूरदासांना अभय देऊन सन्मानाने राजदरबारी आणा."

बादशहाच्या सेवकांनी अखेर सूरदासांना शोधून आणले. ते मथुरेच्याच एका अरण्यात लपून बसले होते. त्यांना राजदरबारी आणले. भगवंताच्या लीलेचे त्याला आश्चर्य वाटले. त्यांनी भगवंताचे मनोमन आभार मानले. बादशहाने सूरदासांना भरपूर संपत्ती इनाम म्हणून दिली. मथुरेचे सर्व अधिकार त्यांना सुपूर्त केले. बादशहाने त्याला सन्मानाने निरोप दिला.

मथुरेत आल्यानंतर सूरदास कविता करू लागले. त्या कविता वाचून लोक हसत असत. सूरदास कवितेत म्हणत की, "मी संतांच्या पादुका वाहतो." लोक अशामुळे त्यांना हसत असत. सूरदास लोकांकडे मुळीच लक्ष देत नसत.

एका साधूने त्यांची परीक्षा घेण्याचे ठरवले. सूरदास 'जैसा बोले तैसा चाले' या उक्तीस पात्र आहे का, हे पाहण्याचे ठरवले. साधू सूरदासांना घेऊन देवळात गेले. आपल्या पादुका सूरदास मदनमोहनांकडे सुपूर्त केल्या. त्यांची परीक्षा पाहण्यासाठी साधू

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सकाळपासून रात्रीपर्यंत भजन करीत बसले. रात्री अचानक साधुमहाराज बाहेर आले. त्यांना पाहिल्या पाहिल्या सूरदासांनी त्यांच्या पादुका त्यांना बहाल केल्या.

साधूंनी सूरदासांना आशीर्वाद दिले व म्हणाले "तू खरोखर वैष्णव आहेस. तुझी निष्ठा पाहून मी धन्य झालो."

पुढे अनेक वर्षे सूरदास मदनमोहन हरिभजन करीत होते. त्यांना श्रीहरीने चतुर्भुज रूपाचे दर्शन दिले.

अध्याय ३७ वा

।। भक्त रसिकमुरार ।।

श्रोत्यांनो! आता मी तुम्हाला रसिकमुरार यांची कथा सांगणार आहे. यांचे निवासस्थान मथुरा प्रांतातील सायनगर येथे होते. यांची आपल्या गुरूंवर दृढ श्रद्धा होती. त्यांना देवाचे नामस्मरण व सत्संगती करण्यास खूप आवडे. ते ब्राह्मणांचा आदरसत्कार करीत असत. त्यांना महिन्यातून एकदा भोजन घालीत असत. वैष्णवांना ते ज्ञानोपदेश करीत असत. त्यांना खूप शिष्य होते.

त्यांनी एके दिवशी केलेल्या चमत्कारामुळे त्यांना रसिकमुरार असे नाव पडले. रसिकमुरार ब्राह्मणांच्या चरणकमलांचे तीर्थ प्राशन करीत असत. त्यांच्या हातून एके दिवशी ब्राह्मणांची सेवा करण्यास ते कमी पडले. तेव्हा गुरूंच्या आज्ञेनुसार त्या ब्राह्मणांची क्षमा मागून पुन्हा एकदा त्यांच्या चरणाचे तीर्थ प्राशन केले.

या रसिकमुरारांच्या गुरूंचे नाव होते दयार्णव. ते ब्रह्मज्ञानी होते. दयार्णव श्रीकृष्णाच्या मूर्तीची पूजा करीत असत. ते अतिशय दृढ श्रद्धेने पूजा करीत असत. त्यांना अनेक शिष्यगण होते. त्यांच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भक्तीवर प्रसन्न होऊन राजाने चार गावांचे वतन त्यांच्या नावे केले. त्यांनी या चारही गावांचा वसूल होणारा कर संतांच्या सेवेसाठी वापरला. दयार्णव दानशूर होते.

या दयार्णव गुरूंचा अत्यंत आवडता शिष्य रसिकमुरार होता. राजाने दिलेली चार गावे एका दुष्ट माणसाने पैशाच्या जोरावर बळकावली – त्या काळी भ्रष्टाचार होता, आजही आहे व उद्याही राहणार. दयार्णव चिडले. त्यांनी राजाकडे तक्रार केली पण राजाच त्यामध्ये सामील होता. दयार्णवांनी आपला लाडका शिष्य रसिकमुरार यांस पत्र लिहून बोलवून घेतले व त्या नालायक माणसाकडून आपल्या जमिनी परत घे अशी आज्ञा दिली. रसिकमुरारने त्यासाठी प्रथम गुरूंचा आशीर्वाद घेतला.

त्या दुष्ट माणसाकडे रसिकमुरार गेले. त्यांनी एका माणसाकडे आपले सामान-सुमान ठेवले. आपण या गावात का आलो आहोत, याचा हेतू रसिकमुरारांनी इतर लोकांना सांगितला. तेव्हा ते लोक म्हणाले, "अहो! तो माणूस वैष्णवद्रोही आहे. श्रीमंत आहे पण स्त्रीलंपट आहे. तो कोणाचेही ऐकत नाही. तुम्ही त्याच्याकडे जाऊ नका. त्याच्या मनावर काहीही परिणाम होणार नाही."

या लोकांपैकी एका मनुष्याने त्या दुष्ट माणसास सांगितले की, "रसिकमुरार बळजबरीने जप्त केलेली गावे व जमिनी घेण्यासाठी इकडे येत आहे. तुम्ही काहीतरी युक्ती करून स्वत:ला वाचवा. तो फार ताकदवान आहे. तुम्हाला ठार मारण्यास तो मागेपुढे पाहणार नाही."

ही बातमी कळल्यानंतर त्या दुष्ट माणसाने एक युक्ती केली. त्याने एका पहिलवानाला बोलावले. त्याला सांगितले की, "तू रस्त्यात हत्ती उभा कर. हत्तीस भरपूर मद्य पाज. त्यामुळे तो मदमस्त

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होईल. रसिकमुरार आला की त्याच्या अंगावर हत्ती सोडून दे. मी याबद्दल तुला दोन हजार सुवर्णमुद्रा इनाम म्हणून देईन."

पहिलवान या कामास तयार झाला. रसिकमुरार आपल्या अनेक आश्रमातल्या शिष्यमित्रांसमवेत बसले होते. सर्वजण देवाचे भजन करीत होते. लोकांनी रसिकमुरारांना सांगितले की, "अहो! त्या चांडाळाने तुम्हाला ठार मारण्यासाठी हत्ती आणला आहे. तो मदमस्त झाला आहे. त्यामुळे तुम्ही तेथे जाऊ नका. तुमचा जीव धोक्यात घालू नका."

रसिकमुरार म्हणाले, "हा देह दोन दिवसांचाच आहे. मनुष्यदेह जर चांगल्या कारणासाठी कारणी लावला तर काय वाईट? मला गुरूंनी आज्ञा दिली आहे. माझी गुरूंवर निष्ठा आहे. त्यामुळे जीव गेला तरी मला मुळीच पर्वा नाही."

हत्तीच्या दिशेने रसिकमुरार गेले. त्यांच्यासमोर अनेक लोक व मित्र होते. ते हत्तीस पाहून घाबरले. रसिकमुरार जरासुद्धा डगमगले नाहीत. ते आपल्या शिष्यमित्रांना म्हणाले, "अरे भित्र्या लोकांनो, मनुष्य देहावर एवढे प्रेम कशाला करता? गुरूंचा उपदेश ऐकून गुरूंसाठी देहत्याग केल्यास जन्माचे सार्थक होईल. नुसत्या गळ्यात माळा घालून काय उपयोग? तुम्हाला अजून ब्रह्मज्ञान झालेले दिसत नाही."

त्या सर्व शिष्यमित्रांनी आपल्या गळ्यातील तुळशीच्या माळा तोडून टाकल्या व आम्ही सद्गुरूंच्या आज्ञेपासून सुटलो असे म्हणाले.

रसिकमुरार प्रभूचे भजन करीत शांतपणे पुढे पुढे चालले होते. त्या पहिलवानाने रसिकमुरारांच्या अंगावर हत्तीस पिटाळले. आता रसिकमुरारांची काय दशा होणार, या भीतीने उपस्थित सर्व लोक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चिंताक्रांत झाले. तो हत्ती जोरात रसिकमुरारांच्या अंगावर धावला व आपल्या सोंडेने प्रथम त्याने वंदन केले. सर्व लोकांनी आश्चर्य व्यक्त केले. रसिकमुरारांनी मित्रांनी फेकून दिलेल्या तुळशीच्या माळा गोळा केल्या व हत्तीस घातल्या व हत्तीच्या कानात 'रामकृष्ण-नारायण-हरी-गोविंद-वासुदेव' असा मंत्रोपदेश केला. त्यांनी गजराजास सांगितले की, "पशूच्या जीवनातसुद्धा परमेश्वराचा ध्यास घेऊन तुला मुक्ती मिळेल. त्यामुळे आजपासून तुला एका साधूप्रमाणे जीवन जगायचे आहे. तुझ्यातला पशुपणा आता या क्षणापासून टाकून दे."

रसिकमुरारजींच्या सांगण्यानुसार तो हत्ती परमेश्वरास शरण गेला. त्यानंतर हत्तीस घेऊन तो त्या दुष्ट माणसाकडे गेला व त्याला म्हणाला की, "आमच्या गुरूंना मिळालेली चार गावे, जमिनी परत करा." त्या माणसाने सर्व गावे, जमिनीच्या सनदा परत केल्या.

तो हत्ती हरिकीर्तनात बेभान होऊन नाचत असे. रसिकमुरारजींच्या कीर्तनासाठी जमलेल्या प्रत्येकाला आपल्या सोंडेने हार घालीत असे व आशीर्वाद देत असे. कीर्तन संपल्यानंतर देवाची आरतीसुद्धा हत्तीच करत असे. सर्व आबालावृद्धांना या हत्तीचे कौतुक वाटत असे. हा हत्ती भागवताचे श्रवणसुद्धा करत असे.

रसिकमुरार व त्यांचे शिष्य जेव्हा तीर्थक्षेत्री जात तेव्हा हा हत्ती सर्व सामान आपल्या पाठीवर घेई व सर्वांचे संरक्षण करीत असे. ज्याच्या जिभेवर 'राम' ही दोन अक्षरे असतील त्यालाच फक्त तो हत्ती आपल्या जवळ येऊन देई. त्या हत्तीलासुद्धा पशू असून रामनामाचा महिमा कळला होता. काही मनुष्यप्राण्यांस रामनामाचा महिमा कळत नसे, याबद्दल रसिकमुरारजींना आश्चर्य वाटे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हे सर्व वैष्णव यात्रा करीत अरुणावतीस आले. तेथील राजाची राणी एकदा वेशीबाहेर दासींबरोबर फिरण्यास गेली होती. तिने तो हत्ती पाहिला. तिला तो हत्ती खूप आवडला. तिने राजाकडे त्या हत्तीसाठी हट्ट सुरू केला. राजाने सेवकांना त्या हत्तीस पकडून आणण्याची आज्ञा दिली.

राजाचे सैनिक तो हत्ती आणण्यासाठी गेले. तेव्हा त्या हत्तीने सैनिकांना पिटाळून लावले. ते सर्वजण हताश होऊन राजाकडे आले.

राजास कोणीतरी सांगितले की जो रामनामाचा जप करतो त्याला हत्ती काहीही करत नाही. राजाने सेवकांना बैराग्याचे रूप घेऊन रामनामाचे चिंतन करण्यास सांगितले. रामनामाचे चिंतन करीत ते सेवक हत्तीजवळ गेले. रामनामाचा ध्वनी ऐकू येत असल्यामुळे हत्ती स्तब्ध उभा होता. ही संधी साधून त्या सेवकांनी साखळदंडाने हत्तीस पकडले व राजदरबारातील हत्तीखान्यामध्ये नेऊन ठेवले. त्या हत्तीस पकडून नेताना सर्वजण फार दु:खी झाले होते. राजाच्या मर्जीपुढे रसिकमुरार व त्यांच्या मित्राचे काही चालले नाही.

आता आपल्याला सत्संगती मिळणार नाही, हरिकीर्तन ऐकण्यास मिळणार नाही, अरण्यात जाऊन मजा करता येणार नाही, यामुळे हत्तीने प्राणत्याग करण्याचे ठरवले. त्याने सतत सात दिवस उपाशी राहून गंगेच्या काठी पाणी पीत असताना प्राणत्याग केला. त्याला मुक्ती मिळाली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय ३८ वा

॥ संत मीराबाई ॥

श्रोतेजनहो! तुम्ही आतापर्यंत अनेक भक्तांच्या कथा श्रवण केल्या आहेत. आता मी तुम्हाला राजस्थान प्रांतातील एका स्त्रीभक्ताची कथा सांगणार आहे. या स्त्रीभक्ताचे नाव आहे मीराबाई.

भारतातील राजस्थान प्रांतामधील उदयपूर नगरात एक राजा राज्य करीत होता. त्याचे नाव होते राणा रतनसिंह. तो लक्ष्मीपती श्रीहरी विष्णूचा मोठा भक्त होता. त्याला विष्णूच्या दशावतारांच्या कथा ऐकण्यास खूप आवडत असे. त्याच्या घरी श्रीकृष्णाची एक मनोहर मूर्ती होती. या मूर्तीची पूजा राजा रोज करीत असे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीकृष्णास भोजन समर्पण केल्यानंतर राजा भोजनास सुरुवात करत असे.

या राजाची मीराबाई नावाची मुलगी फारच सुंदर होती. राजाचे तिच्यावर जीवापाड प्रेम होते. तिलासुद्धा श्रीकृष्णावर प्रेम करण्यास खूप आवडे. ती लहानपणापासून आपल्या वडिलांबरोबर, ते पूजा करत असताना बसत असे.

मीराबाई मोठी झाली. राजाराणीस मीराबाईंच्या विवाहाची चिंता वाटू लागली. त्यांनी वरसंशोधनास सुरुवात केली. आपल्यासाठी वरसंशोधन सुरू आहे, हे कळल्यावर मीराबाई पिताश्रींना म्हणाल्या, "पिताश्री! तुम्ही माझ्या लग्नाची काळजी करू नका. मी माझ्यासाठी वर पाहून ठेवला आहे. मी पसंत केलेला वर तिन्ही लोकांचा स्वामी आहे; त्याने कालियामर्दन केले आहे. त्याने कंसाला ठार मारले आहे, आपल्या मधुर बासरीवादनामुळे गोपींना आपलेसे केले आहे. असा सर्वशक्तीमान देवकीपुत्र श्रीकृष्णच माझा वर आहे. त्यालाच मी आयुष्यभर पती मानून त्याची पूजा करणार आहे. रात्रंदिवस माझ्या मनात मुरलीधराचेच चिंतन सुरू असते. मला या राजवाड्यात सर्वत्र द्वारकाधीशाचेच दर्शन होते. आपल्याकडे जी श्रीकृष्णाची मूर्ती आहे, त्याच्याबरोबर माझा विवाह लावून द्या. श्रीकृष्णाशिवाय मला कोणीही पती म्हणून स्वीकार नाही. श्रीकृष्णच हा माझा खऱ्या अर्थाने जीवनसाथी आहे. हा जीवनसाथी साधासुधा नाही. याचा सहवास मी जिवंत असताना तर लाभेलच; शिवाय परलोकीसुद्धा त्याचे प्रेम मला लाभेल."

आपल्या लाडक्या लेकीचे हे भाषण ऐकून राणा रतनसिंह मीराबाईंना म्हणाले, "अग! किती वेडी आहेस तू? या पाषाणाच्या श्रीकृष्णाच्या मूर्तीला तू पती मानतेस? हे काही नाही. तुझा विवाह

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मी एका सुंदर, शूर राजपुत्राबरोबर लावून देणार आहे.

मीराबाईंकडे अनेक साधुसंत येत असत. मीराबाई त्यांना सुग्रास भोजन देत असे. त्यांच्याबरोबर हरिकीर्तन करीत असत. मीराबाईंकडे एक सोन्याची मूर्ती होती. त्या सुवर्ण श्रीकृष्णाच्या मूर्तीसमोर मीराबाई एकतारी घेऊन भजन करीत असत.

दिवसांमागून दिवस जात होते. मीराबाईंचे वय वाढत होते. तरीही त्या लग्नास तयार नव्हत्या. लोक राजास याबद्दल विचारत होते. लोक मीराबाईंना नावे ठेवू लागली.

आपल्या लेकीबद्दल लोक काहीपण बोलत आहेत हे ऐकून राजाने आपल्या राणीस मीराबाईंचे मन वळवण्यास सांगितले. राणीने आपल्या मुलीस तू कोणत्यातरी राजपुत्राबरोबर लग्न करून संसार थाट असे सर्वप्रकारे समजावून सांगितले. पण मीराबाई आपल्या निश्चयावर अटळ होत्या.

आपली मुलगी ऐकत नाही हे पाहून राजास राग आला. त्याने मुलीस विष देऊन ठार मारण्याचे ठरवले. त्याने आपल्या पत्नीच्या हातून मुलीस विष देण्याचे ठरवले. राजाने आपल्या राणीस बोलावले व सांगितले की, "हा विषाचा पेला घे व मीरेकडे जाऊन तिला ते प्राशन करण्यास सांग. स्वत:ला फारच शहाणी समजतीय. आता जा म्हणावे स्वर्गात आणि तिथेच श्रीकृष्णाची पूजा करत बस."

आपल्या पतीची आज्ञा मानून राणी मीरेकडे गेली. तिचा हात थरथर कापत होता. मीरा आईस म्हणाली, "हे माते! मला विष देताना तू मुळीच संकोच करू नकोस. मनुष्यदेह हा तर आज ना उद्या नष्ट होणारच. मी माझे आयुष्य श्रीकृष्णाच्या चरणी अर्पण केलेले आहे. मला या क्षणभंगुर संसारात मुळीच रस नाही. संसारात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुलेबाळे निर्माण करून आपले आयुष्य त्यांच्यापायी कशाला फुकट घालवायचे. त्यापेक्षा अविवाहीत राहून श्रीकृष्णाचे भजन केले तर मुक्ती मिळेल."

विषाचा पेला मोठ्या आनंदाने मीराबाईंनी आपल्या मातेकडून घेतला. त्या श्रीकृष्णाच्या मूर्तीसमोर उभा राहिल्या व श्रीकृष्णास म्हणाल्या, "मी केलेली आजपर्यंतची सेवा तू गोड मानून घेतलीस त्याबद्दल मी आभारी आहे. माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे. मला तुझ्याबरोबर विवाह करायचा होता; पण जन्मदात्या पित्यास हे मान्य नाही. मी ऐकत नाही त्यामुळे त्यांनी मला विष पाठवले आहे. मी मृत्यु पावल्यानंतर तुझी पूजा कोण करणार बरे?" मीराबाईंनी तो विषाचा पेला नैवेद्य म्हणून श्रीकृष्णास दाखवला. ते पाहून राजाराणीस आश्चर्य वाटले.

मीराबाईंनी आंब्याच्या रसाप्रमाणे ते विष पटापट प्राशन केले. त्यांना ते विष गोड लागले. विषप्राशनानंतर श्रीकृष्णाची पिवळीधमक मूर्ती हळूहळू हिरवी होऊ लागली. ते सर्व पाहण्यासाठी प्रचंड जनसमुदाय जमला.

राजास ते पाहून पश्चात्ताप झाला. तो म्हणाला, "मी साक्षात् सुदर्शनधारी श्रीकृष्णास विष पाजले. माझ्या हातून फार मोठे पाप घडले आहे. माझ्याच मुलीची श्रीकृष्णावरील दृढ भक्ती माझ्या लक्षात आली नाही. तिला मी खूप छळले. किती दुष्ट आहे मी!"

मीराबाईंना त्या मूर्तीचा बदललेला रंग पाहवेना. त्यांनी श्रीकृष्णास प्रश्न केला की, "मी एवढेसे विष प्याल्याने तुझा रंग कसा काय बदलला? कालिया नागाने विषाचा पाऊस तुझ्यावर पाडला तरी तुझ्यावर काही परिणाम झाला नाही. त्यामुळे तू पूर्ववत हो. तुझे ते मनोहर रूप मला पुन्हा पाहावयाचे आहे."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मीराबाईंची ही करूण प्रार्थना ऐकताच श्रीकृष्णाची मूर्ती पुन्हा पूर्ववत झाली. या गोष्टीचे सत्य भविष्यकाळात लोकांना पटावे म्हणून थोडा हिरवा रंग शिल्लक राहिला.

मीराबाईंची राणा रतनसिंगने माफी मागितली. आपल्या कुळाचा उद्धार केला म्हणून मीराबाईंना जवळ घेतले. त्यांच्या आईने मीराबाईंचे प्रेमाने चुंबन घेतले. त्यांच्या घरी ती श्रीकृष्णाची मूर्ती अजूनही आहे.

पुढे मीराबाईंनी श्रीकृष्णावर अनेक पदे हिंदी भाषेत लिहिली. ही पदे आज सर्व भारतभर आनंदाने गायली जातात.

अध्याय ३९ वा

।। संत कान्होपात्रा ।।

श्रोत्यांनो! आपण पंढरपुरातील अनेक भक्तांच्या कथा श्रवण केल्या. आता पंढरपुरापासून सात कोसांवर असलेल्या मंगळवेढा या गावातील एका स्त्रीभक्ताची कथा पाहू या.

या मंगळवेढा गावात श्यामा नावाची एक गणिका राहत होती. तिला एक मुलगी झाली. तिने तिचे नाव कान्होपात्रा असे ठेवले. ती दिसायला फारच सुंदर होती. जणू काही चंद्राचा तुकडाच. तिच्या आईने तिला लहानपणापासून नृत्य, गायन इ. चे बाळकडू दिले.

कालांतराने कान्होपात्रा तरुण झाली. आपल्या आईप्रमाणे तिने धंदा सुरू केला. ती तारुण्यात अधिकच खुलून दिसत होती. तिचे ते लावण्य पाहून स्वर्गातील रंभा, मेनका, उर्वशी, अप्सरा तिच्यावर जळत असत. सोळा हजारांत देखणी स्त्री म्हणून लोक कान्होपात्रेचा उल्लेख करीत असत. कान्होपात्रेचा नाच पाहण्यासाठी लोकांना

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बसायला जागा मिळत नंसे. सर्व पुरुषांना ती कायम आपल्या डोळ्यासमोर असावी असे वाटत असे.

एके दिवशी कान्होपात्रेची आई म्हणाली, "कान्होपात्रा, चल आज आपण राजदरबारात जाऊ. तुझे तारुण्य, नृत्य, गायन पाहून राजा खूश होईल व आपल्याला मालामाल करेल. त्याच्याजवळ खूप वैभव असल्यामुळे तो तुला पट्टराणीपण बनवू शकेल! त्यामुळे तुझे भाग्य उजळेल. तुला असले घाणेरडे धंदे करावे लागणार नाहीत." यावर कान्होपात्रा म्हणाली, "आई! मला कोणत्याही पुरुषाशी लग्न करून बंधनात अडकायचे नाही. मला स्वच्छंदपणे जीवन जगावेसे वाटते. त्या राजाकडे मला जाण्याची इच्छा नाही."

एके दिवशी कान्होपात्रा दारात उभी होती, तेव्हा तिला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वैष्णवांचा मेळा पंढरपूरच्या यात्रेसाठी जात असताना दिसला. त्यांच्या हातात भगव्या पताका होत्या, मुखामध्ये विठ्ठलाचे नामस्मरण सुरू होते. महिलांच्या डोक्यावर तुळशीवृंदावने होती. सर्वजण आनंदाने नाचत होते. हे पाहून कान्होपात्रेला खूप आनंद झाला. ती पळत पळत गेली व वैष्णवांच्या पाया पडली.

कान्होपात्रेने त्या वैष्णवांना विचारले की, "आपण सर्वजण कुणीकडे चालला आहात?" यावर ते वैष्णव म्हणाले, "आम्ही रुक्मिणीपती भक्तवत्सल श्रीविठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला चाललो आहोत."

कान्होपात्रेने त्या विठ्ठलाचे वर्णन सविस्तर सांगा अशी विनंती केली. वैष्णव म्हणाले, "हा पंढरीनाथ विठ्ठल अठ्ठावीस युगांपासून उभा आहे. 'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी। कर कटावरी ठेवोनिया' असे त्याचे वर्णन आहे. त्याचे तेज दिव्य आहे. त्याच्या दर्शनामुळे आपली अनेक जन्मांची पापे नष्ट होतात. त्याच्या गळ्यात तुळशीची माळ असते. त्याच्या दर्शनामुळे मनुष्य देहभान विसरून जातो. सूर्य, चंद्र, तारे यांना श्रीविठ्ठलच प्रकाश देतो. अजून आम्ही काय सांगू? त्याचे वर्णन करताना सहस्त्रमुखी शेषनागसुद्धा थकला होता." कान्होपात्रा म्हणाली, "मी वेश्या आहे. मी आतापर्यंत कधीही देवास पूजले नाही. मला आता त्या विठ्ठलाकडे जायचे आहे. तो मला स्वीकारील काय?"

यावर वैष्णव म्हणाले, "अहो! तो रुक्मिणीपती भावाचा भुकेला आहे. जसा भाव असतो तसा देव त्याला प्राप्त होतो. तो जातपात वगैरे काही पाहत नाही. आपल्या भक्ताचे अंत:करण किती शुद्ध आहे, याचे तो परीक्षण करतो. तो अनंत कृपेचा सागर आहे. तो भीमानदीच्या तीरावर भक्तांना मिठी मारण्यासाठी उभा आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याने चोखामेळा, कुब्जा, अजामिळ, रोहिदास, सेनामहाराज यांनासुद्धा आपलेसे केले.''

हे सर्व सांगितल्यानंतर कान्होपात्रेने आपल्या मातेची परवानगी काढून पंढरपूरास प्रयाण केले. ती संतांबरोबर विठ्ठलाच्या गाभाऱ्यात गेली व विठ्ठलाला साष्टांग नमस्कार घालून, 'तुझी कृपा सदैव माझ्यावर असू दे!' अशी तिने प्रार्थना केली. ती पुढे पंढरपुरामध्येच राहू लागली. ती विठ्ठलनामात दंग झाली.

एके दिवशी कोणीतरी बेदरच्या बादशहाला या सुंदर स्त्रीबद्दल सांगितले. तो बादशहा स्त्रीलंपट होता. त्याने सेवकांना त्या कान्होपात्रेस पकडून आणा अशी आज्ञा दिली. राजाच्या आज्ञेवरून ते पंढरपुरातील महाद्वारात आले. तेथे कान्होपात्रा कीर्तन करीत होती. ते शिपाई तिला म्हणाले, ''हे सुंदरी! आमच्याबरोबर निमूटपणे चल. तुझ्या मुसमुसलेल्या तारुण्यावर आमचे बादशहा खुश झाले आहेत. त्यांनीच तुला बोलावले आहे. जर तू आली नाहीस तर तुला पकडून नेण्यात येईल.''

बादशहाच्या हुकुमामुळे कान्होपात्रा भ्याली. तिने प्रसंगावधान राखले व सेवकांना तेथेच थांबण्यास सांगून, ती विठ्ठलाकडे गेली. ती विठ्ठलास म्हणाली की, ''मला आता तुझ्यात सामावून घे. मी त्या दुष्ट बादशहाच्या हाती लागता कामा नये. मला आता या जीवनात रस नाही. सर्व पुरुष माझ्याकडून उपभोगाची अपेक्षा करतात. मला तुझे चिरंतर प्रेम हवे आहे. घे लवकर मला! मी तुझी लाडकी भक्त आहे ना! आता वेळ नको घालवूस.''

कान्होपात्रेची ही प्रार्थना ऐकून विठ्ठलाने कान्होपात्राची प्राणज्योत आपल्यात सामावून घेतली. तिने विठ्ठलाच्या चरणापाशी प्राणत्याग केला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

खूप वेळ झाला तरी कान्होपात्रा बाहेर का आली नाही, म्हणून शिपायांना आश्चर्य वाटले. तेवढ्यात पुजारी बाहेर आले. पुजाऱ्याने सांगितले की कान्होपात्रा विठ्ठलास प्रिय झाली आहे. शिपायांना ते खरे वाटले नाही. त्यांनी पुजाऱ्यास पकडून बादशहासमोर हजर केले.

पुजाऱ्याने बादशहाला प्रथम प्रसाद दिला. त्या प्रसादात एक केस निघाला. तेव्हा बादशहास क्रोध आला. त्या पुजाऱ्याने हा देवाचा केस आहे असे सांगितले.

कान्होपात्रा मंदिरातून विठ्ठलाच्या चरणी कशी लीन झाली? अशी चौकशी करण्यासाठी बादशहा जातीने पंढरपुरास आला. प्रत्यक्ष विठ्ठल आपल्याला सर्व काही सांगेल अशी पुजाऱ्याला आशा वाटली. पंढरपुरात आगमन झाल्यानंतर विठ्ठलाचे ते सावळे मनमोहक रूप पाहून बादशहाला खूप आनंद झाला. त्याच्या मनातील सर्व शंका नाहिशा झाल्या. त्याने विठ्ठलास साष्टांग नमस्कार घातला. पुजाऱ्याने त्याला विठ्ठलाचा महिमा सांगितला. कान्होपात्रेचा देह दक्षिणद्वारी पुरण्यात आला. याप्रमाणे कान्होपात्रा भक्तांमध्ये अजरामर झाली.

अध्याय ४० वा

॥ भक्त दामाजी ॥

श्रोत्यांनो! आता मी तुम्हाला मंगळवेढ्यातील दामाजीपंत यांची कथा सांगणार आहे. दामाजीपंत एका राजाकडे वसूल गोळा करण्यासाठी नोकरीस होते. राजाचा दामाजींवर खूप विश्वास होता.

दामाजी आलेल्या सर्व याचकांना भोजन देत असत. अन्नदान

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

व नामस्मरण अशा दोन्ही गोष्टी एकाच वेळी सुरू असत. एके वर्षी सर्वत्र कोरडा दुष्काळ पडला. पंढरपुरातही दुष्काळ पडला होता. कोणालाही अन्नपाणी मिळेना. सर्वजण अन्नासाठी दाही दिशा हिंडत होते. पंढरपुरातील एका माणसाला दामाजींचे नाव माहीत होते. त्यांच्याकडे नक्कीच आपल्याला अन्न मिळेल या खात्रीने दामाजी-पंताकडे तो माणूस गेला.

दामाजींनी त्याला जेवायला वाढले. पहिला घास तोंडात घालणार; इतक्यात तो रडू लागला. दामाजींनी त्याच्या दु:खाचे कारण विचारले. तो म्हणाला, "माझ्या घरी कुटुंब आहे. माझी बायको, मुले उपाशी आहेत. मी इथे एकटाच जेवायला बसलो आहे. त्यांना जेवण न देता मी जेवण करणे अत्यंत निंदनीय आहे. कारण मीच कुटुंबप्रमुख आहे. तिकडे कोरडा दुष्काळ पडला आहे."

दामाजीपंत म्हणाले, "अहो! तुम्ही काहीही काळजी करू नका. तुमच्या कुटुंबास एक वर्षभर अन्नधान्य पुरेल एवढा साठा मी तुमच्या घरी पाठवण्याची व्यवस्था करतो.

दोन खंडी धान्य घेऊन तो माणूस आपल्या घराच्या दिशेने चालू लागला. गावात आल्यानंतर तेवढे धान्य पाहून सर्व लोकांना आश्चर्य वाटले. त्यांनी त्यास विचारले की, "एवढा धान्याचा साठा तुला कोठे मिळाला ?" तेव्हा त्याने मंगळवेढ्यातील दामाजीपंताचे नाव सांगितले.

गावातील सर्व लोक दामाजींकडे गेले. ते सर्वजण भुकेने व्याकूळ झालेले होते. त्या सर्वांनी दामाजींना आम्हाला पण अन्नधान्य दान करावे अशी विनंती केली. त्यांनी सर्वांना अन्नधान्य देतो म्हणून सांगितले. लोक जास्त होते वा त्यांच्याकडचा अन्नधान्याच्या साठा कमी पडत होता. त्यामुळे त्यांनी आपल्या प्रिय

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पत्नीस सांगून बादशहाची धान्याची कोठारे सर्वांसाठी खुली केली. सर्वांनी हवा तेवढा, भरपूर अन्नधान्याचा साठा घेतला. आजुबाजूच्या गावातील लोकसुद्धा अन्नधान्य घेण्यासाठी गर्दी करू लागले.

आपली कोठारे सर्वांना उपलब्ध करून दिली म्हणून राजाला खूप राग आला. राजाने दामाजींना बोलावून घेतले व धान्याची कोठारे लोकांना का उपलब्ध करून दिली, याचे कारण विचारले. दामाजींनी सर्व काही सांगितले. राजाने दामाजींचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली. त्यांनी शिरच्छेद करण्यापूर्वी विठ्ठलास भेटण्याची विनंती केली.

राजाने ती विनंती मान्य केली. दामाजी विठ्ठलाकडे गेले. त्यांनी विठ्ठलाच्या चरणांना मिठी मारली व रडू लागले. म्हणाले, "हे विठ्ठला! माझ्या हातून मोठा अपराध झाल्याने राजा माझा शिरच्छेद करणार आहे. आता ही आपली शेवटची भेट. तुला डोळे भरून पाहण्यासाठी मी इथे शेवटचा आलो आहे."

आपल्या लाडक्या भक्तावर संकट आले म्हणून विठ्ठल धावून आला. विठ्ठलाने आपला वेष पालटला व तो राजाकडे आला. राजास विठ्ठलाने प्रथम मुजरा केला व तो म्हणाला, "मी मंगळवेढ्याचा विठू नाईक आहे. दामाजींच्या घरी मी नोकर आहे." स्वत:च लिहिलेली चिठ्ठी राजास दाखवली. ही चिठ्ठी दामाजीपंताने दिली आहे, असे मुद्दाम सांगितले. त्या चिठ्ठीत लिहिले होते की, "कोठारातील सर्व धान्य मी लोकांना फुकट दिले नाही. ते मी लोकांना विकले. त्यामुळे ते धान्य विकून आलेले पैसे मी पाठवत आहे."

राजाने विठू नाईकाबरोबर आणलेले द्रव्य मोजण्यास

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सांगितले. प्रधानाने द्रव्य मोजायला सुरुवात केली. पोत्यातील द्रव्य संपतच नव्हते. प्रधानाचा हात दुखू लागला, तेव्हा राजाने पुरे म्हणून सांगितले व ते दरबारी जमा करा म्हणून सांगितले. राजाने पैसे मिळाले म्हणून पावती दिली. तसेच दामाजीपंतांना मान म्हणून हत्ती, घोडे, सोन्याची नाणी, वस्त्रे, अलंकार इ. भेटवस्तू दिल्या. मंगळवेढ्याचे सर्व अधिकार दामाजीपंतास दिले.

दामाजीपंतांना याबद्दल काहीच माहीत नव्हते. फाशी घेण्यासाठी दामाजीपंत पुन्हा दरबारी आले. तेव्हा राजाने त्यांची क्षमा मागितली व म्हणाला, "आत्ताच तुमच्या नोकराने आम्हाला पैसे आणून दिले. तुमचा देहदंड आम्ही माफ केला आहे."

दामीजींनी ओळखले की, हे सर्व विठ्ठलाचेच काम आहे. त्यांनी विठ्ठलाचे आभार मानले. आपल्यामुळे विठ्ठलास नोकराचे रूप घ्यावे लागले, याचे त्यांना वाईट वाटले.

दामाजी व विठू नाईक पुन्हा घरी परतले. दामाजीला घरी सोडून विठू नाईक उर्फ विठ्ठल अंतर्धान पावला.

दामाजींनी बक्षीस म्हणून दिलेले सर्व काही गोरगरिबांना दान केले व स्वत: पंढरपुरास येऊन ते विठ्ठलाची आयुष्यभर पूजाअर्चा करत राहिले.

अध्याय ४१ वा

॥ शांत ब्राह्मणी राजाची कथा ॥

बिदरला एक राजा राज्य करीत होता. त्या राजाचे नाव होते शांत ब्राह्मणी. तो स्वभावाने अत्यंत सात्त्विक व प्रजादक्ष होता. राज्य करत असताना त्याला वैराग्य कसे प्राप्त झाले? याची कथा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

आपण आता पाहू या.

एके दिवशी राजा आपल्या राणीसह एकांतात माडीवर बसला होता. ते फलाहार करीत होते. त्यांनी केळी खाल्ली व त्याच्या साली चौकात टाकून दिल्या. त्या केळ्यांच्या साली एक भिकारी खाऊ लागला. त्या भिकाऱ्यास राजाच्या शिपायांनी पकडले व राजाकडे आणले. राजाने शिपायांस त्याला बडवायला सांगितले. शिपायांनी त्या भिकाऱ्यास बडवायला सुरुवात केली. तेव्हा तो भिकारी हसू लागला. राजाने भिकाऱ्यास तू का हसतोस? असे विचारले. तेव्हा तो भिकारी म्हणाला की, "मी फक्त केळीच्या साली खाल्ल्या, म्हणून मला एवढे बदडले जात आहे, तर केळी खाणाऱ्याची पुढे काय अवस्था होईल? सजीव प्राण्याची शिकार करून जे प्राणी खातात त्यांचीसुद्धा पुढे वाईट अवस्था आहे."

भिकाऱ्याच्या या बोलण्यामुळे त्या राजाचे डोळे खाडकन् उघडले. त्याने आपल्या राज्याचा, बायकामुलांचा त्याग केला व अरण्यात जाऊन तो तपश्चर्या करू लागला. त्याला कळले की, सद्‌गुरूंची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे तो सद्‌गुरू शोधू लागला. तेवढ्यात त्याला पंढरीस निघालेली दिंडी दिसली. त्या दिंडीमध्ये सामील होऊन तो पंढरपूरला गेला.

राजा पंढरपुरास आला. विठ्ठलाची सावळी मूर्ती पाहून राजाच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. तो देवास म्हणाला, "विठ्ठला! मला तुझ्या स्वरूपाचे ज्ञान करून देणारा सद्‌गुरू हवा आहे. तो सद्‌गुरू तूच मला शोधून दे. जोपर्यंत तू मला सद्‌गुरूंची भेट करून देणार नाहीस, तोपर्यंत मी इथेच बसून राहणार आहे."

सलग तीन दिवस शांत ब्राह्मणी राजा अन्नपाण्यावाचून बसून राहिला होता. त्याच्या मनातील सद्‌गुरूंचा ध्यास पाहून श्रीहरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विष्णु त्याच्या स्वप्नात गेला व म्हणाला, "वत्स! हा विवेकसिंधु ग्रंथ तू घे. याचा तुला खूप उपयोग होईल. तू कल्याणला जा. तेथे असलेले स्वामी सहजानंद तुला सद्‌गुरू म्हणून लाभतील. तेच तुला दिव्य उपदेश देतील."

राजा उठला. त्याने इकडेतिकडे पाहिले, तेव्हा कोणीही दिसले नाही. विवेकसिंधुचे पुस्तक मात्र दिसले. विवेकसिंधु पुस्तकाचे तो वाचन मनन करू लागला. कल्याणला तो स्वामी सहजानंद यांना भेटण्यासाठी गेला; पण स्वामी त्याला भेटले नाहीत म्हणून तो पुन्हा आपल्या घरी आला. तो नंतर पंढरपूरला गेला. तेथे सहजानंदांची भेट झाली. त्यांनी नाममंत्र दिला व त्या राजाचे नाव बदलून मृत्युंजय असे ठेवले. नारायणपूरला त्याने साधना करण्यास सुरुवात केली. तेथेच त्याला साक्षात्कार झाला.

एका साधकाने त्या मृत्युंजयाकडून उपदेश घेतला. त्या दोघांमध्ये समुच्चय नावाच्या एका साधकाने फूट पाडली. समुच्चयाने त्या साधकास वाळीत टाकले. त्याने मृत्युंजयाकडे न्याय मागितला. मृत्युंजयाने सांगितले की, "तू समुच्चयाकडे लक्ष देऊ नकोस. तू आपले नामस्मरण करत बस."

काशिपाती नावाचा एक राजा होता. त्याच्याकडे अपार वैभव होते. तो खूप अन्नदान करीत असे. तो रोज हजारो जंगमांना भोजनास बोलवून त्यांना दक्षिणा देत असे. त्याने एके दिवशी नेमाप्रमाणे हजारो जंगमांना भोजन करण्यास बोलावले होते. त्यांच्याजवळ रुमालात बांधलेली शिवलिंगे होती. प्रथम त्या शिवलिंगास नैवेद्य दाखवून मग भोजन करावयाचे, असा त्यांचा नियम होता. हजारो जंगम हा नियम पाळत असत. या जंगमांची शिवलिंगावर दृढ श्रद्धा होती. सर्व पदार्थ वाढून झाले. ते हजारो

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

जंगम देवास नैवेद्य दाखवू लागले. पण त्या सर्वांना आपापले शिवलिंग दिसेना. एवढी हजारो शिवलिंगे कशी काय अदृश्य झाली हे समजेना. त्या सर्व जंगमांना गुरूंनी मंत्रोपदेश देऊन ती शिवलिंगे दिलेली होती व ती जीवापाड सांभाळण्यास सांगितली होती.

काशिपती राजा म्हणाला की, "तुमच्या हजारो जंगमांपैकी कोणीतरी साधूंचा छळ केला आहे. त्याचे परिणाम सर्वांना भोगावे लागत आहेत." ते हजारो जंगम एकमेकांकडे पाहू लागले; तेव्हा समुच्चय जंगम उठला व त्याने मी एका साधूचा छळ केला असल्याचे मान्य केले. त्यामुळे उमापती आपल्यावर चिडले आहेत हे त्याने ओळखले. राजाने समुच्चय जंगमास मृत्युंजयाकडे जाण्यास सांगितले.

मृत्युंजयाकडे सर्वजण आले व म्हणाले की, "आमच्या प्रत्येकाचे एक-एक शिवलिंग हरवले आहे. अचानकपणे आमची हजारो शिवलिंगे गायब झाली आहेत."

मृत्युंजय म्हणाले, "तुम्ही काही चिंता करू नका. माझ्याजवळ असलेल्या वेदान्त व सिद्धान्त या दोन श्वानांनी तुमची शिवलिंगे गिळलेली असतील असे मला वाटते." त्याने त्या कुत्र्यांस बोलावले. त्यांनी त्यांच्या तोंडातून पाच-पाच हजार शिवलिंगे बाहेर टाकली. आपले शिवलिंग नेमके कोणते आहे, हे काही कोणाला कळेना. तेव्हा प्रत्येकाने 'ॐ नमः शिवाय' चा जप सुरू केला, तेव्हा प्रत्येकाची शिवलिंगे प्रत्येकाकडे गेली.

त्यानंतर आपापला नैवेद्य शिवलिंगास दाखवून त्यांनी भोजनास प्रारंभ केला. दोन जंगमांनी एकमेकांना आलिंगन देऊन वैरभाव मिटवून टाकली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय ४२ वा

॥ संत भानुदास ॥

यापूर्वीच्या अंध्यायात आपण मृत्युंजयाची कथा श्रवण केली. या अध्यायात आपण भानुदासाची कथा श्रवण करा.

पैठण येथे एका सूर्योपासक ब्राह्मणाचे वास्तव्य होते. निष्ठावंत अशा त्या ब्राह्मणाला सूर्योपासनेमुळे एक पुत्ररत्न प्राप्त झाले. त्या ब्राह्मणाचा आनंद गगनात मावेना. तो पुत्र लहानाचा मोठा झाला. एके दिवशी वडिलांबरोबर फिरायला गेलेला असता तो रस्ता चुकला. खूप प्रयत्न केल्यानंतर तो सापडला. घरी आल्यानंतर आईवडिलांनी त्याची खरडपट्टी काढली. यामुळे भिऊन तो मुलगा घर सोडून पळाला. तो एक सूर्यनारायणाची मूर्ती असलेल्या देवळात लपून बसला. तेथे सूर्यनारायणाने त्याची भक्ती पाहून त्याचे संरक्षण केले. त्याने ब्राह्मणाचे रूप घेतले व त्या मुलास उठवून एक पेला दूध पिण्यास दिले. त्या मुलास तो सूर्यनारायणरूपी ब्राह्मण म्हणाला. "भिऊ नकोस! मी तुझ्या पाठीशी आहे. सदैव 'पांडुरंग हरी, वासुदेव हरी' असा जप करीत जा. तुझ्यावर कोणतेही संकट आले तर मी तुझ्या मदतीस असेन." असे बोलून तो ब्राह्मण अदृश्य झाला.

इकडे त्याच्या घरातील सर्वजण त्याचा सर्वत्र शोध घेऊ लागली. सात दिवस झाले तरी तो मुलगा सापडण्याची लक्षणे दिसेना. त्याची आई काळजी करून करून तापाने फणफणली. त्याचा एक मित्र त्या सूर्यमंदिरात गेला होता. तेथे त्याने त्या मुलास पाहिले. त्याने ताबडतोब त्याच्या आईवडिलांना सांगितले की, "अहो! तुमच्या मुलगा सूर्यमंदिरात लपून बसला आहे. तुम्ही तेथे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सावधपणे जाऊन त्याची समजूत काढून त्याला घेऊन या. लवकर जा."

त्या मुलाचे आईवडील व इतर लोक त्याला घरी आणण्यासाठी देवळात गेले. तेथे तो झोपला होता. त्याच्या आईने त्याला उठवले. त्याचे प्रेमाने मुके घेतले व इतके दिवस तू कसे काढलेस? याबद्दल सर्वकाही विचारले. त्याने स्पष्टपणे सांगितले की, "तुम्ही मला खूप रागावला, त्यामुळे मी येथे पळून आलो. पण आता जर तुम्ही रागावलात तर मी गावच सोडून जाईन." आईवडिलांनी ते मान्य केले.

सर्व लोकांच्या संमतीने त्या मुलाचे नाव भानुदास असे ठेवण्यात आले. सूर्याप्रमाणे त्याचा चेहरा अत्यंत तेजस्वी होता. तो बुद्धिवानसुद्धा होता. लहानपणापासून त्याने अनेक संस्कृत श्लोकांचे पाठांतर केले होते.

अत्यंत लाडात भानुदासांचे बालपण गेले. तारुण्यात पदार्पण केल्यानंतर एका मुलीबरोबर त्यांचे लग्न लावून दिले. भानुदासांचे सर्व लक्ष विठ्ठलाच्या चरणांकडे लागले होता. त्यांना सर्व संसार तुच्छ वाटत होता. सदैव मुखामध्ये 'विठ्ठल,विठ्ठल, जय हरी विठ्ठल' असा नामघोष सुरू असे. यामुळे त्यांच्या कुटुंबाचा पोटापाण्याचा प्रश्न उभा राहिला.

भानुदास काहीही करत नाहीत, हे पाहून काही व्यापारी मंडळींनी व मित्रांनी त्याला कापड विकत घेण्याकरिता शंभर रुपये दिले. ते कापड विकून नफा मिळवून हळूहळू धंदा सुरू करण्यास सांगितले. त्या व्यापारी लोकांनी भानुदासांना बरोबर घेतले व बाजारात गेले. तेथे कापडविक्री कशी करावी, याचे ज्ञान त्यांला दिले. त्यांना धंद्याची भाषा कळली. व्यापारीमित्रांनी सांगितले की,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

"धंद्यात खोटे बोलावेच लागते त्याशिवाय गत्यंतर नाही." हे भानुदासांनी ऐकले व ते म्हणाले की, "मी सूर्योपासक आहे. मी काहीही झाले तरी खोटे आयुष्यात बोलणार नाही. आता धंद्यासाठी खोटे बोलून मी मेल्यानंतर खोटे बोललेल्या पापाचे चित्रगुप्तास काय उत्तर देऊ?"

त्यांच्याजवळ अनेक व्यापारी बसलेले असत. गिऱ्हाईक जेव्हा कापडाचा भाव विचारत असे, तेव्हा ते कमी भाव सांगत. तसेच मी यात किती पैसे कमावतो हे पण सांगत. यामुळे लोक त्यांना वेड्यात काढत असत. काही दिवसांनी श्रीरामाप्रमाणे एकवचनी असणाऱ्या भानुदासांकडे सर्व गिऱ्हाईक येऊ लागले. भानुदासांचे खिसे नोटांनी भरून वाहू लागले. इतर व्यापाऱ्यांचा धंदा यामुळे बसला. सर्व व्यापारी हताश होऊन भानुदासाच्या दुकानाकडे पाहत बसू लागले.

त्यांच्याविरुद्धच्या सर्व व्यापाऱ्यांनी भानुदासांचा काटा कसा काढावयाचा, हे ठरवले. ते संधीची वाटच पाहत होते. एकदा ते सर्वजण घोड्यांवर कापडांची ओझी लादून प्रवासासाठी निघाले. प्रत्येक व्यापाऱ्याकडे घोडा व कापडाचे गठ्ठे होते. वाटेमधील एका निसर्गरम्य गावात त्यांनी तळ ठोकला. त्या गावामध्ये एक हरिकीर्तनोत्सव होता. यामध्ये अनेकांची कीर्तने, प्रवचने, व्याख्याने होती. भानुदासांना रात्रीचे कीर्तन ऐकण्यासाठी जायचे होते. ते आपल्या व्यापारी मित्रांना म्हणाले की, "आज एक मोठे महाराज कीर्तनासाठी येणार आहेत. मला त्यांचे सुश्राव्य कीर्तन ऐकण्यासाठी जायचे आहे. त्यामुळे तुम्ही माझा घोडा व कपड्यांचे गठ्ठे सांभाळणार का?"

भानुदासांच्या सर्व व्यापारीमित्रांनी हे करण्यास नकार दिला. ते म्हणाले की, "तू कीर्तनात हे सर्व घेऊन जा. आम्ही काय तुझे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नोकर आहोत ? आम्हाला तुझे सामान सांभाळण्याची हौस नाही." भानुदासाने विठ्ठलाचे मनोमन स्मरण केले आणि त्याला सामान व घोड्याचे संरक्षण करण्यास सांगितले. भानुदास कीर्तन ऐकण्यास निघून गेले.

इकडे भानुदास कीर्तनास गेल्यानंतर त्यांचा घोडा व्यापाऱ्यांनी सोडून दिला. त्याला पिटाळून लावले. त्यांच्या कापडाचे सर्व गठ्ठे एक मोठा खड्डा खणून त्यात टाकले. आणि म्हणाले, "आता आपण सर्वजण निवांत झालो. त्या भानुदासाने आपल्या सत्यवक्तेपणाच्या जोरावर सर्व गिऱ्हाईकांना आपल्याकडे वळवले. आता याचे सर्वस्व गेल्यामुळे आपल्या धंद्यात खूप फायदा मिळेल."

पंढरीनाथास हे सर्व आवडले नाही. आपल्या भक्तावर संकट आल्याचे त्याने जाणले. त्याने ब्राह्मणाचे रूप घेतले व भानुदासाचा बाजारात भटकत असलेला घोडा पकडून ठेवला. इकडे त्या व्यापाऱ्यांच्या तळावर सशस्त्र दरोडेखोरांनी दरोडा घातला. सर्वांना बंदुकीचा धाक दाखवून त्यांचा सर्व माल, घोडे, गळ्यातील सोन्याच्या साखळ्या व पैसे सर्व काही लुबाडून नेले. ते सर्व व्यापारी मोठमोठ्याने ओरडू लागले. त्यांनी अनेकांना मदतीसाठी बोलावले पण कोणीही मदतीला आले नाही.

कीर्तन संपल्यानंतर भानुदास आपल्या मुक्कामी येऊ लागले. तेव्हा त्यांना बाजारातून येताना कोणीतरी आपलाच घोडा धरून ठेवला असल्याचे दिसले. त्यांनी जवळ येऊन पाहण्याचा प्रयत्न केला; पण तेवढ्यात तो ब्राह्मणरूपी विठ्ठल अंतर्धान पावला. भानुदासांना याबद्दल आश्चर्य वाटले. ते घोड्यास घेऊन आपल्या व्यापारीमित्रांकडे आले. तेथे सर्व व्यापारी हताश होऊन बसले होते. आम्ही सर्वजण बरबाद झालो, बुडालो असे ओरडत होते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांनी भानुदासांना दरोडा पडल्याचे सांगितले. त्यांनी भानुदासांना त्रास दिल्याबद्दल माफीसुद्धा मागितली.

भानुदासांनी यावरून ओळखले की, बाजारात ज्या ब्राह्मणाने आपला घोडा पकडून ठेवला होता, तो दुसरा-तिसरा कोणी नसून साक्षात् पंढरीनाथ श्रीविठ्ठलच होता. आपल्या धंद्यामुळे विठ्ठलास खूप कष्ट पडले म्हणून त्यांनी धंदा बंद केला व आपल्याकडील सर्व कापड त्या व्यापाऱ्यांना देऊन टाकले.

भानुदासांनी पूर्णपणे परमार्थाला वाहून घेतले. ते सदैव विठ्ठलाचे नामस्मरण करू लागले. नवीन अभंगांची रचना केली. मंदिरात कीर्तन करू लागले. कीर्तनास अनेक लोक येऊ लागले. लोकांनी दिलेल्या धान्यावर ते पोटपूजा करू लागले. अनेक लोकांना त्यांनी वाममार्गाकडून चांगल्या मार्गाकडे वळवले. आषाढी-कार्तिकी एकादशीस भानुदास अनेक लोकांसमवेत पंढरपूरची वारी करू लागले.

अध्याय ४३ वा

॥ रामराजाची कथा ॥

पंढरपूरचा एक ब्राह्मण दक्षिणा मिळवण्यासाठी गावोगावी हिंडत होता. असे करत असताना त्याचे विद्यानगर येथे आगमन झाले. रामराजाचे तेथे राज्य होते. हा राजा अत्यंत सात्त्विक व प्रजादक्ष होता. तो राजास भेटण्यास गेला. द्वारपालांनी त्या ब्राह्मणास रामराजाकडे नेले. रामराजाने त्या ब्राह्मणाचे यथोचित स्वागत केले. त्याला बसायला आसन दिले. फलाहार दिला. त्या ब्राह्मणास बरे वाटले. रामराजाने त्या ब्राह्मणाचे नाव, गाव इ.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

विचारून घेतले. तो ब्राह्मण म्हणाला, "मी पृथ्वीलोकावरील वैकुंठ असलेल्या पंढरपुरात राहतो. या पंढरपुरास लाडक्या विठ्ठलास भेटण्यासाठी लाखो वारकरी भेट देतात. तुम्ही दानशूर आहात. या गरीब ब्राह्मणास तुमच्याकडून काही सुवर्णमुद्रांची अपेक्षा आहे. माझी इच्छा आपण पूर्ण कराल या आशेने मी आपणाकडे आलो आहे."

राजा म्हणाला, "मी तुमची इच्छा नक्की पूर्ण करीन. मी आता देवीच्या पूजेसाठी जाणार आहे. आपणसुद्धा माझ्याबरोबर आल्यास मला बरे वाटेल. देवीचे दर्शन घेऊन आपणास धन्य वाटेल. संपूर्ण मंदिर सोन्याने मढवलेले आहे."

तो ब्राह्मण व रामराजा दोघेजण रथातून देवीच्या मंदिरात पूजेसाठी गेले. त्या देवीचे नाव राजाई आहे असे राजाने त्या ब्राह्मणास सांगितले. त्यानंतर तो राजा वेदोक्त मंत्रघोषात देवीची पूजा करत बसला. राजाने दिलेली वस्त्रे देवीस नेसवली. यामुळे देवीचे तेज पाहून सर्वजण देहभान हरपून गेले. पूजा संपल्यानंतर रामराजा ब्राह्मणाजवळ देवीच्या वैभवाचे गुणगान गाऊ लागला व म्हणाला की, "तुमच्या त्या पंढरपूरच्या विठ्ठलाचे एवढे वैभव नसेलच. सर्व दुर्बल घटकातील माणसे तेथे पूजा करण्यास येतात. त्यांना देव काय मदत करणार?"

रामराजाचे हे बोलणे ऐकून त्या ब्राह्मणाचा विठ्ठलाबाबतचा अभिमान निर्माण झाला. तो ब्राह्मण राजास म्हणाला, "राजेसाहेब! काही बोलायचे असल्यास पुराव्यानिशी बोलावे. जीभ वळते म्हणून वाटेल ते बोलू नये. आधी सर्व गोष्टींचे निरीक्षण करावे, त्यानंतर आपले मत मांडावे. तुम्ही येथे बसून पंढरीच्या वैभवाबद्दल कसे काय बोलता? त्या पंढरीच्या वैभवाचे काय वर्णन करावे? त्याचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वर्णन करताना शब्द अपुरे पडतील. या पंढरीची रचना स्वतः विश्वकर्माने केली आहे. या पंढरीत कुठेही पहा, तुम्हाला भगव्या पताकांचे दर्शन होईल. येथे आलेल्या प्रत्येक वैष्णवाच्या मुखात 'जय जय विठ्ठल, जय हरी विठ्ठल' असा नामघोष सुरू असतो. सर्व भक्तांना पंढरपूर हे माहेर वाटते. हे पंढरपूर भीमातीरी वसलेले आहे. लाखो वारकरी या पांडुरंगास आपले आईवडील मानतात. ज्याने पांडुरंगाला पंढरपुरास आणले, त्या पुंडलिकाला आपला बंधू मानतात. चंद्रभागा नदी ही सर्वांचे पाप भंग करणारी आहे. ही लाखो वारकऱ्यांची भगिनी आहे. गरुडपाराजवळ स्वर्गातील रंभा, मेनका, उर्वशी या मनमोहिनी अप्सरा नृत्यकला सादर करीत असतात. गंधर्व विठ्ठलाचे गुणगान करीत असतात. क्षीरसागरनिवासी, विश्वाचा पालनकर्ता, लक्ष्मीचा पती, शंखचक्र गदाधारी श्रीहरी विष्णू तो पुंडलिकाच्या भक्तीमुळे विठ्ठलाच्या रूपात पंढरपुरात येऊन राहिला आहे. या सावळ्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी तेहतीस कोटी देव धडपडत असतात. पांडुरंगाचे दर्शन घेतले की सर्व पाप-ताप नाहीसा होतो. तुमची राजाई देवी पंढरपुरात येऊन सडासंमार्जन करत असते.''

आपल्या देवीची निंदा केल्यामुळे रामराजास राग आला. त्याने ब्राह्मणास सांगितले की, ''या क्षणी आपण पंढरपुरास जाऊ. तू जसे वर्णन केलेस तसे न आढळल्यास मी तुला शिक्षा करेन.'' ब्राह्मणाने ते मान्य केले. ते दोघेही पंढरपुरात आले. त्यापूर्वी ब्राह्मणाने विठ्ठलास, 'मी बोललो तसे सर्व काही करून ठेव,' अशी प्रार्थना केली. रामराजास त्या ब्राह्मणाने जसे वर्णन केले तसे सर्व काही दिसले. रामराजास खूप आनंद झाला. त्याला तेथे राजाई देवी महाद्वाराजवळ अंगण झाडत असताना दिसली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपल्या देवीस तिथे पाहून राजा तिला म्हणाला, "हे जगदंबे! भक्तवत्सले, तू येथे कशी काय?" ती देवी म्हणाली, "हे राजन्! तू उगीचच माझ्याबद्दल गर्व धरला होतास. पंढरपुरात श्रीविठ्ठलाची सेवा करण्यासाठी सर्व देवांची चढाओढ सुरू असते. या पंढरपुरात सर्व तीर्थे सामावली आहेत. हा विठ्ठल म्हणजे ब्रह्मांडनायक आहे." देवीचे बोलणे ऐकून तो पुढे गेला. तेथे त्याला नारदांचे व द्वारपाल जय-विजय यांचे दर्शन झाले. त्यानंतर त्याने पांडुरंगाचे दर्शन घेतले. पांडुरंगाच्या अमोघ तेजामुळे त्याची नेत्रकमळे झाकली गेली. त्याला विठ्ठलाच्या मूर्तीत चतुर्भुज गरुडवाहनधारी श्रीविष्णूंचे दर्शन झाले.

तो प्रथम विठ्ठलाच्या पाया पडला व म्हणाला, "हे भक्त-वत्सला, रुक्मिणीपती विठ्ठला, माझी एक इच्छा आहे. ती तू पूर्ण केल्यास मला समाधान होईल. तू आमच्या राज्यात म्हणजे विद्यानगरीस यावे व मी तेथे तुझी पूजा करू इच्छितो. त्यानंतर तू तेथेच वास्तव्य कर!" विठ्ठलाने यास संमती दिली.

राजा विठ्ठलास घेऊन विद्यानगरीस गेला. विठ्ठलास एका रथात बसवले. त्याच्यासमोर अनेक वाद्ये, लोकांचा समुदाय होता. सर्वजण विठ्ठलाचा जयघोष करत होते. यामुळे पंढरपुरातील मंदिर ओस पडले. भक्तगण विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी येऊ लागले पण त्यांना विठ्ठलाची मूर्ती कोठेच दिसेना. भक्त भानुदासांनी सर्व वैष्णवांना धीर दिला व सांगितले, "आपल्या जीवाचे जीवन असणाऱ्या पांडुरंगास रामराजाने विद्यानगरीस नेले आहे. त्याला मी पुन्हा पंढरपुरात आणतो."

भानुदास विद्यानगरीत गेले. भानुदास हळूच विठ्ठलाकडे गेले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दोघांची भेट खूप दिवसांनी झाली होती. विठ्ठलाने आपल्या गळ्यातील नवरत्नांचा हार भानुदासांच्या गळ्यात घातला व तू येथून जा, मी तुला सकाळी पुन्हा दर्शन देईन, असे सांगितले.

राजा विठ्ठलाच्या खोलीत आला. त्याला नवरत्नांचा हार दिसेना. त्याने आपल्या सर्व सेवकांना नगरात हार शोधण्यास सांगितले. नदीच्या किनारी भानुदासांच्या गळ्यात तो हार दिसला. चोरीचा आरोप ठेवून भानुदासांना राजासमोर हजर करण्यात आले.

न्यायसमितीने चोरीबद्दल सुळावर चढवण्याची शिक्षा भानुदासांना केली. भानुदास या शिक्षेमुळे घाबरले नाहीत. त्यांच्या मुखात विठ्ठलाचे नामस्मरण सुरूच होते.

भानुदासाला सुळावर चढवण्याची सर्व तयारी झाली. अचानक विठ्ठलाच्या कृपेमुळे सुळाला पालवी फुटली व त्याचे आंब्याच्या झाडात रूपांतर झाले. देवाची ही कृपा पाहून भानुदासांनी विठ्ठलाचे आभार मानले. राजाने भानुदासांची क्षमा मागितली.

रामराजाने अन्यायाने भानुदासांना जबर शिक्षा दिल्यामुळे विठ्ठल विद्यानगरी सोडून निघाला. विठ्ठल छोटे रूप घेऊन भानुदासांच्या संबळीत बसला. पंढरपुरात आल्यानंतर पुन्हा मोठे रूप धारण केले. सर्व वैष्णवांनी विठ्ठलाच्या मूर्तीस गाभाऱ्यात नेऊन तिची प्रतिष्ठापना केली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय ४४ वा

॥ बहिरंभटाची कथा ॥

पैठण हे गाव आपणा सर्वांना माहीत असेलच. याच गावातील बहिरंभट या भक्ताची कथा आज मी तुम्हाला सांगणार आहे. बहिरंभटांना चारही वेदांचे ज्ञान होते. संस्कृत भाषेतील ग्रंथांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. हे ज्ञानी पंडित होते तरीसुद्धा राजाकडून त्यांनी पैसे मागितले नाहीत. लोकांना ब्रह्मज्ञान शिकवून जे काही लोक देतील त्यावर बहिरंभटाचे व त्यांच्या कुटुंबाचे पालनपोषण होत असे.

एके दिवशी बहिरंभट भोजनास बसले होते. त्या दिवशी भाजीत मीठ नव्हते. त्यामुळे आपल्या पत्नीस बहिरंभट म्हणाले, "काय ग, आज भाजीत मीठ घालायचे विसरून गेले वाटतं?" या वेळी पत्नी त्यांना म्हणाली, "अहो! तुमच्या वयाची साठी पूर्ण झाली तरी जिभेचा मोह सुटला नाही वाटतं. तुम्ही जिभेला दोन्ही बाबतीत जिंकायला हवे आहे. तुमचा बोलण्यावर पण संयम नाही व खाण्यावर पण संयम नाही. जिभेवरच संयम नसल्यामुळे इतर इंद्रियांवर संयम कसा काय असणार?"

या बोलण्यामुळे बहिरंभटाना आपली चूक कळून आली. आपल्याला उपदेश दिल्यामुळे त्यांनी जीवनसाथीचे आभार मानले. तिचा निरोप घेऊन ते वैराग्यप्राप्तीसाठी बाहेर पडले.

आपल्याच जातीतील लोक आपण संन्यास घेतल्यामुळे आपणास हसतील म्हणून त्यांनी एक युक्ती केली. ते एका फकिराकडे गेले व त्याच्याकडून सुंता करून घेऊन मुसलमान बनले. त्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बहिरंभट मुसलमान धर्मात गेल्याची वार्ता सर्व गावभर पसरली. यामुळे सर्व ब्राह्मणांना वाईट वाटले. ते त्यांना व त्यांच्या पत्नीस नावे ठेवू लागले. बहिरंभटांना वाटले होते की मुस्लिम धर्म स्वीकारल्याने आपणास आत्मज्ञानाची प्राप्ती होईल पण तसे काही झाले नाही. त्यामुळे बहिरंभटांनी आपल्या ब्राह्मण मित्रांच्या साहाय्याने पुन्हा हिंदुधर्मात प्रवेश केला.

काही ब्राह्मण बहिरंभटांना म्हणाले, "तुम्ही मुस्लिम धर्मातून हिंदू धर्मात आला आहात. मुसलमानाचा पुन्हा हिंदू कसा काय होईल? आपण राजासमोर जाऊ. तोच आपल्याला याबद्दल सर्व काही सांगेल."

सर्वजण राजाकडे सल्ला घेण्यासाठी आले. राजाने प्रथम बहिरंभटास याबद्दल विचारले. तेव्हा बहिरंभट म्हणाले, "राजन्! मी काय बोलू मला कळत नाही. तुम्ही हिंदु माणसाचे मुसलमानात कसे काय रूपांतर केले? मी आत्तासुद्धा हिंदूच आहे. हे पाहा माझे कान टोचलेले आहेत. कान टोचलेले असताना हिंदूचा मुसलमान कसा काय होईल? माझी सुंता पण मुसलमान फकिरांनी केली आहे त्यामुळे मी प्रायश्चित्त घेऊन हिंदू धर्मात कसा येणार? त्यामुळे मी धड हिंदू धर्मीय नाही व मुस्लिमधर्मीय पण नाही."

राजाने यावर काहीही मत मांडले नाही.

काही दिवसांनी बहिरंभटांना वेड लागले. रस्त्यातून जाणाऱ्या प्रत्येकास 'मी कोण? हिंदू की मुसलमान' असे ते विचारत असत. ते फिरत फिरत वडवाळ गावी आले. तेथे त्यांची गाठ सिद्धपुरुष नागनाथांशी पडली. ते आपल्या मंत्रसामर्थ्यामुळे काहीही चमत्कार करू शकत होते. त्यांना समाधी बांधायची होती. त्यामुळे दगड आणण्यासाठी गाडीला वानरसेना जुंपली होती. हे पाहून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बहिरंभटांना आश्चर्य वाटले. त्यांनी नागनाथांना विचारले की, "स्वामीजी! मी कोण आहे आपण सांगाल का? मी हिंदू आहे का मुसलमान आहे?" हा प्रश्न ऐकल्यानंतर नागनाथांनी हातातील जाड बांबूची काठी त्यांच्या टाळूवर आपटली. त्यामुळे क्षणार्धात बहिरंभट यमलोकी गेले.

यामुळे त्यांच्यातील मीपणा नाहिसा झाला. त्यांनी बहिरं-भटाच्या अस्थींचा चुरा करून दुसरी मूर्ती बनवली व अग्निमध्ये टाकून तिला पक्के स्वरूप दिले. कृपादृष्टीने हुबेहूब बहिरंभटाच्या मूर्तीकडे पाहिले तेव्हा त्या मूर्तीत ज़ीव आला. बहिरंभट पुन्हा पूर्ववत् झाले. त्यांनी बहिरंभटांना विचारले, "आता सांग, तू कोण आहेस बरे?"

बहिरंभट म्हणाले, "माझा देह पूर्वीचा राहिला नाही. हा नवीन देह आहे. हा देह म्हणजे हाडामांसाचा गोळा आहे. त्याला चामडे लावून शिवलेले आहे. या शरीरात परमात्म्याचा अंश आहे. मी आता कोणीही नाही. मी व देव एकरूप झालो आहोत. माझे गुरुजी नागनाथ यांची माझ्यावर असीम कृपा झाली."

बहिरंभट पुढे पंढरपूरला गेले. तेथे त्यांनी कीर्तने करण्यास सुरुवात केली. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी सत् आचार, सत् विचार, सत् उच्चार कसे असावेत; यासंबंधी लोकांना अनमोल मार्गदर्शन केले. त्यांनी विठ्ठलावर अनेक पदे रचली. ती त्यांची पदे आजही सर्वत्र गायली जातात.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय ४५ वा

॥ संत एकनाथ ॥

श्रोत्यांनो! तुम्ही जगदीश मूर्ती आहात. तुम्हाला पुन्हा एकदा मी वंदन करतो. आपण मागे एका अध्यायात भानुदासांची कथा ऐकलेली आहे. आता महाराष्ट्रातील संत भक्तराज एकनाथ महाराज यांचे चरित्र मी तुम्हास सांगणार आहे.

भानुदासांना एक मुलगा होता. त्याचे नाव होते चक्रपाणी. तो श्रीहरी विष्णूंचा भक्त होता. त्याप्रमाणे त्याला कीर्तन ऐकण्याची खूप आवड होती. त्याला मुलगा झाला, त्याचे नाव होते सूर्यनारायण. सूर्योपासना त्या कुळात प्रथमपासूनच होती. सूर्यनारायणांची अर्धांगिनी रुक्मिणी. सूर्यनारायण व रुक्मिणी या दांपत्यास पुत्ररत्न प्राप्त झाले. तोच एकनाथ होय. हेच पुढे संत एकनाथमहाराज झाले. संत एकनाथ हे भानुदासांचे नातू होतं.

एकनाथ लहानपणापासून भाविक व ज्ञानी होता. एकनाथाचे चित्त सदैव भगवंताकडे लागलेले असे. अत्यंत शांत स्वभाव होता. कोणीही रागावून बोलले तरी एकनाथ त्याला शांतपणे उत्तर देत होते. वेळ आल्यावर एकनाथांचा व्रतबंध संस्कार केला गेला.

एकनाथांच्या घरात जनार्दनस्वामी नावाचे साधुपुरुष राहत होते. एकनाथ बालपणी त्यांच्या दर्शनासाठी गेला. जनार्दनस्वामींना प्रथम वंदन केले. जनार्दनस्वामींनी एकनाथांची विचारपूस केली. त्यांनी एकनाथांना आईवडिलांचे नाव विचारले, तसेच तू कोणत्या कुळात जन्म घेतला आहेस हेसुद्धा विचारले.

बाल एकनाथांनी सांगितले की, "या नाटकी जगात राहण्याची मला इच्छा नाही. मला ब्रह्मज्ञानाची प्राप्ती करून घ्यावयाची आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुम्ही मला दत्तगुरूंची भेट करून द्या. मला इथे रस नाही. त्यामुळे मी आता तुमच्याबरोबर राहणार आहे. कृपया आपण यास परवानगी द्यावी."

जनार्दनस्वामी एकनाथांच्या कुशाग्र बुद्धीवर खुश झाले. त्यांनी आपल्याबरोबर राहण्यास एकनाथांना संमती दिली. एकनाथ जनार्दनस्वामींची मनोभावे सेवा करीत असते. त्यांची भक्तीसुद्धा थोर होती. जनार्दनस्वामींना वाटे की, हा एकनाथ भविष्यकाळात नक्कीच मोठा भक्त बनेल. त्यांच्या आईवडिलांनी जनार्दनस्वामींकडे सर्व विचारपूस केली. त्यामुळे आईवडिलांना समाधान वाटले.

एकनाथ जनार्दनस्वामींची सर्व कामे करीत होते. तरीसुद्धा जनार्दनस्वामींनी त्यांच्यावर आपला सर्व हिशेब चोख ठेवण्याचे काम सोपवले. ते म्हणाले, "एकनाथा! तू जर हिशेब ठेवण्यात तरबेज झालास तर भविष्यकाळात तू नक्कीच ज्ञानयोगी होशील."

जनार्दनस्वामींनी आपणास रोजच्या रोज झोपण्यापूर्वी हिशेब दाखवण्याची आज्ञा दिली. एकनाथ दिवसभर सर्व कामे आटपत असत व नंतर हिशेब करीत बसत. एके दिवशी खर्चाच्या बाजूस एक गोष्ट लिहायची राहून गेली. त्यामुळे खर्चात एक पैचा फरक येऊ लागला. ती चूक शोधण्याचा एकनाथांनी खूप वेळ प्रयत्न केला. या नादात त्यांनी अन्नपाणीसुद्धा घेतले नाही. काही तासानंतर हिशेबाचा ताळा झाला. एकनाथ या आनंदामुळे उड्या मारू लागले.

तेवढ्यात तेथे जनार्दनस्वामी आले व म्हणाले, "हा सर्व पैशाचा हिशेब खोटा आहे. मनुष्यास पैसे, दागदागिने, मालमत्ता सर्व काही इथेच सोपवून परलोकी जावयास लागते. तिथे स्वर्गात मोठा हिशेबतपासनीस आहे. तो पृथ्वीवरल्या सर्व माणसांच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पापपुण्याचे हिशेब ठेवत असतो. त्याचे नाव आहे चित्रगुप्त. त्या चित्रगुप्ताला मनुष्यास मृत्यु पावल्यानंतर सर्व पापपुण्याचा जाब द्यावा लागतो. त्यामुळे तुझे एका पैकडे जेवढे लक्ष एकाग्र झाले होते तेवढेच लक्ष एकाग्र करून देवकीनंदन बलरामाचा छोटा भाऊ श्रीकृष्णाच्या चरणी लावल्यास तुला आत्महित साधता येईल व मुक्ती मिळेल.

एकनाथांनी हिशेबाची चोपडी व लेखणी बाजूला ठेवली व जनार्दनस्वामींना साष्टांग दंडवत घातले. तेव्हा एकनाथांना त्यांनी 'रामकृष्ण हरी, जय जय रामकृष्ण हरी' हा नाम मंत्रोपदेश दिला. रात्रंदिवस संत एकनाथ या मंत्राचे नामस्मरण करीत असत.

एके दिवशी एकनाथ आपल्या गुरूंना म्हणाले की, "मला त्रिमुखी, सहा नेत्र असलेल्या दत्तात्रेयांची भेट करून द्या. मला त्यांची भेट घेण्याची खूप दिवसांपासून इच्छा आहे." स्वामींनी दत्तात्रेयांच्या भेटीची सुवर्णसंधी एकनाथांसाठी आणली होती; पण एकनाथांना त्याचा फायदा घेता आला नाही. यामुळे जनार्दनस्वामी व एकनाथांना वाईट वाटले.

काही दिवसानंतर एकनाथांना जनार्दनस्वामी म्हणाले, "हे वत्स! आज आपण वनविहाराला जाऊ. तेथे तुला नक्कीच दत्तात्रेयांचे दर्शन होईल. ते कोणत्या रूपात दर्शन देतील याची मला कल्पना नाही. पण मी ज्यांच्याशी आदराने व मैत्रीपूर्ण बोलेन तेच दत्तात्रेय आहेत असे तू जाण."

ते दोघेही वनामध्ये गेले. तेथे मलंगवेषाने दत्तगुरूंची स्वारी आली. त्यांच्याबरोबर एक कुत्री सोबतीस होती. कामधेनूने कुत्रीचे रूप घेतले होते. हे सर्व काही जनार्दनस्वामींनी तिसऱ्या चक्षूने ओळखले. मलंग जनार्दनस्वामींना म्हणाले, मला फार भूक लागली

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आहे. त्यांनी कुत्रीचे दूध काढले व दुधात जवळचे अन्नपदार्थ भिजवून शिजवले. त्या दोघांनी जेवणास सुरुवात केली. त्या फकिराने एकनाथांनासुद्धा जेवणासाठी बोलावले. एकनाथांनी मनात विचार केला की, फकिराच्या हातचे अन्न आपण कसे खाणार? त्यामुळे त्यांनी जनार्दनस्वामींनाच मला तुमचे उष्टे अन्न भरवा अशी विनंती केली. जनार्दनस्वामींनी एकनाथांस आपले उष्टे भरवले.

यावरून दत्तात्रेय गुरूंनी सर्व काही जाणले. त्यांनी एकनाथांना जवळ बोलावले व त्यांच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला. एकनाथांनी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' असा जयघोष करून त्यांची स्तुती केली. दत्तात्रेयांनी एकनाथांस आज्ञा दिली की, "तू भागवत पुराणाचा अर्थ सर्वसामान्य लोकांना समजेल अशी टीका कर." ते हेच एकनाथी भागवत होय. तसेच त्यांनी भावार्थ रामायणसुद्धा लिहिले. त्यांनी विठ्ठलावर, श्रीकृष्णावर, दत्तात्रेयांवर अनेक अभंग लिहिले. त्यांचे अभंग आजही अनेक लोक भक्तीने गातात.

त्यानंतर जनार्दनस्वामी व एकनाथ एकत्र राहू लागले. दोघांनाही एकमेकांशिवाय करमत नसे.

पुढे काही वर्षांनंतर गुरूंच्या व मातापित्याच्या आज्ञेनुसार त्यांनी विवाह केला. एकनाथांना त्यांच्यासारखीच सुविद्य, भाविक सुशील पत्नी लाभली. एकनाथांचे नाममात्र लक्ष संसारात होते बाकी सर्व लक्ष भगवंताच्या चरणांपाशी गुंतलेले होते.

एके दिवशी सीतापती कौसल्यासुत श्रीराम एकनाथांच्या स्वप्नामध्ये आले व म्हणाले, "वाल्मिकी ऋषींनी लिहिलेले

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रामायण संस्कृतमध्ये आहे. ते सर्वसामान्य लोकांना काही समजत नाही. रामायण हा अत्यंत पवित्र ग्रंथ आहे. त्यामुळे तू वाल्मिकी रामायणावर मराठीतून ओवीबद्ध टीका लिहायला सुरुवात कर. तुझ्यामुळे संस्कृत न समजणाऱ्या मराठी माणसास रामायणाचे आकलन होईल.'' हाच ग्रंथ पुढे संत एकनाथांचे भावार्थरामायण या नामरूपाने प्रसिद्धीस आला.

एकनाथांच्या शेजाऱ्यास हे काही आवडत नव्हते. तो एकनाथांचा मत्सर करीत असे. रामानेच आपल्या सामर्थ्याने एकनाथांना मारूतीप्रमाणे हवेत उड्डाण करवून त्याच्या घरात पाडले. रात्री एकनाथांनी उड्डाण केल्यामुळे धप्कऽन असा आवाज आला. शेजाऱ्याने उठून पाहिले तर अंगणात एकनाथमहाराज होते. त्या शेजाऱ्याने सर्व काही जाणले व त्यांची क्षमा मागितली. या वेळी हनुमंत पर्वतावरून उड्डाण करतो यावर एकनाथ टीका करत होते.

अशा प्रकारे संत एकनाथांनी आपल्या अनेक ग्रंथांद्वारे, भारूडांद्वारे, अभंगांद्वारे समाजप्रबोधन केले.

त्यांना शिष्य वगैरे बनवण्यास आवडत नसे. त्यांना एका मनुष्याने, 'मला तुमच्याकडून ब्रह्मज्ञानाचा उपदेश हवा आहे,' असा तगादा लावला होता. पण एकनाथांनी युक्तीने त्याला नाही म्हणून सांगितले. संप्रदाय वाढवण्यापेक्षा भगवंतावरील प्रेम कसे वाढवता येईल याकडे एकनाथांचे सर्व लक्ष होते.

त्यांचे म्हणणे असे होते की, संप्रदाय वाढवल्यामुळे गुरूशिष्य असा भाव निर्माण होतो. गुरू शिष्यांकडून पाद्यपूजा करून घेतात. यामुळे सर्व शिष्य गुरूंमध्येच अडकतात. त्यांना भगवंताची प्राप्ती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होत नाही. गुरूंच्या पाठीमागे सर्व शिष्यमंडळी लागतात. त्यामुळे गुरूंचीसुद्धा भगवंताची साधना कमी होते, ज्ञान कमी होते. आपण व आपला संप्रदाय, आपली माणसे यातच मनुष्य अडकून बसतो. त्यापेक्षा प्रत्येकाने भगवंतालाच सद्‌गुरू मानून त्याची भक्ती करावी. यामुळेच मनुष्याची जन्ममरणातून सुटका होईल.

अध्याय ४६ वा

।। नाथांच्या घरी देव पाणी भरी ।।

भानुदासांचा नातू एकनाथ आपली मनोभावे पूजाअर्चा करतो हे पाहून श्रीकृष्णास समाधान वाटले. संत एकनाथ सकाळपासून झोपेपर्यंत काम करण्यात मग्न असत. हाती काम व मुखी नाम अशी त्यांची धारणा होती. आपल्या भक्ताला खूप कष्ट पडत आहेत, म्हणून श्रीकृष्णाने त्यांना मदत करायचे ठरवले. नंदकिशोर श्रीकृष्णाने ब्राह्मणाचे रूप घेतले व तो एकनाथांचा मदतनीस झाला.

ब्राह्मणरूपी भगवान श्रीकृष्णाचे पैठणला आगमन झाले. त्याने गावातील काही लोकांना विचारले की, "अहो दादा! या गावात एक निष्ठावंत वैष्णव राहतो. सदैव तो देवकीनंदन कन्हैय्यालाल श्रीकृष्णाची पूजा करीत असतो. दारात आलेल्या याचकांना अन्नदान करतो. लोकांना सन्मार्गाकडे ओढून आणण्यासाठी भारूडे लिहितो, कीर्तने करतो, प्रवचने करतो. या वैष्णवाचे घर कोठे आहे?" लोकांनी त्याला भक्त एकनाथ-महाराजांचा पत्ता सांगितला.

एकनाथमहाराजांच्या घरी ब्राह्मणरूपी श्रीकृष्ण आला व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एकनाथांना म्हणाला, "मी अनाथ ब्राह्मण आहे. माझे या जगात कोणीही नाही. आपल्या घरात मला आधार मिळाला तर तुमचे उपकार होतील. मी तुमची सर्व कामे करीन."

एकनाथांनी त्या ब्राह्मणाची आणखी चौकशी केली तेव्हा तो श्रीकृष्ण म्हणाला, "माझे नाव कृष्णा आहे. मी एका गावाहून दुसऱ्या गावात हिंडत असतो. जो मला काम देईल तेथे मी राहतो."

कृष्णाची विनंती मान्य करून एकनाथांनी त्याला मदतनीस म्हणून घरात ठेवले. कृष्णा सर्व कामे करीत असे.

एकनाथांची देवपूजेसाठीची सर्व तयारी कृष्णाच करीत असे. एकनाथांच्या पत्नीससुद्धा स्वयंपाकात कृष्णा मदत करत असे. त्याच्या पावनस्पर्शामुळे अन्न गोड होत असे. सर्व लोकांना या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कृष्णाचे आश्चर्य वाटायचे. त्याने बनवलेले अन्न लोकांना गोड लागत होते. त्यामुळे लोकांनी त्या कृष्णाचे नाव बदलून 'श्रीखंड्या' असे ठेवले. श्रीखंड्या पंक्तीत पाणी देण्यापासून उष्टी पत्रावळी काढण्यापर्यंत सर्व कामे करत असे.

कालचक्राच्या नियमानुसार एकनाथांचे आईवडील देवास प्रिय झाले. एकनाथांना फार दु:ख झाले. त्यांची आईवडिलांवर खूप श्रद्धा होती. देवाच्या सेवेबरोबर आपल्या जन्मदात्यांचीसुद्धा ते सेवा करीत असत. कालांतराने त्यांचे श्राद्ध आले. श्राद्धानिमित्त एकनाथांनी सर्व ब्राह्मणांना भोजनासाठी बोलावले. सर्व स्वयंपाक वगैरे करून झाला होता. ब्राह्मण येण्यास थोडा वेळ होता. एकनाथ स्नान करून माडीवर धोतर वाळत घालण्यास गेले. त्या वेळी तेथे एक जोडपे रस्ता झाडत होते. समाजसेवा त्यांनी स्वीकारली होती. गावातील सर्व रस्ते स्वच्छ करण्याचे काम त्यांच्यावर सोपवले होते. रस्ता झाडत ते नाथांच्या घराजवळ आले. त्या गृहस्थाची पत्नी म्हणाली, "अहो, धनी ! मला या घरातून भजी तळलेला खमंग वास येतो आहे. तसेच जिलेबी तळल्याचा सुगंध येतो आहे." तिचा नवरा म्हणाला, "इकडे ये, ती माणसे श्रीखंड बनवत आहेत. दिसलं का ! श्रीखंडपुरीचा बेत असल्यामुळे माझ्या तोंडाला पाणी सुटले आहे." दोघांनी एकमेकांना सांगितले की, असे सात्त्विक ताजे अन्न आपणास खायला मिळाले तर किती बरे होईल ? खूप दिवसांपासून आपली मिष्टान्न खाण्याची इच्छा होती.

एकनाथांनी त्या दोघांचे बोलणे ऐकले. एकनाथांनी त्यांना घरी बोलावले. त्यांना दक्षिणा दिली व सुग्रास भोजन करण्यासाठी आग्रह केला. त्या दोघांनी ते मान्य केले. नाथांनी स्वत: त्या दोघांना सर्व पदार्थ वाढले. त्या दोघांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एकनाथांना आनंद झाला.

त्यांनी ब्राह्मणांसाठी पुन्हा दुसरा स्वयंपाक केला. यापूर्वीचा स्वयंपाक आपल्यापेक्षा कमी जातीच्या लोकांनी सेवन केला, हे ब्राह्मणांना आवडले नाही. त्यांनी नाथांच्या घरी जेवण्यास नकार दिला. त्या ब्राह्मणांनी नाथांना प्रायश्चित्त घेण्यास सांगितले.

एकनाथमहाराज प्रायश्चित्त घेण्यास जेव्हा नदीवर आले होते, तेव्हा त्यांनी स्वत:च्या पुण्याच्या जोरावर एकाचे कोड नाहीसे केले.

नाथांनी केलेला हा चमत्कार पाहून सर्व ब्राह्मण नाथांच्या पाया पडले. त्या ब्राह्मणांनी नाथांना सांगितले की, 'तुम्ही साक्षात् विष्णूंचा अवतार आहात. तुम्हाला प्रायश्चित्ताची आवश्यकता नाही. आम्हाला क्षमा करा.'

एकनाथांनी श्राद्धाला ब्राह्मणांना जेवायला बोलावले होते. तेव्हा ब्राह्मण जेवले नाहीत. तेव्हा श्रीखंड्या एकनाथांना म्हणाला, "स्वामीजी! तुम्ही त्या ब्राह्मणांच्या पाठीमागे कशाला लागला? तुम्ही तुमच्या पितरांना बोलवा. ते नक्कीच स्वत: जेवायला येतील.' नाथांनी आपल्या पितरांना श्रीखंड्याच्या सांगण्यावरून बोलावले. पितर जेवण्यास आले. नाथांना आनंद झाला.

त्यानंतर काही दिवसांनी एक ब्राह्मण नाथांकडे आला. त्यापूर्वी तो ब्राह्मण द्वारकेस गेला होता. आपल्याला श्रीकृष्णाची भेट व्हावी या हेतूने तो तेथे तप करत होता. त्याच्या स्वप्नात राधेने सांगितले की, "तुझा लाडका श्रीकृष्ण पैठण येथे एकनाथमहाराजांकडे राहत आहे. त्याने तेथे श्रीखंड्याचे रूप घेतले आहे. तो तेथे मदतनीस आहे. त्यांना तेथे जाऊन एक तप झाले आहे. तुला नाथांच्या घरात त्याचे दर्शन लाभेल. जा तू, त्यांना भेटून ये."

दृष्टांतात सांगितल्याप्रमाणे तो ब्राह्मण एकनाथांच्या घरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आला. एकनाथांनी त्याचे स्वागत केले. त्यांनी त्यास येथे येण्याचे कारण विचारले. तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला, "नाथमहाराज! आपल्याकडे श्रीखंड्या नावाचा मदतनीस आहे ना! त्याला मला भेटायचे आहे. त्याची भेट झाल्याने मला जन्ममरणाचे फेरे करावे लागणार नाहीत. मला मुक्ती मिळेल. मला मिळालेल्या मनुष्य-जन्माचे सार्थक होईल."

एकनाथ म्हणाले, "तो श्रीखंड्या ना, गंगेवर पाणी आणण्यासाठी थोड्या वेळापूर्वीच गेला आहे. आता तुम्ही त्याची प्रतीक्षा करा." तो ब्राह्मण श्रीखंड्याची आतुरतेने वाट पाहत बसला.

थोड्या वेळाने श्रीखंड्या कावड घेऊन आला. नाथांनी त्या ब्राह्मणाची श्रीखंड्याशी ओळख करून दिली. तो ब्राह्मण श्रीखंड्याच्या साष्टांग पाया पडला. तो श्रीखंड्याचे पाय सोडण्यास तयार होईना. श्रीखंड्याने मला आत थोडे काम आहे, असे सांगून आपली सोडवणूक करून घेतली. आतल्या खोलीत श्रीखंड्या गेला व अंतर्धान पावला.

नाथमहाराज व तो ब्राह्मण बाहेर श्रीखंड्याची वाट पाहत बसले. नाथांनी दोन-तीन वेळा हाक मारून पाहिली; पण काहीच फायदा झाला नाही. ते आतमध्ये गेले तेथे फक्त पाण्याची कावड होती, श्रीखंड्या नव्हता, हे पाहून तो ब्राह्मण रडू लागला.

नाथांनी त्या ब्राह्मणास रडण्याचे कारण विचारले, तेव्हा त्याने नाथांना आपला दृष्टांत सांगितला. आपल्याला चुकवून नंदकिशोर भक्तवत्सल श्रीकृष्ण गेला, त्यामुळे त्याला फार दु:ख झाले.

एकनाथांना कळले की, साक्षात् श्रीकृष्णाने आपल्यासाठी बारा वर्षे सर्व प्रकारची कामे केली, कष्ट केले, तरी त्याला आपण ओळखले नाही. यामुळे एकनाथांनासुद्धा वाईट वाटले. त्यांनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपल्या नशिबास दोष दिला.

त्यानंतर एके दिवशी रात्री नाथमहाराज झोपेत असताना ज्ञानियांचे राजे ज्ञानेश्वर माऊलींनी त्यांना स्वप्नात येऊन सांगितले की, "तू आळंदीस ये. समाधी उघड व माझे दर्शन घे. तेथे अर्जुनवृक्षाची मुळी माझ्या समाधीजवळ लागलेली आहे. तिचा मला त्रास होतो आहे. ती दुसरीकडे लाव. त्यानंतर समाधी पुन्हा पूर्ववत कर." ज्ञानेश्वरांच्या विनंतीनुसार सर्व काही कार्य सिद्धीस नेले.

आळंदीमध्ये कोरडा दुष्काळ पडला होता. सर्वजण पोटासाठी वणवण फिरत होते. नाथांबरोबर आलेले सर्व लोक भुकेलेले होते. तेव्हा पांडुरंगाने आपल्या मायेने तेथे तात्पुरते धान्याचे दुकान टाकले व धान्य पुरवले. हे सर्व पांडुरंगाने पैसे न घेता केले. त्यानंतर रुक्मिणीपती पांडुरंग अंतर्धान पावला. नाथांनी आपल्या दिव्य शक्तीने ओळखले की हे सर्व पंढरीनाथानेच केले आहे.

आळंदीत दोन दिवस मुक्काम करून सर्वांनी पैठणला प्रयाण केले.

अध्याय ४७ वा

॥ संत रामदासस्वामी ॥

श्रोत्यांनो! ज्या भक्ताला 'सावधान' या शब्दाचा खरा अर्थ कळला, त्या भक्त रामदासांची कथा तुम्हाला मी सांगणार आहे. ती कथा तुम्ही शांत चित्ताने श्रवण करा.

कृष्णानदीच्या तीरी जांब नावाचे गाव होते. त्या गावात ठोसर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आडनावाचे एक रामोपासक राहत होते. त्यांना सुविद्य, सुशील पत्नी लाभली होती. हे दांपत्य अत्यंत भाविक होते. दर रामनवमीस गावातील सर्व लोकांना ते अन्नदान करीत असत. रामनवमीचा उत्सव ते गुढीपाडव्यापासूनच सुरू करीत असत. नऊ दिवस मोठ्या प्रमाणात ते रामनवमीचा उत्सव साजरा करीत असत.

या भाविक दांपत्यास कशाचीही कमतरता नव्हती. दशरथ-नंदन श्रीरामाच्या कृपेमुळे सर्व काही व्यवस्थित सुरू होते. खूप वर्षे झाली तरी त्यांच्या घरात पाळणा हलला नव्हता. यामुळे त्या दोघांनाही खूप वाईट वाटे. त्यांनी अनेक देवांना नवस केले. एके दिवशी सीतापती श्रीराम त्या गृहस्थाच्या स्वप्नात आला व म्हणाला, "वत्स! तुझी निष्ठावंत रामोपासना पाहून मी धन्य झालो. याचेच फळ म्हणून तुमच्या पोटी माझा परमभक्त मारुती अवतार घेणार आहे." हे स्वप्न त्याने आपल्या पत्नीस सांगितले. यामुळे ती आनंदित झाली.

कालांतराने त्या दांपत्यास मुलगा झाला. हा मुलगा दिसायला अत्यंत तेजस्वी, सुदृढ यष्टीचा होता. त्यांनी त्याचे नाव नारायण ठेवले. थोडे मोठे झाल्यानंतर त्याची मुंज झाली. त्यानंतर त्यांनी वेदांत, उपनिषदे यांचा अभ्यास गुरूंकडून शिकण्यास सुरुवात केली.

तारुण्यात पदार्पण केल्यानंतर एका सुंदर, सुविद्य मुलीशी विवाह ठरवण्यात आला. लग्नाचा दिवस उजाडला. शुभमुहूर्तावर लग्न लागले. गुरुजींनी मंगलाष्टके सुरू केली. 'शुभमंगल सावऽधान्.' त्यांनी सावधान या शब्दाचा अर्थ जवळच उभ्या असलेल्या एका ब्राह्मण गुरुजींना विचारला. तेव्हा ते म्हणाले, "सर्वजण तुलाच सावधान म्हणत आहेत. तू आता प्रपंचाच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चिखलात रुतून बसणार आहेस. हा सर्व प्रपंच नासका आहे. या प्रपंचात मुख्य म्हणजे काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर आहे. या संसारबंधनातून कोणीही सुटू शकत नाही. हा संसार म्हणजे अजगराचा विळखा आहे. या संसारातून मनुष्य जेवढा बाहेर पडण्याचा प्रयत्न करेल, तेवढा तो आणखीन खोल खोल रुतत जातो. या संसारात इंद्रियांचे चोचले पुरवता पुरवता मनुष्य देवास विसरून जातो. वार्धक्य केव्हा येते काहीच कळत नाही. त्यामुळे तू सावध हो.''

हे सर्व ऐकल्यानंतर नारायण सूर्याजी ठोसर या तरुणाची बोबडी वळली. त्याने ताबडतोब निर्णय घेतला की आपण या मोहपाशात अडकायचे नाही. नारायण ताबडतोब बोहल्यावरून पळाला. त्याच्या पाठोपाठ त्याचे आईवडील, लग्नास जमलेली सर्व माणसे नारायणास पकडण्यासाठी धावली. सर्वांना तुरी देऊन नारायण अरण्यात गेला. सर्वजण हताश होऊन परत आले. सूर्याजींनी आपल्या पत्नीची समजूत काढली. ते आपल्या पत्नीस म्हणाले की, ''अग, आपला पुत्र नारायण हा मारुतीचाच अवतार आहे. मारुती हा तर अखंड ब्रह्मचारी होता, तर तो लग्न कसा काय करेल ?''

नारायणाने अरण्यात रामोपासना करण्यास सुरुवात केली. रामाप्रमाणेच आपण सत्यवादी राहायचे असे ठरवले. त्याने अखंड रामनाम घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर रामभक्त हनुमानाने आपल्या अक्राळविक्राळ रूपाने रामदासांना घाबरवले; पण नारायण शांतपणे रामनाम घेत होते. तेव्हा मारुतीने, 'तुला रामाचे दर्शन होईल,' असा आशीर्वाद दिला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यानंतर नारायण गावात जाऊन भिक्षा मागू लागला. रामाचा हा दास आहे असे सर्वजण त्या नारायणास म्हणू लागले. त्यामुळे त्यांनी नारायणाचे नाव बदलून रामदास असे ठेवले. रामदासस्वामीच्या मते मनच आपला मित्र आहे व मनच आपला शत्रू आहे, असे जाणले. त्यामुळे त्यांनी या विशाल मनावर मनाचे २०५ श्लोक लिहिले. या मनाचे श्लोकाच्या निरंतर पठणामुळे यश, लक्ष्मी, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य यांची प्राप्ती होते व परलोकी मुक्ती मिळते.

पुढे आषाढीची वारी चाललेली होती. रामदासस्वामी पण त्या यात्रेतून चालले होते. मारुती त्यांना म्हणाला की, "तुला पंढरपुरात प्रभू रामचंद्राचे दर्शन होईल."

रामदासस्वामी जनसमुदायाबरोबर पंढरपुरास आले. त्यांनी विठ्ठलाचे दर्शन घेतले तेव्हा त्यांना थोडे वेगळे वाटले. ते विठ्ठलास म्हणाले की, "ज्या प्रभू रामचंद्राची मी पूजा करतो ते रूप कुठे आहे? तुझ्या हातातील ते देखणे धनुष्य कुठे आहे? पाठीवर बाणांचा भातासुद्धा दिसत नाही? तुझी लाडकी प्रियतमा सीताबाई पण कुठे दिसत नाही? तुझ्याबरोबर कोणीतरी दुसरीच स्त्री दिसत आहे. शरयू नदी सोडून भीमा नदीच्या पात्रापाशी कसा आलास? माझ्या हातून काय पाप झाले का? त्याचे प्रायश्चित्त मी घेऊ का? पंढरपूर तुला एवढे का आवडले?" असे म्हणून रामदास रडू लागले.

रामदासांची ही निष्ठावंत भक्ती पाहून विठ्ठलाने आपले श्रीरामाचे रूप तेथे प्रकट केले. ते पाहून रामदास आनंदित झाले. विठ्ठलाने रामदासांच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून आशीर्वाद दिला की, "तू सदैव माझी भक्ती कर. राम व कृष्ण यांच्या अद्‌भुत लीलांचे कीर्तनातून गुणगान गा. लोकांना भक्तीमार्गाकडे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वळव. कलियुगात नामस्मरणाचे महत्त्व सर्वांना पटवून सांग.'' रामदासांनी तेथेच आपले कीर्तन सुरू केले.

कीर्तनसमाप्तीनंतर रामदास पुन्हा निघाले. त्यांना वाटेमध्ये महाराष्ट्राचे लाडके दैवत असलेल्या खंडेरायाची जेजुरी लागली. खंडेरायास कळाले की हा आपले दर्शन घेण्यास येणार नाही. तो रामाचा एकनिष्ठ भक्त आहे. त्यामुळे आपणच वेष पालटून त्याला दर्शन द्यावे असे त्याने ठरवले. खंडेरायाने शिवाजींचे रूप घेतले व रामदासांना भेटण्यास गेले. तेथे दोघांच्या गप्पागोष्टी झाल्या. त्यानंतर शिवाजी तेथेच गुप्त झाले. रामदासांनी आपल्या दिव्य चक्षुने पाहिले की आता आलेला शिवाजी म्हणजे खंडोबा होता. ते स्वत: जेजुरी चढून वर आले. रामदासांनी खंडोबाच्या गुणांचे आपल्या कीर्तनातून वर्णन केले. त्यांनी खंडोबावर 'पंचानन हयवाहन सुरभूषितनिळा' ही आरती रचली. तसेच सर्व देवांचा अधिदेव पार्वतीशंकरपुत्र गणेशाची आरती रचली, ही आरती म्हणजेच 'सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची' होय. तसेच रामाचा परमभक्त हनुमंतावर आरती रचली. या तिन्ही आरत्या आजही लोकांमध्ये प्रचलित आहेत.

पुढे रामदासांनी स्वत:चा संप्रदाय निर्माण केला. यालाच रामदासी संप्रदाय असे नाव आहे. सर्व लोकांच्या कल्याणासाठी 'दासबोध' हा उपयुक्त ग्रंथ लिहिला. तसेच आत्माराम हा ग्रंथ लिहिला. त्यांनी देवावर अभंगसुद्धा लिहिले. त्यांची करुणाष्टके-सुद्धा प्रसिद्ध आहेत.

अशा थोर भक्त रामदासांनी पुढे सज्जनगडावर समाधी घेतली. आयुष्यभर ते विरक्त व अलिप्त राहिले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अध्याय ४८ वा

॥ संत तुकाराम ॥

श्रोत्यांनो! ज्ञानीयांचा राजा ज्ञानेश्वरमाऊलीची समाधी असलेले आळंदी गाव सर्वांना माहीत आहेच. त्या आळंदीपासून थोड्या अंतरावर देहू गाव आहे. या देहू गावात पंढरीनाथाचा एक लाडका भक्त राहत होता. या भक्ताचे नाव तुकाराम बोल्होबा अंबिले. सदैव पांडुरंगाच्या चिंतनात तुकाराम गढून गेलेले असत. तुकारामांना दोन पत्नींची साथ मिळाली होती. पहिली बायको शांत होती, सुस्वभावी होती. दुसरी बायको खाष्ट होती. जणू काही जगदंबेचा अवतार! तुकारामांवर सारखी रागवायची. घरी लक्ष्मी पाणी भरत होती.

कालचक्राच्या नियमाप्रमाणे तुकारामांचे आईवडील परलोकी गेले. यामुळे त्यांना फार दु:ख झाले. दु:खातून सावरेपर्यंत देहूत कोरडा दुष्काळ पडला. गावातील सर्व लोक अन्नासाठी वणवण फिरू लागले. घरातील धान्याचा सर्व साठा संपला. मोठी पत्नी अन्नासाठी तडफडून मृत्युमुखी पडली. या पत्नीस दोन मुले होती. दुसऱ्या पत्नीस संतान नव्हते. श्रीमंत तुकाराममहाराज गरीब झाले. घरातील सर्व पैसा संपला. या सर्व गोष्टींमुळे तुकारामांना प्रपंच तुच्छ वाटू लागला.

तुकारामांनी ओळखले की, संसार हा नाशवंत आहे. शाश्वत आहे ते देवाचे प्रेम. देवाची भक्ती केल्याशिवाय देवाचे प्रेम मिळणे अशक्य आहे. म्हणून त्यांनी विठ्ठलाची भक्ती करण्यास सुरुवात केली. देहू गावातील एका जुन्या विठ्ठलाच्या देवळात तासन्तास बसून ते विठ्ठलाचा धावा करू लागले. त्यांनी अत्यंत पवित्र, सर्व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पापांचा नाश करणारे, आयुष्यवर्धक एकादशी व्रत सुरू केले. त्यांनी कीर्तनास सुरुवात केली. संतवाङ्मयाचा अभ्यास करून कीर्तनाच्या दाखल्यासाठी पाठांतर करण्यास सुरुवात केली. गोरगरीब, गाईंची ते सेवा करू लागले. त्यांनी स्वत:च्या अभंगरचनेस प्रारंभ केला.

तुम्ही नामयाची एक कथा श्रवण करा.

एकदा विठ्ठलाचा लाडका भक्त नामदेव, ज्याचा नैवेद्य लहानपणी विठ्ठलाने खाल्ला होता, तो विठ्ठलास म्हणाला, "मला तुझ्या नानारूप लीलांचे, तुझ्या मनमोहक रूपाचे अभंगांमधून वर्णन करायचे आहे."

"यासाठी तुला १०० वर्षांपेक्षा जास्त आयुष्याचा कालावधी लागेल." असे विठ्ठलाने नामदेवास सांगितले. नामदेव म्हणाले, "मी फक्त निमित्तमात्र आहे. बाकी सर्व तूच कर. तूच कर्ता करविता आहेस." विठ्ठलाने विद्यादेवी शारदेस सांगितले की, "तू नामदेवांच्या जिभेवर बस आणि श्रुतीतील गूढ रहस्य अभंगांद्वारे प्रकट कर." सरस्वतीने यासाठी नकार दिला, तेव्हा विठ्ठलच अभंग लिहिण्यास तयार झाला.

विठ्ठलाने एकापाठोपाठ एक अभंग लिहिण्यास सुरुवात केली. अनेक दिवस पालटले. ९४ कोटी ४० लक्ष एवढी संपूर्ण कवित्व-संख्या झाली आणि ललितांची संख्या ९,००,००० एवढी झाली. त्यानंतर विठ्ठल व नामदेव तुकारामांच्या स्वप्नात गेले व म्हणाले की, "आता यापुढे स्वत:ची अभंगपुष्पे तू विठ्ठलाच्या चरणी अर्पण कर. यामुळे सूर्य, चंद्र, तारे असेपर्यंत तुझे नाव लोकांमध्ये राहील."

तुकाराम धाड्कन् जागे झाले. त्यांनी आजुबाजूस पाहिले, तेव्हा त्यांना कोणीही दृष्टीस पडले नाही. विठ्ठलाच्या आज्ञेनुसार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभंगरचनेस सुरुवात केली. सुंदर ते ध्यान उभे विटेवरी, वृक्ष वल्ली आम्हां सोयरे वनचरे, जेथे जातो तेथे तू माझा सांगाती यांसारखे एकापेक्षा एक सुंदर अभंग रचले. त्यांनी या अभंगातून विठ्ठलाचे गुणगान तर गायलेच, शिवाय शेकडो अभंगातून त्यांनी कर्मठ लोकांवर टीका केली. ढोंगी साधूंची खरडपट्टी काढली. तुकाराम अभंग करत आहेत हे काही लोकांना पटले नाही. त्यांनी तुकारामांना नावे ठेवण्यास सुरुवात केली. मंबाजी नावाचा एक निर्लज्ज मनुष्य तुकारामांना फार छळत असे. लोकांनी तुकारामांचे अभंग इंद्रायणी नदीत बुडवले; पण विठ्ठलाच्या कृपेमुळे ते तरले.

तुकारामांना धनाची अपेक्षा नव्हती; कारण त्यांना विठ्ठलरूपी धन मिळाले होते. हे विठ्ठलरूप धन त्यांना आयुष्यभर पुरणारे होते. एकदा यशवंत, कीर्तीवंत, वरदवंत जाणता राजा शिवाजींनी तुकारामांच्या समोर चांदीच्या ताटात सोन्याच्या मोहरा भरून ठेवल्या. या मोहरा पाहिल्यावर तुकाराम शिवाजींना म्हणाले, "शिवबा! या सुवर्णमोहरा आमच्या कामी येणार नाहीत. आम्हाला विठ्ठलरूपी धन प्रिय आहे. आम्हाला सुवर्ण वर्ज्य आहे. हे तुम्ही सन्मानाने येथून घेऊन जावे. यामुळे वैष्णवांच्या मनात मोह उत्पन्न होतो व ते देवांना विसरून जातात. तुम्हीसुद्धा आमच्या मार्गात या. विठ्ठलाचे सदैव नामस्मरण करा. गळयामध्ये तुळशीची माळ घाला." असे तुकाराम शिवाजींना म्हणाले.

मातृभक्त शिवाजीमहाराज हे पुण्यास तळ ठोकून आहेत ही बातमी मुघलांना कळली. शिवाजीस पकडण्यासाठी २,००० पठाण पुण्यास आले. त्यांनी वाड्याचा कडेकोट बंदोबस्त केला. शिवाजी येथेच नक्की सापडेल, त्याला आपण पकडून नेऊ असा त्यांचा बेत होता. त्या वेळी तुकाराममहाराज सुश्राव्य कीर्तन करीत होते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आलेल्या श्रोत्यांकडून शिवाजींच्या जीवाला धोका असल्याचे तुकारामांना कळाले. तेव्हा तुकाराम शिवबास म्हणाले, "राजे! तुमचा प्रताप थोर आहे हे आम्हास माहीत आहे. या प्रतापापाठीमागे भगवंताचा हात आहे. तोच कर्ता करविता आहे. देव तारी त्याला कोण मारी! हे आपणास माहीत आहेच. आज एकादशीच्या कीर्तनात तुम्ही निश्चिंतपणे बसा. सर्व काही देवाच्या हातात आहे."

काही पठाण आतमध्ये घुसले. त्यांना शिवाजी ओळखता येईना. ते पुन्हा आपल्या सरदारापाशी आले. तेव्हा सरदाराने कीर्तनास बसलेल्या सर्वांचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली.

तुकारामांना दिव्य चक्षुने हे कळले. त्यांनी विठ्ठलाचा धावा सुरू केला. आमच्या सर्वांचा जीव आता तुझ्याच हातात आहे असे सांगितले. 'विठ्ठला! विठ्ठला!! आम्हाला वाचव रे!!!' अशी करूण प्रार्थना करण्यास सुरुवात केली. तुकारामांची व श्रोतृ-समुदायाची विठ्ठलाने हाक ऐकली. त्याने तुकारामांस सांगितले की, "तू असेच कीर्तन पुढे सुरू ठेव. माझा जयघोष मोठ्याने म्हण." येथे विठ्ठलाने हुबेहूब शिवाजींसारखे रूप घेऊन एका चपळ घोड्यावरून तो पळाला. सर्वत्र आरडाओरड झाली. शिवाजी पळाला, धावा, त्याचा पाठलाग करा. हजारो पठाण शिवाजीचा पाठलाग करू लागले. खरे शिवाजी मात्र कीर्तनात शांतपणे बसले होते.

विठ्ठलाने त्या सर्व पठाणांना दूरवर नेले. अत्यंत घनदाट अरण्यात नेल्यानंतर विठ्ठल तेथे अंतर्धान पावला. सर्व सैन्य काट्यांमध्ये अडकले. चंद्र अस्तास गेला. सर्वत्र अंधार झाला. घोडे घाबरले. त्यांनी सैन्यास भीतीने लाथा मारण्यास सुरुवात केली. त्यामुळे हजारो सैन्य गतप्राण झाले. अनेक सैनिकांची वस्त्रे फाटली. सर्वजण आपापला जीव वाचवण्याचा प्रयत्न करू लागले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

विठ्ठल पुन्हा कीर्तनात आला व कीर्तनात डोलू लागला, नाचू लागला. शिवाजींनी जीव वाचवल्याबद्दल विठ्ठलाचे आभार मानले विठ्ठलाने शिवाजींना आशीर्वाद दिला. या विठ्ठलाची अद्भुत चमत्काराची घटना शिवाजींनी आपल्या मातोश्रींना म्हणजेच जिजाबाईंना सांगितली.

शिवाजींनी ठरवले की आपण तुकारामांच्या या उपकाराची परतफेड करावी. त्यांनी तुकारामांना धान्य देण्याचे ठरवले. त्यांनी पंचवीस बैलगाड्यात धान्याची पोती भरून घेतली व ते तुकारामांच्या घरी गेले. तुकारामांनी शिवाजींचे स्वागत केले. त्यांना कांदा-भाकर खाण्यास दिली. शिवाजींनी संतांचा प्रसाद आवडीने खाल्ला. शिवाजी तुकारामांना म्हणाले, "महाराज! तुम्हाला काहीतरी द्यावे या हेतूने मी पंचवीस बैलगाड्या भरून वेगवेगळी धान्ये आणली आहेत त्याचा तुम्ही स्वीकार करावा." तुकारामांनी ते धान्य ठेवून घेतले.

तुकारामांचे जीवन विरक्त होते. कशाचाही साठा करून ठेवायचा नाही, देवास आपली काळजी आहे, अशी त्यांची जीवनप्रणाली होती. त्यांनी आपल्याला पुरेल एवढेच धान्य ठेवून घेतले व उरलेले अन्नधान्य गोरगरिबांमध्ये वाटून टाकले. यामुळे तुकारामांची पत्नी त्यांना रागावली.

एके दिवशी तुकारामांनी कीर्तन सुरू असताना मृत्यु पावलेल्या कासाराच्या मुलास जिवंत केले. हे सर्व त्यांनी देवाच्या नामस्मरणावर केले. तुकारामांनी अनेक लोकांना भक्तीमार्गाकडे वळवले. त्यांनी अनेकांना व्यसनांपासून मुक्त केले. आपल्याला एकांत मिळावा म्हणून ते भंडारा डोंगरावर जाऊन साधना करीत असत. संसारबंधनात राहूनसुद्धा देवाच्या प्रीतीस कसे प्राप्त करावे?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

याचा आदर्श तुकारामांनी सर्व लोकांना शिकवला.

तुकारामांना अवघे एक्केचाळीस वर्षांचेच आयुष्य लाभले. वारकरी संप्रदायानुसार लोक सांगतात की, 'ज्ञानदेवे रचिला पाया। तुका झालासे कळस' संत तुकारामांनी वारकरी संप्रदायाचा कळस चढवला. आजही अनेक लोक तुकारामांची पालखी पंढरपुरास नेताना 'ग्यानबा तुकाऽराम, ग्यानबा तुकाऽराम' असा जयघोष करीत असतात.

तुकारामांनी आपल्या आयुष्यात जेवढे जमेल तेवढा वारकरी संप्रदाय वाढवण्याचा प्रयत्न केला. त्यांना अनेक शिष्य होते. संत निळोबा व संत बहिणाबाई हे दोघेही तुकारामांचेच शिष्य होत.

तुकारामांनी ज्ञानेश्वरांप्रमाणे हरिपाठाचे अभंगसुद्धा लिहिले. त्यांचा हरिपाठ आजही सर्वत्र म्हटला जातो. तुकारामांच्या जीवनात अनेक संकटे आली, पण त्यांनी देवाचे नामस्मरण सोडले नाही.

तुकाराममहाराज सदेह वैकुंठलोकी गेले. अशा पद्धतीने संत तुकारामांनी आपले अवतारकार्य संपवले.

अध्याय ४९ वा

॥ संत तुकारामांच्या पत्नीला रुक्मिणीमातेचे दर्शन ॥

तुकारामांनी केलेल्या अद्‌भुत चमत्कारामुळे सर्व लोक त्यांना मान देऊ लागले. मानसन्मानात न अडकता विठ्ठलाचे भजन करण्यासाठी तुकाराममहाराज भंडारा डोंगरावर जात असत. रात्री पुन्हा ते गावात येत. तेथे वेदातल्या अनेक कथांवर कीर्तने करीत. सुमारे दोन महिने तुकाराम स्वगृही गेलेच नाहीत. त्यांच्या पत्नीस याबद्दल आश्चर्य वाटे. काही दिवसानंतर नदीवरून पाणी भरून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आणत असताना तुकारामबुवा भेटले तेव्हा त्यांची पत्नी म्हणाली, "अहो धनी! घरी बायकोमुलांकडे काही लक्ष आहे की नाही? सदैव त्या सावळ्या विठ्ठलाच्या मूर्तीसमोर 'विठ्ठल विठ्ठल, जय हरी विठ्ठल,' असे म्हणत बसता. घरी खाण्याची व्यवस्था कोण करणार? तुम्ही घराकडे का फिरकत नाही? तुम्ही नुसते कीर्तनात नाचत असता; पण बायकोच्या जीवाची काय अवस्था होते, याचा विचार तुम्ही कधी केलात का? रात्रंदिवस तुमच्या भेटीसाठी रडून रडून माझे डोळे सुजून गेलेत. जीवाची तळमळ होते. तुम्हीच सांगा, पतिपरमेश्वराशिवाय पत्नीस करमेल का? तुम्ही आधी घरी चला पाहू. आपली लेकरे वाट बघत असतील."



तुकाराममहाराज आपल्या पत्नीस म्हणाले, "हे बघ मी घरी येतो पण त्याआधी तू मला वचन दे, तू हरिचरणांचे स्मरण करशील.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याचे गुणगान आवडीने गाशील. तू त्या विठ्ठलाचे चरणकमल घट्ट पकड. तोच तुझा सदैव सांभाळ करेल. तुला अन्न, वस्त्र, निवारा तोच पुरवेल."

तुकारामांच्या पत्नीने सर्व काही मान्य केले. तुकारामांना तिने तसे वचनही दिले. त्या दिवशी योगायोगाने अत्यंत पवित्र, पुण्यवर्धक असे जे व्रत म्हणजे एकादशी होती. या पवित्र एकादशीस तुळशीवृंदावनाजवळ बसून तुकारामांनी आपल्या पत्नीस मौलिक उपदेश केला. हे एकादशीस सांगितलेले अकरा अभंग प्रसिद्ध आहेत. या अभंगांमुळे पत्नीच्या हृदयात विरक्ती उत्पन्न झाली.

आपल्या पतीच्या सांगण्यानुसार तिने दुसऱ्या दिवशी आपल्या घरातील असतील नसतील तेवढ्या सर्व वस्तू गावातील लोकांमध्ये वाटून टाकल्या. तेथे एक साधू आला. त्याला काहीतरी मिळेल अशी आशा होती; पण त्याला तेथे काहीच मिळाले नाहीत. त्या साधूने चुलीतील राख आपल्या अंगाला फासली व तेथून प्रयाण केले.

तुकारामांच्या पत्नीला खरोखरच विरक्ती उत्पन्न झाली आहे का, हे पाहण्यासाठी रुक्मिणीने तिची परीक्षा घेण्याचे ठरवले. रुक्मिणीमातेने महारीण स्त्रीचे रूप घेतले व ती तुकारामांना म्हणाली की, "अहो दादा! तुम्ही सर्व वस्तू गोरगरिबांना वाटून टाकल्या; पण मला काहीच मिळाले नाही. मी तुमच्या घरची महारीण आहे. मला काही असेल तर दिल्यास बरे होईल."

तुकाराम तिच्याबरोबर घरी आले. त्यांच्या बायकोने पाठीमागे साडी वाळत घातली होती. तुकारामांनी ती साडी त्या महारणीस दिली व म्हणाले, "माते! तुझा आशीर्वाद सदैव आमच्या पाठीशी असू दे!" तुकारामांच्या पत्नीस या घटनेमुळे राग आला. ती तुकारामांवर चिडली. ती तुकारामांना म्हणाली, "तुम्ही दोन महिने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

इकडे फिरकला नाहीत, तेव्हा मोलमजुरी करून मी ते नवीन लुगडे विकत घेतले होते. तुम्हाला सारखा पांडुरंगाचाच ध्यास लागलेला असतो. त्या विठ्ठलामुळे तुमच्यात सगळा बदल झाला आहे. तुम्हाला वेड लागले आहे. माझे एकुलते एक लुगडेसुद्धा त्या स्त्रीला देऊन टाकले. हे तुम्ही सगळे विठ्ठलापायी केलेत. थांबा, मी त्या विठ्ठलाचे पायच दगड घालून फोडून टाकते.''

तिने दगड घेतला व ती विठ्ठलाकडे जाऊ लागली. यामुळे विठ्ठल घाबरला. तो रुक्मिणीस म्हणाला की, ''या अंबेस तूच आता सांभाळ.'' रुक्मिणी म्हणाली की, ''तुम्ही थोडावेळ कोठेतरी जाऊन या. भक्तांना थोडी वाट पाहत बसावे लागले तरी चालेल.''

विठ्ठल म्हणाला, ''हे मला शक्य नाही.'' तुकारामांना ही गोष्ट कळली तेव्हा ते घाईने विठ्ठलाच्या देवळाकडे जाऊ लागले. त्यांनी मनात ठरवले की विठ्ठलाच्या पायावर दगड मारायच्याऐवजी माझ्या पायावर दगड मार, असे तिला सांगून तिचा राग शांत करावयाचा.

रुक्मिणीने तुकारामांची पत्नी मंदिरात येताच धावत जाऊन विठ्ठलाच्या देवळाचे महाद्वार बंद केले. विठ्ठल आपल्यावर रुसला आहे, असे वाटून तुकाराम बाहेरच उभे राहिले. तुकारामांच्या पत्नीने विठ्ठलाच्या पायावर दगड मारण्यासाठी हात उगारला, तेव्हा रुक्मिणी तिला म्हणाली, ''माझ्या पतीपरमेश्वराने तुझे काय वाईट केले आहे? तू भक्तवत्सल विठ्ठलाच्या चरणकमलांवर दगड का मारणार आहेस? तुला विठ्ठलापासून काय हवे आहे? तुझा पती तुकाराम तर विठ्ठलाच्या भक्तीमध्ये गुंग झालेला असतो. असे असताना तू वेड लागल्याप्रमाणे का वागतेस? तुला संसारात काहीही कमी पडणार नाही. तुला जे काही हवे असेल ते मी देत जाईन.''

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

यामुळे तुकारामांची पत्नी आनंदित झाली. रुक्मिणीमातेने तिची ओटी भरली व शंभर सुवर्णमुद्रा दिल्या. त्यानंतर ती सुखाने घरी परतली.

श्रोत्यांनो! आता पुढील अध्यायात आता एक सुश्राव्य कथा श्रवण करूया.

अध्याय ५० वा

|| पंगतीला बसून श्रीगणेशाचे भोजन ||

रुक्मिणीमातेकडून आपली अर्धांगिनी साडीचोळी व शंभर सुवर्णमुद्रा घेऊन आल्याचे तुकारामांना कळाले. तुकाराम आपल्या पत्नीस म्हणाले, "तू हे योग्य नाही केलेस. यामुळे आपला सोन्यासारखा परमार्थ बुडाला. आपण आधीच सर्वस्वाचा त्याग केला होता आणि तू हे रुक्मिणीकडून कशाला आणलेस? विठ्ठल व रुक्मिणी हे आपले माता-पिता आहेत. ते आपल्याला संसारात काहीही कमी पडून देणार नाहीत. ह्या सर्व सुवर्णमुद्रा गोरगरिबांमध्ये वाटून टाक. संपत्तीचा त्याग केला की सायुज्य मुक्तीची प्राप्ती होते.

तुकारामांच्या आज्ञेवरून त्यांच्या पत्नीने त्या शंभर सुवर्णमुद्रा गोरगरिबांमध्ये वाटून टाकल्या. तुकारामांची कीर्ती सर्वत्र पसरू लागली होती. तुकारामांना सर्वजण साधूमहाराज म्हणू लागले. आपल्या प्रपंचातील अडीअडचणी दूर करण्यासाठी तुकारामांकडून उपाय मागू लागले. पंढरीनाथ पांडुरंग तुकारामांबरोबर भोजन करतो हे सर्वांना माहीत झाले. चिंचवड येथे एक गणेशोपासक होता. दर संकष्टी चतुर्थीस तो अष्टविनायकास जाऊन येत असे. त्यांची गणेशाची निष्ठावंत उपासना सुरू होती. त्यांना गणेश प्रसन्न झाला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होता. त्यांच्या मनात तुकारामांबद्दल द्वैत भाव उत्पन्न झाला. ते मनात म्हणाले की, तुकाराम काहीच आराधना करत नसताना त्यांना देव कसा काय वश होतो, हे आपण पाहू या. देव नावाच्या ब्राह्मणाने तुकारामांना चिंचवडला येण्यासाठी लोकांकडून आमंत्रण पाठवले. तुकारामांनी ते आमंत्रण स्वीकारले व ते चिंचवडला गेले.

तुकारामांचे आगमन झाले. तो ब्राह्मण विघ्ननाशक लंबोदर गणपतीच्या शेजारी जाऊन बसला. दुपार झाली. भोजनाची वेळ झाली. सर्व ब्राह्मण जेवावया बसले. दक्षिणावाटप झाले. तुकारामांजवळ पंढरीनाथासाठी एक पान वाढण्यात आले तेव्हा तुकाराममहाराज म्हणाले, "अहो! शिवपार्वतीचा पुत्र गणपती-साठीसुद्धा एक पान अजून वाढा. गणेश जेवावयास येणार आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याची आपण प्रार्थना करणार आहोत."

जेवावयास बसलेल्या त्या सर्व ब्राह्मणांनी गणेशाची प्रार्थना केली पण गणेश तेथे जेवण्यासाठी आला नाही. सगळ्या ब्राह्मणांची फजिती झाली. तुकाराममहाराज म्हणाले, "थांबा! आता मी गणपतीची प्रार्थना करतो. त्याला यायला थोडा वेळ लागेल. आपल्या भक्ताला पाण्यातून वाचवण्यासाठी तो पाण्यात उतरला आहे." ब्राह्मणांनी गणेशाच्या मूर्तीकडे पाहिले तेव्हा त्यांना गणपतीची मूर्ती ओलीचिंब झालेली दिसली. सर्व ब्राह्मणांनी आश्चर्य व्यक्त केले.

सर्व ब्राह्मणांनी तुकारामांची स्तुती केली. त्यांनी तुकारामांना विचारले की गणेशाबद्दल तुम्हाला एवढी माहिती कोठून मिळाली? तेव्हा बुद्धिदाता गणेशाने स्वत: सांगितले की, "त्या तुकारामांवर लक्ष्मीपती श्रीहरी विष्णूंची कृपा आहे. चक्रपाणीचा तुकारामांना आशीर्वाद आहे. त्यामुळे माझ्याबद्दल तुकारामांना सर्व काही माहीत झाले आहे. माझीसुद्धा त्यांच्यावर कृपा आहे. त्यांनी माझ्यावर अभंग केले आहेत. त्या अभंगामधून माझ्या लीलागुणांचे वर्णन केले आहे."

सर्व ब्राह्मणसमुदाय तुकारामांना म्हणाला, "तुकारामबुवा! तुमची भक्ति खरोखर धन्य आहे. तुमच्या भक्तीसमोर सर्व देव येथे येतील. तुमचा आराध्यदेव पांडुरंग जेवण्यासाठी आला आहे. आता तुम्ही स्वत: गणेशास जेवण्यास बोलवा. त्याचे पान वाढून ठेवले आहे." तुकारामांनी गणपतीचा संस्कृतमधील एक श्लोक म्हटला व गणपतीला भोजनासाठी आवाहन केले. तुकारामांची प्रार्थना ऐकून गणपती भोजनास आला. गणपती व विठ्ठलाकरिता आधीच दोन पाने वाढून ठेवली होती. त्या वेळी उपस्थित

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

असलेल्या सर्व लोकांना मनातील अहंकारामुळे विठ्ठल व गणेश कोणीही दिसेनात. पानातले अन्नपदार्थ मात्र पटापट संपत होते. सर्व लोकांनी तुकारामांना सविनय नमस्कार केला व म्हणाले, "तुम्ही ज्ञानवान, गुणवान आहात. तुमची ही लीला पाहून आमचा अहंकार संपला आहे. आम्हाला तुम्हीच आशीर्वाद द्या." तुकारामांनी त्या लोकांना आशीर्वाद दिला व ते पुढील प्रवासास निघाले.

देहूला परतताना तुकारामांना एक स्नेही भेटला. त्याचा उसाचा मोठा मळा होता. तुकारामांना त्याने मळ्यात नेले, त्यांना उसाचा रस दिला.

ते कडक उन्हाळ्याचे दिवस होते. त्यामुळे उसाचा थंड रस प्याल्याने तुकाराममहाराजांना बरे वाटले. त्या दोघांनी एकमेकांची विचारपूस केली. तुकारामांनी त्या मित्राचा निरोप घेतला. निरोप घेण्यापूर्वी त्याने तुकारामांना पंचवीस उसांची मोळी भेट म्हणून दिली व तुकारामांना म्हणाला, "मुलांना हा खाऊ द्या. काकाने पाठवलेला आहे म्हणावे."

तुकाराम ती मोठी मोळी घेऊन देहू गावात आले. सर्व लहान मुले आट्यापाट्या खेळत होती. सर्वांनी तुकारामांकडचा ऊस पाहिला. प्रत्येक मुलाचा डोळा तुकारामांच्या उसावर होता. काही मुलांनी लक्ष नसताना पाठीमागून ऊस पळवला तर काहींनी सत्यतेने तुकारामकाकांकडे मागितला. तुकारामांनी आवडीने त्या मुलांना उसाचे वाटप केले. असे केल्यामुळे घरात येईपर्यंत एकुलता एक ऊस शिल्लक राहिला. तुकारामांच्या पत्नीस हे सहन झाले नाही. ती त्यांना म्हणाली, "घरी बायकोमुले आहेत ना ? मग कशाला ऊस सगळ्यांना वाटत वाटत आलात? इतरांच्या मुलांवर एवढे प्रेम

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizaqtion by eGangotri

कशाला हवे? डोके ठिकाणावर आहे ना?'' असे वाकडेतिकडे बोलून उरलेला एकुलता एक ऊस तुकारामांच्या पत्नीने तुकारामांच्या पाठीवर मारला. त्यामुळे त्या उसाचे तीन समान भाग झाले. एक तुकडा बायकोला दिला व उरलेले दोन तुकडे तुकारामांनी स्वत: व मुलांमध्ये वाटले. समान भाग केल्याबद्दल तुकारामांनी पत्नीचे कौतुक केले. तुकारामांना एवढे होऊनसुद्धा राग आला नाही याचे तिला आश्चर्य वाटले.

खरोखरच तुकारामबुवा शांतीब्रह्मच होते. आजच्या कलियुगात एवढा शांतीब्रह्म मनुष्य मिळणे अत्यंत अवघड आहे. काम, क्रोध, लोभ ही नरकाची तीन महाद्वारे आहेत असा उपदेश तुकारामबुवा आपल्या कीर्तनातून करीत असत. दुसऱ्यास जर सरळ उत्तर दिले तर क्रोध येण्याचे कारणच नाही. जीवनाच्या अनेक संकटांतून सुवर्णमध्य काढून जीवनाची वाटचाल करा, असा बहुमोल उपदेश ते लोकांना देत असत.

तुकारामांनी अनेक वर्षे पंढरीची वारी केली. ते पायी पंढरीची वारी करत असत. त्यांना वारी करत असताना अनेक अभंग सुचलेले आहेत. एका वर्षी विषमज्वराने ते अत्यंत आजारी होते. त्यांना उभे राहण्याची ताकदसुद्धा नव्हती तेव्हा त्यांनी पंढरपुरास जाणाऱ्या वारकऱ्यांबरोबर पंढरीनाथास पत्र पाठवले. या पत्रातून त्यांनी वीस अभंगांची रचना केली. हे अभंग वाचताना देवाबद्दल प्रेम उत्पन्न होते, डोळ्यात प्रेमाश्रू उभे राहतात. या अभंगांत त्यांनी विठ्ठलाची आळवणी केलेली आहे. विरही भक्ताची स्थिती या अभंगातून आपल्याला कळते. ते पत्र घेऊन वारकरी पंढरपुरास गेले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitized by eGangotri

अध्याय ५१ वा

॥ संत तुकाराम व विठ्ठलरुक्मिणी भेट ॥

तुकारामांचे पत्र घेऊन वारकरी 'विठ्ठल विठ्ठल, जय हरी विठ्ठल' असा जयघोष करीत पंढरपुरास गेले. तेथे वारकऱ्यांनी सर्वांच्या पापांचे हरण करणारी परमपवित्र नदी चंद्रभागेत स्नान केले. त्यानंतर विठ्ठलाचे दर्शन घेतले. विठ्ठलाची 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा॥' ही आरती म्हटली. तुकारामांच्या पत्रातील ते करुणापर अभंग त्यांनी म्हणण्यास सुरुवात केली. हे अभंग ऐकून पांडुरंगाच्या नेत्रकमलांमधून धारा वाहू लागल्या. पांडुरंगाचा कंठ दाटून आला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुकारामांच्या आजारपणाची विठ्ठलास काळजी वाटू लागली. विठ्ठलाने ही गोष्ट रुक्मिणीस सांगितली. तेव्हा तिने 'तुकारामांना येथेच बोलावून घ्या,' असा सल्ला दिला. गरुडाचा या कामी उपयोग करून घ्यावा असे रुक्मिणीमाता म्हणाली. विठ्ठलाने तुकारामांना पत्र लिहिले की, "जोपर्यंत सूर्य, चंद्र, तारे आहेत तसेच विष्णूंचे निवासस्थान वैकुंठ तसेच महादेवाचे निवासस्थान कैलास आहे तोपर्यंत या जगात तुकारामांचे नाव अजरामर होईल. त्यांची कीर्ती सर्वत्र पसरेल. तुकाराम! तुझे स्वरूप सदैव माझ्या हृदयात आहे. तुझ्यासारखा प्रेमळ भक्त मला मिळाला म्हणून मला खूप आनंद झाला आहे. मी तुझ्या भेटीस स्वत: येणार होतो, पण इथे लाखो भक्त माझ्या भेटीसाठी आतुरलेले आहेत. त्यांना सोडून मला येता येणार नाही. मी तुला आणण्यासाठी गरुडास पाठवीत आहे. त्याच्या पाठीवर आरूढ होऊन तू इकडे ये. आम्ही दोघेही तुझे स्वागत करू." हा निरोप घेऊन गरुडाने उड्डाण केले.

आपल्याला पंढरपुरास जाता आले नाही, त्यामुळे तुकाराममहाराज रडत होते. तेवढ्यात तेथे गरुड आला. त्याला पाहिल्यावर तुकारामांनी त्यास वंदन केले. तुकारामांनी गरुडास पंढरीनाथ व रुक्मिणीमातेबद्दल विचारले व आपणास किती दु:ख झाले ते सांगितले. गरुड म्हणाला, "विठोबाची अवस्थासुद्धा तुमचा विरह सहन न झाल्याने तुमच्यासारखीच झाली आहे. त्यांनी मला येथे तुम्हाला आणण्यासाठी पाठवले आहे. माझ्या पाठीवर आरूढ होऊन लवकर चला. तेथे भक्तवत्सल श्रीविठ्ठल तुमची वाट पाहत आहेत." गरुडाने विठ्ठलाने दिलेले पत्र तुकारामांना दिले. तुकारामांनी ते पत्र आपल्या मस्तकी लावून वंदन केले. त्यांना आनंद झाला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुकारामांनी गरुडास सांगितले की, "मला विठ्ठल अतिशय पूज्य आहे. विठ्ठल माझे जीवनच आहे. त्याचप्रमाणे तू मला विठोबासारखा [illegible] आहेस, माननीय आहेस. यामुळे मी तुझ्या पाठीवर बसणार नाही. त्यामुळे तुझ्या पाठीवर विठ्ठलास बसवून येथे आण. मी त्याची वाट बघतो. त्याचे मुखकमल व चरणकमल केव्हा पाहायला मिळेल, असे झाले आहे. यासाठी माझा जीव आतुरतेने सुवर्णसंधीची वाट पाहत आहे." गरुड पुन्हा पंढरपुरास गेला.

गरुडाच्या पाठीवर तुकाराम नाहीत, हे विठ्ठलाने पाहिले. गरुडाने आपल्या स्वामीस सर्व काही सांगितले. रुक्मिणी व विठ्ठलाने तुकारामांना भेटण्यासाठी गोपाळकाला झाल्यानंतर जाऊ असे ठरवले.

त्यानंतर तेथे विठ्ठलाचे दिव्य दर्शन घेण्यासाठी संतमेळा जमला. यामध्ये निंबराज, संतोबा पवार, बोधला, गणेशनाथ इ. भक्त व संतांचा समावेश होता. या सर्वांनी विठ्ठलास लोटांगणे घातली. यातला एक संत निंबराजमहाराज; यांना लोटांगण घालताना फार कष्ट पडले. त्यांचा भाव पाहून रुक्मिणीने आपल्या पतिपरमेश्वरास काहीतरी वरदान देण्याची आज्ञा केली. आता या निंबराज महाराजांची कथा पाहू या. ती तुम्ही शांत चित्ताने श्रवण करा.

संत निंबराज

महाराष्ट्र राज्यात देवपैठण नावाचे सुंदर गाव आहे. या गावातील एका भक्ताची कथा आपण ऐकणार आहोत. या भक्ताचे नाव आहे निंबराज कुलकर्णी. संसारबंधनात प्रथम निंबराज अडकले होते. पण देवाच्या कृपेमुळे त्यांना आत्मज्ञानाची प्राप्ती झाली व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

त्यांनी संसार सोडून दिला व ते संन्यासमार्गाला लागले. संन्यासधर्म स्वीकारल्यानंतर ते बद्रीनाथ, केदारनाथ, रामेश्वर, द्वारका या चार धामांचे दर्शन करू आले. तसेच त्यानंतर काशी, गया, प्रयाग या त्रिस्थळी यात्रेस जाऊन आले. यांसारख्या अनेक तीर्थक्षेत्रांना निंबराजांनी भेटी दिल्या. त्यानंतर ते घरी आले. त्यांना कीर्तन करण्याची आवड होती. ते कीर्तन शिकले व लोकांसमोर वेगवेगळ्या संतांवर, ग्रंथांवर कीर्तने करू लागले.

एके दिवशी विठ्ठलाने शिवपार्वतीनंदन गणपतीस सांगितले की, "निंबराजाला कीर्तन करण्यासाठी तू स्मरणशक्ती प्रदान कर." विठ्ठलाची आज्ञा गणेशाने आनंदाने मान्य केली. याप्रमाणे विनायकाने निंबराजाच्या स्वप्नात जाऊन त्याच्या मुखात तांबूल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitized by eGangotri

ठेवला. त्यांना वरदान दिले की, "तुला कोणत्याही ग्रंथाच्या अभ्यासाची आवश्यकता नाही. माझ्या कृपाशीर्वादामुळे तुला अभ्यासाशिवाय या निर्गुण, निराकार, संपूर्ण विश्वात ओतप्रोत भरून राहिलेल्या परमेश्वराचे वर्णन करता येईल." असा अलौकिक वर देऊन वक्रतुंड महाकाय गणेश अंतर्धान पावला. निंबराज जागे झाले. त्यांनी आजुबाजूस पाहिले पण त्यांना कोणीही दिसले नाही. तोंडात पानाचा मोठा विडा मात्र होता. विडा खाताना त्यांच्या हाताला डाग पडला. तो डाग त्यांच्या हाताला आयुष्यभर होता. निंबराज महाराजांची सुश्राव्य कीर्तने ऐकण्यासाठी लोक आधीच येऊन जागा पकडत असत. त्यांच्या कीर्तनात सर्वजण देहभान हरपून जात असत.

आपल्या पतीपरमेश्वराने दिलेली आज्ञा रुक्मिणीने पाळली. रुक्मिणीमातेने भाजीवाली रूप घेतले व हातात लालबुंद ताज्या गाजरांची टोपली घेतली व ती बाजारात गेली. बाजारात निंबराजसुद्धा आले होते. रुक्मिणी निंबराजांना म्हणाली, "दादा! माझे तान्हे बाळ घरी आहे. मी त्याला घेऊन येते, तोपर्यंत तुम्ही येथे बसा व माझ्या भाजीपाल्याचे रक्षण करा.' निंबराजमहाराजांनी यास होकार दिला. त्यानंतर ती भाजीवाली बाई निघून गेली.

निंबराज ती येण्याची वाट पहात बसले. ते खूप वेळ तेथे थांबले; पण भाजीवालीचा पत्ताच नव्हता. त्यांनी ती पाटी उघडून पाहिली तेव्हा त्यांना त्यात सुवर्णकळ्या दिसल्या. हे पाहिल्यावर निंबराजांनी तेथून धूम ठोकली व ते विठ्ठलाकडे आले. विठ्ठलाचे चरणकमल धरून निंबराज म्हणाले, "देवा! मला तुझ्या कृपेशिवाय काहीही नको. मला तू सुवर्णपाकळ्यांचे दर्शन कशाला घडवलेस ? माझ्या मनात मोह उत्पन्न झाला असता व त्यामुळे मला तुझा विसर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पडला असता.'' असे म्हणून देवाचा निरोप घेऊन निंबराज घरी गेले.

निंबराजाचे हे भाषण ऐकून रुक्मिणीमाता विठ्ठलास म्हणाली, "निंबराज खरोखरच निरिच्छ आहे. त्याला कोणत्याही गोष्टीचा मोह नाही. तुमच्या सांगण्यावरून मी त्याला सुवर्णपाकळ्या दिल्या पण त्याने त्या घेतल्या नाहीत.''

विठ्ठलाने दुसऱ्या दिवशी निंबराजांस दर्शन दिले. त्या दिवशी संतमंडळींच्या समवेत निंबराज स्नानासाठी चालले होते. तेव्हा विठ्ठलाने आपला वेष पालटून ब्राह्मणाचा वेष घेतला. तो निंबराजांजवळ आला व म्हणाला, "मित्रा! मी स्नानाला जात आहे. मी जाऊन येईपर्यंत तू माझी टोपी, तुळशीची माळ, रत्नजडित मौल्यवान मेखला जरा सांभाळशील तर बरे होईल.'' असे सांगून विठ्ठल त्या अफाट गर्दीतून अदृश्य झाला. निंबराजांनी हा प्रकार इतर मित्रमंडळींना सांगितला, तेव्हा ते म्हणाले, "निंबराजमहाराज! आज तुमच्या आयुष्यातील सोन्याचा दिवस आहे. तुमचा जन्म सार्थकी लागला. तुम्हाला ज्या ब्राह्मणाने या सर्व चीजवस्तू दिल्या तो ब्राह्मण म्हणजे ब्रह्मांडनायक विठ्ठलच होता. त्याने तुम्हाला नकळत दर्शन दिले आहे. आता झाले ते झाले. तुम्ही आता जमलेल्या सर्वांना कीर्तनाची मेजवानी द्या.''

निंबराजांना आनंद झाला. त्यांनी कीर्तनास प्रारंभ केला. याच वेळी पांडुरंगाने दहा वर्षाच्या बालकाचे रूप घेतले व तो पाठीमागून मोरपिसांनी निंबराजांना वारा घालू लागला. पण निंबराजांना हे कळले नाही. रात्रभर कीर्तन सुरू होते. सकाळी एका सावकाराच्या पत्नीस त्या विठ्ठलाचे दर्शन झाले. तिने निंबराजांचे दर्शन घेतले. सर्वांना तिने सांगितले की, विठ्ठल स्वत: निंबराजाची सेवा करत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होता. सर्वांनी निंबराजांचा जयघोष केला व 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल' असा जयघोष करूत कीर्तन संपवले.

पौर्णिमेस गोपाळकाला झाला. वारकरी घरी परतले. विठ्ठलास पंढरपूर ओसाड दिसू लागले. विठ्ठलाने सांगितले की, "रुक्मिणी! चल आता आपण गरुडावर आरूढ होऊन तुकारामांच्या भेटीसाठी जाऊ या." तुकारामांना आता सावळा विठ्ठल आपल्याला भेटण्यास येणार आहे असे जाणवू लागले. तुकारामांचा आनंद गगनात मावेना. थोड्याच वेळाने विठ्ठल रुक्मिणीमाता हे दोघेही गरुडावर आरूढ होऊन देहूस तुकारामांच्या भेटीसाठी गेले. या वेळी सर्व गावात आनंदाचे वातावरण होते.

अध्याय ५२ वा

॥ संत तुकारामांचे अभंग पाण्यातून वर आले ॥

गरुडावर आरूढ होऊन पांडुरंग सपत्नीक तुकारामांना भेटण्यासाठी आला, त्या वेळी विठ्ठल तुकारामांना म्हणाला, "तुझ्या भक्तीमुळे मी समाधान पावलो आहे. तुला आता जे वरदान मागायचे असेल ते माग. ब्रह्मदेवालाही दुर्लभ असलेला वर मी तुला प्रदान करेल. तुला वर देण्याची माझी फार दिवसांपासूनची इच्छा आहे."

तुकाराममहाराज म्हणाले, "विठ्ठला! तू येथे आलास यातच मला सर्व काही मिळालेले आहे. माझ्या मनाला तुझा विसर कधीही पडू देऊ नकोस. माझ्या जिभेवर सदैव तुझे नामस्मरण असू दे. तुझ्या भक्तांची माझ्या हातून सेवा घडावी. मला धनाची अपेक्षा नाही. नावलौकिकाची अपेक्षा नाही. जन्मोजन्मी मला तुझा सहवास

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लाभावा. कोट्यवधी जन्म मला मिळाले तरी मी तुझी सेवा सोडणार नाही.''

तुकारामांच्या या भाषणामुळे विठ्ठलास आश्चर्य वाटले. विठ्ठल तुकारामांना म्हणाला, ''तुझ्यासाठी मी पंढरपूरहून सर्व कामे सोडून आलेलो आहे. यामुळे मला पोटपूजासुद्धा करता आली नाही. मला कडाक्याची भूक लागली आहे. त्यामुळे घरात काही असेल तर खायला आण.''

विठ्ठलाच्या विनंतीवरून तुकारामांनी घरातून दोन भाकऱ्या, मेथीची भाजी व पालकाची गरमागरम भजी देवाच्या पानात वाढली. देवास वारा घालण्यासाठी तुकाराम देवाशेजारी बसले. यामुळे विठ्ठलास आनंद झाला व तुकारामांना म्हणाला, ''तू माझ्या ह्दयात सदैव निवास करशील. माझ्या वियोगामुळे तू कधीही रडू नकोस. माझी आठवण काढल्यावर मी तुला सगुण रूपाने भेट देईन.'' तुकारामांचा प्रेमळ निरोप घेऊन विठ्ठल रुक्मिणीसह अंतर्धान पावला.

आळंदीस एक सद्गृहस्थ अनुष्ठानासाठी बसला होता. त्याला वाटत होते की आपल्याला वेद, पुराणे, शास्त्रे यांचे ज्ञान व्हावे. ज्ञानेश्वरमाऊलींनी त्याला दृष्टांतात सांगितले की, ''तू देहू या गावी जाऊन तुकारामांची भेट घे. तुकाराममहाराज तुझी इच्छा पूर्ण करतील.'' तो गृहस्थ तुकारामांना भेटण्यास गेला. तुकारामांनी त्याचे स्वागत केले. तुकारामांनी त्याला प्रसाद म्हणून एकादश अभंग व श्रीफल दिले. त्याच्या मनात आराधनेचा अहंकार उत्पन्न झाला. त्याने ते तुकारामांचे अभंग व श्रीफल नाकारले व तो निघून गेला.

छत्रपती जाणता राजा शिवाजींच्या दरबारात एक पुराणिक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होता. त्याच्या एका नातेवाईकास वेड लागले होते पण हा नातेवाईक लहानपणापासून भाविक होता. तुकाराममहाराजांना तो भेटला व त्यांना वंदन केले. तोच नारळ व एकादश अभंग तुकारामांनी त्याला प्रसाद म्हणून दिला. त्याने तो आनंदाने स्वीकारला. घरच्या लोकांनी त्या नारळाचे उकडीचे मोदक केले. ते गणपतीला नैवेद्य म्हणून दाखवले. गणपतीने त्यास बुद्धी दिली. त्या वेड्याने ते मोदक खाल्ल्यामुळे तो पंडित झाला. अध्यात्मातील भगवद्गीता, वेदांत, उपनिषद यांवर तो बोलू लागला. सर्व लोकांना आश्चर्य वाटले की या महामूर्खाचा पंडित कसा झाला? लोकांनी त्याला याबद्दल विचारले. तेव्हा त्यांनी तुकाराममहाराजांच्या नारळाचा प्रताप असे सांगितले. तुकाराममहाराज दैवी पुरुष आहेत. त्यांचा प्रसाद मला फारच उपयोगी पडला असे सांगितले. त्यांनी दिलेल्या अकरा प्रसादरूपी अभंगामध्ये महान अर्थ सामावलेला आहे. सर्वजण तुकारामांबद्दल आश्चर्य व्यक्त करू लागले. तुकारामांकडून ज्ञानामृत घेण्यासाठी लोक त्यांच्या कीर्तनास जाऊ लागले.

चिंचवड गावातील लोकांना ही बातमी कळली. त्यांनी ठरवले की आपण तुकारामांची भेट घ्यावी. तुकारामांना बोलावण्यासाठी त्यांनी काही माणसांना देहूस पाठवले; पण तुकारामांचा कीर्तनसोहळा पाहून ते नामस्मरणात दंग झाले. या कीर्तनात काही लोक मशाली घेऊन नाचत होते. नाचता नाचता हात उंच गेल्याने मांडवाच्या कापडाला आग लागली. त्याच वेळी गोंदिया गावी एक अद्भुत घटना घडली. शेख महंमद वैष्णवांबरोबर कीर्तन करीत होते. त्यांनी मधेच एक उंच उडी मारली व मांडवाचे कापड हाताने चोळले. तेव्हा उपस्थित लोकांनी त्यांना 'हे तुम्ही काय केले?' असा प्रश्न विचारला. शेख महंमद म्हणाले, "देहू गावात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

तुकारामांचे कीर्तन सुरू आहे. सर्वजण बेभान होऊन देवाचे नामस्मरण करीत आहेत. अचानक तेथे मांडवाला आग लागली. त्यामुळे ती आग मी विझवून टाकली. तुकारामांच्या कीर्तनात सर्व श्रोते विठ्ठलमय झाले होते व विठ्ठल आपला देवपणा विसरून आनंदाने डोलत होता. त्यामुळे ते काम मलाच करावे लागले." सर्वांनी शेख महंमदांचा जयघोष केला.

तुकाराम त्यानंतर स्वत:हून चिंचवडला आले. लोकांना भेटले व त्यांना चमत्कार दाखवला. तुकारामांनी आपली मांडी तीक्ष्ण चाकूने कापली. त्यातून पांढराशुभ्र कापूस बाहेर आला. सर्व लोकांना आश्चर्य वाटले. त्यांना हे बघवले नाही. ते मनात म्हणाले की, "हा थोर पुरुष आहे. अंगात हाडे नाहीत, रक्त नाही, मांसपण नाही तरी तुकाराममहाराज जिवंत कसे राहतात, हे मोठे आश्चर्यच आहे ! सर्व लोकांनी तुकारामांना साष्टांग नमस्कार केला व त्यांची क्षमा मागितली व म्हणाले की, "आम्हाला ज्ञानाचा अहंकार झाला होता. पांडित्याचा अभिमान आम्हाला होता, तो तुमच्या दिव्य दर्शनाने नाहिसा झाला आहे."

त्यानंतर तुकाराम लोहगावात आले. त्यांनी एका कीर्तनकाराला मुलाच्या लग्नासाठी मदत केली. त्या कीर्तनकाराच्या मुलाचे थाटामाटात लग्न लावून दिले. त्या कीर्तनकाराच्या मुलासाठी तुकारामांनी गावातून वर्गणी गोळा केली व ती कीर्तनकारास दिली. तसेच साळींकडून एक सोन्याचा तांब्या तुकारामांनी त्या कीर्तनकारास मिळवून दिला. कीर्तनकाराने तुकारामांचे व गावकऱ्यांचे केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

तुकाराममहाराज पुन्हा देहूला परतले. त्यांना पुन्हा ब्राह्मणाच्या वेषात पांडुरंगाने दर्शन दिले. तुकाराम विठ्ठलास घरी घेऊन गेले; पण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

त्यांच्या बायकोने विठ्ठलास जेवताना अर्धा पावशेर साजूक तूप देण्यास नकार दिला. त्यामुळे विठ्ठल न जेवता निघून गेला. या विठ्ठलाने जेवण्यास येण्यापूर्वी आपला वरदहस्त तुकारामांच्या मस्तकावर ठेवून त्यांना अमृतमय उपदेश केला. तुकारामांनी त्यांना गुरू मानले होते. गुरूंची निराशा झाल्यामुळे तुकारामांनी 'राम कृष्ण हरी जय जय राम राजाराम' हा मंत्र अखंड सुरू ठेवला. सर्वजण तुकारामांचे अभंग म्हणू लागले. सर्व लोकांना तुकारामांचा 'जेथे जातो तेथे। तू माझा सांगाती॥ चालविसी हाती धरोनिया॥' हा अभंग खूप आवडायचा.

तुकारामांची कीर्ती संपूर्ण महाराष्ट्रभर पसरू लागली होती. तुकारामांचा सर्वत्र नावलौकिक होत होता. तुकारामांचा मोठेपणा काही लोकांच्या डोळ्यात खुपला. त्यांनी निर्लज्जपणे तुकारामांच्या अभंगाच्या वह्याच इंद्रायणी नदीत बुडवून टाकण्याचे ठरवले.

ते सर्वजण तुकारामांच्या घरी आले व त्यांच्याकडून अभंगांच्या वह्या काढून घेतल्या व म्हणाले, "तुकारामबुवा! आम्ही या सर्व वह्या इंद्रायणी नदीत बुडवणार आहोत. तुम्हाला अभंग रचण्याचा काहीही हक्क नाही. तुम्ही या अभंगाच्या व्याकरणात खूप चुका केलेल्या आहेत. या चुका पुढे भविष्यकाळात नजरेस पडू नयेत, म्हणून आम्ही त्या इंद्रायणीस समर्पण करणार आहोत. तुमची भक्ती श्रेष्ठ असेल तर या वह्या पाण्यात न बुडता जशाच्या तशा राहतील."

दुसऱ्या दिवशी ताबडतोब तो सर्व घोळका तुकारामांच्या अभंगांच्या वह्या बुडवण्यासाठी इंद्रायणीच्या काठी गेला. त्यातल्या एकाने अभंगांच्या वह्या इंद्रायणीत समर्पण केल्या. हे पाहून तुकाराममहाराज रडू लागले. सर्वजण आपआपल्या घरी गेले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitization by eGangotri

तुकाराममहाराज तेथेच बसून राहिले होते. त्यांनी विठ्ठलास विचारले, "हे विठ्ठला! तूच कर्ताकरविता आहेस. माझ्याकडून तूच सर्व अभंग लिहून घेतलेस, ते कशाला? पाण्यात बुडवायला? माझ्या भक्तीची तू परीक्षा कशाला बघतोस? तुकारामांनी सगळा राग विठ्ठलावर काढला. तुकारामांना विठ्ठलाने सांगितले, "सर्व काही व्यवस्थित होईल. तू माझा लाडका भक्त आहेस ना! भक्तांची सर्व काळजी देवच घेत असतो. भक्ताचे रक्षण करण्यासाठी, त्याची कामे करण्यासाठी, त्याची प्रार्थना ऐकण्यासाठी देव असतो." तुकाराम तेथेच तेरा दिवस अन्नपाण्याचा एक थेंबही न घेता बसून राहिले. तेरा दिवसांनंतर नदीमाता बाहेर आली व तिने तुकारामांना अभंगांच्या सर्व वह्या सुपूर्त केल्या. त्या कर्मठ लोकांनी तुकारामांना साष्टांग लोटांगण घातले व त्यांची क्षमा मागितली.

तुकारामांना खूप आनंद झाला. देवाची आपल्यावर अपार कृपा आहे हे त्यांना कळाले. त्यांनी तेथेच ताबडतोब सात सुंदर अभंगांची रचना केली. त्यात त्यांनी देवाची क्षमा मागितली आहे. 'हे देवा! मी तुला रागाच्या भरात वाट्टेल ते बोललो. माझ्यासाठी तुला कष्ट करावे लागले. अभंगांच्या वह्यांचे रक्षण करायला लागले. आता माझ्या हातून अशी चूक पुन्हा होणार नाही विठ्ठला! मायबापा!' अशी त्यात विठ्ठलाची स्तुती केली.

तुकाराम पुढे अवतारकार्य संपवून सदेह वैकुंठलोकी गेले. विठ्ठल म्हणाला, "तुकाराममहाराज सदेह वैकुंठलोकी गेले तरी ते इथेच चिरंजीव आहेत. त्यांची कर्मभूमी असलेल्या देहूत त्यांचे लाखो वर्षे वास्तव्य असेल. येथे येऊन नवस करणाऱ्यास त्याची मनोकामना पूर्ण होईल. तुकाराममहाराज ज्याचे अंत:करण धुतलेल्या तांदळासारखे स्वच्छ असेल त्यालाच फक्त अनमोल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

उपदेश करतील." तुकाराममहाराज हेच माझे सद्‌गुरू आहेत. त्यांच्या कृपेमुळेच मी हे ग्रंथलेखन केले आहे असे महिपतीबुवांनी लिहून ठेवलेले आहे.

पुंडलिका वरदे हरी विठ्ठल।
श्री ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम।
पंढरीनाथ भगवान की जय।
सब विश्वकी जय। सब संतोंकी जय।

अध्याय ५३ वा

।। माणकोजी बोधला ।।

श्रोत्यांनो! आतापर्यंत आपण महाराष्ट्राचे जे पंचप्राण म्हणजेच संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम यांच्या कथा पाहिल्या. त्याचबरोबर अनेक संतांच्या व भक्तांच्यासुद्धा कथा श्रवण केल्या. आता आपण माणकोजी बोधला या भक्ताची कथा श्रवण करूया.

बालेघाटाजवळ धामगाव म्हणून एक निसर्गरम्य गाव आहे. या गावामध्ये माणकोजी बोधला राहत होते. बालपणापासूनच त्यांच्या कोवळ्या मनावर भगवद्‌भक्तीचे सुसंस्कार झाले. विवाहयोग्य वय झाल्यानंतर त्यांचा विवाह झाला. त्यांना सुंदर, सात्त्विक, सुशील पत्नी लाभली. त्यांच्या पत्नीचे नाव होते ममताई. या दांपत्यास एक पुत्ररत्न प्राप्त झाले. त्यांनी या पुत्राचे नाव यमाजी असे ठेवले. या मुलाचीच बायको भागीरथी होय. भागीरथी रोज देवास व सासुसासऱ्यांना नमस्कार केल्याशिवाय तोंडात पाणी घेत नसे. भागीरथी सासुसासऱ्यांवर आईवडिलांसमान प्रेम करीत होती. हे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चारही जण देवाच्या कृपेमुळे आनंदात होते. रोज नामस्मरण केल्याशिवाय ते झोपत नसत. माणकोजींच्या घरी सर्व प्रकारची सुबत्ता होती. घरी लक्ष्मी पाणी भरत होती. सर्व सणवार, व्रतवैकल्ये ते श्रद्धेने व आनंदाने करत असत. सर्व पापांचा नाश करणाऱ्या एकादशी या व्रतास सर्वजण मिळून विठुरायाच्या भेटीसाठी जात असत.

एकदा अचानक त्यांच्या गावात कोरडा दुष्काळ पडला. लोकांना अन्नधान्य मिळेना. सर्वजण अन्नासाठी वणवण दाही दिशांना भटकू लागले. आपल्या पत्नीशी विचारविनिमय करून माणकोजी दुष्काळपीडीत लोकांना घरातील अन्नधान्याचा साठा वाटू लागले. पंढरपुरातसुद्धा त्यांनी धान्यवाटप केले. आपल्या घरची सर्व संपत्ती त्यांनी लोकांमध्ये वाटून टाकली. घरच्या गायी-म्हशी पण लोकांना देऊन टाकल्या. लोकांना सर्व काही देऊन माणकोजी दरिद्री झाले. त्यांच्याजवळ फक्त शेतच उरले. आपले व कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी माणकोजी मोलमजुरी करू लागले. अत्यंत हलाखीची परिस्थिती त्यांच्या कुटुंबावर आली होती. अशा-मधेसुद्धा माणकोजींचे सर्व लक्ष श्री विठ्ठलाच्या चरणकमलांकडे लागले होते. माणकोजींची निष्ठावंत भक्ती, त्याग व अंत:करणातील शुद्ध, सात्त्विक भाव पाहून रुक्मिणीपतीने त्यांना एकांतात दर्शन दिले.

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत माणकोजी एकादशीस पंढरपुरास निघाले. प्रवासासाठी त्यांच्याकडे पैसेसुद्धा नव्हते. त्यामुळे त्यांची जिवलग ममताई घरीच राहिली. माणकोजी घनदाट अरण्यात गेले. तेथील सागवान लाकूड त्यांनी आणले व त्याची मोळी बाजारात विकली. या मोळीचे माणकोजींना तीन पैसे सुटले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माणकोजींना जरा बरे वाटले. ते पंढपुरमधील वाळवंटातील स्वप्ने गावातच रंगवू लागले.

माणकोजींचे पंढरपुरात आगमन झाले. प्रथम त्यांनी पापभंग करणाऱ्या चंद्रभागेत पवित्र स्नान केले. त्यानंतर तीन पैशांपैकी एक पैसा ब्राह्मणाला दक्षिणा म्हणून दिला. प्रेमळ विठ्ठलासाठी त्यांनी एक पैशाचा हार, नारळ, बुक्का विकत घेतला. माणकोजींनी मोठ्या प्रेमाने सर्व काही देवास अर्पण केले. एकादशीस एका बुवांचे विठ्ठलाच्या देवळात सुश्राव्य कीर्तन होते. ते कीर्तन ऐकून त्यांनी जागरण केले. द्वादशीस त्यांना अन्नदान करण्याची खूप इच्छा होती; पण जवळ असलेल्या एक पैशामध्ये त्यांना फक्त अर्धा शेर ज्वारीचे पीठ विकत घेता आले. ते दु:खी मनाने चंद्रभागेच्या तीरी बसले. त्यांच्या मनात विचारचक्रे सुरू झाली. त्यांच्या मनात आले, "आपण गरीब आहोत. गरिबाकडील पीठ कोण सेवन करणार? श्रीमंत लोक द्वादशीस पंचपक्वान्नांचे जेवण देतात तेथेच सर्वजण जाणार."

पांडुरंगाने आपल्या भक्ताची मन:स्थिती ओळखली. त्यांचे समाधान करण्यासाठी ब्रह्मांडनायक, भक्तवत्सल, रुक्मिणीपती श्रीविठ्ठलाने वृद्ध ब्राह्मण गृहस्थाचे रूप घेतले. तो वृद्ध विठ्ठलरूपी मनुष्य माणकोजींजवळ आला व थरथरत्या आवाजात म्हणाला, "बाळ! ओळखले का मला? मी तुझा नातलग आहे. आता माझे खूप वय झाले. आता मला काहीही जमत नाही; कारण मी आता वृद्ध झालो आहे. मला घरच्यांनी हाकलून दिले आहे. अन्नासाठी मी व्याकूळ झालो आहे. खूप दिवस झाले पोटात अन्नाचा कणसुद्धा नाही. तुझ्याजवळ काही असेल तर मला खायला दे. माझे आशीर्वाद तुला जन्मोजन्मी पुरतील. तू माझी निराशा करू नकोस."

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माणकोजी त्या वृद्ध गृहस्थास म्हणाले, "आजोबा! माझ्याकडे फक्त अर्धाशेर ज्वारीचे पीठच आहे. याशिवाय मी आपणास काहीही देऊ शकत नाही. मी गरीब आहे. मला जमल्यास क्षमा करा."

त्या वृद्ध ब्राह्मणाने ते पीठ आनंदाने घेतले व माणकोजीला वाळवंटात अग्नीसाठी व्यवस्था करण्यास सांगितले. माणकोजींनी गोवऱ्यांची व्यवस्था केली. विठ्ठल ज्वारीच्या भाकऱ्या करण्यासाठी बसला. पांडुरंग भाकऱ्या भाजत असल्याचे कळाल्यावर पांडुरंगाची लाडकी रुक्मिणीसुद्धा वृद्ध ब्राह्मण स्त्रीचे रूप घेऊन तेथे आली. विठ्ठल, रुक्मिणी व माणकोजी या तिघांनीही भोजन केले. पांडुरंग व रुक्मिणीने मिळून केलेल्या भाकरीची चव काय वर्णावी? त्या भाकरीची चव अमृतासमान होती. त्यानंतर ते वृद्ध जोडपे म्हणजे पांडुरंग व रुक्मिणी अदृश्य झाले.

भक्तवत्सल विठ्ठलरुक्मिणीने आपल्या समाधानासाठी भाकऱ्या खाल्ल्या हे माणकोजीला कळाले. त्यामुळे माणकोजी विठ्ठलाकडे गेले व म्हणाले, "हे भक्तवत्सल, प्रेमळ विठ्ठला! तू धन्य आहेस. माझ्यासाठी तू वृद्ध ब्राह्मणाचे रूप घेऊन आलास. तू खरोखरच भक्तांचा रक्षणकर्ता आहेस, उद्धारकर्ता आहेस. तू माझ्यासारख्या गरिबाकडे आलास, बरे वाटले." विठ्ठल म्हणाला, "मला तुझ्यासारख्या गरिबाचेच अन्न गोड लागते. श्रीमंत लोक मला जेवण्यास देत नाहीत. त्यांना पैशाचा गर्व असतो. त्यांच्या मनात माझ्याबद्दल भाव नसतो. त्यांचे अंत:करण शुद्ध नसते. याचे एक उदाहरण तुला उद्या दाखवतो." असे विठ्ठलाने माणकोजींना सांगितले.

दुसऱ्या दिवशी एका श्रीमंत सावकाराने देवास केलेला नवस

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

फेडण्यासाठी सहस्त्र ब्राह्मणांना भोजन देण्याचे ठरवले होते. भोजनाची सर्व तयारी झाली होती. सहस्त्र ब्राह्मण भोजनासाठी बसले. त्यांना अष्टगंध लावून अकरा रुपये प्रत्येकाला दक्षिणा देण्यात आली. तेवढ्यात पांडुरंग तेथे आपला वेष पालटून आला. त्या सावकाराची परीक्षा पाहण्यासाठी त्याने वृद्ध ब्राह्मणाचे रूप घेतले व तो मांडवात आला. विठ्ठल त्या सावकाराला म्हणाला, "शेठजी! खूप दिवस झाले, माझ्या पोटात अन्नाचा कण नाही. मलासुद्धा या ब्राह्मणांबरोबर जेवायला बसवले तर अजून एका ब्राह्मणाचे शुभाशीर्वाद तुम्हाला लाभतील. माझ्या कृपाशीर्वादामुळे तुम्हाला यश, लक्ष्मी, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य या गुणांची प्राप्ती होईल. आपली इच्छा असल्यास मी इथे जेवण्यास बसू का?"

सावकार म्हणाला, "माझ्या संकल्पाप्रमाणे एक सहस्त्र ब्राह्मण झालेले आहेत. आता आणखीन एक ब्राह्मण वाढवता येत नाही. तुम्हाला घेतले की बाहेरचे अजून काही ब्राह्मण उतावीळपणे येथे येतील. आम्ही किती ब्राह्मणांना अन्नदान करणार? तुम्ही येथून कृपा करून जा, ही नम्र विनंती." सावकाराने केलेले भाषण त्या ब्राह्मणाने ऐकले तरीही तो ब्राह्मण ताट घेऊन भोजनासाठी बसला. यामुळे सावकार त्या ब्राह्मणावर चिडला. त्याने नोकरांना आज्ञा केली की, "या ब्राह्मणाला काही कळत नाही. याला बाहेर फेकून द्या. मध्येच कुठेतरी येऊन बसला आहे. बोलवले नसतानासुद्धा हा ब्राह्मण इथे येतो म्हणजे हा ब्राह्मण शुद्ध मूर्ख आहे." नोकरांनी त्या ब्राह्मणास उचलले व हाकलून दिले. यामुळे विठ्ठलास राग आला. तेथेच माणकोजी बोधला उभा होता. विठ्ठल त्याला म्हणाला, "आता बघ! सगळ्यांची कशी त्रेधातिरपीट उडवतो!"

ब्राह्मण जेवायला सुरुवात करणार तोच प्रचंड वादळ आले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

वाढलेले सर्व सुग्रास अन्न मातीत मिसळले गेले. पत्रावळी हवेमुळे उडाल्या. आलेल्या सर्व ब्राह्मणांच्या धोतरांवर आमटी सांडली, अळूची भाजी सांडली. काही ब्राह्मणांच्या डोळ्यात अन्नाचे कण वाऱ्यामुळे उडून गेले. त्यामुळे ते ब्राह्मण डोळे चोळीत बसले. त्या वादळात धुळ प्रचंड होती. कोणालाच काही दिसेना. सर्व ब्राह्मण एकमेकांना धडकून आपटले. कोणाच्या डोक्यातून रक्त वाहू लागले, तर कोणी घाबरुन गेले. सर्व ब्राह्मण मिळेल त्या दिशेने धावत सुटले. सहस्त्र भोजनासाठी तयार केलेला मांडवसुद्धा खाली पडला. आलेल्या सर्व ब्राह्मणांचा गोंधळ झाला. आपण कशाला या सावकाराचे निमंत्रण स्वीकारले, असे सर्व ब्राह्मणांना वाटले. एक सहस्त्र ब्राह्मण अन्नाचा एक कण न मिळताही उपाशीपोटी घरी परतले. सावकारास यामुळे वाईट वाटले.

विठ्ठल माणकोजींना म्हणाला, "श्रीमंतांच्या मिष्टान्नापेक्षा सात्त्विक भावाने दिलेले साधे फळ मी आवडीने खातो. मी अन्नपदार्थांकडे पाहत नाही तर मी अन्नपदार्थ समर्पण करणाऱ्या व्यक्तीच्या भावनेकडे पाहत असतो. ज्याचा जसा भाव, तसा मी त्याला पावत असतो. माझी आराधना करताना सात्त्विक अंत:करण अत्यंत महत्त्वाचे आहे. सात्त्विक अंत:करणात एक कणसुद्धा काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर असता कामा नये. यामुळेच मी माझा परममित्र सुदामा त्याच्या हातून पोहे भक्षण केले."

देवाचा प्रेमळ अंत:करणाने निरोप घेऊन माणकोजी आपल्या गावी निघाले. वाटेत त्यांना तहान लागली. त्यांचा जीव तहानेने व्याकूळ झाला. माणकोजींनी आजुबाजूस पाहिले. त्यांना कोठेही पाणी दिसेना. त्यांनी विठ्ठलाचा धावा केला. विठ्ठलाने आपल्या भक्तासाठी मायेने एक गोड पाण्याचा झरा निर्माण केला. त्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

झऱ्याचे पाणी पिऊन माणकोजींची तहान भागली. त्यांनी विठ्ठलाचे आभार मानले.

एके दिवशी माणकोजी आपल्या शेतात पिकाची राखण करीत बसले होते. त्यांनी पाखरांना हाकलण्यासाठी हातात गोफण घेतली होती. माणकोजींना वाटले, ईश्वर या विश्वात ओतप्रोत भरून राहिलेला आहे. विश्वातल्या प्रत्येकात मनुष्यात, प्राण्यांत, पक्ष्यांमध्ये, पानांमध्ये, फुलांमध्ये ईश्वर आहे. ही पाखरे लोंब्या खातील म्हणून आपण त्यांना हाकलून देतो. या पाखरांमधेसुद्धा ईश्वर आहेच. पाखरांना हाकलणे म्हणजे आपण या विश्वाला एका अंशाने धारण करणाऱ्या ईश्वरास हाकलल्याप्रमाणे आहे. या भावनेमुळे त्यांनी गोफण फेकून दिली व 'विठ्ठल! विठ्ठल!! विठ्ठल!!!' असा जयघोष करीत शेतामध्येच बसले. त्यांच्या पत्नीला हे कळले, तेव्हा तिने माणकोजींना समजावून सांगितले की, "धनी! आपणास शेताचा सारा भरायचा आहे. त्यामुळे आता तुम्ही कोणाला कणसे देऊ नका. या ज्वारीच्या कणसांवरच आपण पोट भरीत आहोत."

एक वारकरी विठ्ठलाचे नामस्मरण करीत माणकोजींच्या शेतातून पंढरपुराकडे चालला होता. त्या वारकऱ्यास खूप भूक लागली होती. वारकरी माणकोजींना म्हणाला, "राम राम मंडळी! मी तुमच्या शेजारच्या गावचा आहे. मला खूप भूक लागलीय. पंढरीला चाललोय ना! आपली संमती असेल तर मला थोडा हुरडा खाण्यास मिळेल का?" माणकोजी म्हणाले, "अवश्य खा; पण मी माझ्या हाताने दुसऱ्यास ज्वारीची कणसे देणार नाही मी माझ्या असे पत्नीस वचन दिले आहे. त्यामुळे तुला हवी तेवढी कणसे तू स्वत:च्या हाताने घे." त्या वारकऱ्याने दोन कणसे घेतली. त्याचा हुरडा बनवला. तो आनंदाने खाऊन माणकोजींना आशीर्वाद देऊन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पंढरीच्या वाटेने निघाला.

थोड्या वेळाने पंचवीस-तीस वारकरी तेथे आले. त्यांना पण हवी तेवढी कणसे काढून हुरडा 'खा' असे माणकोजींनी सांगितले. गावातले सर्व लोक माणकोजींच्या भोळेपणाचा फायदा करून घेऊ लागले. यामुळे त्यांच्या शेतातील सर्व कणसे संपली.

यामुळे माणकोजींच्या कुटुंबास सारा भरता आला नाही. वसुली अधिकाऱ्यांनी दंड म्हणून सात होन व एक पोते ज्वारीची मागणी केली. माणकोजींनी त्यांना सर्व काही सत्य सांगितले; पण त्याचा वसुली अधिकाऱ्यांवर काही परिणाम झाला नाही.

देव हा भक्तांवर संकट येते तेव्हा धावून जातो हे आपणा सर्वांना माहीत आहेच. त्यामुळे त्यांचे परमदैवत विठ्ठल त्यांच्या मदतीला धावून आला. विठ्ठलाने त्याच गावातील विठोबा महाराचे रूप घेतले व वसुली अधिकाऱ्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे सात होन व ज्वारीचे पोते दंड म्हणून सुपूर्त करून आला. माणकोजींना हे सर्व काही माहीत नव्हते. ते वसुली अधिकाऱ्यांना सांगायला आले की, "साहेब! आमच्या घरात ज्वारीच्या दाण्याचा एक कणही नाही, असे असताना मी तुम्हाला सात होन व एक पोते ज्वारी कुठून देणार? मला या वर्षी क्षमा करा. मी पुढील वर्षी तुम्हाला तिप्पट सारा देईन."

ते वसुली अधिकारी म्हणाले, "अहो! आताच आम्ही विठोबा महारास सारा संपूर्ण भरल्याची पावती दिली. तुमच्याकडे तो घेऊन येतच असेल."

हे माणकोजींना समजल्यावर त्यांनी प्रथम विठ्ठलाचे आभार मानले व वेळेवर धावून आल्यामुळे त्याची स्तुती केली.

विठ्ठलाच्या कृपाशीर्वादामुळे त्यांना पुन्हा वैभव मिळाले. शेतात ज्वारीचे भरघोस पीक आले. भरपूर संपत्ती मिळाली. यामुळे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांच्यावर जळणाऱ्या लोकांची तोंडे बंद झाली. माणकोजींना सर्वत्र माणकोजीमहाराज म्हणू लागले.

देवाचे प्रेम मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे आहे. देवाला आपलेसे केले की तो प्रेमाचा वर्षाव आपल्या भक्तांवर करतोच.

वरील अध्यायात आपला भक्त माणकोजी बोधला यांवर विठ्ठलाने कसे प्रेम केले हे आपण पाहिलेच. आता पुढील कथा श्रवण करू या.

अध्याय ५४ वा

।। पांडुरंगाने केलेला चमत्कार ।।

माणकोजी बोधला यांना गावातले सर्व लोक मान देऊ लागले. परमेश्वराचे मोठे भक्त म्हणून काही लोकांनी त्यांना आपल्या घरी भोजनासाठी निमंत्रणे दिली. माणकोजी कीर्तनाकडे वळले. ते सुश्राव्य कीर्तन करू लागले. पंढरपूरचा पांडुरंग त्यांच्या कीर्तनात येऊन नाचत असे व टाळाची साथ करत असे. पांडुरंग व माणकोजी यांचा एकमेकांवर फार जीव होता. या दोघांच्यात प्रेमाचे दृढ नाते निर्माण झाले होते.

माणकोजींच्या कीर्तनामुळे त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली. ते एकादशीस कीर्तन करत तेव्हा लोकांची प्रचंड गर्दी होत असे. त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी हंसी नावाची कुणबीणसुद्धा येत होती. तिने माणकोजींकडून भक्तीमार्गाचा उपदेश घेतला होता. हंसी कीर्तनाची सर्व तयारी करून ठेवत असे. श्रोत्यांसाठी थंड पाणी भरून ठेवणे, श्रोत्यांना बसण्यासाठी बैठका टाकणे, साफसफाई करणे ही कामे हांसी आवडीने करत असे. तिला एक लहान मुलगीसुद्धा होती.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपल्या आईबरोबर तीसुद्धा सर्व कामे करीत असे. ही हंसी राळेर गावात राहत असे.

एके दिवशी माणकोजींचे एकादशीस कीर्तन होते. त्या दिवशी कीर्तन ऐकण्यासाठी राळेर गावातून सुमारे ५०-६० लोक घोळक्याने येत होते. घनदाट अरण्यातून रस्ता होता. अरण्यातून येत असताना एका माणसाला विषारी साप चावला व तो यमलोकी गेला.

सर्व लोकांनी माणकोजींच्या भक्तीची परीक्षा घेण्याचे ठरवले. त्यांनी त्या माणसाचे प्रेत उचलले व कीर्तनाच्या ठिकाणी नेले.

कीर्तन सुरू झाले. कीर्तनाच्या प्रथेप्रमाणे पूर्वरंग संपल्यानंतर विठ्ठलाचा जयघोष करण्यास सुरुवात झाली. 'विठ्ठल विठ्ठल जयहरी विठ्ठल,' असे उपस्थित असलेले सर्वजण जयघोष करू लागले. यमलोकी गेलेल्या माणसाचे प्रेत तिथेच होते. काही मंडळी माणकोजींना म्हणाली, "बुवा! हा मनुष्य आपल्या मुखाने विठ्ठलाचा जयघोष करीत नाही. तुम्हीच इकडे या व त्याला विठ्ठलाचा जयघोष करण्यास सांगा."

माणकोजींना साप चावून तो मनुष्य मृत्यु पावल्याचे माहीत नव्हते. ते त्या मनुष्यास म्हणाले, "अरे! तुला मिळालेला अनमोल नरदेह सार्थकी लाव. विठ्ठल विठ्ठल म्हण पाहू." हे पाहून विठ्ठलाने मृत्युदेवता यमाला आज्ञा केली की, "त्याच्या शरीरात पुन्हा प्राण दे." यमाने विठ्ठलाची आज्ञा मानली. मृत पावलेला मनुष्य देवाच्या व माणकोजींच्या कृपेमुळे पुन्हा जिवंत झाला. त्याच्या कानी विठ्ठलाचा जयघोष ऐकू आला. त्याबरोबर तो मनुष्य आनंदाने विठ्ठलाच्या नामघोषात तल्लीन झाला. तेथील मंडळींनी माणकोजींना नमस्कार केला व म्हणाले, "तुमच्यामुळे आज प्रेत उठले." माणकोजींनी ओळखले, हे सर्व रुक्मिणीपतीचे काम आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांनी विठ्ठलाचे आभार मानले. हा चमत्कार झाल्यानंतर आजुबाजूच्या गावातील लोकसुद्धा माणकोजीच्या कीर्तनास गर्दी करू लागले.

माणकोजींनी पुढे हंसीचे संरक्षण केले. तिच्या मेव्हण्याच्या भांडणातून त्यांनी तिची मुक्तता केली. हंसीने पुन्हा आयुष्यभर विठ्ठलाची सेवा केली. तिने आपला नरदेह सार्थकी लावला.

काही वर्षांनंतरची ही गोष्ट आहे. पावसाळ्याचे दिवस होते पण वरुणराजा लोकांवर रुसला होता. तो दडी मारून बसला होता. अश्विन महिन्यापर्यंत पावसाचा एक थेंबसुद्धा पडला नव्हता. देवाच्या कृपेमुळे कार्तिक महिन्यात मुसळधार पाऊस पडला. कार्तिकी वारीसाठी जाणारे वैष्णव माणकोजींकडे आले व धान्य मागू लागले. पाऊस नसल्यामुळे अजून पीक तयार झाले नव्हते. आपल्या बायकोमुलांच्या संमतीने माणकोजींनी आपल्याजवळ असलेल्या गव्हाच्या पोळ्या त्यांना करून दिल्या. त्यांना विन्मुख पाठवले नाही व कडू भोपळ्याचे बी माणकोजींनी शेतामध्ये पेरून ठेवले. त्यानंतर विठ्ठलाचे नामस्मरण करीत माणकोजी तेथे बसत असत.

कडू भोपळ्याचे बी शेतात पेरल्यामुळे माणकोजींच्या शेतात मोठमोठे कडू भोपळे लागले. हे भोपळे गावातल्या टवाळखोर लोकांनी पाहिले. ते माणकोजींची चेष्टा करू लागले. त्यांनी माणकोजींना वेडे ठरवले. त्यातल्या एका माणसाने तो मोठा भोपळा जमिनीवर धाडकन् आपटला तर त्यातून गव्हाचे सोन्यासारखे दाणे मिळाले. भोपळ्यामध्ये गव्हाचे दाणे कसे काय शक्य आहे? सर्वांनी आश्चर्य व्यक्त केले. माणकोजींनी गावातल्या प्रत्येक कुटुंबास एक एक भोपळा प्रेमापोटी दिला. विठ्ठलाच्या कृपेमुळे माणकोजींच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शेतात भोपळ्याचे मुबलक पीक आले होते. कित्येक लोकांना भोपळे वाटले तरी ते संपतच नव्हते. माणकोजींना देवाच्या कृपेमुळे भोपळ्यांचा अक्षय्य साठा प्राप्त झाला होता.

काही लबाड लोकांनी ही बातमी तेथे राज्य करणाऱ्या बादशहास सांगितली. बातमी सांगितल्यामुळे त्या लोकांना शंभर सुवर्णमुद्रा बादशहाने बक्षीस म्हणून दिल्या. बादशहाला वाटले की, माणकोजी मोठे जादूटोणा करणारे आहेत. आपल्या शिपायांना माणकोजींकडे पाठवून माणकोजींना पकडून आणले. माणकोजी बादशहाला म्हणाले, "सरकार! मला तुम्ही का पकडून आणले आहे? मी काहीही अपराध केला नाही. मी विठ्ठलाचा दास आहे. मी भोपळ्यांवर काहीही जादूटोणा केलेला नाही. ही सर्व देवाचीच खेळी आहे."

बादशहाचा यावर विश्वास बसला नाही. बादशहाने माणकोजीस मुसलमान बनवण्याचे ठरवले. प्रथम बादशहाने स्वत: चाबकाने माणकोजींना मारले. नंतर जबरदस्तीने त्यांना गोमांस खायला दिले. पण देवाच्या कृपेमुळे त्याची गुलाबाची फुले व बुक्का झाला. हा चमत्कार पाहून बादशहाला आपली चूक कळून आली. त्याने माणकोजींना मुक्त केले. बादशहाने माणकोजींकडे क्षमा मागितली व आपणास काय देऊ? असे विचारले. आपणास काहीही हवे असल्यास मी तुम्हाला देईन असे बादशहाने सांगितले.

माणकोजींच्या पाठीशी विठ्ठल होता. त्यामुळे माणकोजींना कशाचीच कमतरता नव्हती. त्यांनी बादशहाकडे काहीही मागितले नाही. ताबडतोब ते घरी आले.

माणकोजी व विठ्ठल एकरूप झाले. त्या दोघांमध्ये काही वेगळेपण नव्हतेच. दोघेही अत्यंत आनंदात होते. देव व भक्त

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

यांच्यामध्ये असेच प्रेम असते हे माणकोजींच्या जीवनचरित्रावरून कळून येते.

अध्याय ५५ वा

॥ गणेशनाथ, केशवस्वामी, गोमाई व लतिबशाह ॥

श्रोत्यांनो! आतापर्यंत आपण अनेक भक्तांच्या कथा श्रवण केल्या. एकापेक्षा एक श्रेष्ठतम भक्त पूर्वी होते, आज आहेत व उद्याही असणार. या सर्व भक्तजनांचा आदर्श आपण डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवून आपण वाटचाल केली पाहिजे. आपल्याला मिळालेल्या मनुष्यदेहाचा वेळीच उपयोग करून घेतला पाहिजे. माणसाचे बालपण खेळण्यात, बागडण्यात जाते. त्यानंतरचा काळ शालेय अभ्यास करण्यात व पोटापाण्याचा उद्योग शोधण्यात जातो. तारुण्यात पदार्पण केल्यानंतर माणूस लग्नाच्या पवित्र बंधनात अडकतो. मुलांना मोठे करण्यात वार्धक्य केंव्हा येते, हे मनुष्यास काही कळत नाही. वार्धक्यात सर्वत्र यमाची सावली दिसू लागते. यामुळे आपण सर्वांनी देवाची भक्ती केली पाहिजे. आता या अध्यायात आपण चार भक्तजनांची कथा श्रवण करणार आहोत. प्रथम आपण गणेशनाथ यांची कथा पाहणार आहोत. त्यानंतर केशवस्वामी, गोमाई व लतीबशाह यांच्या कथा श्रवण करणार आहोत. त्यामुळे तुम्ही या सर्व कथा शांतचित्ताने श्रवण करा, ही नम्र विनंती.

चला! प्रथम गणेशनाथांची कथा पाहू. गणेशनाथ हे छत्रपती शिवाजीराजांच्या काळात होते. गणेशनाथ उजनी व सारसी या दोन ठिकाणी एक-एक आठवडा राहत असत. त्यांची आपल्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सद्‌गुरूंवर दृढ श्रद्धा होती. नामस्मरण व सत्संगतीमध्ये त्यांचा दिवस जात असे. गणेशनाथांवर नवनाथांचा फार प्रभाव पडला होता. गणेशनाथांचा पेहरावसुद्धा नवनाथांप्रमाणेच होता. गणेशनाथ दिवसभर अरण्यात राहून देवाची आराधना करत असत. लोकांना कीर्तनातून उपदेश करण्यासाठी ते रात्री नगरात येत असत. आपल्याकडचे दिव्य ज्ञान ते श्रोत्यांना कीर्तनाद्वारे समाजावून सांगत असत.

गणेशनाथांना लोकांकडून कशाचीही अपेक्षा नव्हती. लोक गणेशनाथांना 'साधुमहाराज' या नावाने ओळखत असत. सर्वत्र त्यांना मान मिळत असे. गणेशनाथांना या कोणत्याही गोष्टींचा मोह होत नसे.

एकदा राजे शिवाजी पंढरपूरला आले होते. तुकारामांच्या उपदेशामुळे शिवाजींनी विठ्ठलाची उपासना करण्यास सुरुवात केली होती. त्या रात्री शिवाजींनी गणेशनाथांचे सुश्राव्य कीर्तन ऐकले. त्यांचे अलौकिक ज्ञान पाहून यशवंत, कीर्तीवंत, वरदवंत शिवबा प्रभावित झाले. शिवबांनी गणेशनाथांना आपल्या वाड्यावर येण्याची विनंती केली. गणेशनाथांना मुळात तेथे जायचे नव्हते; पण महाराष्ट्राचा राणा शिवबांच्या प्रेमापोटी गणेशनाथ शिवाजींच्या वाड्यावर गेले. त्यापूर्वी गणेशनाथांनी आपल्याबरोबर एक ओंजळ बारीक खडे घेतले.

पालखीतून वाड्यात आल्यानंतर शिवाजींनी गणेशनाथांची उत्तम बडदास्त ठेवली. त्यांची पाद्यपूजा करून त्यांना फलाहार दिला. रात्र झाल्यानंतर शिवाजींनी गणेशनाथांची मऊ पलंगावर झोपण्याची व्यवस्था केली. शिवाजींनी तेथे सुगंधी अत्तर, पानाचे विडे, दीपमाळा, शाही पडदे यांची चोख व्यवस्था केली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गणेशनाथांना हे सर्व तुच्छ वाटले. त्यांच्या विरक्त मनास हे आवडले नाही. गणेशनाथांनी स्वत:बरोबर आणलेले ओंजळभर खडे पलंगावर पसरले व सुखाने निद्रावस्थेत गेले.

सकाळी गणेशनाथांचे दर्शन घेण्यासाठी शिवाजी गेले. पलंगावर त्यांनी खडे पाहिले. त्याबद्दल गणेशनाथांना विचारले, तेव्हा गणेशनाथ म्हणाले, "राजन्! मनुष्यास झोपेसाठी शाही, मऊ कापसाच्या पलंगाची आवश्यकता नाही. मनुष्याने कष्ट केल्यास त्याला रात्री नक्कीच आपोआप झोप येईल. आता आपण जेवढे सुख भोगू त्यापेक्षा हजारपटीने भविष्यकाळात आपणास दु:ख भोगावे लागते."

गणेशनाथांच्या या वक्तव्याने शिवाजींच्या मनात विरक्ती उत्पन्न झाली. त्यांनी आपला शाही पलंग एका दुबळ्या गरीब मनुष्यास भेट म्हणून दिला.

गणेशनाथांनी स्वश्रच्छेने एका वर्षात तीनशेसाठ शिष्य केले व त्यांना आपल्याकडचे दिव्य ज्ञान प्रदान केले. त्यांचा प्रत्येक शिष्य गणेशनाथांनी मस्तकावर वरदहस्त ठेवल्यानंतर संसारातल्या गोष्टींबद्दल विरक्त होत असे व तप करण्यास जात असे.

काही दिवसांनंतर गणेशनाथ तीर्थाटनास आपल्या शिष्यांबरोबर निघाले. महाराष्ट्रातील अनेक तीर्थक्षेत्रांना त्यांनी भेटी दिल्या. तीर्थाटन करीत करीत संत एकनाथमहाराजांचे गावी पैठण येथे आले. तेथे अनेक विद्वान पंडित होते. त्या पंडित लोकांमध्ये गणेशनाथांनी कीर्तन केले. ते कीर्तन ऐकून ते पंडित लोक चाट पडले. या पंडित लोकांना दुसऱ्यांना नावे ठेवण्याची खूप हौस होती. ते म्हणाले, "गणेशनाथ लोकांना भ्रमिष्ट करतात. आपल्या मायाजाळात लोकांना ओढून त्यांच्याकडून पैसे लुबाडतात. त्यांचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कीर्तन म्हणजे नुसती पोपटपंची आहे. आपल्या तेजस्वी चेहऱ्याने ते अनेक जणांना मोहीत करतात.''

हे सर्व पंडित लोक गणेशनाथांना भेटण्यासाठी गेले व त्यांना म्हणाले, ''तुम्हाला लोकांना आत्मज्ञान सांगण्याची खूप आवड आहे. तसेच तुमची शिष्यसंख्यासुद्धा खूप वाढलेली आहे. यापुढे लोकांना मंत्रदीक्षा देऊ नका. एवढी आवड असेल तर झाडांना, फुलांना, फळांना मंत्रोपदेश द्या.'

गणेशनाथांनी या मूर्ख पंडितांचे आव्हान स्वीकारले. ते जिथे बसले होते, तेथे समोरच एक जुना आम्रवृक्ष होता. त्या वृक्षाजवळ जाऊन गणेशनाथांनी वृक्षास मंत्रोपदेश केला व वृक्षास भाजी-भाकरी खा अशी विनंती केली. गणेशनाथांनी ही भाजी-भाकरी देवाच्या नैवेद्यासाठी आणली होती.

यानंतर ताबडतोब वृक्षाचा बुंधा मनुष्याच्या तोंडासारखा उघडला व त्याने भाजी-भाकरी खाल्ली. त्यानंतर वृक्ष पूर्ववत झाला. हा चमत्कार पाहून पंडित लोकांची तोंडे बंद झाली. त्यांनी गणेशनाथांची क्षमा मागितली.

ह्या गणेशनाथांना पांडुरंग प्रसन्न होता. त्याच्याच कृपेमुळे वृक्षाचा चमत्कार घडला. आजही त्यांच्या राहत्या ठिकाणी मोठी यात्रा भरते. हे जागृत देवस्थान आहे.

केशवस्वामी

समुद्रमंथनाच्या वेळी हलाहल विष निघाले हे आपणा सर्वांना माहीत आहे. हे हलाहल विष महादेवाने प्राशन केले; नाहीतर हे सर्व विष संपूर्ण विश्वात पसरले असते. यामुळे महादेवास नीलकंठ असे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाव पडले. या अध्यायात आपल्या भक्तांच्या रक्षणासाठी पांडुरंगाने विष कसे प्राशन केले याची कथा पाहू या.

केशवस्वामी नावाचे एक वैष्णव होते. सर्वांना भक्तीमार्गाकडे वळवून लोकोद्धार करणे हेच त्यांचे मुख्य काम होते. लोकोद्धारासाठी ते कीर्तनाचा प्रभावीपणे उपयोग करून घेत असत. प्रत्येक गावोगावी जाऊन लोकांसमोर कीर्तन करत असत. कीर्तनाच्या आख्यानाला ते सोपी भाषा वापरत असत. लोकांना प्रपंचातील उदाहरणे देत असत. यामुळे त्यांच्या कीर्तनास खूप लोक येत असत. कीर्तनानंतर ते प्रसाद म्हणून मलई पेंढे, खवा बर्फी, साखरफुटाणे, लाह्या-चिरमुरे इ. वाटत असत.

केशवस्वामी असेच एकदा कीर्तन करण्यासाठी विजापूरला गेले. त्यांनी तेथे कीर्तन केले. त्या कीर्तनास खूप लोक आले होते. ते एकादशीचे कीर्तन होते. एकादशीस जागरणास महत्त्व असते, त्यामुळे घरातील आबालवृद्धांसह सर्वजण कीर्तनास आले होते. कीर्तनाचा पूर्वार्ध संपल्यानंतर केशवस्वामी आपल्या शिष्यास म्हणाले, 'आज एकादशी आहे त्यामुळे लोकांना लाह्या-चिरमुऱ्याचा प्रसाद वाटता येणार नाही. त्यामुळे सुंठसाखर आपण प्रसाद म्हणून वाटूया. तू ताबडतोब गावात जा व तिथल्या वाण्याच्या दुकानातून सर्वांना पुरेल एवढी सुंठ व साखर घेऊन ये. सुंठीची पूड तयार कर. सुंठीच्या पुडीत साखर मिसळून दहा-बारा ताटात वाढून ठेव. कीर्तन संपल्यानंतर प्रसाद वाटण्यास सोपे पडेल."

रात्रीचे कीर्तन होते. सर्व वाण्याची दुकाने बंद झाली होती. त्यांच्या शिष्याने एका वाण्याचे दुकान पाहिले. त्या वाण्याचे खाली दुकान होते व तो माडीवर राहायला होता. त्या शिष्याने दार वाजवून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वाण्यास उठवले. वाणी अर्धवट झोपेतून डोळे चोळीत आला व 'काय पाहिजे आहे एवढ्या रात्री ?' असे विचारले. त्या शिष्याने सुंठ व साखरेची त्या वाण्याकडे मागणी केली.

वाणी अर्धवट झोपेत होता. त्याने चुकून एका पोत्यातील सुंठासारखा दिसणारा विषारी पदार्थ सुंठ म्हणून दिला. त्या पदार्थाचे नाव होते बचनाग. बचनाग व साखर घेऊन तो शिष्य घरी गेला. त्याचे अडकित्याने बारीक तुकडे करून त्याची खलबत्यात पूड केली, साखर मिसळली व कीर्तनात घेऊन गेला. कीर्तन संपल्यानंतर त्यांच्या शिष्यांनी तो विषारी प्रसाद सर्वांना वाटला. सुंठ म्हणून आपण बचनागाची पूड घेतली हे कोणत्याही श्रोत्यांना कळाले नाही. सर्वांनी प्रसाद भक्षण केला. काहींनी तो प्रसाद बांधून घेतला. कोणालाही प्रसादातून विषबाधा झाली नाही.

दुसऱ्या दिवशी वाणी उठला. त्याच्या लक्षात आले की आपल्या हातून केवढा मोठा गोंधळ झाला आहे. यामुळे वाण्याचे डोके सुन्न झाले. आपण कीर्तनात जमलेल्या सर्व लोकांना मारले ते पाप आपल्या हातून झाले अशी त्या वाण्याची भावना झाली. त्यामुळे तो विहिरीत जीव देण्यासाठी निघाला. आत्महत्येशिवाय आपल्याला दुसरे प्रायश्चित्त नाही असे त्याला वाटले.

तो वाणी रस्त्याने जाऊ लागला. त्याला लोकांचे सर्व काही व्यवहार सुरळीतपणे चालू असल्याचे दिसले. सर्वजण आनंदात होते. कोणाच्याही घरी रडणे सुरू नव्हते. वाण्याला वाटले होते की प्रत्येकाच्या घरात प्रसाद खाऊन कोणीतरी मेले असेल, रडगाणे सुरू असेल. वाण्याने स्मशानात जाऊन पाहिले तेथे सामसुम होती. कोणाचेही प्रेत तेथे आलेले नव्हते.

वाण्याने ओळखले की, बचनाग विठ्ठलाने ग्रहण केला. त्याने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रसादातील बचनागातील पूड शोषून घेतली व साखर तशीच ठेवली. त्यामुळे कोणालाही विषबाधा झालेली दिसत नाही. त्या वाण्याने विठ्ठलाचे मनोमन आभार मानले व नकळत हातातून घडलेल्या अपराधाबद्दल विठ्ठलाजवळ क्षमा मागितली.

विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी स्नान करून केशवस्वामी आले. त्यांना विठ्ठलाची मूर्ती काळीनिळी झालेली दिसली. केशवस्वामींना कळले नाही की विठ्ठलाची सावळी गोंडस मूर्ती काळीनिळी कशी झाली? तेवढ्यात तेथे वाण्याचे आगमन झाले. त्या वाण्याने काल काय प्रकार झाला ते सविस्तरपणे सांगितले. पंढरीनाथ विठ्ठलाच्या कृपेमुळेच सर्वांचे प्राण विषापासून वाचले असे सांगितले. केशवस्वामींनी त्या वाण्याला महादेवाचे, मीराबाईंच्या श्रीकृष्णाचे उदाहरण दिले. आपल्या भक्तांसाठी व जगत् कल्याणासाठी देवांनी विष प्राशन केल्याचे सांगितले. माझ्यामुळेच विठ्ठलाला ताण सहन करावा लागला असे वाणी त्या केशवस्वामींना म्हणाला.

त्यानंतर त्या दोघांनी पांडुरंगाची नामदेवरचित 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा॥' ही आरती भक्तीभावनेने म्हटली. त्यांची भावना पाहून विठ्ठलाची ती काळीनिळी मूर्ती पुन्हा मनोहर रूपात दिसू लागली. त्यानंतर ते दोघे स्वस्थानी परतले.

संत गोमाई

विठ्ठलाने विष प्राशन करून आपल्या भक्तांचा जीव कसा वाचवला हे आपण केशवस्वामींच्या कथेमध्ये पाहिले. आता आपण संत गोमाई या स्त्रीभक्ताची कथा पाहू

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोमाई नावाच्या एक बाई होत्या. त्या विधवा होत्या. त्यांना मूलबाळ नव्हते. आपला पतीपरमेश्वर देवाघरी गेल्याने त्यांना जीवनातल्या कोणत्याच गोष्टीत रस नव्हता. दु:खाचा पहाड कोसळल्यामुळे त्या कृश झाल्या. रस्त्यातून भटकू लागल्या. लोक त्यांना प्रेमाने अन्न देत असत. ते शिळेपाके अन्न खाऊन गोमाई पोट भरत असत. असे असूनसुद्धा गोमाई रुक्मिणीपती पांडुरंगावर जीवापाड प्रेम करत होत्या. या जगातील लोक मतलबी आहेत, दुष्ट आहेत, स्वार्थी आहेत, निंदानालस्ती करणारे आहेत, अशी त्यांची मनोधारणा होती. त्यामुळे जनसंपर्क तोडून त्या विठ्ठलाशी एकरूप झाल्या होत्या.

विठ्ठलास भेटण्यासाठी त्या पंढरपुरास चालल्या होत्या. चंद्रभागेच्या पलीकडे त्या उभ्या होत्या. त्यांच्याकडे पैसे नसल्यामुळे नावाडी गोमाईंना नावेत घेण्यास तयार होईनात. ते नावाडी लोक गोमाईंना तुम्ही घरी परत जा, असे म्हणू लागले. गोमाईंचा दृढ निश्चय होता. त्या जबरदस्तीने एका नावेत बसू लागल्या तेव्हा त्या नावाड्याने त्यांना ढकलून दिले. त्या चंद्रभागेच्या पाण्यात पडल्या. त्यांना यामुळे राग आला. त्यांच्याजवळ ओंजळभर गव्हाचे पीठ कुणीतरी दिलेले होते ते त्या नावाड्यास देऊ लागल्या तरीही तो त्यांना नावेत बसू देईना.

असे झाल्यामुळे ऐलतीरातील सर्व लोक पैलतीरावर पोहचले तरीसुद्धा गोमाई मात्र तेथेच राहिल्या. त्यांनी विठ्ठलाचा धावा सुरू केला. भक्ताची प्रार्थना ऐकून देव आला.

पांडुरंगाने एका नावाड्याचे रूप घेतले व नाव वल्हवीत गोमाईजवळ आला व म्हणाला, "आईसाहेब! तुम्हाला पैलतीरी जायचे आहे ना! चला मी तुम्हाला माझ्या नावेतून सोडून येतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पटकन चला, माझ्याकडे वेळ कमी आहे." गोमाईंना आनंद झाला. त्या नावाड्यास म्हणाला, "माझ्यासारख्या गरीब बाईकडे पैसे नाहीत. मी उतरताना पैशाऐवजी तुला ओंजळभर पीठ देईन. मला तू नेल्याबद्दल माझे आशीर्वाद सदैव तुझ्या पाठीशी असतील. देव तुझं भलं करो."

नावाडी म्हणाला, "मी कोणाकडून काहीही घेत नाही. माझ्यातर्फे मी सर्वांना देत असतो. तुमच्यासारख्या संतमंडळींची सेवा करण्यासाठीच मी अठ्ठावीस युगांपासून येथे राहत आहे."

नावाड्याच्या *(विठ्ठलाच्या)* सांगण्यावरून गोमाई नावेत बसल्या. पैलतीर येईपर्यंत गोमाईंनी नावाड्यास ज्ञानेश्वरीतल्या ओव्या, तुकारामांचे अभंग वगैरे म्हणून दाखवले. यामुळे दोघांनाही वेळ कसा गेला, हे काही कळले नाही. नावेतून उतरल्यानंतर गोमाईंनी नावाड्यास ओंजळभर पीठ देऊ केले. तेव्हा नावाडी म्हणाला, "आईसाहेब! माझी आठवण तुम्ही सदैव ठेवा. माझ्या आठवणीने तुम्हाला मुक्ती मिळेल. मला हे पीठ नको. याऐवजी ह्या पीठाच्या भाकऱ्या करा व द्वादशीस वारकऱ्यांना द्या. तुम्हाला अन्नदानाचे पुण्य तरी लाभेल." त्यानंतर क्षणार्धात नावाडी दिसेनासा झाला.

गोमाईंनी आनंदाने व भक्तीभावनेने आपली पंढरपूरची यात्रा सफल केली. द्वादशीस नावाड्याच्या आज्ञेप्रमाणे गोमाईंनी पीठाच्या भाकऱ्या केल्या. कोणत्याही वारकऱ्याने गोमाईंच्या भाकऱ्या घेतल्या नाहीत. गोमाईंना वाईट वाटले. त्यांच्या समाधानासाठी पांडुरंग रुक्मिणीने वृद्ध पुरुष, स्त्रीचे रूप घेतले. गोमाईंकडून त्या भाकऱ्या विठ्ठलरुक्मिणीने आनंदाने खाल्ल्या.

गोमाईंना आश्चर्य वाटले की ओंजळभर पीठाच्या भाकऱ्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तिघांना कशा काय पुरल्या? गोमाईंनी अजून भाकरी पाहिजे का, हे विचारण्यासाठी मागे वळून पाहिले, तेव्हा ते भक्तवत्सल दांपत्य अदृश्य झाले होते.

लतीबशाह

आपल्या भारत देशाची संस्कृती थोर आहे. या देशात नाना धर्मांचे लोक एकत्र राहतात. आपल्या देशात हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, पारशी अनेक वेगवेगळ्या धर्मातील लोक एकमेकांस भाऊ मानून प्रेमाने राहतात.

आता आपण एका मुसलमान भक्ताची कथा पाहणार आहोत. लतीबशाह हे त्यांचे नाव. लतीबशाह जन्मत: मुसलमान होते; पण हिंदू धर्मातील वेदांत, उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, भगवद्‌गीता इ. वाचून त्यांनी हिंदू धर्म स्वीकारला. लतीबशाह यांनी मुख्यत: भगवद्‌गीता- ज्याला हिंदू धर्मात पंचम वेदांत म्हणतात – व भागवत यांचे वाचन केले.

भागवतातील भक्तीचा उपदेश वाचून त्यांनी अयोध्येचा राजा, सीतापती श्रीरामाची उपासना सुरू केली. त्यांच्या मुखात 'रघुपती राघव राजाराम, पतित पावन सीताराम,' हे भजन सुरू असे.

हिंदू धर्मातील सर्व लोकांना ज़्या दोन देवांनी मोहवून टाकले ते म्हणजे शबरीची उष्टी बोरे खाणारा, वडिलांसाठी चौदा वर्षे वनवासात जाणारा, दुष्ट रावणाचा संहार करणारा प्रभू श्रीरामचंद्र आणि दुसरा म्हणजे माखनचोर, गोपींना सतावणारा, दुष्ट कंसाचा संहार करणारा श्रीकृष्ण होय. लतीबशाह श्रीरामाच्या उपासनेबरोबर श्रीकृष्णाचीसुद्धा पूजाअर्चा नित्यनेमाने करीत असत.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi.

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लतीबशाहनी आपला मुसलमान धर्म सोडून हिंदू धर्मात धर्मांतर केले, हे काही मुसलमान लोकांना आवडले नाही. त्यांनी लतीबशाह यांना बादशहाकडून शिक्षा देण्याचे ठरवले. ते सर्वजण बादशहाकडे गेले व लतीबशहाविरुद्ध बादशहाचे कान फुंकले. बादशहाने आपल्या सेवकांना आज्ञा दिली की लतीबशाहच्या घरी जा व त्याचे सर्व सामान बाहेर रस्त्यावर फेकून द्या.

राजाची आज्ञा मानून त्याचे सेवक लतीबशाहच्या घरी गेले. ते तेथे आले तेव्हा लतीबशाह शांतपणे श्रोत्यांना भागवत समजावून सांगत होते. शिपाईही तेथे भागवत ऐकण्यासाठी बसले. त्या नादात आपण येथे कशासाठी आलो आहोत हे विसरूनच गेले. सर्व शिपाई लतीबशाहजींचे शिष्य बनले व आश्रमातच राहू लागले.

कोणीही परत आले नाही हे पाहून बादशहा जातीने लतीबशाहच्या घरी गेला. तेथे सर्वत्र श्रीकृष्णाचा जयघोष सुरू होता. 'हरे रामा हरे कृष्णा, कृष्णा कृष्णा हरे हरे' असे सर्वजण म्हणत होते. त्यानंतर लतीबशाह यांनी भागवत सांगण्यास सुरुवात केली. त्यांचा एकएक शब्द म्हणजे अमृताचा थेंब होता. सर्व श्रोते अमृताच्या प्रेमरसात न्हाऊन निघाले.

बादशहाने आजुबाजूस पाहिले तेव्हा लतीबशहा यांच्या आश्रमातील भिंतीवर दशावतारांच्या आकृती *(मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध, कलंकी)* रंगवल्या होत्या. वेगवेगळ्या तीर्थक्षेत्रांची चित्रे होती. बादशहास वाटले की आपण लतीबशाहच्या घरी आलेलो नसून स्वर्गातच आलो आहोत. बादशहाचे मुख्य लक्ष गेले ते राधाकृष्णाच्या चित्राकडे.

बादशहाने भागवत वाचत असताना लतीबशाहाला उठवले व रागाने विचारले, "काय रे गोसावड्या? हे कोणाचे चित्र आहे?"

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लतीबशाह शांतपणे म्हणाले, "सरकार! हे चित्र राधाकृष्णाचे आहे. राधेचे श्रीकृष्णावर, व श्रीकृष्णाचे राधेवर अपार प्रेम होते. राधा कृष्णाच्या मुखात पानाचा विडा देत आहे."

बादशहा म्हणाला, "ठीक आहे. पण तुझा श्रीकृष्ण राधेच्या हातून विडा का खात नाही? राधेवर रुसून बसला आहे की काय?" लतीबशाह त्या चित्राजवळ गेले व श्रीकृष्णास म्हणाले, "आता या भक्ताची लाज तुमच्याच हातात आहे. मी माझ्या परीने तुमची भक्ती केली आहे. आता तुम्ही माझ्यासाठी राधेच्या हातचा विडा खा."

आपल्या भक्ताची प्रार्थना ऐकून श्रीकृष्णाने राधेच्या हातातील विडा खाल्ला. विडा खाल्याबरोबर चित्रातील हिरवा रंग नाहिसा झाला. चित्रातील ही अद्भुत हालचाल बादशहाने स्वत: पाहिली. त्याला खात्री पटली. त्याने लतीबशाहची क्षमा मागितली व नंतर तो आपल्या राज्यात निघून गेला.

अध्याय ५६ वा

संतोबा पवार व संत निळोबा व उद्धव चिद्घन

श्रोत्यांनो। तुम्हाला अष्टविनायकाबद्दल माहिती असेलच. अष्टविनायकमधील एक गणपती रांजणगावी आहे. या रांजणगावातील एका भक्ताची कथा या अध्यायात आपण पाहणार आहोत.

रांजणगावी संतोबा पवार यांचे वास्तव्य होते. हे सरकारदरबारी होते. अमाप संपत्ती होती. तसेच ते धैर्यवान व शूरवीर होते. अनेक लढायांमध्ये त्यांनी अनेकांना यमलोकी पाठवले होते. ते सहज एकदा देहूमध्ये संत तुकारामांचे कीर्तन ऐकण्यास गेले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांच्या कीर्तनाने प्रभावित होऊन त्यांनी आपला सर्व संसार, बायकोमुले सोडून दिले. त्यानंतर अरण्यात जाऊन तप करत बसले.

त्यांच्या घरी आईवडील होते. ते वयोमानाने थकले होते. आपला मुलगा तप करण्यासाठी निघून गेला हे कळल्यावर त्यांना वाईट वाटले. त्यांनी आपल्या मुलास परत आणण्यासाठी सुनेला तेथे पाठवले. संतोबा पवारांवर याचा काहीच परिणाम झाला नाही. त्यांची पत्नी संतोबांचा आत्मज्ञानाचा उपदेश ऐकून विरक्त झाली. तिनेही संन्यासधर्म स्वीकारला. आपल्या पतीपरमेश्वराच्या पावलांवर पावले टाकून तिने आपल्या जन्माचे सार्थक करून घेतले.

हे वैराग्यी दांपत्य लोकांच्या भिक्षेवर पोटपूजा करू लागले. संतोबांनी आपल्या बायकोस सांगितले की, "तू दररोज गावात जाऊन भिक्षा मागायची, चतकोर किंवा अर्ध्या भाकरीचाच स्वीकार करायचा. कोणी काही गोडधोड दिल्यास घ्यायचे नाही."

त्यानंतर ते एक एक आठवड्याने गाव बदलू लागले. गाव बदलत ते पारगावी आले. संतोबांची बायको भिक्षा मागण्यासाठी गावात गेली. याच गावात संतोबा पवारांची भगिनी राहत होती. त्यांची पत्नी भिक्षा मागत मागत संतोबांच्या बहिणीच्या घरी आली. त्यांच्या बहिणीचा वहिनीला पाहून डोळ्यांवर विश्वासच बसेना. तिला आपल्या भावाने-वहिनीने संन्यासाश्रम स्वीकारल्याचे माहीत नव्हते. तिने वहिनींना आत नेले. वहिनीने नणंदेस सर्व काही सांगितले.

संतोबांच्या बहिणीने दादा व वहिनींसाठी पाकातले गुलाबजाम दिले. नको म्हणत असताना आग्रहाने संतोबांच्या बहिणीने बायकोस तो गुलाबजामचा डबा दिला. ती संतोबांकडे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आली. त्यांना बहीण भेटल्याचे सांगितले. गुलाबजामचा डबा दिला. संतोबा पवारांनी तो गुलाबजामचा डबा बहिणीस पुन्हा देऊन येण्यास सांगितले.

पतीची आज्ञा मानून तिने नणंदेस गुलाबजामचा डबा परत दिला. परत येताना भीमा नदीस पूर आला होता. तेव्हा विठ्ठलाने तिला नावाड्याचे रूप घेऊन पंलतीरावर नेले. त्यानंतर विठ्ठल अंतर्धान पावला. बायकोने ओळखले की आपल्याला विठ्ठलाने दर्शन दिले. तिने सर्व काही आपल्या पतीराजास सांगितले.

संतोबा पवारांना यामुळे दु:ख झाले. ते पत्नीस म्हणाले, "तुला पंढरीनाथाने दर्शन दिले; पण मला दर्शन देण्यासाठी तो कोणता मुहूर्त पाहत आहे. मी आता त्याचे दर्शन झाल्याशिवाय अन्न घेणार नाही."

संतोबा पवारांचा दृढ निश्चय पाहून विठ्ठलाने संतोबा पवारांना दर्शन दिले. त्यापूर्वी विठ्ठलाने एका वाण्याकडून त्यांची परीक्षा पाहिली.

एकदा सर्व वारकरी मित्रमंडळींबरोबर संतोबा पवार चालले होते, तेव्हा नदीला पूर आला होता. विठ्ठलाचे नाव घेत संतोबा पवार पुरातून वाट काढत गेले. इतर वारकरी मंडळींसाठी त्याने कासवाचे रूप घेतले. विठ्ठलाने रूप घेतलेल्या कासवाच्या पाठीवरून सर्व वारकरी मंडळी चालत पैलतीरी गेली.

त्यावेळी संतोबा पवार विठ्ठलास म्हणाला. 'विठ्ठला! मला सदैव तुझ्याजवळ ठेव. तुझे रूप सदैव माझ्या हृदयात असू दे.' विठ्ठलाने संतोबा पवारांना आपल्यात सामावून घेतले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संत निळोबा

आपण मागील अध्यायात महाराष्ट्रातील देहू गावातील संत तुकारामांची कथा श्रवण केली. आता त्यांचे शिष्य संत निळोबा यांची कथा आपण पाहू या.

निळोबांनी विठ्ठलाला भक्तीद्वारा आपलेसे केले. पंढरीनाथ निळोबांवर प्रसन्न झाला. निळोबा हे संसारात होते; पण त्यात त्यांचे मन रमत नव्हते. त्यांची मुले व पत्नी सुसंस्कारी, सात्त्विक होती. निळोबांना मीपणाचा अहंकार नव्हता. त्यांनी प्रपंचाचा सर्व भार विठ्ठलावर टाकला होता.

देवाच्या कृपेमुळे निळोबांच्या मुलीचे लग्न ठरले. मुलीच्या लग्नासाठी निळोबांकडे पैसे नव्हते. आपल्या भक्ताची पाहुण्यांत, मित्रमंडळींमध्ये फजिती होईल म्हणून विठ्ठल वृद्ध ब्राह्मणाचा वेष घेऊन निळोबांच्या घरी आला. विठ्ठल निळोबांना म्हणाला, 'माझ्याजवळ थोडा शिधा आहे. तो शिधा मुलीच्या लग्नाच्या दिवशीच्या जेवणाच्या पिठात मिसळावा ही माझी इच्छा आहे. यास तुमची संमती असल्यास मी आता जेवेन.' निळोबांनी यास संमती दिली. निळोबांच्या घरी जे थोडे काही अन्न होते ते खाऊन तो वृद्ध ब्राह्मण समाधान पावला.

रात्री झोपताना तो वृद्ध ब्राह्मण निळोबांना म्हणाला, 'उद्या तुमच्या कन्येचे लग्न आहे ना! मला या लग्नास उपस्थित राहण्याची फार इच्छा आहे. मी गरीब आहे. मला कोणीही मिष्टान्न खाण्यास देत नाही. लग्नास जर आलो तर मला गुलाबजाम, जिलेबी, बुंदीचे लाडू, श्रीखंड इ. अनेक गोडधोड पदार्थ खाण्यास मिळतील. तसेच बटाट्याची भजी, तळलेले पापड इ. तळलेले पदार्थ खायला मिळतील. मी या बदल्यात लग्नातली सर्व छोटी-मोठी कामे करीन.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मला काम करायला खूप आवडते. आपली काय इच्छा आहे ते कृपया ताबडतोब सांगावे.''

निळोबांनी त्या ब्राह्मणास होकार दिला. दुसऱ्या दिवसापासून तो ब्राह्मण सकाळी लवकर उठून सडा घालणे, सुंदर रांगोळी काढणे, पाण्याची पिंपे भरून ठेवणे अशी छोटी-मोठी कामे करू लागला. विठ्ठलाच्या कृपेमुळे लग्नात सर्वांना पोटभरून जेवता आले. कोणताही पदार्थ कमी पडला नाही. तो ब्राह्मण आलेल्या प्रत्येकाला काय हवे, नको पाहत होता. जेवायला बसलेल्या लोकांना स्वत: गुलाबजाम प्रेमाने वाढत होता. विठ्ठलाच्या शिध्यामुळे वर व वधू अशी दोन्हीकडची सुमारे एक हजार माणसे पोटभरून जेवली. सर्वजण समाधानी होते. भांडण नाही, तंटा नाही. सासरची माणसेसुद्धा चांगल्या स्वभावाची होती.

चार दिवस मोठ्या प्रमाणात लग्नसोहळा व्यवस्थित पार पडला. पंढीनाथाची जिथे कृपा असेल तिथे विघ्न कसे येणार? चारही दिवस पंढरीनाथाने खूप कष्ट केले. निळोबा मुलीला सासरी पाठवून घरी आले. निळोबांच्या मनात आले की, या वृद्ध ब्राह्मणाने सर्व काही चोख व्यवस्था ठेवली. त्यामुळेच कार्य उत्तम रीतीने पार पडले. त्यामुळे आपण त्याला काहीतरी उत्तम वस्त्र आहेर म्हणून द्यावे. निळोबांनी त्या ब्राह्मणास नाव विचारले. तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला, माझे नाव विठ्ठलराव; पण गावातील सर्व लोक मला विठ्ठल याच नावाने ओळखतात. देवघराच्या तिथे पांडुरंग अंतर्धान पावला.

विठ्ठलास देण्यासाठी निळोबा एक सोनेरी रंगाचा शेला घेऊन आले. त्यांना तो ब्राह्मण कोठेच दिसेना. निळोबांनी ओळखले की हा ब्राह्मण म्हणजे साक्षात् भक्तवत्सल पांडुरंग होता. त्याने आपल्यावरील प्रेमामुळे चार-पाच दिवस अपार कष्ट केले. निळोबा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देवास म्हणाले, 'देवा! तू आल्यामुळे मला काहीही ताण जाणवला नाही. तुझे उपकार मी आता कधीही विसरणार नाही. मी तुझ्यावर प्रेम करण्यासाठी कोट्यावधी जन्म घेईन व तुझ्या प्रेमरसात बुडून जाईन.'

पिंपळनेरास विठ्ठलाचे जागृत देवस्थान आहे. येथे फाल्गुन वद्य द्वितीयेला उत्सव होतो. यात कीर्तने, प्रवचने, भारुडे, गोंधळ इ. कार्यक्रम होतात. निळोबांना संत तुकारामांनी दृष्टांत देऊन अभंग करण्यास सांगितले. त्यांनी अनेक अभंग केले.

उद्धव चिद्‌घन

आता आपण एका रामभक्ताची कथा पाहणार आहोत. आपल्यास रामाचा आदर्श ठाऊक आहेच. राम एकवचनी, एकपत्नी होता. पिताश्रींच्या सांगण्यावरून रामाने चौदा वर्षे वनवासात काढली. श्रीराम हा कौसल्यादशरथाचा मुलगा होय. राम स्वत: विष्णूचा अवतार होता; तरीही श्रीरामाने वसिष्ठांना गुरू केले व त्यांच्याकडून ज्ञान ग्रहण केले. श्रीरामाच्या नामस्मरणाला खूप महत्त्व आहे. उमापती महादेव सांगतात की, एखाद्या मनुष्याने श्रीराम असा मुखातून उच्चार केला तर त्याने एक हजार वेळा विष्णूंचे नामस्मरण केल्याप्रमाणे आहे.

धारुर येथे रामाचे एक भक्त होते. या रामभक्ताचे नाव होते उद्धव चिदघन. त्यांना लोकोद्धार करण्याची आवड होती. आपल्या कीर्तनातून ते लोकांना ज्ञानाचा उपदेश करीत असत. एकदा ते कीर्तन करण्यासाठी बिदर येथे आले. त्यांचे पहिले कीर्तन तेथे चैत्र

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शुद्ध प्रतिपदेस झाले. त्या नगरातील सर्व लोकांना ते कीर्तन खूप आवडले. उद्धव चिद्घन व गावकऱ्यांनी ठरवले की रामनवमीपर्यंत कीर्तने करून मोठ्या प्रमाणात रामनवमी साजरी करायची. गावातील सर्व लोकांनी रामनवमीसाठी वर्गणी म्हणून एकवीस रुपये काढण्याचे ठरवले.

रामनवमीपर्यंत उद्धव चिद्घन बुवांची उत्तम कीर्तने झाली. रामनवमीचा दिवस उजाडला. गावात सर्वत्र उत्साहाचे व भक्तीमय वातावरण होते. राम, सीतामाई यांच्या सुंदर मूर्ती सजवलेल्या रथात बसवल्या व गावातून मिरवणूक काढण्यास सुरुवात झाली. सर्व गावकरी या मिरवणुकीत सहभागी झाले होते. सर्वजण 'सीतारामचंद्रकी जय' असा जयघोष करीत होते. रामनवमीचा एवढा मोठा भव्य सोहळा या पूर्वी गावात झाला नव्हता.

या गावात काही मुसलमान लोक होते. त्यांना रामनवमीचा उत्सव आवडला नाही. त्यांनी ही रामनवमीची मिरवणूक उधळून लावण्याचे ठरवले. त्यांनी आपल्याच धर्मातील दोनशे-तीनशे लोकांना हाताशी धरले. रामनवमीची मिरवणूक मशिदीवरून जात असताना मुसलमानांनी लोकांवर दगड मारायला सुरुवात केली. चिखलाचे गोळे फेकले, पताका फाडून टाकल्या, लोकांना लाथाबुक्क्यांचा प्रसाद दिला. वीणेच्या तारा सटासट तोडून टाकल्या, गोड ध्वनी निर्माण करणारा मृदुंग फोडून टाकला. रामरहीम यावरून भांडणे त्या काळी होती हे आपणास यावरून दिसून येते. ती रामरहीमवरून होणारी भांडणे आजही आहेत व उद्याही राहणार.

सर्व लोकांचा उत्साहभंग झाला. उद्धव चिद्घनांना हे योग्य वाटले नाही. उद्धव चिद्घन शांतपणे श्रीरामाचे चिंतन करीत बसले

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांनी रागाच्या भरात सीतापतीस विचारले, 'हे प्रभू रामचंद्रा! आम्ही सर्वजण आनंदाने तुझा उत्सव साजरा करत होतो. मग तू विघ्न कशाला उत्पन्न केलेस? आमच्या हातून कोणते पाप घडले. आहे की ज्याची शिक्षा तू आम्हा सर्वांना देत आहेस. तू हे सर्व काही सहन कसे केलेस? तू आता त्या मुसलमानांना धडा शिकवल्या-शिवाय राहू नकोस. हिंदूंना छळण्याचा परिणाम काय होतो ते त्यांना कळू दे.'

उद्धव चिद्घनाचे सर्व भाषण रामाचा परमभक्त सेवक अंजनीसुत हनुमंताने ऐकले. त्याने या यवन लोकांचा वचपा काढण्याचे ठरवले. ' शुभस्य शीघ्रम ' असे म्हणून त्याने आकाशात उड्डाण केले. तो यवनांच्या मशिदीवर आला व आपल्या अफाट बलसामर्थ्यांने ती मशीद जोरजोराने हलवू लागला. तिकडे पलीकडे एक म्हातारा मुसलमान बसला होता. त्याने ओळखले की हा रामभक्त हनुमान आहे. तो ताबडतोब मशिदीमधल्या बांधवांकडे गेला व त्यांना म्हणाला, 'बाहेर जा व त्या वानराची क्षमा मागा. ते साधेसुधे वानर नसून साक्षात् श्रीरामचंद्रांचा सेवक हनुमान आहे. तो आपली मशीद हलवत आहे. तुम्ही त्याची क्षमा मागितली नाही तर तो आपली मशीद पाडून टाकेल.' त्या लोकांनी त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही.

आपली क्षमा मागण्यासाठी कोणीही आले नाही म्हणून चिडून हनुमानाने आपल्या दणकट पायांनी ती मशीद पाडून टाकली. त्या वेळी सुमारे एक हजार मुस्लिम नमाज पढत होते. त्यांच्या अंगावर भिंती वगैरे कोसळल्याने ते सर्वजण जागीच मृत्युमुखी पडले.

हे सर्व वृत्त बादशहाला कळाले. बादशहा धावत उद्धव चिद्घनांकडे आला. त्याने उद्धव चिद्घनांची माफी मागितली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याने रामनवमीसाठी एक हजार सुवर्णमुद्रा दिल्या. धान्याची कोठारे उपलब्ध करून देऊन तो राजधानीला परतला.

॥ अध्याय ५७ वा ॥

॥ भक्त विसोबा सराफ ॥

श्रोत्यांनो! आपण यापूर्वीच्या छपन्न अध्यायात अनेक भक्तांच्या कथा पाहिल्या. अनेक भक्तांनी देवाची भक्ती करून आपले जीवन सार्थकी लावले. त्यांनी लोकांना देवाची भक्ती करायला सांगितले. आधी केले, मग सांगितले; असे त्यांनी जीवनभर कार्य केले. देव हा भावाचा भुकेला असतो. सर्व भक्तांनी प्रथम आपले अंत:करण शुद्ध केले. त्यानंतर सत् आचार, सत् विचार, सत् उच्चार यांचा सर्वत्र प्रसार केला. आपण या जन्मात केलेली देवाची भक्ती पुढील अनेक जन्मात उपयोगी पडते. अनेक भक्तांनी लोकांना उपदेश करण्यासाठी अभंगांची रचना केली. भारुडे लिहिली, ओव्या लिहिल्या. हा शेवटचा अध्याय आहे. या अध्यायात आपण विसोबा सराफ यांची कथा पाहणार आहोत. तुम्ही सर्वांनी शांतपणे सर्व कथा श्रवण केल्याबद्दल मी आपला आभारी आहे. सर्व श्रोत्यांना मनोभावे वंदन करून शेवटच्या अध्यायास सुरुवात करतो.

पंढरपुरामध्ये विसोबा सराफ राहत होते. पंढरपुरात सर्वत्र भक्तीमय वातावरण असल्यामुळे त्यांना बालपणापासून भक्तीचे संस्कार लाभले. मोठे झाल्यानंतर त्यांनी सावकारीचा धंदा सुरू केला. अल्पावधीत ते पंढरपुरातील श्रीमंत सावकार झाले. अमाप पैसा जवळ असूनही त्यांना संपत्तीचा गर्व नव्हता. दारात आलेल्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रत्येक याचकास ते दान देत असत. आषाढी-कार्तिकी वारीस आलेल्या वारकऱ्यांसाठी ते भोजन देत असत.

काही वर्षानंतर पंढरपुरात दुष्काळ पडला. अन्न मिळवण्यासाठी सर्वांची मारामारी होऊ लागली. प्रत्येकावर उपासमार होण्याची वेळ आली. सर्वजण विसोबा सराफांकडे अन्न मागण्यासाठी गेले. विसोबा सराफांनी सर्वांना अन्नदान केले. कोणालाही विन्मुख पाठवले नाही. दिवसेंदिवस याचकांची संख्या वाढू लागली तरीही विसोबा घाबरले नाहीत. त्यांनी अन्नदान करण्याचे सुरूच ठेवले. विसोबांचे पैसे संपू लागले तेव्हा विसोबांनी घरातील नानाविध दागदागिने, भांडीकुंडी, वस्त्रे यांचा त्याग करून लोकांच्या मुखी अन्न दिले.

अशामुळे विसोबांची लोकांकडून येणारी सर्व येणी बुडाली. त्यांना कर्जबाजारी व्हावे लागले. त्यांनी कासेगावाच्या एका अब्दुल पठाणाकडून कर्जाऊ रक्कम घेतली. त्या कर्जाची रक्कम वाढत वाढत सातशे रुपयांपर्यंत गेली. त्यांची एका सिद्धपुरुषाने हलाखीच्या परिस्थितीत परीक्षा घेतली. त्या सिद्धपुरुषाचे नाव होते सिद्धपुरीबुवा. त्यांनी विसोबांच्या घरी जाण्यापूर्वी सर्वांगाला घाण माखून घेतली. ते विसोबांकडे आले. विसोबांनी त्यांचे स्वागत केले. त्यांना स्नान घालून उत्तम कपडे घालण्यास दिले व नंतर श्रीखंडपुरीचे जेवण दिले. यामुळे तो सिद्धपुरुष आनंदी होऊन आश्रमात परतला.

विसोबांच्या गरिबीचा फायदा काही लोकांनी घेण्याचे ठरवले. ते त्या अब्दुल पठाणाकडे गेले व ताबडतोब विसोबांकडून पैसे वसूल करण्यास सांगितले. तो अब्दुल पठाण विसोबांकडे गेला व म्हणाला, "साहेब! प्रथम आमचे सर्व पैसे परत करा. खूप दिवस

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झाले. आता पैसे दिल्याशिवाय मी इथून हालणार नाही.'' विसोबा सराफांना आपल्यावर मोठे संकट आले आहे असे वाटले. त्यांनी विठ्ठलाचा धावा सुरू केला. आपल्या भक्ताचे संकट निवारण्यासाठी विठ्ठल धावून आला. या वेळी विठ्ठलाने गुमास्त्याचे रूप धारण केले होते. विठ्ठलाने पठाणाचे सातशे रुपये मुद्दल व त्यावरील असलेले व्याज मिळून झालेली रक्कम त्वरीत चार लोकांच्या साक्षीने पठाणास दिली. पठाणाकडून पैसे मिळाल्याचा रोखा घेतला. विठ्ठलाने तो रोख्याचा अर्धा भाग विसोबा सराफांच्या पोथीमध्ये सुरू असलेल्या अध्यायातल्या पानात ठेवला. दुसऱ्या दिवशी विसोबांनी पोथी उघडली. तेथे त्यांना फाटका रोखा दिसला. त्यांना आश्चर्य वाटले. तो रोखा घेऊन ते पठाणाकडे गेले.

अब्दुल पठाण म्हणाला, ''साहेब, तुम्ही इकडे पुन्हा कशाला आलात? तुमच्या गुमास्त्याने सकाळी सर्व रक्कम दिली. मी त्याला रोखासुद्धा देऊन टाकला.'' विसोबांचा विश्वास बसत नव्हता म्हणून पठाणाने त्या चारही लोकांना बोलवून घेतले. विसोबांचा नंतर विश्वास बसला. त्यांनी ओळखले की हे सर्व आपल्यासाठी जगदीश्वर विठ्ठलाने केले आहे. तो भक्तांचा कैवारी आहे, त्यांचा रक्षणकर्ता आहे असे ते सर्वांना सांगू लागले.

त्यानंतर विसोबा सराफ विठ्ठलाकडे आले व म्हणाले, ''हे देवा! माझ्यामुळे तुला गुमास्त्याचे रूप घेऊन पैसे फेडावयास लागले. खरोखरच तू अठ्ठावीस युगांपासून कमरेवर हात ठेवून भक्तांचे संकट निवारण करण्यासाठीच उभा आहेस. तुला कोटी कोटी धन्यवाद ! तुझी कृपादृष्टी सदैव अशीच माझ्यावर जन्मोजन्मी राहू दे, ही तुला नम्र प्रार्थना.''

विठ्ठल म्हणाला, ''जसा भाव तसा देव. भक्तांचा भाव पाहून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मी त्याच्यावर कृपा करतो. भक्ताने प्रथम अंत:करणाची शुद्धी केली पाहिजे. ही अंत:करणशुद्धी करण्यासाठी नामस्मरण सातत्याने करणे आवश्यक आहे. मी भक्तावर प्रेम करतो व भक्त माझ्यावर प्रेम करतो. आम्ही दोघे एकमेकांच्या प्रेमात डुंबून जातो. हा भवसागर तरुन जाण्यासाठी सर्व लोकांनी देवाच्या नामाच्या नौकेत बसावे व पैलतीरी जावे. 'आपुला तो एक देव करूनी घ्यावा। तेणेवीण जीवा सुख नोहे ।।' असे तुकारामांनी सांगितले आहे. तसेच 'सुख एक आहे हरी आठवता। इतर जपता दु:ख बहु ।।' असे एकनाथांनी सांगितले आहे. माझ्या अनेक भक्तांची येथे उदाहरणे देता येतील. या जगात आई, वडील, बहीण, भाऊ, नातेवाईक यांचे प्रेम शाश्वत नसते; पण माझे प्रेम जन्मोजन्मी लाभत असते. माझे प्रेमच सर्वोत्कृष्ट आहे.''

महिपतीबुवा म्हणतात, 'पंढरीच्या नाथाने मला जी बुद्धी दिली त्यायोगे मी सर्व लिहिले आहे. मी फक्त निमित्तमात्र अशी माझी अवस्था झाली आहे. 'जेथे जातो तेथे, तू माझा सांगाती' अशी माझी अवस्था झाली आहे. हे सर्व एका अंशाने संपूर्ण विश्वाला धारण करणाऱ्या परमेश्वरास मी अर्पण करीत आहे.''

।। विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल ।।

।। पांडुरंग हरी वासुदेव हरी ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समारोप

मित्रांनो ! मानवी जीवन ही भगवंताने दिलेली अनमोल देणगी आहे. या देणगीचा सदुपयोग जर केला तर मानवातील देवत्व प्रगट होते व याचा दुरुपयोग केला तर मानवातील पशुत्व प्रगट होते.

सर्व संतांच्या चरित्रातून त्यांनी केलेली भगवंताची भक्ती दिसून येते. ती ज्ञानोत्तर भक्ती होय. हे भक्तीप्रेम जीवनाचा आधार आहे. संतांच्यावर कितीही संकटे आली तरी त्यांनी ईश्वराचे स्मरण कधीही सोडले नाही. छोटी-मोठी संकटे प्रत्येकाच्या वाट्याला येत असतात पण त्या संकटांना भिऊन चालणार नाही. ईश्वरावर पूर्ण श्रद्धा ठेवून त्याचे स्मरण करीत अचूक प्रयत्नाने संकटांच्या पायऱ्या चढावयाच्या असतात व त्यावरून चढून यशोमंदिर गाठायचे असते.

परमार्थ वाटचालीतील सर्वांत महत्त्वाचे सूत्र म्हणजे सदाचार होय. आपले विचार सात्त्विक असावेत, उच्चार सात्त्विक असावेत व आचरण शुद्ध म्हणजे सत्याला धरून असावे. सत्य हे केव्हातरी आचरणात आणण्याची गोष्ट नाही. आपले प्रत्येक कर्म सत्याच्या आधारे झाले पाहिजे. आपल्या मनातील सर्व प्रकारचे द्वैत संपले पाहिजे. जो माणूस जसा वागतो तसे त्याला कर्माचे फळ मिळत असते, म्हणून कधीही वाईट विचार करू नयेत व वाईट वागू नये.

आपली कर्तव्यकर्मे प्रामाणिकपणे करत जावे. अनेक व्यवसाय करणारे संत जगात होऊन गेले. व्यवसाय करताना त्यांच्या अंत:करणात प्रभूचे अमृताहूनी गोड नाम होते व मुखातून भजन प्रगट होत होते. प्रभूचे सदैव भजन करा. काया, वाचा, मनसा कोणालाही दुखवू नका आणि आपल्यातील देवत्वाचा पूर्ण विकास करा. मला स्फुरलेल्या एका अभंगाने या ग्रंथाचा समारोप करीत आहे.

आता तरी तुम्ही भजन करा रे। सदा सर्वकाळ प्रेमभावे ॥१॥
सकळांच्या पायी माझे दंडवत। आपुलाले चित्त शुद्ध करा ॥२॥
सत्यशिव सुंदर होईल दर्शन। विश्वी विश्वंभर दिसे सदा ॥३॥
ज्ञानेश म्हणे आता काय सांगू तुम्हा। सदाचार हा थोर जगी जाणा ॥४॥

॥ शुभं भवतु ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

॥ आरती भक्तीविजयाची ॥

दिंडीरवन पावन क्षेत्र पंढरी। परब्रह्म अवतरले उभे विटेवरी।
चंद्रभागा तीरी कर कटावरी ठेवोनिया। अखंड उभा आहे भक्तांचे द्वारी॥धृ.॥
जयदेव जयदेव जय पंढरीनाथा। जडजीव तारुनी पायी वीट जडली पाया॥१॥
पातक पृथ्वीवरी झाले दारुण। तेहतीसकोटी देव आले तुला शरण।
म्हणून आज्ञा केली भक्तालागून। मृत्युलोकी तारावे जनांस॥२॥
प्रथम विप्रकुळी जयदेव झाले। तस्कराने हस्त चरण तोडिले।
पद्मावतीसी छळिता प्राणा त्यागिले। अष्टपदी म्हणूनी प्रेत उठवले॥३॥
हनुमंताचा अवतार तो तुलसीदास। काशीमध्ये त्याने धरिला रहिवास॥४॥
अयोनिसंभव भक्त दोघे जन्मले। कबीर नामदेव नाम पावले।
नामयाचे संगे देवे भोजन केले। कबीरगृही हरीने शेले विणीले॥५॥
शुकाचा अवतार नामा निजभक्त। वाल्मिक कबीर झाला तोही विरक्त।
तीर्थे करीत आले त्या घरी संत। चोरी करीता वधला कमाल निजपुत्र॥६॥
निवृत्ती, ज्ञानदेव तिसरे सोपान। ब्रह्मा विष्णु महेश नटले आपण।
आदिमाया मुक्ताई निजखूण जाणे। मांडे केले सच्चे पाठीवर जिने॥७॥
संन्याशाच्या पोटी जन्म म्हणून। निंदा करिती ग्रामी सर्व जन।
त्यांचे व्हावयास द्वैत खंडण। रेड्यामुखे वेद म्हणविले जाण ॥८॥
नामा ज्ञानेश्वर गेले तीर्थासी। पंथ क्रमिता उदक न मिळे त्या देशी।
स्तवन करिता तुझे उत्तम पावलासी। उदके भरुनी कूप देऊळ फिरवीसी॥९॥
तीर्थे करूनी आले पंढरपुरासी। ब्राह्मणाने प्रायश्चित्त दिधले देवासी।
दिव्य चतुर्भुज रूप दाखवुनी त्यासी। संशय त्यांचा नेला सर्वही लयास॥१०॥
पांगुळ शक्तीहीन तो कूर्मदास। व्हावे तुझे दर्शन मनी जडली आस।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामा घेऊन सवें जाता भेटीस। माळ्याच्या हृदयी केला तू रहिवास॥ ११ ॥
राका आणि गोरा होते कुल्हाळ। नकळत बालहत्या घडली तात्काळ।
चिखल माखिता त्याने तुडविले बाळ। पिली घालून केला अग्निबंबाळ ॥१२॥
विठ्ठल विठ्ठल नामे करिता गजर। पिलीपुत्र तेव्हा उठवी सत्वर।
स्त्रीसी ताडन करिता गोरा कुंभार। शपथ देता त्याने तोडिले करकमल॥१३॥
द्वैत भेदे महादेव नरहरी सोनार। त्यासी दिधले दर्शन होऊनी शंकर।
जनीचे काज करूनी टाकितसे केर। ऐसे भक्त किती सांगू तुम्हां अपार॥१४॥
शंकर वरदें जळी मच्छिंद्र झाला। विभुतीचे प्रतापे गोरक्ष केला।
गुरूंची आज्ञा वंदूनी भिक्षेसी गेला। नेत्र देऊन त्याने वठक आणिला॥१५॥
चांगदेवे केले व्याघ्राचे वाहन। भिंत चालविली योगी ज्ञानदेवाने।
नरसी मेहत्याचे पुत्राचे लगीन। हुंडी भरिली देघे न लागता क्षण॥१६॥
रामराजा यांची भक्ती देखोन। विद्यानगरी देव केले आपण।
भानुदास गेले शुद्धीकारणे। हार दिला त्याला होती नवरत्ने॥१७॥
राजा पाहू गेला तव हार नाही। भानुदास कंठी सापडला पाहीं।
नेमुनिया सुळी नेला लवलाही। शाखापल्लव फुटले शूळासी पाही॥१८॥
कान्होपात्रा वेश्या आणि मीराबाई । सांडून देहभाव नटल्या तव पायी।
विष देता अमृत झाले लवलाही। कान्होपात्रा स्वरूपी मेळविली पाही॥१९॥
अन्नाचा दुष्काळ पडिला बहुत। मंगळवेढ्या होते दामाजीपंत।
पंढरपूर क्षेत्रिचे जन समस्त। ऐकूनी कीर्ती त्यांची आले धावत ॥२०॥
दामाजीपंतांचे हृदय कोमल। आज्ञा करोनी धान्य लुटताती सकळ।
मुजुमदार तेथे होता महाचांडाळ। यवनालागी त्याने लिहली खबर॥२१॥
यवने क्रोध करूनी दवडीले दूत। आपण दामाजीला आणा बांधुनिया येथे।
संकट जाणोनिया द्रव्य भरिता तेथे। अपार महिमा सख्या दाविसी दासाते॥२२॥
बहिरंभट होता सूज्ञ ब्राह्मण। निंदा व्हावी म्हणुनी झाला तो यवन।
पैठणाचे अवघे मिळोनी ब्राह्मण। प्रायश्चित्त देता त्यासी करितो बहु प्रश्न ॥२३॥
पैठणी एकनाथ होते ब्राह्मण। द्वादश वरुषे पाणी भरी स्वयं नारायण।
भेटीलागी आले तेथे हरीजन। देऊन दर्शन गुप्त झाले जगज्जीवन॥२४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

मारुतीचा अवतार तो रामदास। सावध म्हणता पळून गेला वनास।
श्लोक म्हणुनी प्रार्थित होता मनास। तेथे जाऊन त्याते तू भेटलास ॥२५॥
जातीचा वाणी तुकोबा राय। सद्‌गुरू अवतरला फेडाया भ्रम।
छळण करिता झाले पंक्तिपावन। गणपती देवासहित केले भोजन ॥२६॥
बोधल्याने शेत लुटविले जाण। तुंबिनीचे बीज पेरी आणून।
संकट पडता पेवे भरली धान्याने। प्रेत उठूनी देवा करितां कीर्तन ॥२७॥
केशवराज हरीदिनी करीत कीर्तन। बचनाग दिधला सुंठ म्हणोन।
संकट पडतां विष केले भक्षण। कीर्तनरंगी लुटती श्रोते सज्जन ॥२८॥
वृद्ध शक्तीहीन गोमाई जाण। भीमा पार केली तिजला आपण।
वृद्धवेषे देवा होऊन ब्राह्मण। चंद्रभागेतीरी केले भोजन ॥२९॥
विसोबा सराफ होता ब्राह्मण। आल्या अतिथीसी घाली भोजन।
त्याचे संकट केले निरसन। झाले अध्याय येथून सत्तावन्न ॥३०॥
संतांची आरती जे प्राणी गाती। त्यांते प्रसन्न होईल जगदीश रुक्मिणीपती।
गणेशसुत त्यांचे चरणांची माती। मागे देवा तुझ्या चरणांची जन्मोजन्मी भक्ती ॥३१॥

नामस्मरण

मुकुंद माधव गोविंद बोल। केशव माधव हरी हरी बोल ॥धृ.॥
विठ्ठल विठ्ठल बोल। विठ्ठल विठ्ठल बोल ॥१॥
राम राम बोल। राम राम बोल ॥२॥
शिव शिव बोल। शिव शिंव बोल ॥३॥
कृष्ण कृष्ण बोल। कृष्ण कृष्ण बोल ॥४॥
नारायण नारायण बोल। नारायण नारायण बोल ॥५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आमची लोकप्रिय प्रकाशने





अमोल प्रकाशन
श्रीकेशव अपार्टमेंट,
पत्र्यामारुती समोर,
४९८ / बी, नारायण पेठ,
पुणे ३० फोन : ४४३३९९०







Dr. Urmila Sharma Collection, Varanasi